**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA**
KAVATHE MAHANKAL, Dist. Sangli (Maharashtra) Pin- 416 405
**Principal Prof. (Dr.) M. K. Patil** M.Sc., M. Phil., Ph.D. Mob.**9421185277**
Phone-02341-295220 Email: kmpvp@rediffmail.com Website: www.pvpkm.ac.in
**Jr. College Index No. J 22.04.002**

# Criterion-3: Research, Innovations and Extension

## Key Indicator 3.2 Innovation Ecosystem

**3.2.1 Institution has created an ecosystem for innovations and has initiatives for creation and transfer of knowledge (patents filed, published, incubation center facilities in the HEI to be considered)**

## Transfer of Knowledge through College Magazine

## Index


| Sr. No. | Particulars | Page No |
|---|---|---|
| 1 | Vasant 2022-23 | 1-87 |
| 2 | Vasant 2021-22 | 88-125 |
| 3 | Vasant 2020-21 | 126-243 |
| 4 | Vasant 2019-20 | 244-350 |


P.V.P. Mahavidyalaya Kavathe Mahankal Dist. Sangli

PRINCIPAL
Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, K. Mahankal, Dist. Sangli

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ.

# वसंत

#data #media #economy #election #unemployment #cylinder #constitution #education #change




डॉ. एम. के. पाटील
प्राचार्य,
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ, जि. सांगली

शिक्षण प्रसारक मंडळ कवठे महांकाळ संचलित

# पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ.

# वसंत

२०२२-२३
वर्ष : ४५
अंक : ३८

## संपादन समिती

अध्यक्ष

प्राचार्य (डॉ.) एम्. के. पाटील

प्रमुख संपादक

प्रा. (डॉ.) मोहन लोंढे

## विभागीय संपादक

प्रा. विजय कोष्टी
प्रा. महेश कांबळे
प्रा. आप्पासाहेब कोळेकर
प्रा. रविंद्र पाटील

डॉ. दिलीप गाडे
डॉ. मयुर शिंदे
डॉ. धर्मेंद्र थोरात
डॉ. भगवान मोहिते

## मांडणी/ मुखपृष्ठ

डॉ. प्रा. सुरेंद्रनाथ बाबर

२०२२-२३

**।। प्रकाशनाचा काळ ।।**

वार्षिक

**।। प्रकाशक ।।**

प्र. प्राचार्य, डॉ. एम्. के. पाटील
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। मुद्रक ।।**

श्री. सुरेश नानासो पाटील
महांकाली प्रिंटींग प्रेस, कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। राष्ट्रीयत्व ।।**

भारतीय

**या अंकात व्यक्त झालेल्या विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

# अनुक्रमणिका


संपादकीय ........ ६

फोटोफिचर

प्रेरणा ........ ९

मार्गदर्शक ........ १०

संस्थापक ........ ११

मार्गदर्शक ........ १२

संचालक मंडळ ........ १३

सन्मान ........ १४

परंपरा दिन ........ १५

आधुनिकता दिन ........ १६

विविध कार्यक्रम ........ १६

क्रीडा विभाग ........ १९

राष्ट्रीय सेवा योजना ........ २०


## गद्य


| | | |
|---|---|---|
| आजची स्त्री सुरक्षित आहे का ? | विद्या दयानंद कांबळे<br>बी. ए. भाग ३ | २१ |
| ग्रामीण साहित्यिक: चारुतासागर | आरती मोरे<br>बी. ए. भाग २ | २३ |
| नवीन शैक्षणिक धोरणाचे परिणाम | संकेत संदिप इरळे<br>बी. ए. भाग ३ | २६ |

| | | |
|---|---|---|
| तमाशा: लोकप्रिय कलाप्रकार | विश्वजित अर्जुन जाधव<br>बी. ए. भाग २ | २८ |
| विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र | रोहित भिमराव आठवले<br>बी. ए. भाग २ | ३२ |
| थोर संख्याशास्त्रज्ञ सी आर राव | स्वाती दिपक चव्हाण<br>बी. एस्सी. भाग ३ | ३६ |
| विरसा मुंडा यांचे जीवन चरित्र | आरती सावंता मोरे<br>बी. ए. भाग २ | ३९ |
| मराठीतील ज्ञानपीठ मिळवणाऱ्या लेखकांचे संकलन | शिवराज श्रीकांत पवार<br>बी. ए. भाग २ | ४२ |
| देवाराई – सांस्कृतिक वारसाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन | सहाय्यक प्राध्यापक –<br>साईदीप महादेव काळेल | ४७ |
| मानस का हंस | दिक्षा उमेश वाघमारे<br>बी. ए. भाग २ | ५१ |
| अमिता | कु. मनिषा चंद्रकांत लवटे<br>बी. ए. भाग २ | ५४ |
| **Management of the stray Cattle in Rural India** | Miss. Aparna Atpadkar<br>B.Com - I | ५७ |
| **For Folk Art to Live, the Folk Artist must live** | Miss. Prajakta A. Dhole<br>B.A. - I | ६० |

| | | |
|---|---|---|
| **Make in India with the Relevance to E-waste Management** | Miss. Shraddha Vankhade<br>B.Com - I | ६३ |
| **Necessity Widening our Social Circles for Inclusiveness of Transgenders.** | Miss. Snehal Mali<br>B.A. - I | ६५ |
| **Need for Co-Farming to Accelerate the Rural Economy.** | Miss. Tejaswini Chavan<br>B.Com - I | ६८ |
| **अध्यापकनपूरक व अध्यापनेतर कार्याचा वार्षिक अहवाल** | | ७१ |

# संपादकीय

शिक्षण प्रसारक संस्था, कवठे महांकाळ संचलित पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयास या वर्षी ४५ वर्षे पूर्ण होत आहेत. दरवर्षीप्रमाणे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या वसंत या वार्षिकाचा हा ३८ वा अंक प्रसिध्द होत आहे. हे शैक्षणिक वर्ष १ आक्टोंबर २०२२ ते १७ जून २०२३ पर्यंतचे आहे.

आमच्या प्रेरणास्थानी असणारे वसंतरावदादा पाटील, संस्थापक आनंदरावदादा शिंदे यांच्या विचार कार्याची परंपरा पुढे वृद्धिंगत करणारे अध्यक्ष मा. बाळासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे.

महाविद्यालयाचे कुशल मार्गदर्शक आणि तंत्रस्नेही प्राचार्य मा. डॉ. एम्. के. पाटील यांच्यामुळे महाविद्यालयात अनेक विविध आणि नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. याशिवाय महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या मुळे हे महाविद्यालय विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करीत आहे. यासाठी कवठे महांकाळ परिसरातील पालकांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे.

महाविद्यालयामध्ये २५०० च्या आसपास विद्यार्थी-विद्यार्थिनी ज्ञानार्जन करीत आहेत. ग्रामीण भागातील एक नावारुपास आलेले, पुरोगामित्वाची जपणूक करणारे हे महाविद्यालय आहे. दुष्काळाच्या झळा पचवून, हातावर पोट भरणारा बहुसंख्य समाज असूनही शिक्षणाची ओढ लागलेला आणि शिक्षणाच्या जोरावर स्वत: ची प्रगती करु पाहणारा विद्यार्थी वर्ग महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याचे समाजभान त्यांच्या लेखनातून दिसून येते. यातूनच आजची स्त्री सुरक्षित आहे का ?, ग्रामीण साहित्यिक चारुतासागर, नविन शैक्षणिक धोरणाचे परीणाम, तमाशा : लोकप्रिय कलाप्रकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र, थोर संख्याशास्त्रज्ञ सी. आर. राव, बिरसा मुंडा यांचे जीवन चरित्र, देवराई - सांस्कृतिक वारसाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन अशा वैचारिक गद्यात्मक लेखना आणि हिंदी, इंग्रजी मधील गद्य म्हणजेच हा अंक आहे.

सामाजिक, सांस्कृतिकतेचे भान ठेवून परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय घडवला जातो. यातूनच खास अशी भूमिका घेऊन महाविद्यालयात विविध उपक्रम राबविलेले आहेत. परंपार दिना निमीत्त शाहिर देवानंद माळी आणि सहकारी यांचा पोवाड्यांचा कार्याकम, आधुनिकता दिना निमीत्त प्रा. अजितकुमार कोष्टी यांचा कार्यक्रम

झाला.

आमच्या महाविद्यालयामध्ये अनेकविध कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यामध्ये शिक्षक दिना निमीत्त डॉ. सुभाष कोठावळे यांचे व्याख्यान, आतंरराष्ट्रीय माहिती दिना निमीत्त सतीश पाटोळे यांचे व्याख्यान, वाचन प्रेरणा दिन, मराठी भाषादिन, मराठी पंधरवड्या निमीत्त अनेक व्यख्याने आयोजित करण्यात आली. अशा कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

'वसंत' हा महाविद्यालयीन कर्तृत्वाचा आरसा आहे. विद्यार्थांनी आपल्या सुप्त गुणांना वाव देत सामाजिकतेचे दर्शन आपल्या विविधांगी लेखनातून व्यक्त केले आहे. महाविद्यालयात वर्षभरात उत्तमोत्तम कार्यक्रम झाले. त्याकडे डोळसपणे पाहिले तर विद्यार्थ्यांमध्ये माणूस घडविण्याचे कौशल्य महाविद्यालयाचे सामाजिकतेची दृष्टी असणारे कुशल प्राचार्य डॉ. एम्. के. पाटील यांच्याकडे आहे. त्यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन यातून प्रस्तुत अंक पूर्णत्वास पोहचला आहे.

मुखपृष्ठ प्रा. सुरेंद्रनाथ बाबर यांनी तयार करुन दिले. त्यांचे आभार तसेच संपादक मंडळातील सर्व प्राध्यापकांनी वेळो-वेळी दिलेल्या सहकार्यासाठी त्यांचेही आभार. या अंकासाठी योगदान देणाऱ्या सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सर्व विद्यार्थी व अंक वेळेत पूर्ण करुन दिल्याबद्दल महांकाली प्रेसचे शतश: आभार, विशेष म्हणजे सुबक मांडणी साठी अतुल पाटील यांचे ही आभार !

**प्रा. (डॉ.) मोहन लोंढे**

# असे हे अण्णा भाऊ

" अण्णा भाऊ साठे यांच्या वाट्याला आलेले जीवन सहज, सोपे नव्हते. त्यांनी कधीही त्यांच्या उपेक्षित जीवनाविषयी तक्रार केली नाही की अशी कारणे सांगून लेखन थांबविले नाही. उलट त्यांनी अनेक उत्तम उत्तम कलाकृती वाचकासमोर सादर केल्या. जे जगले, भोगले आणि अनुभवले तेच साहित्यातून मांडले. ही त्यांची प्रेरणा सामान्य मानसाला त्यांच्या उपेक्षित जीवनातुन सावरुन प्रामाणिकपणे आणि धाडसाने जगायला शिकविते. त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे. अशी माणसं संघर्षमय जीवन जगतात आणि म्हणूनच ध्येयवाद आणि धाडसी, पराक्रमी आणि धैर्यवान माणसं साहित्याचा केंद्रबिंदू ठरतात. त्यांची जीवनावर मोठी निष्ठा असून त्यांना माणसे आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान असते, त्यांच्या बळावरच हे जग चालतं, त्यांची झुंज आणि यश यावर त्यांचा विश्वास आहे. या निष्ठेमुळे त्यांचे लोककलावंत म्हणून भरणपोषण झाले आहे. त्यांचे कथाविश्व, कादंबरीविश्व समृध्द झाले आहे." [१]

संदर्भ–

१ मोहन लोंढे : 'असे हे अण्णा भाऊ' हस्ताक्षर प्रकाशन गृह, नांदेड, २०२४
पृ. ६०

प्रेरणा...



# डॉ. वसंतरावदादा पाटील

## मार्गदर्शक



**श्री बाळासाहेब शिंदे**

अध्यक्ष



**श्री सुरेश पाटील**

उपाध्यक्ष



**श्री. सुदर्शन शिंदे**

सचिव

संस्थापक



# आनंदराव (दादा) शिंदे

# मार्गदर्शक



**प्रा. डॉ. एम्. के. पाटील**
प्राचार्य
५/६/२०२३



**प्रा. सौ. सिमा सुर्यवंशी**
उपप्राचार्य
कनिष्ठ विभाग



**प्रा. सुनिल तोरणे**
पर्यवेक्षक
कनिष्ठ विभाग

# संचालक मंडळ



श्री. औदुंबर पाटील



श्री. जे.वाय. भोसले



श्री. दिनकर शिंदे



श्री. एकनाथ जगताप



श्री. अशोक पाटील



श्री. तात्यासो फाकडे



श्री. गणपती शिंदे



श्री. एच. बी. पाटील



श्री. ए. जे. खोत



श्री. शहाजी पाटील



श्री. विलास नलवडे

## सन्मान



डॉ. आप्पासाहेब कोळेकर इंग्रजी विषयात
पीएच. डी. पदवी मिळाले बद्दल



डॉ. धर्मेद्र थोरात हिंदी विषयात
पीएच. डी. प्राप्तपदवी मिळाले बद्दल



डॉ. रविंद्र पाटील मराठी विषयात
पीएच. डी.प्राप्त पदवी मिळाले बद्दल



प्रा. राहुल शिंदे
सेट उत्तीर्ण



प्रा. सागर शिंदे
सेट उत्तीर्ण



प्रा. शितल पाटील
सेट उत्तीर्ण

## सेवानिवृत्ती



प्रा. बी. एन. पाटील



प्रा. एस. व्ही. कर्चे

# परंपरा दिन



कै. आनंदरावदादा शिंदे यांच्या प्रतिमेचे पुजन



भारुड



शाहीर देवानंद माळी पोवाडा सादर करताना




तालुकास्तरीय भजन स्पर्धा



रक्तदान शिबीर

## आधुनिकता दिन




हास्य सम्राट प्रा. अजितकुमार कोष्टी



पारितोषिक वितरण

## विविध कार्यक्रम




करिअर मार्गदर्शन कार्यशाळा




आरोग्य शिबीर

# विविध कार्यक्रम

## संख्याशास्त्र कार्यशाळा



प्रा. डॉ. किरण पोतदार









प्रा. सुकुमार राजगुरु



डॉ. ए. ए. कलगोंडा



सत्कार समारंभ





पुस्तक प्रकाशन सोहळा

# विविध कार्यक्रम



डॉ. प्रदीप सरवदे यांची सदिच्छा भेट




वादविवाद स्पर्धा





भिंतीपत्रक प्रदर्शन




प्रा. येवले यांचे अतिथी व्याख्यान




खेंगाट चित्रपट निर्मिती प्रक्रिया




आझादी का अमृत महोत्सव

# क्रीडा विभाग



बापू कोळेकर- महाराष्ट्र मिनी ऑलम्पिक कुस्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक




नम्रता माळी- महाराष्ट्र मिनी ऑलम्पिक मैदानी स्पर्धेत तृतीय क्रमांक



अक्षदा होळकर राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत सहावा क्रमांक, झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग



योगिता पवार व श्रुती साबळे महाराष्ट्र मिनी ऑलम्पिक शूटिंगबॉल स्पर्धेत द्वितीय क्रमांक, राष्ट्री शूटिंगबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक



सांगली विभागीय हॅंडबॉल स्पर्धेत चतुर्थ क्रमांक
वैभव सकटे, अभिजित गुजले,भंडारे जयदीप, ऋषिकेश पाटील, ऋषिकेश कदम.



राज्य शूटिंगबॉल स्पर्धेत द्वितीय क्रमांक
योगिता पवार, श्रुती साबळे, सानिका भोसले, प्रजक्ता साळुंखे, मोनिका सुखदरे.



सांगली विभागीय शुटींगबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक वैभव सकटे, अभिजित गुजले, अक्षय चव्हाण, संकेत शिंदे, चंद्रकांत नरुटे, आदर्श लोंढे, करण माळी, शंकर मलमे.



राज्यस्तरीय शालेय शूटिंगबॉल स्पर्धेत द्वितीय क्रमांक सौरभ नाईक, रोहित गुजले नियाज मुजावर, पारस कांबळे, संदीप मोरे, विक्रम भोसले, सौरभ मोरे, प्रतिक गायकवाड, अथर्व चव्हाण, गणेश जाधव, तात्यासो शिंदे.

# राष्ट्रीय सेवा योजना




शिबिराचे उद्‌घाटन प्रसंगी
मा. बाळासाहेब शिंदे यांचा सत्कार




श्रमदान




श्रमदान



श्रमदान





कमंडलू नदी परिसर स्वच्छता

# आजची स्त्री सुरक्षित आहे का ?

विद्या दयानंद कांबळे
बी. ए. भाग ३

नवीन वर्षे येत जातील, नवीन दिवस येत जातील आणि कदाचित नवे विचार देखील . बघाना, एकीकडे नवीन वर्ष सुरु झालंय आणि जुन्या विकृत आठवणी जाता जात नाहीत. एकीकडे एका मुलीला जन्माला येण्या आधी मारले जाते आणि दुसरीकडे जन्माला आल्यानंतर तिच्यावर अत्याचार करुन मारलं जातं. किती खेदाची गोष्ट आहे ही संत म्हणतात, कवी म्हणतात परस्त्रीकडे आया बहिणीप्रमाणे बघा मग तरीही अत्याचार होतातच कसे? आणि यातूनच असा प्रश्न निर्माण होतो, आजची स्त्री सुरक्षित आहे का?

शहर असो किंवा गाव आजच्या तरुणी कुठेही सुरक्षित नाहीत. मग मनात राहून राहून एकच प्रश्न निर्माण होतो याला जबाबदार कोण? पोलीस, सरकार की ती खुद्द तरुणी? दिल्लीत जे अत्याचार प्रकरण घडलं आठवल तर आजही अंगावर काटा येतो. त्यानंतर आंदोलने झाली पण गुन्हेगार तरीही मोकाट सुटलेच ना? नंतर कोपर्डी प्रकरण मग मुली सुरक्षित आहेत कुठे? दिल्ली, महाराष्ट्र की आंध्रप्रदेश कुठेच नाहीत. एका पाठोपाठ स्त्री ही स्वभावातच सोशिक आणि घाबरट असल्याने अस काही घडले तरी ती वेळीच आवाज उठवत नसल्याने नराधम चागलेच फोफावतात २०१२ मधील दिल्लीमध्ये एका तरुणीवर सामुहिक बलात्कार करण्यात आला आणि त्यातून तिचा अंत झाला. या घटनेने देशातील वातावरण ढवळून निघाले होते तिच्या प्रति आस्था वाटून मोर्चा काढला गेला. सरकारच्या निष्क्रीयतेवर टिका झाली एवढे सगळे होऊनही महिलावर, अजान मुलीवर होणारे अत्याचार बलात्कार थांबले नाहीत. उलट अजून वाढत आहेत. तरुणपणी प्रौढ वयात वासना निर्माण होणे हे नैसर्गिक आहे पण त्यावर आवर घालणे स्वत:च्या मनावर ताबा ठेवणे हा सुसंस्कृतपणा होय. वासना आणि आकर्षण यामुळे अशा घटना वारंवार घडतात कारण काहीही असली बलात्काराचे गुन्हे घडतात. मग या विकृतीकडे दुर्लक्ष करुन

चालणार नाही.

आज कित्येक तरुणी शिक्षणासाठी, नोकरीसाठी, करिअरसाठी अनोळखी शहरात एकट्या प्रवास करतात. मग अशा एकट्या मुलीला पाहून नराधमांचे डोळे विस्फारतात आणि अमानुष कृत्ये घडतात. काही गुन्हेगार पकडले देखील जातात. पण पुरेशा पुराव्यानिशी सोडले जातात. बलात्कार केल्यानंतर आपण पकडलो गेलो तरी पोलीसांना मॅनेज करु ही मानसिकता अशा गुन्हेगारांची झालेली आहे. त्यांना कायद्याची भिती नाही. बलात्काराचे खटले चालविण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केली पाहिजेत. शिवाय रस्त्यांच्या जागोजागी पोलीसांची गस्त हवी. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे हवेत. व्हिडीओ क्लिप्स, अश्लिल दृष्य यावर बंदी घालण्यात यावी. थोडक्यात म्हणजे जोपर्यंत स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबणार नाहीत. स्त्रीभ्रूण हत्यामुळे ती कालही असुरक्षित होती आणि अत्याचारामुळे आजही असुरक्षित आहे. स्त्रीयांनी स्वत:च्या संरक्षणाची काळजी स्वत: घ्यायला हवी. कोणीतरी आपले रक्षण करील या भ्रामक कल्पनेतून अन्यायाच्या विरुध्द प्रतिकार करायला शिकले पाहिजे.

# ग्रामीण साहित्यिकः चारुतासागर

आरती मोरे
बी. ए. भाग २

**प्रस्तावना-**

(जन्म-२१ नोव्हेंबर, इ. स. १९३० मृत्यु-२९ मे, इ. स. २०११) यांनी चारुतासागर या नावाने कथालेखन तर धोंडू बुवा कीर्तनकार या नावाने कीर्तने केली. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ जवळचे मळणगांव हे त्यांचे मूळ गांव तिथेच त्यांनी प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नोकरी केली होती. राष्ट्रिय पुरस्कार प्राप्त 'जोगवा' हा मराठी चित्रपट चारुता सागर यांच्या 'दर्शन' या कथेवर आधारलेला आहे.

चारुतासागर हे ग्रामीण कथालेखक म्हणून सुपरिचीत आहेत. मराठी कथा समृध्द आहेत.

चारुतासागर या नावाने त्यांनी कथालेखन केले असले तरी, त्या लेखकाचे नाव दिनकर दत्तात्रय भोसले असे आहे. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील मळणगांव येथे एका गरीब कुटुंबात झाला. तिथेच त्यांच सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. लहान वयातच पोथी-पुराण, कीर्तन यात ते रमायचे. ते अवघ्या चौदा वर्षाचे असताना आईचे छत्र हरपले. आईच्या जाण्याचा धक्का त्यांना सहन झाला नाही. ते या परिस्थितीत असाह्य झाले. त्यांच्या वडीलांचा भार कमी करण्यासाठी त्यांनी घर सोडण्याचा निर्णय घेतला. आणि पुढे चौदा वर्षे फुटेल त्या वाटेने ते भारतभर पायी भटकत राहिले. अनेक गावं-शहरं त्यानी पालथी घातली. या काळात त्यांनी पोटाची खळगी भरण्यासाठी मिळेल ती कामे केली. एका शहरात तर अगदी बेवारशी प्रेत पुरायचे काम देखील त्यांनी केले. फुटपाथवर राहुन दिवस काढण्याची वेळ त्यांच्यावर आली. कित्येकदा अपमानास्पद वागणुकीलाही त्यांना सामोरं जाव लागलं. अशी काही वर्ष घालवल्यानंतर एका गावात ते काही दिवस स्थिरावले. भारत-पाक फाळणीचा तो काळ होता. देशात दंगलीचे लोट पसरले होते. या काळात भारताने मोठ्या प्रमाणात सैन्य भरती करण्याचे ठरवले. त्यासाठी देशातील तरुणांना आवाहान करण्यात आल.ं चारुता सागर यांना वाटलं की अशी छोटी-छोटी कामे करण्यापेक्ष्या सैन्यात

का जावू नये. त्यांनी सैन्यात जाण्यासाठी अर्ज भरला. आणि त्यांची त्यात निवडही झाली. काही वर्ष सैन्यात सेवा केल्यानंतर त्यांनी परत मुलखात येण्याचा निर्णय घेतला. ते घरी आले. पण घरच्या दैन्यावस्थेत फारसा फरक पडलेला नव्हताच. सैन्यात कमवलेली थोडीफार बेगमी त्यांनी घरासाठी खर्च केली. आणी पुन्हा घर सोडले.

आडमार्गाने ते चालत राहीले. एका डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या लहानश्या खेड्यात ते पोहचले. तिथे काही लहान मुलं नुसतीच हुंदडत होती. दगड मातीत खेळत होती. इथे शाळा नावालाही नव्हती. या मुलांना मार्गी लावण्यासाठी आपण शाळा काढली तर? उगीच कुठेतरी भटकण्यापेक्षा हे काम बरं, अस त्यांना वाटलं आणी त्यांनी हा बेत तिथल्या गावकऱ्यांना सांगितला. गावकऱ्यांना तो पसंतही पडला. त्या दिवसापासून तिथल्या चार मुलांना गोळा करुन त्यांनी झाडाखाली शाळा सुरु केली. मुलं शिकू लागली. आणी चारुता सागर यांचेही गावकऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध तयार झाले. गावकऱ्यांच्या सुख:दुखाच्या गोष्टी ते ऐकू लागले. त्यांना ते वाट दाखवू लागले. तिथेच शिक्षक म्हणून ते बराच काळ रमले.

एकदा प्रवासात असताना शरदबाबुंची ींडी दीदी ही कादंबरी त्यांच्या वाचनात आली. या लिखाणाने ते प्रचंड भारावले. मग शरदबाबुंच सगळे साहित्य त्यांनी झपाटल्यागत वाचूनच काढले पण त्या वेडापायी सारी रंगभुमी ही पालथी घातली. अनुभवांवर आधारीत काही लिखाण करण्याची उर्मीही त्यांच्यात निर्माण झाली. पुढे अशाच एका पायी प्रवासात त्यांना एक बाई भेटली जी आपल्या आईच्या शोधात फुटेल त्या दिशेला रस्ता तुडवत चालली होती. त्या बाईच्या दु:खाने ते प्रचंड व्यथित झाले. तिच्या दु:खाला त्यांनी शब्दांची वाट करुन दिली. आणि त्यांच्या हातून 'वाट' ही पहिली कथा लिहीली गेली. पुढे त्यांनी सातत्याने कथालेखन करायला सुरवात केली. त्यांच्या 'नागीण' या गाजलेल्या कथेमुळे मराठी साहित्य विश्वाला त्यांची ओळख झाली. त्या कथेला उत्कृष्ठ कथेचे पारितोषिक मिळाल्यानंतर त्यांचा चांगलाच नांव लौकिक मिळाले. 'नागीण' ही सर्वांच्या भीतीने जखडलेल्या चंद्रा नावाच्या तरुण स्त्रिची कथा आहे. नवरा-बायकोच्या विश्वब्ध प्रेमाचं आणी नागजोडीच्या वेगवान वासनेचं चारुता सागर यांनी वेधक वर्णन या कथेत केलं आहे. पु. ल. देशपांडे यांनाही या कथेन भुरळ पाडली. आणि त्यांनी या नवख्या लेखकांच्या कथेच्या जाहीर वाचनाचे काही प्रयोग पुण्या-मुंबईत केले अशीच त्यांची अजून एक गाजलेली कथा म्हणजे ' दर्शन ' या कथेत त्यांनी जोगतिणींच्या आयुष्याच स्तिमित करणार दर्शन घडवलं आहे. त्याच कथेवर आधारलेला ' जोगवा ' हा मराठी चित्रपट पुढे प्रदर्शित झाला.

सत्यकथा नियतकालीकात चारुतासागर यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या. नागीण (१९८६), नदीपार (१९८६), मामाचा वाडा (१९८६), अशा तीन कथासंग्रहातून त्यांच्या सुमारे पन्नास कथा प्रकाशित झाल्या आहेत. मोजक्याच पण अतिशय मार्मिक तरल अनुभूती देणाऱ्या कथा चारुता सागर यांनी लिहिल्या. या कथा साहित्य रसिकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या. जी. ए. कुलकर्णीसारख्या श्रेष्ठ मराठी कथाकाराने त्यांच्या कथांची पारायणं केली.

चारुतासागर यांनी मराठी कथेतील अनुभवविश्वाचं क्षितीज अधिक विस्तारित करण्याचं मौलिक काम केलं. दलित, शोषित, पीडित माणसांच एक अनोळखी विश्व त्यांनी आपल्या कथांतुन उभं केल. ग्रामीण स्त्रियांच दु:ख लष्करी पेशातील लोकांचे विश्व, तसेच साधू, बैरागी, जोगती, पारधी, वैदु, डोंबारी, गारुडी,

नंदीवाले, बेरड, प्रेत उचलणारे, वाटमारी करणारे अशा समाजातील अनेक दुर्लक्षित घटकांच्या जगण्याचा, त्यांच्या दु:खाचा अतिशय खोलवर वेध त्यांनी आपल्या कथेतुन घेतला. अभावांच जीवन जगणारी ही माणसं जीवनाचे भोग निमुटपणे भोगत असतात. मोडून न पडता परिस्थितीचा स्वीकार करत ती जगत राहतात. या माणसांच विश्व त्यांनी अतिशय संवेदनशिलतेने वाचकांसमोर उभं केलं. गावगाड्यातील बदलत्या काळातील स्पंदनही त्यांनी आपल्या कथांतून सुक्ष्मपणे टिपली आहेत. मुक्या प्राण्यांची पखड आणि त्यांच माणसांशी असणारं नातही त्यांनी अतिशय हळुवारपणे आपल्या कथांतून उभं केलं. लोकजीवन आणि लोकभाषा यांचा खराखुरा जिवंत अविष्कार करणारी त्यांची कथा सामाजिक वास्तवाचा तळ दाखवताना वाचकाला अस्वस्थ करुन सोडते.

जीवनाविषयी अपरंपार कुतूहल असलेल्या चारुता सागर यांनी मराठी ग्रामीण कथा खऱ्या अर्थाने समृध्द संपन्न केली. मराठी समीक्षकांनीही त्यांच्या कथांची म्हणावी अशी दखल घेतली नाही. पण सर्वसामान्य वाचकांच्या मनात त्यांच्या कथांनी कायमचं घर केलं समाजातील एक ज्वलंत अनुभवविश्व आपल्या कथांतून साकारणाऱ्या या कथाकाराचं २९ मे २०११ ला वयाच्या एक्क्याऐंशीव्या वर्षी निधन झालं.

# नवीन शैक्षणिक धोरणाचे परिणाम

संकेत संदिप इरळे
बी. ए. भाग ३

भारतात अनेक वर्षापासून सुरु असलेले शैक्षणिक धोरण नुकतेच पुर्णपणे बदलण्यात आले. पहिले शैक्षणिक धोरण इंदिरा गांधी यांनी १९६८ मध्ये सुरु केले होते. त्यानंतर राजीव गांधी यांनीही त्यात आवश्यक ते बदल केले. १९९२ मध्ये पंतप्रधान नरसिंहराव यांनीही त्यात आवश्यक ते बदल केले. कोणतीही वस्तू एकाच ठिकाणी अनेक वर्षे पडून राहिल्यास त्यात धूळ साचते. हे जसे आपण आहोत तशीच स्थिती पूर्वीच्या शैक्षणिक धोरणाचाही होती. केंद्रातील मोदी सरकारने नव्या शैक्षणिक धोरणाला मंजूरी दिली आहे. १०+२ चे स्वरुप आहेत पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे. त्याऐवजी ५+३+३+४ स्वरुप सुरु केले जाईल. शाळेत कला, वाणिज्य, आणि विज्ञान विषयांना समान महत्व दिले जाईल. विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडू शकतात. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय असे करण्यात आले.

पायाभरणीच्या टप्प्यात सर्व प्रथम तीन वर्षांची मुले येथील पूर्व प्राथमिक शाळेत जातील. त्यात तीन ते आठ वयोगटातील मुले शिकतील. इयत्ता १ आणि इयत्ता ३ ते ५ च्या तयारीच्या टप्प्यात विभागली जातील. नवीन शैक्षणिक धोरणानुसार  आधारित शिक्षणाला चालना दिली जाईल. हा टप्पा तीन वर्षांचा असतो.

मधल्या टप्प्यात सहावी ते आठवी पर्यंतचा अभ्यास असेल. या वर्गांमध्ये विविध विषय शिकवले जाणार असून सहावीपासून व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु विषयांतर्गत दोन पर्याय दिले आहेत. एक मुलभूत आणि दुसरा इयत्ता या प्रकारचा पर्याय विद्यार्थ्याला सर्व विषयांमध्ये उपलब्ध असेल. विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार कोणताही पर्याय निवडू शकतात. बोर्डाच्या परिक्षा पूर्वीपेक्षा खूपच सोप्या झाल्या आहेत. आता परीक्षा वस्तूनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ पध्दतीनुसार घेतली जाणार आहे. अशा परीक्षा वर्षातून दोनदा घेतल्या

दोनदा घेतल्या जातील. विद्यार्थी कोणतीही एक निवडू शकतात. बोर्डाच्या परिक्षांसाठी एक विशेष प्रात्यक्षिक मॉड्युल तयार केले जाईल.

NEFT म्हणजेच राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच तयार केला जाईल जो ई-कोर्सना प्रोत्साहन देईल. नवीन शैक्षणिक धोरणानूसार मुल्यांकन केंद्र सुरु करण्यात येणार आहे. ती बोर्ड परीक्षांसाठी एक मानक संस्था म्हणून काम करेल. शालेय विद्यार्थ्यांसाठी वर्षातून सुमारे दहा दिवस बॅगलेस डे आयोजित केले जातील. ज्यामध्ये पुस्तके घेऊन जाण्याची गरज भासणार नाही. यावेळी विविध प्रकारचे इंटरशिप उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता ३, ५ आणि ८ या तीन स्तरांसाठीच परीक्षा होणार आहेत. बोर्डाच्या परीक्षा अशा पध्दतीने घेतल्या जातील की विद्यार्थ्यावर परीक्षांबाबत कोणताही दबाव येणार नाही.

विद्यार्थी त्यांच्या गरजेनुसार पदवी अभ्यासक्रम करु शकतात आणि कोणत्याही कारणास्तव सोडू शकतात. पदवी अभ्यासक्रम मल्टिपल एंट्री आणि एक्झिट होणार आहेत. माध्यमिक टप्प्यात इयत्ता नववी ते बारावी पर्यंतचा अभ्यास असेल आणि इथे मुलांना त्यांच्या कुवतीनुसार आणि आवडीनुसार विषय निवडता येतील इयत्ता सहावीपासून व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित शिक्षण दिले जाईल. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत भविष्यात एकही तरुण बेरोजगार राहणार नाही. अशा पध्दतीने विद्यार्थी तयार करण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे मुलांनी कुरकुर करणाची प्रवृत्ती संपुष्टात येईल.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार केवळ इयत्ता तिसरी, पाचवी आणि आठवीच्या परीक्षा होणार असून बोर्डाच्या परीक्षांमध्येही बरेच बदल करण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पाचवीपर्यंतच मुलांना त्यांच्या मातृभाषा, स्थानिक भाषा किंवा प्रादेशिक भाषेत शिक्षण वाचण्याचा पर्यायही असेल. मुलांनी मातृभाषेतून अभ्यास केल्यास ते अधिक चांगल्या प्रकारे शिकू शकतील आणि समजून घेऊ शकतील. त्यांचा शिक्षणाचा वेग वाढेल. त्यांचा पाया आधीच मजबूत होईल. ज्ञान हे ज्ञान असते भाषा कोणतीही असो संगीत चित्रकला या अभ्यासक्रमांचाही शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे मुलांना केवळ विषयाशी संबंधित नाही तर सर्व प्रकारचे ज्ञान मिळेल.

दहावी आणि बारावीच्या शिक्षणात बरेच बदल झाले आहेत. सीबीएसई बोर्डात दहावीच्या गणितात असा बदल करण्यात आला आहे. विद्यार्थाला कोणत्याही प्रवाहात जायचे आहे असे वाटल्यास त्याला विशेष प्रकारचे प्रमाणपत्र दिले जाईल.

विद्यार्थ्याने एका वर्षानंतर अभ्यास सोडल्यास त्याला प्रमाणपत्र दिले जाईल. जर दोन वर्षांनी प्रगत डिप्लोमा प्रमाणपत्र दिले जाईल. तीन-चार वर्षांनी त्याला पदवीचे प्रमाणपत्र मिळेल. पुर्वीच्या शैक्षणिक धोरणानुसार एखाद्या विद्यार्थ्याने मध्येच अभ्यासक्रम सोडल्यास त्याला ड्रॉप आऊट असे म्हणतात. पण आता ते होणार नाही.

**निष्कर्ष :-** नवीन शैक्षणिक धोरणांचा मुलांना आणि तरुणांना खूप फायदा होईल. यामुळे रॉट बाय पास करण्याची प्रवृत्ती नाहीशी होईल. नवीन शैक्षणिक धोरण आणण्याचा येणाऱ्या पिढीचे भविष्य उज्वल करण्याचा हाच उद्देश आहे.

# तमाशाः लोकप्रिय कलाप्रकार

विश्वजित अर्जुन जाधव
बी. ए. भाग २

तमाशा हा महाराष्ट्रातील लोकरंजनाचा लोककलाप्रकार आहे. पूर्वी उत्तर पेशवाईमध्ये तमाशाला राजाश्रय मिळाला महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेचे करमणुकीचे तमाशा हे मुख्य साधन होते. तमाशा, दसरा झाला की गावोगाव बाजाराच्या दिवशी तंबू पडायचे. पाऊस संपलेला असायचा. पाऊस संपल्यामुळे शेतकरी शेतीतील सर्व कामे आटोपून रिकामा झालेला असायचा. धान्य घरात आलेलं असायचं तो आनंदी असायचा त्याच दरम्यान गावातील बाजारात तमाशाचा तंबू पडला किंवा तमाशा आला की तो रात्री नक्कीच तमाशाला जायचा आणि तमाशातल्या मावशीच्या संवादाने आणि मित्रांच्या गप्पागोष्टींनी खळखळून हसायचा. अशी ही रांगडी गंमत म्हणजे तमाशा होय.

पेशवाईचा काळ हा तमाशाचा राजाश्रय असण्याचा कालखंड होय. त्यावेळी तमाशा हा राजांच्या दरबारात होत असे. राजे त्या बदल्यात बिदागी देत असत. एखाद्या राजाला तमाशा आवडला तर राजा त्याठिकाणी स्वत:च्या डोक्यावरचा शिरपेच काढून तमाशगीरांच्या डोक्यावर खोचायचे आणि त्या कलावंताचा सत्कार करायचे आपल्या कलेची राजाने दखल घेतली राजे महाराज खूश झाले. म्हणून तमाशगिरांची मुठभर छाती फुगायची. आणि तो आणखी आपल्या अंगात असणाऱ्या कलेचा जोमाने विकास करत महाराजांच्या बिदागीस पात्र होण्यासाठी धडपड करीत. पेशवाई संपल्यानंतर तमाशे बैलगाडीतून गावोगाव फिरत असे. व तमाशा सादर करीत. त्यावेळी फडात जास्त माणसे नसायची. एकच पात्र अनेक पात्रांची भूमीका सादर करायचा त्यावेळी शक्यतो स्त्रिया तमाशात चाळ बांधून नाचत नव्हत्या. गोरे गोमटे तरुण पोरं स्त्री वेश परिधान करुन नाचत असत. त्यावेळी स्टेज नव्हती तर मातीचा ओटा तयार करुन त्यावर तमाशाचे सादरीकरण होत असे. तेव्हा विजेचे दिवे, ट्युब, किंवा रंगबेरंगी लाईटींग नव्हती. तर उजेडासाठी गॅसबत्तीचा उपयोग केला जाई. त्यावेळी मेकअप साठी कोणतेही महागडे साहित्य उपलब्ध नव्हते. गोल डब्यातील पावडर तोंडाला लावायची आणी लाली म्हणून पानाचा

विडा चावायचा अशा पद्धतीने तमाशातील कलावंत नटत असायचे यानंतर मात्र तमाशा या लोककलेमध्ये थोडी–थोडी सुधारणा झाली.

तमाशा हा कंत्राटदारांच्या हुकूमशाहीत अडकला. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, विदर्भ, जळगाव अशा मोठ्या शहरामध्ये तमाशासाठी थिएटर निर्माण झाले. श्रीमंत माणसे किंवा व्यापारी तमाशाचे कॉन्ट्रक्ट घेऊन तमाशा थिएटरमध्ये सादर होऊ लागला. तमाशगिरांना थिएटरच्या सुपाऱ्या मिळत असत. ज्या तमाशामध्ये जास्त माणसे नाचकाम करणाऱ्या स्त्रिया जास्त त्यांची सुपारी जास्त असायची. जो तमाशा जास्त लोकरंजन करील त्याला मोठ्या
पैशाची सुपारी मिळायची. तमाशा हा लोकप्रकार बंदिस्त नाही तो उघड्यावर पाहण्याची कला आहे. परंतु कंत्राटदारांनी ही लोककला थियटरमध्ये बंद करुन या कलाप्रकाराचे खूप मोठे नुकसान केले. कारण कंत्राटदारांच्या तालावर या तमाशाच्या मालकाला नाचावे  लागे. तो तमाशगीरांचे शोषण करीत होता त्यामुळे तमाशा व तमाशा कलावंतालाही उतरती कळा लागली.

## तमाशाचे प्रकार:

तमाशा हा लोककलेचा प्रकार आहे. महाराष्ट्रात ही लोककला प्रचंड प्रसिद्ध आहे तमाशा म्हंटल की ग्रामीण भागातील जनतेची मनोरंनाची मेजवानीच असायची. प्रत्येक भागात म्हणजे महाराष्ट्रात अनेक प्रकारचे तमाशे असायचे.

## १) झाडाखालचा तमाशा:

सकाळी नऊच्या सुमारास गावाच्या पाराजवळ मंदीरासमोर शाळेच्या चौथऱ्यावर किंवा भैरोबाच्या मंदीराच्या प्रांगणात ढोलकी व हलगी सुरु होते व आवाजाने गावातील रसिक जागा होतो. मोकळ्या जागेत गर्दी करुन तमाशा पाहतो. लहान मुले तरुण मुले, मध्यमवयीन  माणसे, म्हातारे असे प्रत्येकजण तमाशा बघायला येत. प्रथम गण नंतर गवळण, बतावणी, लावण्या, पोवाडे, सिनेमातील गाणी, आणी शेवटी वगाला सुरवात होते. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक अशा विषयावर वगनाट्य सादर होते. त्यावेळी तरुण वर्ग आपली जागा सोडतो. आणि मध्यम वर्गीय म्हणुन प्रौढ मंडळी गर्दी करुन संपूर्ण वगाचा आस्वाद घेतो. झाडाखालचे तमाशे प्रामुख्याने सातारा, कराड, सांगली, कोल्हापूर इ. ठिकाणी पहायला मिळायचे. छाया आगर नागजकर, दत्तोबा तिसंगीकर, बायना सातारकर अशी कितीतरी नावे सांगता येतील

## २) कनातीतील तमाशा:

कनातीतील तमाशा हा झाडाखालच्या तमाशापेक्षा वेगळा आहे. कनातीच्या तमाशाला जाहिरात करावी लागते तमाशाचे पोस्टर बाजारात, शाळेत भिंतीला, झाडाला लावले जायचे त्याचबरोबर जीपला पोष्टर लावून चटपटीत भाषेत आवाज करीत  गावातून बाजारातून जीप फिरवली जायची. आणि असल्या तमाशाची खास वैशिष्ट्ये कोणती, सोंगाड्या कोण, सिनेतारखा म्हणून एखाद्या

नर्तिकेचा उल्लेख अशी जाहिरात केली जात असे. कनातीच्या तमाशात १२० ते १५० कलाकारांची संख्या असायची. कनातीचे तमाशे देवी देवतांच्या यात्रेच्या दिवशी असायचे. तमाशा एक रांगडी गंमत ह्या पुस्तकातील प्रकरण क्रमांक ५ मधील पृष्ठ क्र. ९७ मध्ये गण संपताच रंगीबेरंगी ताणून नऊवारी नेसलेली भडक रंग लावलेल्या आणि पाटमोऱ्या होऊन पदराचे दोन टोक दोन्ही हाताच्या बोटात धरुन स्त्रिया नाचायला सुरवात करतात तरूण वर्ग मात्र जीव मुठीत धरुन मान उंच करुन नृत्य आणि नृत्यांगना न्याहळत असतो, शिट्या मारीत असतो. गुंडाचा त्रास रोजच सहन करावा लागतो. उभ आयुष्य तमाशगिरांना उघड्यावर काढावे लागते. कलावंत म्हणून ते कितीही श्रेष्ठ असले तरी प्रतिष्ठा किंवा सन्मान त्यांना दिला जात नाही. अनेक कलावंत हे घरदार सोडुन मुलं-बाळं सोडून सात-आठ महिने घराबाहेर असताना अनेक कलावंताची मुलं शाळेपासून वंचित राहतात. नाचणाऱ्या स्त्रियांकडे तर अतिशय तुच्छतेने पाहिले जाते. त्या पुरुषांना जाळ्यात ओढतात, नादी लावतात, माणसांचे संसार उध्वस्त करतात, एखाद्या श्रीमंत पाटलाच्या पोराला फसवतात हा दृष्टिकोन ठेवला जातो. एखादा कलावंत अचानक मृत्यू पावला तर त्याच्या अंत्यसंस्कारासाठी गावकऱ्याकडून वर्गणी गोळा करावी लागते. तमाशा ही जिवंत कला आहे. परंतू तिला मातीत घालण्यात प्रयत्न आज चालू आहे असे मत श्रेष्ठ लावण्यवती ' कांताबाई सातारकर ' यांचे आहे. या स्त्रिया बहुगुणी आहेत परंतु त्यांची दखल शासन घेत नाही. तमाशातील शिवकन्या बडे नगरकर मुलगी लावणी करते, ढोलकी वाजवते, पेटी वाजवते, ड्रम वाजवते, सायकल चालवते, ट्रक चालवते, कोणतीही गाडी चालवते तरीही माणूस म्हणून तिला प्रतिष्ठा मिळाली नाही. शब्बीर मनियार म्हणतात तमाशात सुरवातीला कलाकार असतो. नंतर हळुहळू वेठबिगार होतो. लावणीसम्राज्ञी मंगला बनसोडे म्हणतात " तमाशासाठी मी माझ आख्खं कुटुंब घेऊन भ्रमंती करते. पण कोणीही नाचनारी स्त्री म्हणूनच आमच्याकडे पाहतात असे असेल तरी, एक गोष्ट विसरुन चालत नही ती म्हणजे तमाशा ही अशी लोककला आहे की अनेक जाती धर्माचे, वंशाचे लिंगाचे लोक एका तंबुत सुखाने नांदतात. कोणताही भेदभाव नसतो. जातपात काही नसते. सर्व जाती ह्या एकाच पंगतीला जेवायला बसतात. एकाच ताटात जेवतात. श्रेष्ठ कनिष्ठ कोणताच भेद नाही. स्वयंपाक करणारा वाढणारा कोणत्याही जातीचा असू शकतो. त्यांच्या हाताची चव सगळे आनंदाने चाखतात. एकाच ताटात सगळे जेवायला बसतात. अशी मुक्त कला महाराष्ट्राची शान आहे. महाराष्ट्राचा गौरव आहे. महाराष्ट्राच लेणं आहे. त्याची आपण सर्वांनी जोपासना केली पाहिजे तरच या कलेला मानाचे स्थान प्राप्त होईल."

## ३) खडीगंमत:

पश्चिम महाराष्ट्रात व मराठवाडा या भागात स्त्रिया चाळ पायात बांधून नाचतात. विदर्भ, भंडारा, चंद्रपूर, गोंदीया भागात पुरुषच साडी नेसुन नाचतात. त्यांना नाच्या म्हणतात. त्या तमाशाचे खास वैशिष्ठ्य म्हणजे हा तमाशा वर्षातून एकदा गावात येतो. या तमाशात सर्वसाधारण नऊ कलावंत असतात. शाहीर हा मुख्य कलावंत असतो.

## ४) कोकणातील तमाशा:

हा तमाशा गुढी पाडवा या दिवशी असतो अंधार पडल्यावर सुंदर तरुण मुलांना साडी नेसवली जाते. गावाच्या चैथऱ्यावर दोन तंबोरे, दोन डफ, मृदंग, पेटी या वाद्यावर हा तमाशा सुरु होतो. मुली,महिला,मुले तमाशा पहायला गर्दी करतात. गण, गवळण, लावण्या आणि वग असे या कोकणातील तमाशाचे स्वरुप आहे.

## ५) भारुडाचा तमाशा:

भैरवनाथाच्या जत्रेला भारुड तमाशा ठेवायची परंपरा असते. मुळशी, मावळ, आंबेगाव या कोकणातील गावात हा तमाशा ठेवण्याची परंपरा असायची. गवळण, गाणी, लावण्या, वग असे या तमाशाचे स्वरुप असायचे यामध्ये स्त्री कलावंत असतात. भारुडाबरोबरच हिंदी गाणी व लावण्या म्हंटल्या जातात. हा तमाशा सात-आठ तास चालतो. हलगी, ढोलकी, टाळकरी, पिपळ्या इ. वाद्य या तमाशात वाजवली जातात.

संदर्भ

१) तमाशा एक रांगडी गंमत - संदेश ज्ञानेश्वर भंडारे
२) मराठी लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य - नामदेव व्हटकर
३) आण्णाभाऊ साठे - यांचे पोवाडे व लावण्या

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र

रोहित भिमराव आठवले
बी. ए. भाग २

**जन्म :** १४ एप्रिल १८९१, मध्य प्रदेशातील इंदूरजवळील महू येथे झाला.
**मूळ गांव :** आंबवडे (जि. रत्नागिरी)
डॉ. बाबासाहेबांचे वडील लष्करात सुभेदार पदावर काम करत होते. त्या दरम्यान बाबासाहेबांचा जन्म महू येथे झाला.
**मूळ नांव :** भीमराव रामजी सपकाळ उर्फ आंबावडेकर
**आईचे नांव :** भीमाबाई
डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या आई-वडीलांचे १४ वे शेवटचे अपत्य होते.
**शिक्षण :** प्राथमिक शिक्षणासाठी काही काळ दापोली व त्यानंतर साताऱ्यातील ॲग्रीकल्चर स्कूल (एलिमेंटरी स्कूल/प्रतापसिंह स्कूल) मध्ये प्रवेश. या शाळेतील कृष्णाजी केशव आंबेडकर या प्रेमळ गुरुजींनी बाबासाहेबांना आपले आंबेडकर हे नांव स्वीकारन्यास सांगीतले.
**१९०५ :** रमाबाई यांच्याशी विवाह
**१९०७ :** मुंबईच्या एल्फिन्सटन हायस्कूलमधून मॅट्रीक परिक्षा उत्तीर्ण
**१९१२ :** अर्थशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय घेऊन बाबासाहेब एल्फिन्सटन कॉलेजमधून बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण
**जानेवारी १९१३ :** बडोदा संस्थानात काही काळ नोकरी
**२ फेब्रुवारी १९१३ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पितृशोक. बडोद्यास जाण्यास नाकारले.

**उच्च शिक्षण** : महाराष्ट्र सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या दरमहा रु. २५ च्या शिष्यवृत्तीच्या आधारे जुलै१९१३ ते जुलै १९१६ या काळात बाबासाहेबांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला.
**एम. ए. पदवी १९१५** : Administration & Finance of East India Company हा प्रबंध कोलंबिया विद्यापिठात सादर केला व एम. ए. ची पदवी संपादन केली.
**पी. एच. डी. पदवी १९१६** : कोलंबिया विद्यापिठाची पी. एच. डी. पदवी मिळविण्यासाठी Administreation & Finance of East India Company बाबासाहेबांनी हा प्रबंध लिहिला
**ऑक्टोबर १९१६** : लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमीक्स मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश घेतला. दरम्यान शिष्यवृत्तीची मुदत संपल्याने वर्षभरातच त्यांना भारतात परतावे लागले.
**१९१७ साली** : Evolution of Provincial Finance in British India ब्रिटीश भारतातील प्रांतीक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती या नावाने प्रसिध्द झाल्यावर त्यांना कोलंबिया विद्यापिठाची पी. एच. डी. पदवी मिळाली.
**१९१७** : मुंबईत वर्स कॉलेज या खाजगी व्यापारी शिक्षण संस्थेत काही काळ अर्थशास्त्र, बँकींग व कायदा विषयाचे अध्यापन केले.
**नोव्हेंबर १९१८** : मुंबईच्या सिडनेहॅम कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्ती. सिडनेहॅम कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्र हा विषय शिकवत असत.
**सप्टेंबर १९२०** : या वर्षीच राजर्षी शाहूंच्या आर्थिक सहाय्यामुळे बाबासाहेब पुढील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी इंग्लंडला रवाना झाले.
**१९२१** : लंडन विद्यापिठाची एम.एस.सी. पदवी प्राप्त.
**१९२३** : लंडन विद्यापिठाची डी.एस.सी ही पदवी विषय द प्रॉब्लेम ऑफ रुपी (भारतीय रुपयाचा प्रश्न)
याच दरम्यान बाबासाहेबांनी काही काळ बॉन विद्यापिठात कायद्याचा अभ्यास केला.
**१९२३** : बॅरिस्टर ची परीक्षा उत्तीर्ण
**१९२४** : भारतात परतल्यावर काही काळ मुंबई उच्च न्यायालयात वकीली.
**१९२८** : मुंबईतील शासकीय विधी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य.
**१९३५ ते १९३८** : या काळात मुंबईतील शासकीय विधी महाविद्यालयाचे प्राचार्य.
**२७ मे १९३५** : बाबासाहेबांच्या प्रथम पत्नी रमाबाई यांचे निधन झाले.
**१५ एप्रिल १९४८** : डॉ. शारदा कबीर या ब्राम्हण विदुषीशी दुसरा विवाह. लग्नानंतर सविता आंबेडकर असे नांव
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक सुधारणा** : जुन १९२८ डिप्रेस्ड क्लासेस एजुकेशन सोसायटीची स्थापना.
**१९४६** : मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना
या संस्थेमार्फत मुंबई येथे सिध्दार्थ कॉलेज (१९४६) तर औरंगाबाद येथे मिलींद कॉलेजची (१९५०) ला स्थापना केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय कारकिर्द :**

**१९२६ ते १९३६** : मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाचा सदस्य म्हणून नियुक्ती.

**१९३३** :बाबासाहेबांनी विधीमंडळात ग्रामपंचायत बिलावर भाषण केले.

**१९३० ते १९३२** : लंडन येथील तीन्ही गोलमेज परिषदांना अस्पृष्य बांधवाचे प्रतिनिधी म्हणून बाबासाहेब उपस्थित होते.

बाबासाहेबांनी गोलमेज परिषद दलित बांधवांना प्रोटेस्ट हिंदू किंवा नॉन कनकर्मिस्ट हिंदूचा दर्जा मिळावा अशी मागणी केली.

**२४ सप्टेंबर १९३२** : महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेउकर येरवडा कारागृहात ऐक्य करार

**१९४२ ते १९४६** : या काळात गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळावर मजूरमंत्री म्हणून नियुक्ती.

डॉ. बाबासाहेब आंबेउकर बंगाल प्रांताच्या विधीमंडळातून घटना समितीवर निवडून आले.

**२९ ऑगस्ट १९४७** : संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड

**१९४७** : स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या मंत्रिमंडळात कायदामंत्री

**१९४८** : स्हिंदू कोड बिलाची निर्मिती.

**१९५१** : हिंदू कोड बिलास विरोध झाल्याने बाबासाहेबांनी मंत्रीपदाचा त्याग केला.

* मार्च १९५२ मध्ये डॉ. बाबासाहेब राज्यसभेवर निवडून आले.

* कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्री असताना बाबासाहेबांनी १९४२ ते १९४६ या कालावधीसाठी पुर्नबांधनी व पुर्नवसन योजना राबवली पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आधार घेण्यात आला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा :**

* व्हू वेअर द शुटज (शुध्द कोण होते)
* **Federation Versus Freedom -(1939)**
* अनटचेबलस ॲण्ड इंडियण कान्स्टिट्युशन
* स्मॉल होल्डींग्ज इन इंडीया ॲण्ड देअर रिमेडिज (१९१८)
* **The Children of India's hetro**
* डॉ. बाबासाहेबांचे आत्मचरित्र **(wating for a visa)**
* **What Congress & Gandhi have done to the antochables**
* बूध्द ॲण्ड हिज धम्म
* थॉटस् ऑन पाकिस्तान
* स्टेट ॲण्ड मायनॉरिटीज
* रिडल्स इन हिंदू इसम
* रानडे, गांधी आणि जीना
* कास्मत इन इंडीया
* थॉटस् ऑन लिग्पीस्टिक स्टेटस्

**अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशन** : १८ जुलै १९४२ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाचे रुपांतर अ. भा. शेड्युल कास्ट फेडरेशन या पक्षात झाले. (पक्ष मुख्यालय नागपूर)

* ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशनच्या स्थापनेमागे आप्पा दुराई यांची प्रेरणा होती.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संस्था :**

**२० जुलै १९४२ :-** बहिष्कृत हित करणी सभा मुंबई येथे या सभेची स्थापना झाली.

बहिष्कृत हितकरणी सभेचे ब्रीदवाक्य :- **शिका, चेतवा, व संघटित व्हा**

**१९२७ साली :-** समज समता संघ

**१९२८ साली :-** या संघातर्फे समता, जनता व प्रबध्द भारत ही पते सुरु केली.

**१९५५ :-** बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंड्यिा ची स्थापना

डॉ. बाबासाहेब यांनी केलेले महत्वाचे सत्याग्रह

**२० मार्च १९२७ :** चवदार तळे सत्याग्रह

**२५ डिसेंबर १९२७ :** मनुस्मृती धर्मग्रंथाचे दहन

**२ मार्च १९३० :** नाशिक येथील काळाराम मंदीर सत्याग्रह

**१९३३ :** हिंदू धार्मीक ग्रंथाच्या पारायणासाठी भुखंड येथे सत्याग्रह

**डॉ. बाबासाहेब यांनी शेतकऱ्यासाठी केलेले कार्य :-**

**१४ एप्रिल १९२९ :-** चिपळूण येथील शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद बाबासाहेबांनी भुषविले

**१० जानेवारी १९३८ :-**दामोदर खोरे परियोजना ही संकल्पना मांडली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर**

**१३ ऑक्टोबर १९३५ :** येवला (जि. नाशिक) येथे प्रतिज्ञा हिंदू म्हणून जन्माला आलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही.

**१४ ऑक्टोबर १९५६ :-** नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आपल्या हजारो अनूयायांसह बौध्द धर्माची दिक्षा घेतली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती :-**

| | | |
|---|---|---|
| * गौतम बुध्द | * संत कबिर | * महात्मा फुले |
| * रुसी | * थॉमस पेन | * अब्राहम लिंकन |
| * नेपोलियन बोनापार्ट | * जे. एस. मिल | |

**बाबासाहेबांना अवगत असलेल्या भाषा :-**

* मराठी * हिंदी *इंग्रजी * फारशी * गुजराती * पाली * संस्कृत * बंगाली * जर्मन * कॅन्च

# थोर संख्याशास्त्रज्ञ सी आर राव

स्वाती दिपक चव्हाण
बी. एस्सी. भाग ३

सी. आर. राव यांचा जन्म कर्नाटकातील हुविना हडगल्ली येथे झाला. त्यांचे वडील सी. डी. नायक व आई लक्ष्मीकांताम्मा. वडील निवृत्तीनंतर कुटूंबासह आंध्रप्रदेशातल्या विशाखापट्टणम येथे स्थायिक झाले. यांचे संपूर्ण नांव सल्यामपुडी राधाकृष्ण राव.

राव यांचे महाविद्यालयापर्यंतचे सर्व शिक्षण विशाखापट्टणम येथे पार पडले होते. सी. आर. राव यांनी गणितातील पहिली एम. ए. पदवी आंध्र विद्यापीठातून तर भारतीय सांख्यिकी संख्येत (आय. एस. आय.) कोलकाता येथे नोकरी करत असताना दुसरी एम. ए. पदवी कोलकाता विद्यापीठातून मिळवली. कोलकात्यातील अँग्लो–इंडियनांच्या मानववंशशास्त्रीय अभ्यासासाठी सांख्यिकी पध्दत विकसीत करण्यात रावांचा सहभाग होता. त्या कामामुळे महालनोबीसांचे अंतर वापरुन अफ्रिकेच्या सुदानमधील, जेबेल माया प्रदेशांतील लोकांचे मुळ स्थान शोधून काढण्याचे काम करण्यासाठी राव यांना केंब्रीजमधील पुरातत्वशास्त्र आणि मानववंशशास्त्र संग्रहालयाने निमंत्रित केले. तरी त्या २७९१ थडग्यांत दफन केलेले ३१३५ मानवी सांगाडे व प्राणी यांच्या शरीरांच्या विविध भागांच्या मानांची (Measures) आधारसामग्री अभ्यासण्यासाठी रावांनी बहुविध मानांच्या विश्लेषणाच्या नव्या पध्दती निर्माण केल्या.

सी. आर. राव यांनी 'Statistical problems of Biological classifications' या शीर्षकाचा प्रबंध सादर करुन केंब्रीज विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळवली. त्यांचे मार्गदर्शक होते प्रसिध्द संख्याशास्त्रज्ञ आर. ए. फिशर. प्रचरण विश्लेषणाचे (Analysis of variance, ANOVA) सामान्यीकरण केलेले बहुचल प्रचरण विश्लेषण आणि कसोट्या रावांनी त्या सांगाड्यावर काम करताना विकसीत करुन प्रकाशित केल्या. यथावकाश त्यांच्या प्रकाशनांवर समशील–समिक्षणे मागवूण केंब्रिज विद्यापीठाने त्यांना डी. एम. सी. पदवी आणि ऑनररी लाईफ ऑफ किंग्ज कॉलेज, केंब्रिज हा दुर्मिळ सन्मान दिला.

रावांची जगप्रसिध्द असमानता (Rao Inequality) विकसित होण्यास कारण ठरला. त्यांच्या एका विद्यार्थ्यांचा प्रश्न पूर्वग्रहमुक्त आकलन वापरुन शक्य असलेल्या न्युनतम प्रचरणासाठी (Variance) काटेकोर असमानता अस्तित्वात असेल का? त्याच्या सिध्दतेसाठी त्यांनी दोषाचे (error) अचुक प्रगणन केले. सी. आर. राव म्हणतात की,

जादूने स्वप्न प्रत्यक्षात येत नाही त्यासाठी
घाम, जिद्द आणि मेहनत करावी लागते.

सकाळी लवकर उठून मेनबत्तीच्या उजेडात काम करण्यापासून, कागदावर हाताने आकडमोड करण्यापासून, १९४४ च्या एका रात्रीत त्यांच्या प्रसिध्द असमानतेचा शोध लावण्यापर्यंत सी. आर. राव हे गेल्या सात दशकांमध्ये सांख्यिकी विज्ञानातील जागतिक नेत्यांपैकी एक आहेत.

सी. आर. राव यांच्या कार्यामुळे संशोधनाची अनेक नविन क्षेत्रे खुली झाली. त्यांच्या क्रेमर-राव असमानता राव-ब्लॅकवेलीझेशन सारख्या त्यांचे नाव असलेल्या अनेक नव्या तांत्रिक संज्ञा उदयास आल्या त्यातील (cramerrao bound) हेझेनवर्गच्या अनिश्चिततेच्या तत्वाचे अधिक सुस्पष्ट आहे. त्याशिवाय Global (Bayesian) cramerrao bound complexfied and Intrinsic cramer-Rao Bound, Blackwell versions of cross validation and nonparametric bootstrap) अशा कित्येक संकल्पना त्यांच्या नांवे आहेत.

फिशर-रा रिमानियन टुरिक ही अनेक विज्ञान शाखांना मिळालेली महत्वाची देणगी आहे. यामुळे फिशर-राव रिमानियन भुगणितीय आकाराच्या प्रगणनासाठी एक किफायतशीर साधन शास्त्रज्ञांना मिळाले. रावांची आणखी एक उपलब्धी म्हणजे अनंतवर्ती प्राप्तांक कसोटी संभव कसोटी विकसित करणे ही होय. ही कसोटी संभव कसोटी (likelihood tests) and (wald test) यांना उत्तम पर्याय ठरली. या तीनही कसोट्या अलौकीक त्रयी मानल्या जातात.

काही शोधनिबंधाच्या मालिकेतून राव यांनी चयनीकृत मांडण्या (combinatorial arragements) म्हणजेच लंब रचना (orthogonal arrays) विकसित केल्या. त्यांचा वापर रावांनी प्रायोगीक अभिकल्पांत (Design of Experiments) करुन दाखविला. यांचा विशेश अभ्यास करण्यासाठी जणनी अभियंता आणि संख्याशास्त्रज्ञ, तगुची (Taguchi, ISS) मध्ये आले होते. त्यावरुन सध्याच्या उद्योग व्यवसायात प्रसिध्द असलेल्या तगुची पध्दती तयार केल्या ज्या विविध परिस्थितीत सर्वाच्च उत्पादन देण्यास मदत करतात.

संभाव्यता वितरणांचे लक्षणचित्रण सुनिश्चित करण्यातील रावांचे मोठे योगदान त्यांच्या chracterization problems in Mathematical Statistics या सहलेखीत पुस्तकातून पुढे आले. त्यातून रावांचे Raos Damage Model, Rao-Rubin Theorem, kagan, Linnic and rao Theorems या गोष्टीही सांख्यिकीला मिळाल्या. निवृत्तीनंतर १९८० मध्ये अमेरिकेत गेल्यावर राव यांनी तेथील विद्यापीठांत अध्यापन आणि संशोधन केले. Jacob Burbea यांच्या सहकार्याने राव यांनी माहितीची आणि विविधतेची माने (Measures) यांची मालिका निर्मिती आणि त्या मानांच्या गुणवैशिष्टांचा अभ्यास केला. (ANODIV) चे सामान्यीकरण असलेली ॲनालिसिस ऑफ डायव्हर्सिटी (ANODIV) ही नवी कसोटी त्यांनी विकसित केली. प्रचरणाचे सर्वसामान्यमान म्हणून त्यांनी व्दिघाती एन्ट्रॉपी (quadratic entropy) शोधली. एळाद्या भुभागातील कार्यात्मक विविधता किंवा असमानता मोजण्यासाठी ही कसोटी पर्यावरणशास्त्रज्ञ

पर्यावरणशास्त्रज्ञ वापरतात.

गणितांतील फलीय समीकरणाच्या (Functional equation) क्षेत्रांत रावांनी संकलन केले. (integrated cauchy) फलीय समीकरणे शोधले. संभाव्यतेच्या मानांची गुणवैशिष्ट्ये निश्चित करण्यासाठी तसेच सांख्यिकी विश्लेषणातील आधारसामग्रीच्या प्रसंभाव्य प्रतिमानिकरणाच्या (stochastic modelling) समस्या सोडविण्यात याची मदत होते. रेषीय प्रतिमानासाठी त्यांनी लघुतम वर्गाची एकत्रिकृत (unified) उपवली शोधली. संविशेष असताना किंवा नसतानाही (singwar or not) सामान्यीकृत व्यस्त सारणी (generalized inverse of matrix) तयार करणे ही रावांची गणितातील एक भरीव कामगिरी होय.

संख्याशास्त्र, गणित आणि अर्थमितीशास्त्रावरील तीस पुस्तकांचे ते लेखक किंवा सहलेखक आहेत. त्यांच ४७५ शोधनिबंध, जागतिक किर्तीच्या नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांना जगभरातील विविध देशांतील शैक्षणिक संस्थांकडून ३८ मानद डॉक्टरेट प्रदान केलेल्या आहेत.

२००० मध्ये अमेरिकेतील केंटच्या महापौरांनी १३ मे हा सी. आर. राव दिवस म्हणून घोषीत केला. संख्याशास्त्रात अद्वितीय भर घालण्याबद्दल राव यांना सॅम्युअल एस. विल्कस पदक अमेरिकन स्टॅटिस्टिकल ॲसोसिएशनचे डिस्टिंग्विड अचिव्हमेंट पदक भारत सरकारचे पद्मभुषण आणि पद्मविभूषण, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते नॅशनल मेडल ऑफ सायन्स पुरस्कारभारतातील विज्ञानाकरिता इंडिया सायन्स ॲवॉर्ड हा सर्वोच्च पुरस्कार आणि रॉयल सोसायटीचे गाय पदक देण्यात आले. भारत सरकारने त्यांच्या गौरवार्थ राव पुरस्कार प्रस्थापित केला होता.

गणित, संख्याशास्त्र आणि संगणक शास्त्रातील संशोधनाला प्रोत्साहन मिळावे यासाठी त्यांनी हैद्राबाद विद्यापिठाच्या प्रांगणात सी. आर. राव ॲडव्हान्स्ड इन्स्टिट्युट ऑफ मॅथेमॅटिक्स, स्टॅटिस्टिक्स, कम्प्युटर सायन्स (CRRAO AIMSCS) ही संस्था साकारली. हैदराबाद विद्यापिठामध्ये संख्या सांख्यिकीचे राष्ट्रीय संग्रहालय उभारण्यामागे राव यांचे नियोजन होते.

डॉ. राव हे केवळ गणिती सांख्यिकि शास्त्रज्ञचं नव्हते तर त्यांनी इतर क्षेत्रात क्रांती घडूवून आणली होती व प्रतीभावान बुध्दी आणी प्रगल्भ नम्रता या दोन्हीयुक्त अशी दुर्मिळ व्याक्ती देखील होती.

अशा या थोर शास्त्रज्ञांना मृत्यू २२ ऑगस्ट २०२३ रोजी झाला.

# विरसा मुंडा यांचे जीवनचरित्र

आरती सावंता मोरे
बी. ए. भाग २

प्रस्तावना

भारतीय आदिवासी नेते आणि स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांनी ब्रिटीश नियंत्रणाविरुध्द लढा दिला. ते एक दूरदर्शी होते, ज्याने आपल्या जमातीच्या लोकांच्या मुक्तीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. जे नियमितपणे ब्रिटीशांच्या गुन्ह्यांचे आणि शोषणाचे बळी होते. बिरसा हा रोजगार शोधत असलेला तरुण असताना, त्यांच्या गावावर ब्रिटीशांकडून अत्याचार होत असल्याचे त्यांना आढळून आले, ज्यामुळे त्यांना विविध समस्यांचे ज्ञान मिळवण्यास मदत झाली.

बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंडमधील उलिहातू या गावी १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झाला. त्यांचे शिक्षण जर्मन मिशनरी स्कूल मध्ये झाले. सगळ्यांमध्ये मिळून मिसळून राहण्याचा बिरसाचा स्वभाव होता. त्यामुळे तरुण वयात त्यांनी समवयस्क आणि समविचारी सहाकार्यांचे संघटन केले. बिरसांना आपल्या वडिलांचे सुगन मुंडांचे जबरदस्तीने धर्मांतर केल्याबद्दल ख्रिस्ती मिशनऱ्यांचा व इंग्रजांचा मनस्वी राग येत असे. त्यातच अशिक्षित आदिवासींवर इंग्रजांकडून होणारा अत्याचार पाहून इंग्रज अधिकाऱ्यांना धडा शिकवण्याचा विचार त्यांनी केला. बिरसा मुंडाने छोटा नागपूर क्षेत्रात इ.स. १८९५ साली लढा उभारला. इंग्रजांनी त्याला अटक केली व तुरुंगात अतोनात छळ केला. ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांचा रांची कारागृहात मृत्यू झाला. बिरसा मुंडा यांना लोकांनी जननायक हा किताब बहाल केला.

१. शाळा सोडल्यानंतर ब्रिटिश नियंत्रणाविरुध्द पहिला संघर्ष

लोकांनी बिरसा या स्वातंत्र्यसैनिकांना त्यांच्या शैक्षणिक पराक्रमामुळे जर्मन शाळेत प्रवेश घेण्याचा आग्रह केला. तथापि, बिरसा मुंडा यांचे नाव बदलून बिरसा डेव्हिड असे करण्यात आले कारण त्यांना ख्रिश्चन शाळेत प्रवेश घेण्यासाठी ख्रिश्चन व्हावे लागले. जर्मन मिशन स्कूल सोडण्यापूर्वी त्यांनी काही काळ अभ्यास केला. कारण सावकार आणि ब्रिटीश सरकारने केलेल्या गुन्ह्यांविरुध्द बिरसा यांची बंडाची भावना ती लहानपणापासूनच धगधगत होती.

२ बिरसा मुंडा यांना तुरुंगात टाकले

बिरसा मुंडा यांनी जनतेला उध्दट जमीनमालकांविरुध्द शस्त्रे उालण्यास प्रवृत्त केले. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या हे लक्षात आले आणि त्यांनी त्यांना जमाव जमवण्यास मनाई केली. बिरसा यांच्या म्हणण्यानुसार मी माझी जबाबदारी पार पाडत आहे. त्यामुळे पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र स्थानिकांनी त्यांना वाचवले. लवकरच त्यांना पुन्हा एकदा ताब्यात घेण्यात आले आणि हजारीबागमध्ये दोन वर्षे तुरुंगात टाकण्यात आले. नंतर त्यांना पदासाठी न जाण्याचा इशारा देऊन सोडण्यात आले.

३ बिरसा मुंडा यांचे कर्तृत्व

बिरसा मुंडा यांचे कुटुंब १८८६ ते १८९० पर्यंत सरदारविराधी कारवायांमुळे प्रभावित झालेल्या चाईबासा येथे वास्तव्यास होते. या कृतींचा त्याच्यावर परिणाम झाला आणि त्यांनी सरदारविरोधी चळवळीला पाठिंबा देण्यास प्रवृत्त केले. सरदारांच्या मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी, त्यांच्या कुटुंबाने १८९० मध्ये जर्मन मोहिमेतील त्यांचे सदस्यत्व सोडले. नंतर ते पोराहाट प्रदेशाच्या संरक्षित जंगलात मुंडांच्या पारंपारिक अधिकारांना प्रतिबंधित करणाऱ्या अन्यायकारक कायद्यांविरुध्दच्या लढ्यात सक्रिय झाले. १८९० च्या सुरुवातीला भारतावर संपूर्ण ताबा मिळवण्याच्या ब्रिटिश कंपनीच्या योजनांबद्दल त्यांनी लोकांना शिक्षित करण्यास सुरुवात केली. कृषी ऱ्हास आणि सांस्कृतिक परिवर्तन या दुहेरी समस्यांविरुध्द बंड करणारे यशस्वी नेते म्हणजे बिरसा मुंडा. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी चळवळींना वाव मिळाला आणि ब्रिटिशांविरुध्द अनेक निदर्शने झाली. या मोहिमेने आदिवासी लोकच खरे जमीनदार आसल्याचे दाखवून दिले आणि मध्यस्थ आणि ब्रिटिशांना बेदखल करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आकस्मिक निधनानंतर अळेर आंदोलन थांबले. तथापि, वसाहती सरकारला कायदा करण्यास भाग पाडल्यामुळे ते अत्यंत महत्त्वपूर्ण होते. डिकांना स्थानिक लोकांची जमीन सहजतेने(बाहेरील) घेण्यापासून रोखण्यासाठी. याव्यतिरिक्त, ते आदिवासी लोकांच्या लवचिकतेसाठी आणि ब्रिटीश राजाच्या पूर्वग्रहांना झुगारुन त्यांच्या शौर्यासाठी उभे होते. म्हणून आजही बिरसा मुंडा हे धरती बाबा म्हणून पूज्य आहेत.

४ उलगुलनची घोषणा

ब्रिटीश येण्याआधी, झारखंडींनी झारखंडवर नियंत्रण ठेवले, परंजु ब्रिटीश राजवट लागू झाल्यानंतर, झारखंडच्या स्थानिक लोकांना त्यांचे स्वातंत्र्य आणि स्वायत्तता गमावण्याची भीती वाटू लागली. शेकडो वर्षांपासून, आदिवासींनी जमीन, पाणी आणि जंगले यांचा वापर त्याच्या बाहेरील जीवन जगण्यासाठी केला आहे. आदिवासींनी समाज इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा आपल्या स्वातंत्र्य आणि हक्कांबाबत अधिक जागरुक असल्याचे मानले जाते. असे करणे म्हणजे बाकीचे सर्व काही गमावणे असे असूनही ते स्वातंत्र्याची भावना जपण्यासाठी झटत होते आणि धडपडत होते. ब्रिटिशांनी आदिवासी लोकांचे पाणी, जंगल आणि जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा उलगुलन नावाची चळवळ झाली.बिरसा यांनी उलगुलानाला ब्रेकजा, तुमच्या देशात परत जा, असे ओरडून प्रेरित केले, जसे की इतर स्वातंत्र्यसैनिक ज्यांनी नंतर त्यांच्याच नागरिकांना असेच वाक्य बोलून प्रेरित केले. याव्यतिरिक्त, असे मानले जाते की बिरसा मुंडाच्या आधीच्या प्रत्येक उठावाचा उद्देश जमीन संरक्षित करणे हा होता. मात्र, बिरसा मुंडा यांनी तीन अडथळे पार करुन यश मिळवले. त्यांनी प्रथम पाणी, जंगले आणि जमीन यासह नैसर्गिक

संसाधने वाचवण्याचा प्रयत्न केला. तिसरे म्हणजे, त्यांनी त्यांच्या समाजाच्या परंपरा जपण्याचा प्रयत्न केला. दुसेर, त्यांना महिलांचे संरक्षण करायचे होते.

५ ब्रिटिश लोकांमध्ये चळवळ

१८९४ मध्ये सर्व मुंडांना एकत्र करुन ब्रिटिश सरकारचे भाडे माफ व्हावे यासाठी बिरसा यांनी मोहीम सुरु केली. १८९५ मध्ये त्यांना ताब्यात घेण्यात आले आणि हजारीबाग मध्यवर्ती कारागृहात दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. दोन वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर, बिरसाची सुटका झाली आणि त्यांना समजले की त्यांना बंड करण्याशिवाय पर्याय नाही. कारण आदिवासींना ब्रिटिश सत्तेने कायद्याच्या बहाण्याने वेठीस धरले आहे. त्यांच्यापासून सुटकेची मागणी करणे निरर्थक आहे.

६) ब्रिटिश आणि बिरसा मुंडा संघर्ष

१८९७ ते १९०० या काळात मुंडा लोक आणि ब्रिटिश सैन्य यांच्यात युध्दे झाली. इंग्रजांनी बिरसा आणि त्यांच्या अनुयायांच्या नाकाखाली ठेवले होते. ऑगस्ट १८९७ मध्ये बिरसा आणि त्यांच्या ४०० बागधारी माणसांनी खुंटी पोलिस स्टेशनवर हल्ला केला. १८९८ मध्ये टांगा नदीच्या काठावर, मुंडा ब्रिटिश सैन्याशी लढाईत गुंतले. या लढाईत सुरुवातीला ब्रिटीश सैन्याचा पराभव करण्यात आला, परंतु नंतर अनेक स्थानिक टोळी प्रमुखांना परतफेड म्हणून ताब्यात घेण्यात आले.

डोंबारी टेकडीवर, जानेवारी १९०० मध्ये आणखी संघर्ष झाला ज्यामध्ये असंख्य महिला आणि मुलांचा मृत्यू झाला. बिरसा तेथे आपल्या जाहीर सभेला संबोधित करत फेब्रुवारी १९०० रोजी चक्रधरपूर येथे ताब्यात घेण्यात आले. ९ जून १९०० रोजी बिरसा यांचे रांची तुरुंगात निधन झाले. बिहार, ओरिसा, झारखंड, छत्तीसगड आणि पश्चिम बंगाल या आदिवासी भागात बिरसा मुंडा यांना अजूनही देवता म्हणून पूज्य मानले जाते.

७) बिरसा मुंडा बद्दल विशेष माहिती

बिरसा हे एकमेव आदिवासी प्रमुख ज्यांचे चित्र संसद भवनात दाखवले आहे. बिरसा सात्विक राहणीमान, परस्पर सहाय्य आणि बंधुभाव हा आपला धर्म मानत. जेव्हा ते लहान होते आणि शेवटी लाकडातून स्वत:ची बासरी तयार केली. लहानपणापासूनच, बिरसाच्या टीकेने क्रांतिकारी विचार तसेच आपल्या लोकांबद्दल प्रेम आणि भक्ती व्यक्त केली, ज्यामुळे त्यांचे पालक घाबरले.

८) बिरसा मुंडा यांचा मृत्यू

बिरसा मुंडा यांचा मृत्यू ३ मार्च १९००, बिरसा(चक्रधरपूर) च्या आदिवासी गनिमी सैन्यासह माकोपाई जंगलात ब्रिटिश सैन्याने ताब्यात घेतले. ज्या ठिकाणी बिरसा यांनी ठेवण्यात आले होते तेथे ९ जून १९०० रोजी वयाच्या २५ व्या वर्षी रांची तुरुंगात त्याचे निधन झाले. ब्रिटीश सरकारने कॉलरा हे मृत्यूचे कारण म्हणून सूचीबध्द केले होते. सरकार मात्र रोगाशी संबंधित कोणतीही लक्षणे दाखवण्यात आपयशी ठरले. त्यांना विषबाधा झाल्याची कुजबुज सुरु होती.

बिरसा मुंडा यांची स्मारके

असंख्य संस्था, शाळा आणि ठिकाणे त्यांचे नाव घेतात. बिरसा इन्स्टि्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बिरसा कृषी विद्यापीठ, प्रसिध्द आहेत. झारखंड मध्ये बिरसा मुंडा विमानतळ आणि बिरसा मुंडा ऍथलेटिक्स स्टेडियम आहेत.

# मराठीतील ज्ञानपीठ मिळवणाऱ्या लेखकांचे संकलन

2. In primary or in Highschool level government and board of studies should introduce the topic of Sex education so students can identity and accept the fact that the trans community or even LGBTQ Community is part of our society.
3. The normalization of different choices trough NGO camps and systematic acceptance of separate and difference of Gender.

## Need for Co-Farming to Accelerate the Rural Economy.

Miss. Tejaswini Chavan
B.Com - I

**Introduction:**

Initially, Co-farming makes looking after our bodies and our minds easier for everyone and more about healthy ecosystems and nature when you farm in harmony with nature, you produce tastier, safer, and healthier food that doesn't cost the earth more about ecosystems. In addition, present research strives to give solution for farmers problem of loan as well as the model for co-operative society in context of farming.

**The objective of the Research:**

- To provide more sustainable model of co-operative societies in farming and introduce social grounds for financially independent farming society.
- To acknowledge the middle class, lower middle class and poor farmers the importance of Co-farming which offers similar advantages as co-working in town.
- Co-farming offers a solution to the problems of isolation. It is not only about a physical space, it is about establishing a community of like-minded, that 'we' call family just like a traditional family running a farm in Egypt, we believe that the best way to cooperate is to share land, water, knowledge, experience, and yields. Co-farming is more than only crop-sharing.

**Hypothesis:**

Although India has widely called as Agricultural nation, one can often see the social, psychological and economic imbalance between Indian Farmers & other strata's of the society. Moreover, due to huge population the ration of land holding is getting to lesser and lesser in day by day. So, in order to improve standard of living and uplift the most undervalued asset of the nation co-farming will be the best option.

**Social Relevance of the study:**

Social farming is gaining increasing attention from multiple stakeholders in Europe because it can generate serval socio-economic benefits, for farming households too. The research which is part of a project carried out by a healthcare authority in Friuli Venezia Giulia region to investigate social farming in the local area is the first attempt to analyze social farm results.

**Problems:**

Farming is defined as growing crops or keeping animals for communication. The main example of farming is raising dairy cows and business of cultivating land and raising stocks etc.

1) What are solutions for farmers' problems?
2) How do farmers solve problems?
3) The main problems faced by farmers?
4) What are the common problems in farming?

**Solution of the problems:**

The main economic objective is increasing per capita often their low level of education and lack of communication has resulted in a general lack of awareness regarding modern research and inventions in the agriculture sector.

1) Getting the right seeds
2) Sowing at the right time
3) Water supply/monsoon
4) Marketing for good prize
5) Harvesting at the right time
6) Make rural areas developed
7) Growing farming

**Ojebakareigomu Co-operative Society Model, 2018**



According to this model co-farming model can be implemented in rural part of India. The model shows that co-operative societies can benefit the community to have income, savings, job creation, can able to buy household assets and farming assets like instruments in order to achieve financial, social and cultural stability.

**Conclusion:**

- There is concern that agriculture production in developing countries in cause environmental threats in the future as production will have to increase to satisfy the growing demands for food.
- An important part of these inputs leak from the system in the form of nutrient leaching to groundwater and gaseous losses to the atmospheric pressure on the existing agricultural land may increase to growing demand.
- The idea of co-farming is to compel 20 to 25 like-minded farmers and initiate the farming and Agri based business so they can be financially and politically as well as economically independent.
- To have financial independence as well as social preference farmers can decide the rates for their product as well as co-product.

# अध्यापनपूरक व अध्यापनेतर
# कार्याचा वार्षिक अहवाल
# २०२२-२३

# सांस्कृतिक विभाग

सन २०२२-२०२३ या शैक्षणिकवर्षामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करणेत आले. याशिवाय इतर महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या स्पर्धा आणि कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्सफुर्त सहभाग नोदविला.

* सांस्कृतिक विभाग (मराठी विभाग, संख्याशास्त्र विभाग, शा. शिक्षण विभाग, राज्यशास्त्र विभाग, कै. आनंदराव दादा शिंदे स्पोर्टस् असोशिएशन, एन. एस. एस. वाणिज्य इ. च्या संयुक्त विद्यमाने)

महाविद्यालयात वेळोवेळी आयोजित केलेले विविध कार्यक्रम खालीलप्रमाणे.

१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लो. टिळक पुण्यतिथी : ०१/०८/२०२२

२) हर घर तिरंगा अभियाण कार्यक्रम : ०८/०८/२०२२

३) आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा : ९/०८/२०२२

४) स्वराज्य महोत्सव (National anthem singing) : ९/०८/२०२२

५) अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा : १२/०८/२०२२

६) स्वातंत्र्य दिन : १५/०८/२०२२

७) आरोग्य तपासणी शिबीर आणि चर्चसत्र : १८/०८/२०२२

८) शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम- व्याख्याते- डॉ. सुभाष कोठावळे : ०५/०९/२०२२

९) करिअर मार्गदर्शन कार्यशाळा- प्रमुख मार्गदर्शक-प्रा.शशिकांत पाटील सांगली १००९/२०२२

१०) कै. आनदराव दादा शिंदे यांच्या जयंतीनिमित्त दि. १२ ते १८ सप्टेंबर २०२२ परंपरा दिन साजरा करण्यात आला यानिमित्त रांगोळी, निबंध, वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या तसेच दिनांक १८/०९/२०२२ रोजी श्री देवानंद माळी आणि सहकारी यांचा पोवाड्याचा कार्यक्रम.

११) जात पडताळणी शिबीराचे आयोजन : २२/०९/२०२२

१२) आंरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त मा. सतीश पाटोळे यांचे व्याख्यान : २८/०९/२०२२

१३) महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान - गांधी विचारधारा- प्रा. श्रीकांत फाकडेयांचे व्याख्यान : ०२/१०/२०२२

१४) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन कट्टा व वाचन प्रेरणा दिन आणि प्रा. राकेश वानखेडे यांचे ऑनलाईन व्याख्यान : १६/१०//२०२२

१५) सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती एकता दिन पोस्टर प्रदर्शन : ३१/१०/२०२२
१६) पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती : १४/११/२०२२
१७) बिरसा मुंडा यांची जयंती, आदिवाशी जनजातीय दिन : १५/११/२०२२
१८) संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे– मा. प्रा. बाळासाहेब भोसले कुरुंदवाड : २६/११/२०२२
१९) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन : ०६/१२/२०२२
२०) राष्ट्रीय मतदार दिन : २४/०१/२०२३
२१) छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती : १९/०२/२०२३
२२) आधुनिकता दिन निमित्त पारितोषिक वितरण आणि सांस्कृतीक कार्यक्रम दि. ९ आणि ११ मार्च २०२३
२३) महात्मा ज्योतीराव फुले जयंती निमित्त प्रा. जे. वाय. भोसले यांचे व्याख्यान : २७/०२/२०२३
२४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ. विनोद कांबळे यांचे व्याख्यान : १४/०४/२०२३
२५) शाहूमहाराज स्मृती शताब्दी निमित्त व्याख्यान प्रा. गौतमीपुत्र कांबळे : ०६/०५/२०२३
२६) शिवस्वराज्य दिन निमित्त प्रा. सुरेश पोळ यांचे व्याख्यान : ०६/०६/२०२३
२७) छ. शाहू महाराज जयती निमित्त प्रा. हरिप्रसाद पवार यांचे व्याख्यान : २६/०६/२०२३

महाविद्यालयात आयोजित इतर विशेष उपक्रम

१) माजी विद्यार्थी स्नेह मेहावा

दि. २७/१०/२०२२ रोजी (दिवाळी पाडवा) महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेह मेळावा आयोजित करणेत आला. याप्रसंगी अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांमध्ये चर्चा आणि पुढील कार्याविषयी आखणी करण्यात आली.

२) ४२ वा शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव सहभाग

दि. १२/१०/२०२२ रोजी ४२ वा शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव घेण्यात आला यामध्येमहाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

३) आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रम

दि. ९ ऑगस्ट २०२२ रोजी आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

४) आंतरराष्ट्रीय महिला दिन : ८ मार्च २०२३

जागतिक महिला दिनानिमित्ताने मा. सौ. मनिषा शेटे यांचे महिला सक्षमीकरण या विषयावा व्याख्यान.

डॉ. दिलीप गाडे
सांस्कृतिक विभाग

# जिमखाना अहवाल

प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी महाविद्यालयाच्या खेळाडू विद्यार्थ्यांनी विविध खेळाच्या स्पर्धेत विशेष प्रविण्य प्राप्त केले. यामध्ये अक्षदा होळकर हिने गुवाहाटी येथे झालेल्या राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत सहावा, मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत व्दितीय तसेच चेन्नई येथे झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग घेतला. नम्रता माळी हिने पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र मिनी ऑलम्पिक मैदानी स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. विजय बजबळे याने औरंगाबाद येथे झालेल्या आंतर विद्यापीठ सायकलींग स्पर्धेत सहभाग घेतला. योगिता पवार व श्रुती साबळे यांनी आंध्रप्रदेश येथे झालेल्या राष्ट्रीय शुटींगबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक, उस्मानाबाद येथे झालेल्या राज्य शुटींगबॉल स्पर्धेत व्दितीय क्रमांक व जळगाव येथे झालेल्या महाराष्ट्र मिनी ऑलम्पिक शुटींगबॉल स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळवला. सानिका भोसले, प्राजक्ता साळुंखे, मोनिका सुखदरे यांनी उस्मानाबाद येथे झालेल्या राज्य शुटींगबॉल स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळवला. बापू कोळेकर याने पुणे येथे

झालेल्या महाराष्ट्र मिनी ऑलम्पिक कुस्ती स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळवला. साद जमादार याने सांगली येथे झालेल्या शालेय राज्यस्तर वेटलिफ्टिंग स्पर्धेत तृतीय व सिंधुदुर्ग येथे झालेल्या झोनल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. संघात वैभव सकटे, अभिजीत गुजले, अक्षय चव्हाण, संकेत शिंदे, चंद्रकांत नरुटे, आदर्श लोंढे, करण माळी, शंकर मलमे, हे होते तर महाविद्यालयाच्या हँडबॉल झोनल स्पर्धेत चतुर्थ क्रमांक मिळवला. त्या संघात वैभव सकटे, अभिजीत गुजले, भंडारे जयदिप, पाटील ऋषिकेश, कदम ऋषिकेश हे होते. जळगाव येथे झालेल्या शालेय शुटींगबॉल स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने व्दितीय क्रमांक तसेच कोल्हापूर विभागीय व सांगली जिल्हास्तरीय शुटींगबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. त्या संघात सौरभ नाईक, रोहित गुजले, नियाज मुजावर, पारस कांबळे, संदीप मोरे, विक्रम भोसले, सौरभ मोरे, प्रतिक गायकवाड, अथर्व चव्हाण, गणेश जाधव, तात्यासो शिंदे हे होते. सांगली जिल्हास्तरीय शालेय शुटींगबॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने व्दितीय क्रमांक मिळवला त्या संघात प्राजक्ता थोरात, प्रियांका कांबळे, महेक अत्तार, वर्षा शिंदे, श्रावणी पवार, सरिता आलदी, साक्षी भोसले, सानिका मंडले, सानिका सरवदे, सिमरन पिंजारी, प्राजक्ता पाटील, निकिता बाबर हे होते. शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. त्या संघात गणेश जाधव, सौरभ मोरे, अथर्व चव्हाण, किरन रास्ते, तात्यासो शिंदे, प्रविण पवार, रोहन आठवले, विक्रम पाटील, शुभम शिंदे, स्वप्नील जगताप हे होते तर खो खो स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळवला त्या संघात अनिकेत पाटील, अविनाश हुबाले, आदित्य ढोबळे , आदित्य सरवदे, इमरान कोतवाल, ऋषिकेश पाटील, प्रथम पाटील, प्रमोद करे कांबळे, म्हाळाप्पा कनप विजय पाटील, विठ्ठल खांडेकर, सुदर्शन पाटील, संकेत बोरीगिड्डे, सौरभ मोरे, संकेत शिंदे हे होते, तसेच महाविद्यालयातील खेळाडुंनी कुस्ती, बुध्दिबळ, मैदानी, खो खो, कबड्डी, सायकलींग या स्पर्धामध्ये सहभाग घेतला.

डॉ. मयुर शिंदे
जिमखाना विभाग प्रमुख

# Statistics Department Report

In the academic year 2022-23 there are 80 students in B.Sc. I, in B.Sc. Part II, and 20 in B.Sc. III, In B.Com. II are 162 students and in B.A.I (S.T.D.) 57 students.

The following activities were implemented on behalf of the department during the year.

**Participation in various programs :-**

Student of the department participated in various programs arranged in the college from time to time.

**A)** National Statistics Day 2023 and Birth anniversary of Prashant Chandra Mahalanobis is celebrated in Department. : 29 June 2023

**B)** Celebrated Prof. Dr. C. R. Rao's 102nd birthday : 10 September 2022

**C)** One day Workshops :-

1. Organized a one day workshop on Revised syllabus of B.Sc. I (Statistics) on Monday 5th December 2022.

**D)** Poster Presentation competitions on occasion of "prof. Dr. C.R. Rao's 102nd birthday and Dr. V. S. Huzurbazar's 103rd birth anniversary"

**E) Lectures / Program Attendance :**

I) Celebrated Dr. A.P.J. Abdul Kalam's birth anniversary : 15/10/2022

II) Teacher's Day :- 5 Sep 2022

III) Celebration Rajashri Shahu Maharaj Jayanti. : 26 June 2022

Vi) Celebrated B. R. Ambedkar Jayanti : 14 Apr 2023

Vii) Celebrated National Mathematics day (Ramanujan Jayanti) : 22 December 2022

**F) Guest lectures :**

1. Mr. R. N. Kharade guided the students of B.Sc. I, II, III (Statistics) on topic "Career in statistics." (Date : 09th November 2022)
2. Mr. A. M. Yelpale Guided students of B.Sc. I, II, III (Statistics) on topic "importance of basic sciences course." (Date : 09th November 2022)
3. Dr. Santosh Babare guided the students of B.Sc. I, II, III (Statistics) on the "Statistics is Auxiliary Science of History" (date : 9 January 2023)
4. Mr. Rushikesh Jagtap guided the students of B.Sc. II, III (Statistics) about "Introduction to Python Programming language" (Date : March 2023)
5. Prof. (Dr.) Sarjerao Powar guided the students of B.Sc. III (Statistics) about "Florence Nightingale : A Statistician" (Date : 12 May 2023)

6. Dr. Annasaheb Suryawanshi guided the students of B.Sc. III (Statistics) about "Applications of Software's in Statistics (Date : 15 May 2023)

Guest Lecture Under MoU

1. Guest lecture arranged for B.Sc. III (Statistics) Students of P. V. P. Mahavidyalaya Kavathe Mahankal & Adarsh Mahavidyalay Vita by Mr. S. V. Rajguru on the "Analysis of Non-Normal Data" (date : 5 December 2022)

Visit :

1. Visit by scientist Dr. Pradip Sarvde. (Date : 08/032023)
2. Visit by LIC committee (19 May 2023)

G) Special activities :-

1. Students Participation :

1. One day national Webinar on "Testing of Hypothesis Techniques using R-software" on 15 th March 2023 at 11:00 a.m.

2. For B.Sc. I & III students "Certificate Cours in MS-Excel"

3. "Intarnational Conference on Recent Advances in Applied Statistics" on Friday 10th March 2023

2. Students Research Articles :

Paper Presented in international conference "International Conference on Recent Advances in Applied Statistics" on Friday 10th March 2023

1. Statistical Analysis of Milk Production in Rural area of kavathe Mahankal Tehsil.
2. Statistical Anaylsis of Demand of Bakery Products in sangli district.
3. The Statistical Analysis of Bike User' in Kavathe Mahankal Tehsil.
4. Statistical Preception towards the Online Shopping in the Kavathe mahankal Tehsil.
5. Consumer's Preception towards Himalaya product on Kavathe Mahankal Tehsil.

3. Study Tour : (date : 03/04/2023 to 04/04/2023)

4. Student Teacher Meeting : (Date : 1 September 2022)

5. Farewell Function (date : 10 June 2023)

Mr. V. V. Koshti
Associate Professor

Prof. (Dr.) M. K. Patil
Head, Department Of Statistics

# Teacher's Report

P. M. Patil (Statistics)

| Sr. No. | Activity | Organized by | Duration |
|---|---|---|---|
| 01 | One day Workshop on Revised Syllabus of B.Sc. I | P.V.P. Mahavidyalay K. Mahankal | 05/12/22 |
| 02 | Attended one day Workshop on Biodiversity & Tourism | | 2702/23 |
| 03 | Attended one day International Conference (Paper presented) | Adarsh Mahavidyalay Vita | 10/03/23 |
| 04 | Attended one day Workshop | Mudhoji College Phaltan | 15/03/23 |
| 05 | Attended one day National Conference (Paper presented) | Dr. Ganpatrao Deshmukh Mahavidyalay Sangola | 06/07/23 |
| | **Examination Work** | | |
| 01 | Junior Supervision | P.V.P. Mahavidyalay K. M. | |
| | | | |
| | | | |
| 05 | Paper Setting B.Sc. II Sem. III, Sem. IV, 1 sets | P.V.P. Mahavidyalay K. M. | Feb 23 |
| 06 | Expert at B.Sc. III Practical, B.Sc. III | | 7,8/5/23<br>12 to 15/5/23<br>07 to 09/06/23 |
| 07 | Examiner at B.Sc. II Practical | | |

# Teacher's Report

G. D. Satpute (Statistics)

| Sr. No. | Activity | Organized by | Duration |
|---|---|---|---|
| 01 | One day Workshop on Revised Syllabus of B.Sc. I | P.V.P. Mahavidyalay K. Mahankal | 05/12/22 |
| 02 | Attended one day Workshop on Biodiversity & Tourism | | 2702/23 |
| 03 | Attended one day International Conference (Paper presented) | Adarsh Mahavidyalay Vita | 10/03/23 |
| 04 | Attended one day Workshop | Mudhoji College Phaltan | 15/03/23 |
| 05 | Attended one day National Conference (Paper presented) | Dr. Ganpatrao Deshmukh Mahavidyalay Sangola | 06/07/23 |
| | **Examination Work** | | |
| 01 | Junior Supervision | P.V.P. Mahavidyalay K. M. | |
| 02 | External examine at B.S. III Practical | KWS Sangli | 21 to 25/05/23 |
| 05 | Paper Setting B.Sc. II Sem. III, Sem. IV, 2 sets | | Feb 23 |
| 06 | Expert at B.Sc. III Practical, B.Sc. III | P.V.P. Mahavidyalay K. M. | 7,8/5/23 12 to 15/5/23 |
| 07 | Examiner at B.Sc. II Practical | | 07 to 09/06/23 |
| 08 | Practical Paper Setting B.Sc. II, 1 Set | | 07 to 09/06/23 |

# Teacher's Report

V. V. Satpute (Statistics)

| Sr. No. | Activity | Organized by | Duration |
|---|---|---|---|
| 01 | Attended Conference ISMS | KIMS Karad | 24/11/22 |
| 02 | One day Workshop on Revised Syllabus of B.Sc. I | P.V.P. Mahavidyalay K. Mahankal | 05/12/22 |
| 03 | One day Workshop on Effective documentation for NAAC | | 02/01/23 |
| 04 | Attended one day Workshop onBiodiversity & Tourism | | 27/02/23 |
| 05 | Attended one day International Conference (Paper presented) | Adarsh Mahavidyalay Vita | 10/03/23 |
| 06 | Attended one day Workshop | Mudhoji College Phaltan | 15/03/23 |
| 07 | Attended one day National Conference (Paper presented) | Dr. Ganpatrao Deshmukh Mahavidyalay Sangola | 06/07/23 |
| | **Examination Work** | | |
| 01 | Junior Supervision | P.V.P. Mahavidyalay K. M. | |
| 02 | CAP - B.S. III | Willigdon College Sangli | 17,18/1/23<br>12,13/6/23 |
| 03 | Internal Examiner | P.V.P. Mahavidyalay K. M. | 20 to 28/01/23<br>03 to 06/06/23 |
| 04 | Paper Setting B.Sc. I, II Sem. I, Sem. II, 3 sets | | Feb 23 |
| 05 | Paper Setting B.A. I, Sem. I, Sem. II, 3 sets | | Feb 23 |
| 06 | Paper Setting B.Sc. III Sem. V, 03 sets | Shivaji University | May 23 |
| 07 | Paper Setting B.Sc. II Sem. V, 1+1 sets | P.V.P. Mahavidyalay K. M. | May 23 |
| 08 | Expert at B.Sc. I Practical, B.Sc. III | | 7,8/5/23<br>12 to 15/5/23 |
| 09 | Internal Examiner at B.Sc. II Practical | | 07 to 09/06/23 |
| 10 | Assessment B.A.I, B.Sc.I, Sem, II Unit tests | | 3 to 6/5/23 |
| 11 | Paper Setting B.Sc.I, Sem, I, Sem II 4 Sets | | May 23 |
| 12 | Paper Setting B.A.I, Sem, I, Sem II 4 Sets | | |
| 13 | Paper Setting B.Sc.II, Sem, III, Sem IV 2 Sets | | |
| 14 | Practical Paper Setting B.Sc.II, 1 Set | | |
| 15 | Admission Committee B.Sc. I | | June 2023 to |
| | **Other** | | |
| 01 | Syllavus subcommittee meeting - B.Sc. II | Shivaji University | 2104/23 |
| 02 | Subject Expert College Teacher selection | Y. C. S. College Karad | 26/04/23 |
| 03 | Subject Expert College Teacher selection | Shashikant Shinde College Medha | 04/08/23 |
| | **Achivements** | | |
| 01 | Published 100+ articles in leading newspapers In Maharashtra on various topics, E-content Develop | | |
| 02 | Arranged Study tour, Progect work, Guest Lectures, Visit, Alumni meet, student, dept. meetings etc. | | |

**Prof. (Dr.) M. K. Patil 2022-2023**
Department of Statistics, P. V. P. Mahavidyalay, kavatheMahankal

## * Participation in Workshop / Seminar / Webinar

| Sr. No. | Title | Agency/Institute | Date |
|---|---|---|---|
| 1 | International Conferen on Recent Advances Applied Statisti ICRAAS-2023) | Adarsh College, Vita<br>* Presented a Paper entitled "The Statistical Analysis of Bike user's in Kavathe mahankal Tehsil"<br>* Chaired Technical Session -T3 | 10th March 2023 |
| 2 | Testing of Hypothesis technique using R softwqre | Mudhoji College Phaltan | 15th March 2022 |
| 3 | Atal Bhujal Yojana | Bhujal Sarveksham Adani Vikas Yantrar Maharashtra Shashan | 14th August 2022 |
| 4 | Organized one day workshop on "Revised Syllabus of B. Sc. I Statistics" | Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalay, Kavathe Mahankal | 5th December 2022 |

**Books Published for B. Sc. I (Revised Syllabus NEP-2020)**

| Sr.No. | Name of the book | ISBN | Authors |
|---|---|---|---|
| 1 | Descriptive Statistics I | 978-93-90546-37-4 | Dr. M. K. Patil |
| 2 | Elementary Probability Theory | 978-93-90546-44-2 | Dr. K. G. Potdar |
| 3 | Descriptive Statistics II | 978-93-90546-78-7 | Dr. A. A. Kalgonda |
| 4 | Descrete Probility Distrabutions | 978-93-90546-77-0 | Dr. A. V. Dorugade |

*** Member of the following committee's formed by Shivaji University, Kolhapur**

(I) Member of DRC and RAC committee in Statistics.
(ii) Member of Expert Commottee.
(iii) Member of preparation Academic Audit format Committee.
(iv) Placement committee Co-ordinator of the teachers in Stage 2 / Stage 3 / Stage 4 / Stage 5
(v) Subject Expert in Placement committee Stage 2 / Stage 3 /Stage 4 / Stage 5
(vi) Member of scrutiny committee of the placement of the teachers.

# कला, वाणिज्य व विज्ञान विभाग

## सिनीअर विभाग

## प्राचार्य – डॉ. एम्. के. पाटील

### इंग्रजी

**प्रा. कांबळे एस्. एस्.** एम.ए., नेट

**प्रा. शिंदे एन. पी.** एम.ए.,सेट, नेट, गेट

**डॉ. सोलगे एस. पी.** एम.ए.,बी.एड., एम.फिल, सेट,पीएच. डी.

**प्रा. कु. सावनूरकर आशिया** एम.ए.,सेट

### मराठी

**प्रा. डॉ. लोंढे एम्. जी.** एम.ए.,एम्.फिल.,पीएच. डी.

**प्रा. राठोड ए. बी.** एम.ए.,सेट, नेट(जेआरएफ)

**डॉ. अंदेलवार एस. एल.** एम.ए.,बी.एड.,सेट, पीएच. डी.

**डॉ. शिंदे ए. एस्.** एम. ए.,एम्.फिल, पीएच. डी.

**प्रा. सुर्यवंशी एस. व्ही.** सेट

**डॉ. पाटील रविंद्र** एम.ए, बी. एड., सेट, पीएच. डी.

**प्रा. कु. इमडे ए. आर** एम.ए.,बी. एड. सेट, नेट

### हिंदी

**डॉ. थोरात डी. पी.** एम.ए.सेट,नेट, पीएच. डी.

**डॉ. शिंदे व्ही. एस.** एम. ए. पीएच. डी.

### अर्थशास्त्र

**प्रा. सकट के. एल.** एम.ए., नेट

**प्रा. वसावे आर. आर.** एम.ए., सेट

**प्रा. पाटील सी.बी..** एम. ए. बी. एड.,सेट

### शारीरिक शिक्षण

**प्रा. भोसले ए. पी.** एम.पी.एड्.

### वाणिज्य विभाग

**डॉ. मोहिते बी. एच.** एम.कॉम. पीएच.डी.

**प्रा. माळी पी. आर.** एम.कॉम.,एम.बी.ए., एम.फिल.,नेट

**प्रा. माने ए. एम.** एम.कॉम., सेट, नेट

**प्रा. खांडेकर ए. एम.** एम. कॉम.

**प्रा. शिंदे एस. एम.** एम.कॉम., सेट

### इतिहास

**प्रा. पोळ एस्. एन्.** एम.ए.

**प्रा. पवार एच. व्ही.** एम. ए., सेट

**प्रा. एनापूरे के. जी.** एम. ए., सेट

### भूगोल

**डॉ. कुंभार टी. ई.** एम.ए. पीएच. डी.

**डॉ. पोळ एन्. एस्.**
एम.ए.एम्.फिल., पीएच. डी.

**डॉ. गाडे डी. ए.** एम.ए., पीएच. डी., नेट

**प्रा. गोडसे डी. एम.** एम.ए.,सेट

**प्रा. माळी ए. एम.** एम. ए., सेट

**प्रा. घाटगे व्ही. पी.** एम. ए., सेट

**प्रा. माने एस. जी.** एम. ए., सेट

### राज्यशास्त्र

**प्रा. वाघमारे एन. एस.** एम.ए.

**प्रा. फाकडे एस्. एन.** एम.ए.

**प्रा. पवार आर. एन.** एम.ए. सेट

### समाजशास्त्र

**प्रा. बाबर एस. ए.** एम.ए., एल.एल.बी., नेट, सेट(जेआरएफ)

**प्रा.सौ. पवार एस. एस.** एम. ए.

**प्रा. यादव एस. एस** एम. ए.

### मानसशास्त्र

**डॉ. कांबळे व्ही. डी.** एम.ए., सेट, नेट, पीएच.डी.

**डॉ. सुर्यवंशी एम्. एस्.** एम.ए.एम्.फिल.,पीएच.डी.

**प्रा. सुर्यवंशी डी. एस्.** एम. ए. सेट

### संख्याशास्त्र

**प्रा. डॉ. पाटील एम्. के.**
एम.एस्सी.एम्.फिल. पीएच.डी., डी.आया.टी.

**प्रा. कोष्टी. व्ही. व्ही.** एम.एस्सी.एम्.फिल., डी.आय.टी.

### गणित

**प्रा. दुधाळ आर. ए.** एम.एस्सी.एम.फिल.

**प्रा. वाघमोडे एस. एन.** एम.एस्सी.

**वनस्पतीशास्त्र**

**प्रा. पाटील टी. जी.** एम.एस्सी.,एम्.फिल.
**डॉ. जाधव बी. टी.** एम. एस्सी.,पीएच.डी.
**प्रा. पाटील एस. बी.** एम. एस्सी., बी. एड.
**प्रा. साबळे एस. एम.** एम. एस्सी.
**प्रा. पाटोळे एस. एस.** **प्रा. मुजावर आर. जी.**
**प्रा. चव्हाण आर. व्ही.** **प्रा. मलमे ए. एस.**

**पदार्थ विज्ञान**

**प्रा. सौ. महामुनी पी. यु.** एम. एस्सी.
**प्रा. पाटील एस्. बी.** एम. एस्सी.
**डॉ. शेंडगे एस्. एस्.** एम. एस्सी.,पीएच.डी.
**प्रा. मोरे जी. एस.** एम. एस्सी.
**प्रा. गोडसे एस. टी.** एम. एस्सी.
**प्रा. पाटील एम. ए.** एम. एस्सी.
**प्रा. बील्ले ए. बी.** एम. एस्सी.
**प्रा. शिंदे एस. एस.** एम. एस्सी.
**प्रा. कांबळे पी. यु.** एम. एस्सी.

**रसायनशास्त्र**

**प्रा. पाटील एस्. व्ही.** एम.एस्सी.एम्.फिल.
**प्रा. डॉ. कोरे जी. डी.** एम. एस्सी., पीएच. डी.
**प्रा. कांबळे ए. ए.** एम. एस्सी. सेट
**प्रा. पवार ए. एस.** एम. एस्सी., नेट (जेआरएफ), सेट, गेट
**डॉ. सुतार आर. एस.**
एम. एस्सी.,नेट,गेट(जेआरएफ),पीएच.डी.
**प्रा. कु. पाटील पुजा** एम. एस्सी., बी. एड.
**प्रा. शिंदे टी. पी.** **प्रा. भोसले ए. बी.**
**प्रा. साळुंखे ए. पी.** **प्रा. पाटील एन. एस.**

**प्राणिशास्त्र**

**प्रा. डॉ. कु. मोरे एस. बी.** एम.एस्सी., पीएच.डी.
**डॉ. सनदी आर. ए.** एम.एस्सी., पीएच.डी.
**प्रा. पाटील एस. ए.** एम.एस्सी.

**शारीरिक शिक्षण संचालक**

**डॉ. शिंदे एम. एम.** एम.पी.एड्., सेट, पीएच.डी.

**ग्रंथालय विभाग / ग्रंथपाल**

**प्रा. कांबळे एम. एम.**
एम.ए.एम.लिब ॲण्ड आय.एस्सी, सेट

## ज्युनिअर विभाग

## उपप्राचार्य – डॉ. बी. एन. पाटील

**इंग्रजी**

**प्रा. कोळेकर ए. एस.** एम.ए.बी.एड., नेट, सेट
**प्रा. ढेरे ए. डी.** एम.ए.बी.एड.

**मराठी**

**प्रा. सौ. सुर्यवंशी एस्. एस्.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. सौ. ओलेकर एस. डी.** एम.ए.,बी.एड.

**हिंदी**

**प्रा. थोरात डी. पी.** एम.ए.,बी.एड. नेट, सेट

**भूगोल**

**प्रा. यादव डी. पी.** एम.ए.,बी.एड.

**अर्थशास्त्र/सहकार**

**प्रा. वाघमारे टी. ए.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. पाटील सी. बी.** एम.ए.,बी.एड. सेट

**राज्यशास्त्र / इतिहास**

**प्रा. पाटील बी. एन्.** एम.ए.,बी.एड.

**इतिहास**

**प्रा. सौ. तोरणे व्ही. एस.** एम.ए.,बी.एड.

**वाणिज्य विभाग**

**प्रा. पाटील एस. एस.** एम.कॉम., बी.एड.
**प्रा. शिंदे एस. पी.** एम.कॉम.

**शारीरिक शिक्षण संचालक**

**प्रा. डॉ. शिंदे एम. एम.**
एम.पी.एड्., सेट, पीएच.डी.

**पदार्थ विज्ञान**

**प्रा. शिंदे आर. एल.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. कर्चे एस्. व्ही.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. पाटील सुरेश तुकाराम** एम.एस्सी.,बी.एड्.

**रसायनशास्त्र**

**प्रा. तोरणे एस्. एन्.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. के. एस. पाटील** एम.एस्सी.,बी.एड्.

**गणित**

**प्रा. कु. पवार एस. एन.** एम. एस्सी.बी.एड.

## प्रशासकीय कर्मचारी

**कुलसचिव तथा प्रबंधक – श्री. स्वामी आर. ए.** एम. ए. जीडीसी & ए

### मुख्य लिपीक
**श्री. चंदनशिवे बी. टी.** बी.एस्सी.,एम.ए.

### कनिष्ठ लघुलेखक
**श्री. शिंदे एस. एस.** बी. कॉम., लघुलेखन

### ग्रंथालय लिपीक
**श्री. थोरात टी. ए.** बी. ए. बी. पी. एड.
**श्री. शिंदे एस. बी.** एम. ए. बी. लिब.

### प्रयोगशाळा सहाय्यक
**श्री. मुजावर एस्. एन्.** एच. एस. सी.
**श्री. जाधव एस्. जे.** बी.एस्सी.

### कनिष्ठ लिपीक
**श्री. शिंदे ए. एस्.** बी. ए.
**श्री. सोनंद बी. एस्.** एम. ए.
**श्री. पाटील जी. आर.** बी.एस्सी

### प्रयोगशाळा परिचर
**श्री. पवार व्ही. आर.**
**श्री. शिंदे जी. व्ही.**
**श्री. झांबरे बी. जे.**
**श्री. पाटील व्ही. जी.**
**श्री. चव्हाण ए. बी.** बी. ए.
**श्री. गावडे बी. डी.** बी. ए.
**श्री. खोत व्ही. पी.**

### ग्रंथालय परिचर
**श्री. बोदगीरे एस्. एन्.** बी.कॉम
**श्री. माने एस्. आर.**
**श्री. गायकवाड ए. आर.**
**श्री. व्हनमोरे ए. व्ही.**
**श्री. पवार आर. एस्.**

### शिपाई
**श्री. भांगले पी. बी.**
**श्री. वडर आर. बी.**
**श्री. कुंभार डी. आर.** बी. ए.
**श्री. पवार एम्. बी.** बी. ए.
**श्री. जंगम पी. आर.** एम.ए.
**श्री. कारंडे एस्. पी.**
**श्री. सपकाळ पी. जे.** बी. ए.
**श्री . भोसले व्ही. व्ही.**
**श्री. खोत एस. जी.**

प्र. प्राचार्य,
डॉ. एम्. के. पाटील
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ, जि. सांगली.

# वसंत

वार्षिक, दोन हजार बावीस

# 2022

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ.

शिक्षण प्रसारक मंडळ कवठे महांकाळ संचलित

# पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ.

# वसंत

२०२१-२२
वर्ष : ४४
अंक : ३७

## संपादन समिती

अध्यक्ष

प्र. प्राचार्य (डॉ.) एम्. के. पाटील

प्रमुख संपादक

प्रा. (डॉ.) मोहन लोंढे

## विभागीय संपादक

प्रा. विजय कोष्टी
प्रा. महेश कांबळे
प्रा. आप्पासाहेब कोळेकर
प्रा. रविंद्र पाटील
डॉ. दिलीप गाडे
डॉ. मयुर शिंदे
डॉ. धर्मेंद्र थोरात
डॉ. भगवान मोहिते

## मांडणी/ मुखपृष्ठ

श्री. अतुल पाटील

**।। प्रकाशनाचा काळ ।।**

वार्षिक

**।। प्रकाशक ।।**

प्र. प्राचार्य, डॉ. एम्. के. पाटील
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। मुद्रक ।।**

श्री. सुरेश नानासो पाटील
महांकाली प्रिंटींग प्रेस, कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। राष्ट्रीयत्व ।।**

भारतीय

**या अंकात व्यक्त झालेल्या विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ५ |
| **फोटोफिचर** | | |
| प्रेरणा | | |
| मार्गदर्शक | | |
| संस्थापक | | |
| मार्गदर्शक | | |
| संचालक मंडळ | | |
| अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कार्यक्रम | | |
| विविध कार्यक्रम | | |


## गद्य


| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्राचे मुख्यमंत्री : पद्मभूषण वसंतदादा पाटील | श्रूती रोशन बनसोडे | ९ |
| मोबाईलचे दुष्परिणाम : आई-बाबांपासून तुटलेला संवाद | पुनम बाळकृष्ण कदम | ११ |
| कोरोना एक जागतिक संकट | रेणूका सुरेश बोरकर | १४ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानायक | रोहित सुनिल माळी | १६ |
| जागतिक सामाजिक न्याय दिवस | डॉ. संजय कांबळे | १९ |

| | | |
|---|---|---|
| चाक कवितासंग्रहातील समतामुल्य | डॉ. रविंद्र भगवात पाटील | २३ |
| वृध्द विमर्श | गौंश माने | ३३ |
| महायुध्द और हिंदी साहित्य | गंगाधर कांबळे | ३६ |
| | **पद्य** | |
| नातं | लक्ष्मी बनसोडे | ३९ |
| स्वप्न | लक्ष्मी बनसोडे | ४० |
| जीवन खूप लहान असतं | महेश माळी | ४१ |
| रोज की तरह फिर बोलता हूँ मैं आज नहीं कल आऊँगा | महेश माळी | ४२ |
| कविता | लक्ष्मी बनसोडे | ४४ |
| अध्यापकनपूरक व अध्यापनेतर कार्याचा वार्षिक अहवाल | | ४५ |

# संपादकीय

शिक्षण प्रसारक संस्था, कवठे महांकाळ संचलित पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयास या वर्षी ४४ वर्षे पूर्ण होत आहेत. दरवर्षीप्रमाणे सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या वसंत या वार्षिकाचा हा ३७ वा अंक प्रसिध्द होत आहे. हे शैक्षणिक वर्ष कोरोना काळातील असून, १ आक्टोंबर २०२१ ते २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंतचे आहे.

आमच्या प्रेरणास्थानी असणारे वसंतरावदादा पाटील, संस्थापक आनंदरावदादा शिंदे यांच्या विचार कार्याची परंपरा पुढे वृद्धिंगत करणारे अध्यक्ष मा. बाळासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे.

महाविद्यालयाचे कुशल मार्गदर्शक आणि तंत्रस्नेही प्र. प्राचार्य मा. डॉ. एम्. के. पाटील यांच्यामुळे महाविद्यालयात अनेक विविध आणि नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. याशिवाय महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या मुळे हे महाविद्यालय विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करीत आहे. यासाठी कवठे महांकामहाविद्यालयामध्ये २५०० च्या आसपास विद्यार्थी–विद्यार्थिनी ज्ञानार्जन करीत आहेत. ग्रामीण भागातील एक नावारुपास आलेले, पुरोगामित्वाची जपणूक करणारे हे महाविद्यालय आहे. दुष्काळाच्या झळा पचवून, हातावर पोट भरणारा बहुसंख्य समाज असूनही शिक्षणाची ओढ लागलेला आणि शिक्षणाच्या जोरावर स्वत: ची प्रगती करु पाहणारा विद्यार्थी वर्ग महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याचे समाजभान त्यांच्या लेखनातून दिसून येते. यातूनच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद्मभूषण वसंतदादा पाटील, मोबाईलचे दुष्परिणाम : आई–बाबांपासून तुटलेला संवाद, कोरोना एक जागतिक संकट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानायक, वाणिज्य शाखा करिअरच्या संधी, जागतिक सामाजिक न्याय दिवस,महायुध्द और हिंदी साहित्य अशा वैचारिक गद्यात्मक लेखनाबरोबरच नातं, स्वप्न, जीवन खूप लहान असतं, रोज की तरह फिर बोलता हू, कविता असा पद्यात्मक हुंकार विद्यार्थ्यांनी या अंकात मांडला आहे. अशा प्रकारे वैचारीक वास्तववादी अनुभूतीतून साकारलेली गद्य–पद्य आणि हिंदी, इंग्रजी मधील गद्य म्हणजेच हा अंक आहे.

सामाजिक, सांस्कृतिकतेचे भान ठेवून परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय घडवला जातो. यातूनच खास अशी भूमिका घेऊन महाविद्यालयात विविध उपक्रम

राबविलेले आहेत. अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत ग्राहक संरक्षण कायदा व माहिती अधिकार, Data Analysis using MS-Excel, प्राशासकीय कर्मचारी गुणवत्ता वाढ या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या वर्षामध्ये कोरोनाचा संसर्ग सुरु असल्यामुळे शारीरिक अंतर, लॉक डाऊन मुळे संकलन, संपादन करणे अवघड होते तरी ही आमच्या महाविद्यालयामध्ये अनेकविध कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यामध्ये साहित्यिक चारुता सागर यांच्या जयंतीचे औचित्य साधून साहित्यिक आपल्या भेटीला यामध्ये नाटकार गणपत पाटील व पत्रकार गोरख चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला, कवठे महांकाळ बस स्थानक या ठिकाणी निशुल्क ग्रथं वितरण करण्यात आले. अशा कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. त्या प्रमाणे राजर्षी शाहू महाराज जंयती, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती, महात्मा गांधी जयंती, मौलाना अब्दुल कलाम आझाद जयंती, माजी विद्यार्थी स्नेह मेळावा, संविधान दिन, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त, विविध कार्यक्रम, हुतात्मा दिन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, मराठी राजभाषा दिना निमित्त व्याख्यान, आझादी का आमृत महोत्सव निमित्त व्याख्याने असे कार्यक्रम शासनाच्या सुचनेचे पालन करुन घेण्यात आले.

'वसंत' हा महाविद्यालयीन कर्तृत्वाचा आरसा आहे. विद्यार्थांनी आपल्या सुप्त गुणांना वाव देत सामाजिकतेचे दर्शन आपल्या विविधांगी लेखनातून व कवितेतून व्यक्त केले आहे. महाविद्यालयात वर्षभरात उत्तमोत्तम कार्यक्रम झाले. त्याकडे डोळसपणे पाहिले तर विद्यार्थ्यांमध्ये माणूस घडविण्याचे कौशल्य महाविद्यालयाचे सामाजिकतेची दृष्टी असणारे कुशल प्राचार्य डॉ. एम्. के. पाटील यांच्याकडे आहे. त्यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन यातून प्रस्तुत अंक पूर्णत्वास पोहचला आहे.

मुखपृष्ठ श्री. अतुल पाटील यांनी तयार करुन दिले. त्यांचे आभार तसेच संपादक मंडळातील सर्व प्राध्यापकांनी वेळो-वेळी दिलेल्या सहकार्यासाठी त्यांचेही आभार. या अंकासाठी योगदान देणाऱ्या सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सर्व विद्यार्थी व अंक वेळेत पूर्ण करुन दिल्याबद्दल महांकाली प्रेसचे शतश: आभार, विशेष म्हणजे सुबक मांडणी साठी अतुल पाटील यांचे ही आभार !

**प्रा. (डॉ.) मोहन लोंढे**

# वाणिज्य शाखा करिअरच्या संधी

प्रा. डॉ. मोहीते बी.एच.
वाणिज्य विभाग

वाणिज्य शाखा करिअरच्या गोल्डन संधी आपल्यातल्या अनेकांना विशेषत: विज्ञान शाखेतल्या संधीविषयी बऱ्यापैकी माहिती असते, त्याविषयी चर्चाही बरीच होताना दिसते, पण वाणिज्य शाखा गेल्या काही वर्षात ज्या पध्दतीने विकसित होत आहे, त्यामानाने त्याबद्दल महाविद्यालयीन युवक–युवतींना माहिती मात्र पुरेशी नसल्याचेच दिसून येते. कॉमर्स म्हणजे फक्त गणित असा समज अनेक विद्यार्थी विद्यार्थ्याच्या मनात रुजलेला दिसतो. कॉमर्समध्ये गणित हा अनेक विषयांपैकी एक विषय असतो. त्यामुळे माझं गणित चांगलं आहे म्हणून मी कॉमर्सच्या वाटेला जायचे, अशीही भूमिका घेऊ नका. खरंतर, जागतिकीकरणाच्या रेट्यात व्यवसाय व व्यवहाराचे स्वरुप बदलल्याने वाणिज्य शाखाही अर्थातच अधिक विकास पावली आहे. अभ्यासविषय बदलले आहेत. त्यातून या विद्याशाखेतील करिअरच्या संधीही वाढल्या आहेत. त्यामुळे दहावी–बारावीनंतर आपल्या अभ्यासाचा मार्ग ठरवण्यापूर्वी या नानाविध संधी समजून घेणे हिताचे ठरेल. कॉमर्समधील बेसिक पदवीसोबत आता अकाऊंटिंग आणि फायनान्स मधील बीएएफ, बँकिंग आणि इन्शुरन्समधले बीबीआय व फायनान्शिअल मार्केटिंग बीएफएम हे पदवीच्या पातळीचे अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. वाणिज्य शाखेचा अभ्यास करुन बँकिंग क्षेत्रात जाण्यासाठी बीबीआय हा उत्तम पर्याय आहे आणि त्यात पुढे स्पेशलायझेशन करता येते. वाणिज्य शाखेतील स्पेशलायझेशनसाठी अर्थशास्त्र, अकाऊंटींग, फायनान्स, टॅक्सेशन, इ–कॉमर्स, बिझनेस लॉ, विमा, बिझनेस मॅनेजमेंट, ह्युमन रिसर्च मॅनेजमेंट, फायनान्स मॅनेजमेंट असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. भारतासारख्या लोकशाही देशात उत्तम कायदा व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामुळे कायदा या विषयात चांगलं करिअर करता येतं. कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी हा चांगला पर्याय आहे. कंपनी लॉ, लेबर लॉ मध्ये स्पेशलायझेशनच्या संधी आहेत. बारावीनंतर पाच वर्ष किंवा पदवीनंतर तीन वर्षांचा कोर्स आहे.

त्याचबरोबर कामगार कायदा, बौध्दिक संपदा कायदा, करविषयक कायदे, बँकांचे कायदे, सायबरविषयक कायदे असे काही दुरस्थ शिक्षणाचे अभ्यासक्रमही आहेत. कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी सीए., सीएस., आयसीडब्ल्यु अभ्यासक्रम खुप महत्वाचे आहेत. अकाऊंट्समध्ये करिअर करायचं असेल तर चार्टर्ड अकाऊंट आणि कॉस्ट अकाऊंट हे दोन पर्याय उत्तम. तसंच कंपनी कायद्यातील प्रावीण्यासाठी कंपनी सेक्रेटरी हा कोर्सही उपलब्ध आहे हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने प्रयत्नशील रहाणे गरजेचे आहे. बीएएफ, बीबीआय, बीएफएम यासारखे कोर्स निवडून सहजरित्या सीए, सीएस, एमबीए होता येईल असे अनेकांना वाटत असते पण ते काही खरं नाही. त्यात यश मिळविण्यासाठी त्या त्या संदर्भातील प्रोफेशनल कोर्सचा वेगळा अभ्यास करावाच लागतो. सीए, सीएस, आयसीडब्ल्यु, सीएएफ यांसारख्या महत्वाच्या प्रोफेशनल अभ्यासक्रमात यश मिळविण्यासाठी हुशारीपेक्षाही जिद्द, अथक परिश्रम करण्याची तयारी विद्यार्थ्यांमध्ये असणं आवश्यक आहे. हेही लक्षात घ्यायला हवं.

प्रेरणा...



डॉ. वसंतरावदादा पाटील

## मार्गदर्शक



श्री बाळासाहेब शिंदे

अध्यक्ष



श्री सुरेश पाटील

उपाध्यक्ष



श्री. सुदर्शन शिंदे

सचिव

संस्थापक



आनंदराव (दादा) शिंदे

# मार्गदर्शक



**प्रा. डॉ. एम्. के. पाटील**
प्र. प्राचार्य



**प्रा. बी. एन. पाटील**
उपप्राचार्य
कनिष्ठ विभाग



**प्रा. एस. व्ही. कर्चे**
पर्यवेक्षक
कनिष्ठ विभाग

## संचालक मंडळ



श्री. औदुंबर पाटील



श्री. जे.वाय. भोसले



श्री. दिनकर शिंदे



श्री. एकनाथ जगताप



श्री. अशोक पाटील



श्री. तात्यासो फाकडे



श्री. गणपती शिंदे



श्री. एच. बी. पाटील



श्री. ए. जे. खोत



श्री. शहाजी पाटील



श्री. विलास नलवडे

# अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कार्यक्रम




## संख्याशास्त्र विभाग : एम्. एस्. एक्सेल. कार्याशाळा




## वाणिज्य विभाग : ग्राहक संरक्षक कायदा व माहिती अधिकार

**प्रशासकीय कर्मचारी गुणवत्ता वाढ**



डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मार्गदर्शन करताना

# अग्रणी महाविद्यालय अंतर्गत कार्यक्रम




**मा. मिलींद देशमुख** वरिष्ठ सहाय्यक, विभागीय संचालक कार्यालय (उच्च शिक्षण) कोल्हापूर **मार्गदर्शन करताना**




**मान्यवरांचे सत्कार**



**वाचन प्रेरणा दिन**

# विविध कार्यक्रम



वसंत भित्तीपत्रक प्रकाशन




सहित्यिक आपलय भेटीला नाटककार गणपती पाटील



बस स्थानक येथे निशुल्क ग्रंथ वितरण



ग्रंथ प्रदर्शन

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीः पद्मभूषण वसंतदादा पाटील

श्रुती रोशन बनसोडे
बी. एस्सी. भाग १

प्रखर देशभक्त, कुशल पक्षसंघटक व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री अशा प्रभावी भुमिका प्रभावीपणे निभावणारे व्यक्तिमत्व! सच्चे सहकार महर्षी, सच्चा नेता, पक्षसंघटना सांभाळणारे पद्मभूषण वसंतदादा पाटील

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राला एक वेगळे निर्णायक वळण देऊन महाराष्ट्राचा विकास साधणारे नेते म्हणजे वसंतदादा पाटील होत. क्रांतीकारी स्वतंत्र चळवळीचे विधायक कार्य प्रभावीपणे पार पाडणारे नेते म्हणून दादांना ओळखले जाते.

सांगली जिल्ह्यातील, तासगांव तालुक्यातील पद्माळे या गावात १३ नोव्हेंबर, १९१७ साली जन्मलेले वसंतदादा पाटील १९७७-१९८५ या कालावधीत ते चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. वसंतदादा पाटील यांनी चार वर्ष महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या पदाचा पदभार सांभाळला. त्या आधी ते राजस्थानचे राज्यपालही राहीले होते. (१९७२ मध्ये ते मंत्री होते.) व १९५२ मध्ये दादा पहिल्याच प्रयत्नात सांगलीमधून आमदार म्हणून निवडून आले होते.

राजकीय जीवन प्रवासामध्ये सुमारे २५ वर्षे दादांनी सांगलीचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या राजकीय जीवनात त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, राष्ट्री मिल मजदुर संघ व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस आदि संस्था, संघटनांची अध्यक्षपदे सांभाळली. त्यांनी त्यांच्या राजकीय जीवनात केलेल्या कार्यामुळे आज शैक्षणिक क्षेत्राचाही विकास झालेला दिसून येतो.

वसंतदादा पाटील यांनी पक्षकार्याला ज्यादा महत्व दिले होते. वसंतदादा नंतर कॉंग्रेस पक्षाला एवढे बळ देणारा नेता महाराष्ट्रातुन मिळालाच नाही असे राजकीय निरीक्षक म्हणतात. सत्तेची हाव नसलेले सत्ताधारी असे दादांबद्धल म्हटले जाते. महाराष्ट्राचे नेतृत्व करता-करता समाज सुधारक परिणाम साधणारे निर्णय घेतले.

१९८३ मध्ये दादांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन विद्यालय विनाअनुदान निर्माण करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होण्याबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात तसेच औद्योगिक क्षेत्रात विकास घडून आला. 'पाणी वाचवा, पाणी जिरवा' ही संकल्पना प्रथम दादांनी महाराष्ट्रासमोर आणली.

वसंतदादांनी अगदी लहान वयात म्हणजेच वयाच्या १३ व्या वर्षी स्वतंत्र चळवळीमध्ये आपले पहिले पाऊल टाकले. १९४० पासून त्यांनी स्वतंत्र चळवळीमध्ये जोमाने भाग घेतला. भ्रमणध्वनीच्या तारा तोडणे, पोस्ट जाळणे, रेल्वेचे नुकसान करणे, पिस्तुल बाँबचा वापर करणे यामुळे ब्रिटिशांमध्ये दहशत निर्माण करुन १९४२ मध्ये त्यांनी ब्रिटीशांविरुद्ध प्रखर लढा दिला. कायदेभंग चळवळीच्या काळात सोलापूरला चार हुतात्मे झाले. या हुतात्म्यांच्या आठवणीसाठी दादांनी चहा सोडला होता. ते कही काळ भूमीगत होते. त्यांना सुमारे तिन वर्षे तुरुंगवासही भोगावा लागला होता. त्यानंतर तुरुंगातून निसटण्याचा प्रयत्न करताना दादांना खांद्याला गोळी लागली होती. त्यामुळे त्यांना पुन्हा तुरुंगवास भोगावा लागला. दादांच्या सुटकेसाठी सांगलीकरांनी सभा मोर्चा या माध्यमातून प्रयत्न केला. या प्रयत्नात रामानंद भारती व बॅरिस्टर नाथ पै हे ही सहभागी होते.

सातारा–सांगली या भागात क्रांतिसिंह नाना पटील, यशवंतराव चव्हाण यांच्यासह दादाही स्वतंत्र चळवळीत आघाडीवर होते. महाराष्ट्र उभारणीतील सर्वात महत्वाचे व मोलाचे कार्य म्हणजे दादांनी सहकार क्षेत्राचा केलेला विकास व विस्तार होय. त्यांनी सहकार क्षेत्राचा विकास केल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात, शेती व्यवसायात तसेच शैक्षणिक क्षेत्रात खूप विकास झाला आहे. सुतगिरण्या, कापडगिरण्या, तेलगिरण्या, खत कारखाने, शेती अवजारांचे उत्पादन, शेती, उद्योग, व्यवसाय यासारखे व्यवसाय सहकारी तत्वावर दादांनी उभे केले.

दादांनी डेक्कन शुगर इन्स्टिट्युटची स्थापना करुन संशोधनाला चालना दिली. आता या संस्थेचे नाव वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्युटची आहे. त्यांनी १९५३ मध्ये प्रथम सहकारी शेतकरी साखर कारखान्याची स्थापना केली. त्यावेळी त्यांनी स्वत: शेतामध्ये जाऊन शेतकऱ्यांना ऊस कसा लावायचा यांचे प्रात्यक्षिक दिले. महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रातील या अद्वितीय कामगिरीमुळे त्यांना १९६७ साली पद्मभूषण ह्या पुरस्काराने गौरवण्यात आले.

# मोबाईलचे दुष्परिणामः आई-बाबांपासून तुटलेला संवाद

पूनम बाळकृष्ण कदम
बी. एस्सी. भाग १

गरज ही शोधाची जननी आहे. या उक्तीनुसार मानवाने आपल्या गरजेनुसार विज्ञानाचा उपयोग करुन अनेक शोध लावले. या शोधांपैकी मोबाईल हा आगळा-वेगळा शोध. मोबाईलचा शोध लागल्यापासून जगाचा कायापालट झाला आहे. असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. मोबाईलचा प्रसार हा श्रीमंत लोकांपासून ते तळागाळाच्या लोकांपर्यंत झाला आहे. मोबाईल म्हणजे माझा जीव की प्राण! असं सगळयांना वाटत आहे.

एकोणिसाव्या शतकात मोबाईलचा या उपकरणाचा शोध लागला. हे एक असे उपकरण आहे ज्यामूळे अनेक दुष्परिणाम माणसाला भोगावे लागतात. दुष्परिणामांचा पर्वत या मोबाईलमूळे डोक्यावर येऊन कोसळला आहे. जसे की मानवी नाती ही खुप नाजुक असतात. नात्यांमध्ये जरा-जरा दुरावा आला तर नात्यांचे मरण हे निश्चित आहे. यांना जागृत करणे खुप कठीण असते. हा दुरावा जो नात्यांमध्ये येतो तो येतो म्हणजे मोबाईलमुळे! अलीकडे बघीतल तर प्रत्येक व्यक्ती हा मोबाईलमध्ये गुंतलेला आहे. सारख किंवा गरज नसताना मोबाईल कानाला लावून इकडून-तिकडं फिरणे हा एक नवीन ट्रेंड आहे. ज्याच्याकडे मोबाईल तो खुप हुशार म्हणे! हा सर्व एक  मानवी मेंदूचा भास आहे.

पूर्वी घरात आई-बाबांना बसवून मुलं त्यांना शाळेतील प्रत्येक गोष्ट सांगत. मला तो तसा म्हणाला त्या सरांनी मला शाबासकी दिली. वगैरे-वगैरे असे किस्से सांगत होते, पण आता शाळेतून आल्यापासून ते मोबाईल पाहून आपले मनोरंजन करतात. दिवसभरात ज्या आई-बाबांनी आपल्या आवाजाची एकही झलक ऐकली नसते, त्यांना आपण एका शब्दासाठी तरसवता. खरच हा मोबाईल किती वाईट आहे पहा, ज्यामूळे जन्म देणाऱ्या आईपासून आपण दुरावलो जातो.

मोबाईल म्हणजे हातातला खुळखुळा

गरज नसेल वाजवायचा
भुरळ पाडणारा हा भुलभुलैया
कशाला करायचा त्याचा गाजावाजा

आजकाल जन्मलेल्या मुलाला जर मोबाईलची एक झलक दाखवली तर ते असं समजेल की कदाचीत हाही घरचा सदस्य असावा नाही का? अंगाईगिताऐवजी लहान मुलांना आज मॉडर्न गाणी ऐकवून शांत केलं जात. आईची ममताही या मोबाईलमूळे कमी होत असावी.

मोबाईलमूळे अनेक रोगांना सामोरे जावं लागतं. त्याच्यातुन अतिनील किंवा घातक किरणे जी बाहेर पडतात. त्यामुळे दृष्टी कमी होते. व जिवनातील सुंदर गोष्टी न्याहाळण्यात आपण कमी पडतो. यांच्यापासून निद्रानाश होतो. आपण मोबाईल खुप वेळ पाहिल्याने झोप कमी लागते. झोप कमी लागल्याने डोळ्याखाली काळे डाग पडणे, यासारख्या अनेक त्रासांना सामोरे जावे लागते. मोबाईल हा प्रत्येक शरीराच्या भागाला त्रास देतो. असे म्हंटले तरी काही चुकीचे ठरणार नाही. कानही बाद होऊ शकतो. अलीकडे इअरफोन आल्याने कुमारवयीन मुले प्रवास करताना, घरी बसल्यानंतर कोणतेही काम करताना कानात इअरफोन घालून गाण्याचा आनंद घेतात. हा आनंद खुप महागात पडेल हे त्यांना कुणी सांगायचं? कानाचे पडदे हे सतत जास्त आवाजाची गाणी ऐकल्याने खराब होऊन कानांना त्रास होऊ शकतो.

कार्पल टनल हा एक नवीन आजार या मोबाईलच्या कृपेने आपल्या जीवनात आला आहे. या आजाराची लक्षणे ही अशी आहेत की यामध्ये हात कापणे म्हणजेच अशक्तपणा येणे, मोबाईल हातातुन घेतला की हात थरथर कापणे, पाय थरथर कापणे, कोणतेही काम करु न वाटणे अशी लक्षणे दिसतात. अशा आजारापासून दूर राहायचे असेल तर मोबाईलचा वापर कमी प्रमाणात करणे हा एकमेव उपाय!

शास्त्रज्ञांच्या मते मोबाईलचा वापर हा दिवसातून ३-४ तासांपर्यत करावा. अन्यथा खूप त्रास सहन करावे लागतील. मोबाईल चार्जिंग लावून जर कोणाशी बोलत बसलो तर खूप त्रास होऊ शकतो. मोबाईल गरम होऊन त्याचा स्फोटही होऊ शकतो.

शाळेत जाणाऱ्या किंवा कॉलेजमधील मुले ही सतत मोबाईलवरच असतात. अभ्यासातील प्रश्न हे आपल्या बुद्धीने किंवा शिक्षकांच्या मदतीने सोडवल्यास जास्त समजतात, असे माझे मत आहे, परंतु असे न करता प्रत्येक प्रश्न मोबाईलमधील गुगल या अँपवर टाकून त्याचे उत्तर मिळवले जाते. यामुळे मुलांच्या बुद्धीचा कमी विकास होतो. आपण अश्या प्रत्येक प्रश्नासाठी यावर अवलंबून राहतो. व आभ्यासात यामुळेच तर कमी पडतो. कुमारवयीन मुले ही अश्या जाळ्यात अडकून बसले आहेत की त्या जाळ्यातून सुटण्याचा प्रयत्न केला तर पुन्हा अडकून बसतात. मोबाईलवरील अश्लील चित्रे पाहून गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या मोबाईलपासुन मुलींना खूप त्रास होत आहे. त्यांचे फोटो कोणी व्हायरल केले तर त्यांचे पूर्ण जीवन नष्ट होऊन जाते. त्यांना खूप बदनामी सहन करावी लागते. अश्या गुन्हेगारीचे प्रमाण हे या मोबाईलमूळेच वाढताना दिसते.

शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींचे जीवन तर खूप गंभीर समस्येत अडकले आहे.

मोबाईलमूळे जग आले जवळ

वहीपासून लेखणी गेली दूर
माणसासारखी माणसं झाली मुकी
मोबाईलमधील चँटींगला आली सुगी

मोबाईलमूळे सायबर क्राईम होताना देखील दिसत आहे. बँकींग पासवर्ड ओटीपी यासारख्या गुप्त गोष्टी कुणाला सांगितल्यास आपण आर्थिक संकटात येऊ शकतो.

एकंदरीत मोबाईल हा मानवी जीवनात खूप धोकादायक आहे.

# कोरोना एक जागतिक संकट

रेणुका सुरेश बोरकर
बी. एस्सी. भाग १

या पृथ्वीवर अनेक घटना घडतात त्या पैकी एक म्हणजे कोरोना. डिसेंबर २०१९ च्या मध्यापासून चीन या देशातील वूहान या शहरामध्ये आला तेथील काही माणसे बाहेरच्या देशात गेले तेथूनच हा संसर्ग वाढत गेला. हा रोग जास्त पसरत गेल्यामूळे लोकांच्या लवकर लक्षात आले नाही. डॉक्टरांच्याही लवकर लक्षात आला नाही जेव्हा लक्षात आले तेव्हा खूप उशीर झाला होता. यावर उपाय काढण्यासाठी व हा रोग आटोक्यात आणण्यासाठी शासनाने लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला. व पूर्ण भारत  देशामध्ये लॉकडाउन करण्याचा निर्णय घेतला. व पूर्ण भारत  देशामध्ये लॉकडाऊन झाले. शाळा, महाविद्यालये, व दुकाने बंद  झाली. यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले. त्यानंतर माझे कुटुंब माझी जबाबदारी ही योजना करुन घरोघरी जाऊन तपासणी करण्याचे ठरवले.

या रोगावर अनेक शास्त्रज्ञ आणी डॉक्टरांनी उपाय शोधायला सुरवात केली. डॉक्टर यांनी रात्र–दिवस दवाखान्यात काम करुन अहोरात्र जनतेची सेवा केली. अशा या शूर कोरोना योध्दा म्हणजेच डॉक्टर यांना माझा सलाम. रात्रीच्या वेळी एक दीड वाजता नको असणारे ते पीपीडी कीट घालून पेशंटची काळजी घेतली. लोकांनीही शासनाचे नियम पाळले. घरी राहून सहकार्य केले. पण शहरी गेलेले हजारो लोक आपल्या आपल्या गावी परतले. पण काही लोकांना निर्बंध लावले होते. प्रवास करताना खूप त्रास सहन करावा लागला. अनेकांना आपला जीव गमवावा लागला. तसेच डॉक्टरांनाही उपचार करत असताना आपला जीव गमवावा लागला. त्यापैकी डॉ. जावेद अली हे ज्वलंत उदाहरण आहेत. अनेक लोकांचे जीवन व्यवसायावर अवलंबून होते. अशा लोकांचे खाण्या–पिण्याचे वांदे झाले. अशा अनेक लोकांच्या समस्या उद्धभत होत्या. यावर शासनाने स्वस्थ धान्य गावो–गावी वाटप केले. जे गरीब लोक नुसत्या व्यवसायावर  होते त्यांना वेळी जेवायला न मिळाल्याने त्यांना आपला जीव गमवावा लागला.

सर्व परीक्षाही रद्द  झाल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. तसेच हजारो लोक आपल्या गावी परतले बाहेर संसर्गाचा धोका होता. व गावोगावी निर्बंध लावले होते. डॉक्टरांनी लस काढल्यापासून हा रोग जरा आटोक्यात आला. तसेच पोलीसांचेही खूप योगदान आहे. रस्त्यावर चोख बंदोबस्त केला, सार्वजनिक ठिकाणी गर्दी करणे, सामुहिक चर्चा यावर योग्य ती कारवाई केली. ही परिस्थिती सामान्य होण्यासाठी लस आल्यापासून पुढे कमीत कमी १ वर्षाचा कालावधी लागेल. देशाची सेवा करणे अशा या शूर कोरोना योध्यांना माझा सलाम.  डिसेंबर २०१९ मध्ये सापडलेल्या या अतिसुक्ष्म विषाणुने अल्पकाळात जगभरात थैमान घातले. घड्याळाच्या काट्यावर फिरणारे जग अक्षरश: थांबले. भयंकर कोरोना महामारी विरुद्ध लढण्यासाठी प्रत्येक देशात कोरोना योध्दे सज्ज झाले. स्वत:च्या जीवाची पर्वा न करता केवळ देशसेवेचा विचार या कोरोना योध्यांनी केला. महाराष्ट्र सरकारने माझे कुटूंब माझी जबाबदारी ही मोहीम आखली.

कोरोना लढाईतील पोलीस हा अहोरात्र झटत होता. कोरोनामूळे अनेक लोकांनी जीव गमावले तर काहींनी आपले व्यवसाय. या रोगामुळे सर्वानी पौष्टीक अन्न ग्रहन केले त्याचबरोबर लोकांच्या तब्येती चांगल्या राहिल्या. कोणी आजारी असेल  तर घरच्या घरी उपाय केले. निसर्गात अशा अनेक गोष्टी घडत असतात त्यामुळे यावर उपाय करुन आपण नक्कीच विजय मिळवू!

तसेच लोकांनी हा संसर्ग वाढूनये म्हणून घरीच बसून राहीले. बाहेरची वस्तू आणल्यामूळे ती धुवून घेवून मगच आत घ्यायची, बाहेर जाताना मास्क घालणे, सॅनिटायझर हाताला लावने हे सर्व नियम नीट व्यवस्थित लोकांनी पाळले. तसेच सर्व डॉक्टर, नर्स आणी पोलीस यांचे मोठे योगदान आहे.

कोरोना योध्यांचा ठेवू मान
कार्य आहे त्यांचे महान.....

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानायक

रोहित सुनील माळी
बी. ए. भाग १

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक आघाडीचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक विचारवंत होते. त्यांचे विचार आणि योगदान महत्त्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कारकीर्द सुद्धा अतिशय भव्य व प्रेरक आहे. त्यांनी शिक्षणासाठी घेतलेले परिश्रम, संपादित केलेल्या अत्युच्च शैक्षणीक पदव्या आणि त्यातून त्यांनी कमावलेली असामान्य व कुशाग्र बुद्धिमत्ता या गोष्टी आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते.अशा महान व्यक्तीचे जीवन व कार्य आपण वेगवेगळ्या माध्यमातून समजून घेत असतो. मी आंबेडकरांच्या विषयी माहिती घेत असताना आपल्या महाविद्यालयातील ग्रंथालयामधील लेखक अशोक बाबर यांचे 'आंबेडकरवाद' हे पुस्तक दिसून आले. आणि मी वाचनास घेतले. 'आंबेडकरवाद' या पुस्तकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महनीय कार्याची ओळख झाली. डॉ. आंबेडकर यांच्या एकंदर जीवनकार्यावर बुध्दाच्या तत्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे त्यांच्या जीवनदृष्टीत आध्यात्मिकता होती. या पुस्तकात लेखक अशोक बाबर यांनी केलेली चिकित्सा व तर्कसंगत मांडणी अभ्यासनीय आहे. बुध्दधर्म, हिंदुधर्म, मार्क्सवाद, गांधीवाद आणि नेमाडे यांचा देशीवाद यांचे तौलनिकदृष्या विश्लेषण केले आहे. तर्कसंगत युक्तिवाद, आधीच्या अभ्यासकांच्या मताचे खंडन-मंडन, आंबेडकरवादी साहित्यसिध्दांत हे बाबर यांच्या मांडणी मधील महत्त्वाचे विश्लेषण आहेत. 'आंबेडकरवाद' या ग्रंथामुळे आपणाला आंबेडकर समजून घेता येतील. या पुस्तकामध्ये बुध्द व मार्क्स यांच्या विचारांची तुलना केली आहे. दोन्ही विचार साम्यवादी आहेत. आंबेडकरांनी बुध्द विचारसरणीला प्राधान्य दिले आहे. हे साम्यवादी विचारचं देशाच्या प्रगतीला उपयोगी ठरतील. भारतीय राज्यघटनेमध्ये सुध्दा बुध्दाच्या

तत्वाचे (साम्यावादाचा) विचार दिसून येतात. खरे म्हणजे बुध्द की कार्ल मार्क्स असे म्हणायलाच नको पाहिजे. असे पुस्तकाचे नाव नाही. असे म्हणल्यास आपण बुध्द व कार्ल मार्क्स यापैकी एकच निवडतो. पण बुध्द आणि कार्ल मार्क्स जेव्हा बोलतो तेव्हा ते योग्य होय. बुद्ध व कार्ल मार्क्स यांची तत्त्वप्रणाली एकसारखी होती. आंबेडकरवाद म्हणजे समाजवादी समाज-रचनेच्या निर्मितीसाठी या जगाची जी पुनर्रचना करावी लागेल. त्यासाठी धर्माच्या सहाय्याने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यावर उभ्या असणाऱ्या लोकशाहीची निर्मिती करण्याची प्रेरणा देणारे समाजजीवन आहे. खरे म्हणजे बुद्ध आणि हा धर्म नव्हे तर तो एक धम्म आहे. धम्म म्हणजे तत्वे डॉ. आंबेडकरांच्या मते धर्म हा माणसा-माणसांमध्ये द्वेषाची,तिरस्काराची भावना निर्माण करतो. भारतामध्ये बरेचसे धर्म आहेत पण त्यामध्ये स्वातंत्र्य,समता,बंधुता पाहायला मिळत नाही. खरा धर्म तोच ज्यामध्ये व्यक्तीला स्वातंत्र्य,समता व बंधुता प्राप्त होते. बौद्ध धर्म हा जर धम्म नसून धर्म असता तर आंबेडकरांनी बुद्ध धर्माचा पुरस्कार केला नसता.आंबेडकरांचे असे म्हणणे होते की, जगाच्या पाठीवर असा कुठलाही देश नाही जेथे धर्माने या देशाच्या इतिहासात इतकी महत्वपूर्ण भूमिका पार पाडली असेल.भारतीय इतिहासामध्ये आपणाला असे दिसून येते की भारतीय इतिहास अन्य काही नसून ब्राह्मणवाद आणि बौद्धवाद यातील श्रेष्ठत्वासाठीचा जीवघेणा संघर्ष आहे.धर्म आणि धम्म यामध्ये आंबेडकरांनी चांगला जीवनमर्ग म्हणून धम्माची निवड केली. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथामध्ये डॉ. आंबेडकरांनी धम्म म्हणजे शासनसंस्थेचे एकरूप किंवा एक मॉडेल म्हणून मांडले. सर्व भारतीयांसाठी एकच धर्मग्रंथ असावा असे त्यांचे म्हणणे होते. त्याप्रमाणे त्यांनी या ग्रंथाची निर्मिती केली. असे म्हणे जास्त उचित ठरेल. आंबेडकरवाद धर्माला कडाडून विरोध करतो आणि धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म या संकल्पनेचा स्वीकार करतो. आंबेडकरवाद या ग्रंथात साम्यवादी घडवून आणणारी बुद्धाची साधने सांगितली आहेत. दुःखाच्या कारणाचा शोध घेतला असता बुद्धाला दोन कारणे सापडली. 1) माणसाचे दुःख व दैन्य काही अंशी स्वतःच्या गैरवर्तणूकीचा परिणाम असते.2) माणसाच्या माणसाबाबत असलेल्या असमानतेचा परिणाम होय.गैरवर्तणूकीच्या परिणामातून निर्माण झालेल्या दुःखाचे कारण दूर करण्यासाठी बुद्धाने पंचशील आचरणात आणण्याचा उपदेश केला. हिंसा, चोरी, असत्य कामवासना आणि मादक पेयापासून अलिप्त राहणे. म्हणजे पंचशिलाचे पालन करणे होय.आंबेडकरांच्या मते जाती व्यवस्थेला शास्त्रीय आधार नाही. जातिव्यवस्था ही अशी समाजव्यवस्था आहे की जी हिंदू समाजातील उच्च समजल्या गेलेल्या विकृत मनोवृत्तीच्या वर्गाच्या स्वार्थाकरिता फॅशन म्हणून निर्मिती करण्यात आली. व त्यांनी आपल्या सामाजिक वर्चस्वाच्या बळावर रूढ केली. जातिभेदाने हिंदू समाजाचे पूर्णतः विघटन आणि नैतिक अधःपतन केलेले आहे.लोकशाही म्हणजे जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणणारी आणि या बदलांना जनतेने कोणत्याही प्रकारच्या विवादाचा अथवा रक्तपाताचा आसरा न घेता मान्यता द्यावी अशी व्यवस्था होय. ही पण व्याख्या बुद्धाच्या धम्मावरच आधारित आहे, हे आपणास स्पष्ट होते. आंबेडकरवाद हुकूमशाही विरहित लोकशाही प्रणित राज्य समाजवादाची स्थापना करतो.आंबेडकरांना भांडवलशाही आणि ब्राह्मणशाही हे दोन प्रमुख शत्रू वाटतात. आंबेडकरांनी ब्राह्मणी प्रति-क्रांतिचे विश्लेषण करून भारतीय स्थितीतील समाजाची जी तात्कालीन अवस्था होती याची कारणे स्पष्टपणे मांडलेली आहेत. कालिदासाची ही ब्राह्मण साहित्य परंपरा उत्तर आधुनिकीच्या बॅनरखाली चालवली जाते. याउलट

# अध्यापनपूरक व अध्यापनेतर कार्याचा वार्षिक अहवाल २०२१-२२

# Statistics Department

In the academic year 2021-22 there were 90 students in B.Sc. I, 49 in B.Sc. Part II, and 20 in B.Sc. III. In B.Com. II there are 173 students and in B.A. I (S.T.D.) 53 students. The following activities were implemented on behalf of the department during the year.

**Participation in various programs:-**

Students of the department participated in various programs celebrated in the college from time to time.

A) National Statistics Day 2022 and Birth anniversary of Prashant Chandra Mahalanobis is celebrated in Department. : 27 June 2022

B) Celebrated Prof. Dr. C.R. Rao's 102nd birthday: 9 September 2022.

C) Arranged Basic Statistics Quiz competition for B.Sc. I, B.Sc. II, B.SC. III on 5th June 2022

**D) One Day Workshops:-**

**1**. Organized jointly with SUSTA (under MoU) a one day workshop on "Designing and Attainment Of CO'S, PO'S and PSO'S" on 8th September 2021.

**2.** Organized a one day workshop on "Data analysis using Ms Excel "on Thursday 17th March 2022. ( Lead College Program).

**E) Poster presentation competitions on occasion of "Prof. Dr. C.R. Rao's 102nd birthday and Dr. V. S. Huzurbazar's 103rd birth anniversary"**

**F) Lectures / Program Attendance**

I) Marathi Language Conservation Fortnight – Programme (Book exhibition) 17 Jan 2022

ii) Celebrated Dr. A.P.J. Abdul Kalam's birth anniversary. : 15/10/2021

iii) Lecture on the occasion of Teacher's Day by Dr. S. S. Kothavale: - 5 Sep 2022

iv) Constitution Day Celebration ( Lecture by Dr. B. G. Bhosale): 26/11/2021

v) Celebration of Rajarshi Shahu Maharaj Jayanti. : 26 Jun 2021

vi) Celebration of B. R. Ambedkar Jayanti: 14 Apr 2022

vii) Celebrated National Mathematics Day (Ramanujan Jayanti): 22 December 2021

viii) Mahaprinirvan Din Celebration : 6 December 2021

ix) Celebration of Science Day, 28 Feb 2022

x) Celebration of Science Day lecture by Dr. Goutam Gaikwad: 9 March 2022

xi) Mahatma Jotirrao Fule Jayanti Program: 11/04/2022

**G) Guest lecturers:**

1. Er. Asif Shaikh Guided the students of B.Sc. I,II,III (Statistics) about Scope of statistics subject in software industry.(Date:7 May 2022)
2. Mrs. Karisma Gadikar Shaikh guided the students of B.Sc. I,II,III (Statistics) about Job opportunities in Statistics. (Date:7 May 2022)

3. Prof. Archana More guided the students of B.Sc. I,II,III (Statistics) on the Scope of Statistics.(Date:5 June 2022)

4. Prof. Sarjerao Powar guided the students of B.Sc. I,II,III (Statistics) about job opportunities in statistics.(Date: 6 June 2022)

5. Prof. A. B. Patil guided the students of B.Sc. II (Statistics) about Scope Of statistics. (Date: 20 June 2022)

**Visit:**

1. Pro. Registrar Dr. V. N. Shinde Visited the Department. (Date:30/03/2022)

2. Dr. R. V. Kulkarni Region Director YCMOU Nashik Visited the Department (17/9/2022)

**H) Special activities:-**

**1. Students Research Project:** Statistical study on reducing losses in Tomato cultivation, in Western Maharashtra (Sangli).

**2. SUSTA Project Presentation Competition:-**

"THE IMPACT OF COVID-19 ON SOCIAL WELFARE" Project Submitted in a Competition organized by SUSTA.

Prof. (Dr.) M. K. Patil
Head, Department Of Statistics

Asso. Prof. V. V. Koshti
Associate Professor

Assi. Prof. S. S. Patil,

Assi. Prof. P. M. Patil,

Assi. Prof. G. D. Satpute

# मराठी विभाग

## १) दि. १५ ऑक्टोंबर २०२२

हा दिवस डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. त्यानिमित्त भित्तीपत्रिकेचे प्रकाशन प्रा. शिवाजी कांबळे यांचे हस्ते करणेत आले. ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले. तसेच सदर दिवशी सकाळी १०. वाजता 'आनंद भवन' सभागृहात श्री दत्ताजीराव शिंदे यांचे वाचनाने माणूस समृद्ध होतो या विषयावरील व्याख्यान झाले.

### २) दि. ८ जानेवारी २०२२ ते २४ जानेवारी २०२२

या कालावधीमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यता आले.

दि. ८ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालय परिसरात सकाळी ९:३० वाजता कट्ट्याचे आयोजन केले. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. राजेंद्र स्वामी (प्रबंधक), आणी अध्यक्षस्थानी प्रा. सुरेश पोळ होते.

### दि. १० जानेवारी २०२२

रोजी 'वसंत' भित्तीपत्रीकेचे प्रकाशन मा. सुरेश पाटील (उपाध्यक्ष-शिक्षण प्रसारक संस्था क. म) यांचे हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. एम. के. पाटील होते. तर प्रमख उपस्थीती म्हणून मा. सुदर्शन शिंदे (सचीव शिक्षण प्रसारक संस्था क.) होते.

### दि. १७ जानेवारी २०२२

रोजी सकळी १० वाजता ग्रंथालय विभागामध्ये 'ग्रंथप्रदर्शन' आयोजीत करण्यात आले. त्यामध्ये विश्वकाश, शब्दकोश,स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ग्रथ तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांचे लिखित ग्रंथ मांडण्यात आले होते. सदर कर्यक्रमाचे प्रमुख पाहुणे- मा. विशाल शिंदे (अध्यक्ष माजी विद्यार्थि असो.) आणि अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ एम. के. पाटील हे होते.

### दि. १९ जानेवारी २०२२

रोजी सकाळी १० वाजत मराठी विभाग येथे सुंदर हस्तक्षर, सुलखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कर्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अविनाश कांबळे (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख) हे होते.

**दि. २० जानेवारी २०२२**

रोजी सकाळी १० वाजता कवठेमहांकाळ बस स्थानक या ठिकाणी नि:शुल्क ग्रंथ वितरणाचा कर्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी बसस्थानक व्यवस्थापक महेश जाधव यांचे हस्ते प्रवाशांना नि:शुल्क ग्रंथ वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. बाळासाहेब शिंदे (अध्यक्ष–शिक्षण प्रसारक संस्था क.म) प्रमख उपस्थीती म्हणून मा. सुरेश पाटील (उपाध्यक्ष–शिक्षण प्रसारक संस्था क.म) प्र. प्राचार्य डॉ. एम. के. पाटील तसेच ग्रंथपाल व महाविद्यालयातील प्राद्यापक वर्ग उपस्थीत होता.

**दि. २४ जानेवारी २०२२**

रोजी निबंध व कथालेखन स्पर्धा जाहीर करण्यात आल्या. त्याची मुदत दिनांक. १५ फेब्रुवारी पर्यत होती. सदर स्पर्धेत विद्यार्त्थाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**३) दि. १० मार्च २०२२**

रोजी जागतिक मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. खऱ्याअर्थाने २७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रजांचा जन्मदिवस जागतिक मराठी भाषा दिन म्हणुन सर्वत्र साजरा केला जातो. परंतु महाविद्यालयस सुट्टी असल्याकारणाने तो साजरा करता आला नाही. परंतु १० मार्च २०२२ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी आणी १३ मार्च हा मराठीतील प्रसिध्द कथाकार, साहित्यिक चारुता सागर यांच्या जयंतीचे औचित्य साधून सदर कर्यक्रम मरठी विभाग व भाषा वाङ्मय मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने साजरा केला. साहित्यिक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत कवठेमहांकाळ तालुक्यातील कुची गावचे साहीत्यिक – नाटककार श्री. गणपती पाटील हे प्रामुख पाहुणे म्हणन उपस्थिती होते. तर अध्यक्षस्थानी प्रा. विजय कोष्टी हे होते. प्रमख उपस्थिती म्हणून शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष– मा. सुरेश पाटील, पत्रकार – गोरख चव्हाण हे होते. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व मराठी विभागातील विध्यार्थी उपस्थिती होते.

वरील सर्व कार्यक्रमास शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. बाळासाहेब शिंदे, उपाध्यक्ष मा. सुरेश पाटील, सचिव सुदर्शन शिंदे, प्र. प्राचार्य डॉ एम. के. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लभले. तसेच विद्यार्त्याचा उस्फुर्त सहभाग व प्रतीसाद मिळाला.

**प्रा. (डॉ.) मोहन लोंढे**
**मराठी विभागप्रमुख**

## Prof. (Dr.) M. K. Patil

Department of Statistics,

*** Participation in Workshop/Seminar/Webinar**

| Sr. No. | Title | Agency/Institute | Date |
|---|---|---|---|
| 01 | Two day state level online workshop on "Paython Programming" | Kisan Veer Mahavidyalaya, Wai | 16-17 June, 2021 |
| 02 | National Web-seminar on "Recent Trend in Libraries and Research" | Prof. Dr. N. D. Patil Mahavidyalaya, Malkapur | 01.08.2021 |
| 03 | International Conference on "Recent Advances in Statistics" | Sadguru Gadage Maharaj College, Karad | 11-12 October, 2021 |
| 04 | Webinar on "Future Scope of Statistics Government Sector" | Balwant College, Vita | 19.01.2022 |
| 05 | National Level Conference on "Statistica Modeling and Inference" | P.C. Jabin Science College Hubali | 29.01.2022 |
| 06 | Two days National webinar on "NGOs' Initiatives and Intervention in Disability Sector" | Shivaji University, Kolhapur | 24-25 Feb, 2022 |
| 07 | "National Intellectual Property Awareness Program" | Government of India, Intellectual Property India | 19.04.2022 |

*** Member of the following committee's formed by Shivaji University, Kolhapur**

i) Member of DRC committee in Statistics.
ii) Member of Expert Committee.
iii) Member of preparation Academic Audit format Committee.
iv) Placement committee Co-ordinator of the teachers in Statge2/ Stage3/ Stage 4/Stage 5.
v) Subject Expert in Placement committee Statge2/ Stage3/Stage 4/Stage 5.
vi) Member of scrutiny committee of the placement of the teachers.

**Prof. (Dr) Suvarna Balkrishna More**
Department of Zoology

1. Award - Maazi Vasundhara- Paryavaran Dut Nagarpanchyat Kavathe Mahankal – 13.12.2021
2. Worked as Subject expert for placement at S U Kolhapur - 21.1.2122and 14 .06 .2022
3. Excursion of B. Sc III at Dandoba ( Short study Tour)- 15.1.2022 and Long Study Tour at Mahabaleshwar, Ratnagiri on 9th to 12th May 2022.
4. B. Sc III- Visit to Goat Farming at Punyashlok Ahilyadevi Holkar goat Farming Ranjani on 12.04. 2022. Project on Bird Biodiversity of Kavathe Mahanksl Tahsil, Vermicomposting, Insect Diversity, and butterfly Diversity.
5. Guidance for Research students.
6. Research Papers Published :

i) The Study of Habit, Habitat, Web Pattern and Parental Care in *Herennia multipunctata* (Arachnida: Araneae) from Sahyadri Tiger Reserve : International Journal of Science and Research *(IJSR),* **ISSN(online): 2319-7064, Index Copernicus Value (2013):6.14, Impact factor: (2015) : 7.803,** Vol. 11 Issue 2 ,Page 266 to 269 (Feb. 2022)

ii) Diversity, Habits and Habitats of Anurans from Kavathe Mahankal Tehsil (Dist. Sangli); International Journal of Current Science (IJCSPUB) **ISSN 2250-1770, Impact factor: (2022) :** 8.17, Vol. 12 Issue 3, 613 to 621. (July 2022)

iii) Amphibian Diversity from Patharpunj area of Sahyadri Tiger Reserve(Maharashtra, India): International Journal of Science and Research *(IJSR),* **ISSN(online): 2319-7064, SJIF (2019):7.583,** Paper ID:SR21226174454, DOI: 1021275/SR21226174454 (February 2021)

7. Worked as Senior Supervisor for theory exam. – 23rd to 30th Aug. 2022 and Practical Examiner on 2.06.2022 to 06.06.2022.
8. Participated in one day workshop on 'Consumer Protection Act and Cyber Crime Awareness Programme' organized by P.V.P. Mahaviyalaya Kavathe Mahankal, on 15th March 2022.

9. Participated in one day workshop on 'Advancs in Zoology Practical Instrumentation and Techniques'organized by Department of Zoology Arts, Commerce and Science College Paluson 9th Feb. 2022.
10. Participated in National Conference on Innovative Trends in Biological Research, organized by Dept. of Zoology and Microbiology, D. P. Bhosale College, Koregaon. Dist – Satara on 9th Nov. 2022.
11. Celebrated wildlife Week – 6th Oct.to 15th Oct 2022 by arranging various activities, such as,
   i) Exhibition of more than 60 Medicinal plants, Aquatic plants, Marine life , molluscan shells etc.
   ii) Competition of Poster presentation, Rangoli of wildlife .
   iii) Prepared Wildlife and Jungle models to create awareness among the students. Exhibition enjoyed by more than 2000 students and teachers of various colleges, Schools and Institutes.

## G. D. Satpute (Statistics)

| Sr. No. | Activity | Organized by | Duration |
|---|---|---|---|
| 01 | Attended one day Workshop on Data Analysis using Ms Excel (Convener) | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 17/03/22 |
| 02 | Attended one day Workshop for non-teaching staff | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 26/03/22 |
| | | | |
| | **Examination Work** | | |
| 01 | Junior Supervision Practical Exam B.Sc. I | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 3 Days |
| 02 | Junior Supervision Practical Exam B.Sc. II | | 4 Days |
| 03 | Junior Supervision Practical Exam B.Sc. III | | 4 Days |
| 04 | Assessment Practical Exam B.Sc. I | | 2 Days |
| | | | |
| | **Achievements** | | |
| 01 | Online quiz: अटल भूजल योजना: स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव (भूजल सर्वेक्षण आणी विकास पुणे आयोजित) दि: १५/८/२२ | | |

## V. V. Koshti (Statistics)

| Sr. No. | Activity | Organized by | Duration |
|---|---|---|---|
| 01 | Attended one day Workshop on World Consumer Protection act and cyber crime awareness program. | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 15/03/22 |
| 02 | Attended one day Workshop on Data Analysis using Ms Excel (Convener) | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 17/03/22 |
| 03 | Attended one day Workshop for non-teaching staff | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 26/03/22 |
| | **Examination Work** | | |
| 01 | Paper Setting B.Sc. I, Sem I Sem II 8 Sets | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | |
| 02 | Paper Setting B.A. I Sem I, Sem II 8 Sets | | |
| 03 | Paper Setting B.Sc. III Sem V, 1+1 Sets | Shivaji University, Kolhapur | 1 Day |
| 04 | Paper Setting B.Sc. II Sem V, 1+1 Sets | Shivaji University, Kolhapur | 1 Day |
| 05 | External Examiner at B.Sc. II Practical | R.R. Mahavidyalaya Jat, R.R. Patil College Savlaj | 3 Days 3 Days |
| 06 | Internal Examiner at B.Sc. I, B.Sc. III practical | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 10 Days |
| 07 | Assessment B.A.I, B.Sc. I, | | 4 Days |
| 08 | Junior Supervision | | 10 |
| | **Achievements** | | |
| 01 | ईगल फौंडेशनचा राष्ट्रीय गरुडझेप पुरस्कार २०२२: गणपतीपुळे दि: ३ एप्रिल २०२२ | | |
| 02 | भीमा-नीरा विकास संस्थेचा राष्ट्रशाहीर आमरशेख पुरस्कार २०२२: इंदापूर दि: १२ जून २०२२ | | |
| 03 | Attended e-test on the occasion of Independence Day organized by MKCL दि.: १५/८/२२ | | |
| 04 | Online quiz: अटल भूजल योजना: स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव (भूजल सर्वेक्षण आणी विकास पुणे आयोजित) दि: १५/८/२२ | | |
| 05 | Online Statistics Quiz organized by Adarsh College, Vita. Date: 29/06/2022 | | |
| 06 | Published 100+ articles in leading newspapers in Maharashtra on various topics | | |

# कला, वाणिज्य व विज्ञान विभाग

## सिनीअर विभाग

## प्र. प्राचार्य – डॉ. एम्. के. पाटील

### इंग्रजी
**प्रा. कांबळे एस्. एस्.** एम.ए., नेट
**प्रा. कु. सावनूरकर आशिया** एम.ए.,सेट

### मराठी
**प्रा. डॉ. लोंढे एम्. जी.** एम.ए.,एम्.फिल.,पीएच. डी.
**प्रा. डॉ. शिंदे ए. एस्.** एम. ए.,एम्.फिल, पीएच. डी.
**प्रा. सुर्यवंशी एस. व्ही.** सेट
**प्रा. पाटील रविंद्र** एम.ए, बी. एड., सेट
**प्रा. कु. इमडे ए. आर** एम.ए.,बी. एड. सेट, नेट

### हिंदी
**प्रा. थोरात डी. पी.** एम.ए.सेट,नेट
**प्रा. डॉ. शिंदे व्ही. एस.** एम. ए. पीएच. डी.

### अर्थशास्त्र
**प्रा. सकट के. एल.** एम.ए. नेट
**प्रा. पाटील सी. बी.** एम.ए. बी.एड., सेट

### शारीरिक शिक्षण
**प्रा. भोसले ए. पी.** एम.पी.एड्.

### वाणिज्य विभाग
**प्रा. डॉ. मोहिते बी. एच.** एम.कॉम. पीएच.डी.
**प्रा. माने ए. एम.** एम.कॉम., सेट, नेट
**प्रा. खांडेकर ए. एम.** एम. कॉम.
**प्रा. शिंदे एस. एम.** एम.कॉम., सेट

### इतिहास
**प्रा. पोळ एस्. एन्.** एम.ए.
**प्रा. एनापूरे के. जी.** एम. ए. सेट

### भूगोल
**प्रा. डॉ. कुंभार टी. ई.** एम.ए. पीएच. डी.
**प्रा. डॉ. पोळ एन्. एस्.**
एम.ए.एम्.फिल., पीएच. डी.
**प्रा. डॉ. गाडे डी. ए.** एम.ए., पीएच. डी., नेट
**प्रा. माळी ए. एम.** एम. ए. सेट
**प्रा. घाटगे व्ही. पी.** एम. ए. सेट
**प्रा. माने एस. जी.** एम. ए. सेट

### राज्यशास्त्र
**प्रा. वाघमारे एन. एस.** एम.ए.
**प्रा. फाकडे एस्. एन.** एम.ए.
**प्रा. पवार आर. एन.** एम.ए. सेट

### समाजशास्त्र
**प्रा.सौ. पवार एस. एस.** एम. ए.
**प्रा. यादव एस. एस** एम. ए.

### मानसशास्त्र
**प्रा. डॉ. कांबळे व्ही. डी.** एम.ए., सेट, नेट, पीएच.डी.
**प्रा. डॉ. सुर्यवंशी एम्. एस्.** एम.ए.एम्.फिल.,पीएच.डी.
**प्रा. सुर्यवंशी डी. एस्.** एम. ए. सेट

### संख्याशास्त्र
**प्रा. डॉ. पाटील एम्. के.**
एम.एस्सी.एम्.फिल. पीएच.डी., डी.आया.टी.
**प्रा. कोष्टी. व्ही. व्ही.** एम.एस्सी.एम्.फिल., डी.आय.टी.

### गणित
**प्रा. दुधाळ आर. ए.** एम.एस्सी.एम.फिल.
**प्रा. वाघमोडे एस. एन.** एम.एस्सी.

**वनस्पतीशास्त्र**

**प्रा. पाटील टी. जी.** एम.एस्सी.,एम्.फिल.
**प्रा. डॉ. जाधव बी. टी.** एम. एस्सी.,पीएच.डी.
**प्रा. पाटील एस. बी.** एम. एस्सी., बी. एड.
**प्रा. साबळे एस. एम.** एम. एस्सी.
**प्रा. पाटोळे एस. एस.** **प्रा. मुजावर आर. जी.**
**प्रा. चव्हाण आर. व्ही.** **प्रा. मलमे ए. एस.**

**पदार्थ विज्ञान**

**प्रा. सौ. महामुनी पी. यु.** एम. एस्सी.
**प्रा. पाटील एस्. बी.** एम. एस्सी.
**प्रा. डॉ. शेंडगे एस्. एस्.** एम. एस्सी.,पीएच.डी.
**प्रा. मोरे जी. एस.** एम. एस्सी.
**प्रा. गोडसे एस. टी.** एम. एस्सी.
**प्रा. पाटील एम. ए.** एम. एस्सी.
**प्रा. बील्ले ए. बी.** एम. एस्सी.
**प्रा. शिंदे एस. एस.** एम. एस्सी.
**प्रा. कांबळे पी. यु.** एम. एस्सी.

**रसायनशास्त्र**

**प्रा. पाटील एस्. व्ही.** एम.एस्सी.एम्.फिल.
**प्रा. डॉ. कोरे जी. डी.** एम. एस्सी., पीएच. डी.
**प्रा. कांबळे ए. ए.** एम. एस्सी. सेट
**प्रा. कु. पाटील पुजा** एम. एस्सी., बी. एड.
**प्रा. शिंदे टी. पी.**
**प्रा. साळुंखे ए. पी.**
**प्रा. भोसले ए. बी.**
**प्रा. पाटील एन. एस.**

**प्राणिशास्त्र**

**प्रा. डॉ. कु. मोरे एस. बी.** एम.एस्सी., पीएच.डी.
**प्रा. पाटील एस. ए.** एम.एस्सी.

**शारीरिक शिक्षण संचालक**

**प्रा. डॉ. शिंदे एम. एम.** एम.पी.एड्., सेट, पीएच.डी.

**ग्रंथालय विभाग / ग्रंथपाल**

**प्रा. कांबळे एम. एम.**
एम.ए.एम.लिब ॲण्ड आय.एस्सी, सेट

## ज्युनिअर विभाग

## उपप्राचार्य – डॉ. बी. एन. पाटील

**इंग्रजी**

**प्रा. कोळेकर ए. एस.** एम.ए.बी.एड., नेट, सेट

**मराठी**

**प्रा. सौ. सुर्यवंशी एस्. एस्.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. सौ. ओलेकर एस. डी.** एम.ए.,बी.एड.

**हिंदी**

**प्रा. थोरात डी. पी.** एम.ए.,बी.एड. नेट, सेट

**भूगोल**

**प्रा. यादव डी. पी.** एम.ए.,बी.एड.

**अर्थशास्त्र/सहकार**

**प्रा. वाघमारे टी. ए.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. पाटील सी. बी.** एम.ए.,बी.एड. सेट

**राज्यशास्त्र / इतिहास**

**प्रा. पाटील बी. एन्.** एम.ए.,बी.एड.

**इतिहास**

**प्रा. सौ. तोरणे व्ही. एस.** एम.ए.,बी.एड.

**वाणिज्य विभाग**

**प्रा. पाटील एस. एस.** एम.कॉम., बी.एड.
**प्रा. शिंदे एस. पी.** एम.कॉम.

**शारीरिक शिक्षण संचालक**

**प्रा. डॉ. शिंदे एम. एम.**
एम.पी.एड्., सेट, पीएच.डी.

**पदार्थ विज्ञान**

**प्रा. शिंदे आर. एल.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. कर्चे एस्. व्ही.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. पाटील सुरेश तुकाराम** एम.एस्सी.,बी.एड्.

**रसायनशास्त्र**

**प्रा. तोरणे एस्. एन्.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. के. एस. पाटील** एम.एस्सी.,बी.एड्.

**गणित**

**प्रा. कु. पवार एस. एन.** एम. एस्सी.

## प्रशासकीय कर्मचारी

**कुलसचिव तथा प्रबंधक – श्री. स्वामी आर. ए.** एम. ए. जीडीसी & ए

### मुख्य लिपीक
**श्री. चंदनशिवे बी. टी.** बी.एस्सी.,एम.ए.

### कनिष्ठ लघुलेखक
**श्री. शिंदे एस. एस.** बी. कॉम., लघुलेखन

### ग्रंथालय लिपीक
**श्री. थोरात टी. ए.** बी. ए. बी. पी. एड.
**श्री. शिंदे एस. बी.** एम. ए. बी. लिब.

### प्रयोगशाळा सहाय्यक
**श्री. मुजावर एस्. एन्.** एच. एस. सी.
**श्री. जाधव एस्. जे.** बी.एस्सी.

### कनिष्ठ लिपीक
**श्री. शिंदे ए. एस्.** बी. ए.
**श्री. सोनंद बी. एस्.** एम. ए.
**श्री. पाटील जी. आर.** बी.एस्सी

### प्रयोगशाळा परिचर
**श्री. पवार व्ही. आर.**
**श्री. शिंदे जी. व्ही.**
**श्री. झांबरे बी. जे.**
**श्री. पाटील व्ही. जी.**
**श्री. चव्हाण ए. बी.** बी. ए.
**श्री. गावडे बी. डी.** बी. ए.
**श्री. खोत व्ही. पी.**

### ग्रंथालय परिचर
**श्री. बोदगीरे एस्. एन्.** बी.कॉम
**श्री. माने एस्. आर.**
**श्री. गायकवाड ए. आर.**
**श्री. व्हनमोरे ए. व्ही.**
**श्री. पवार आर. एस्.**

### शिपाई
**श्री. भांगले पी. बी.**
**श्री. वडर आर. बी.**
**श्री. कुंभार डी. आर.** बी. ए.
**श्री. पवार एम्. बी.** बी. ए.
**श्री. जंगम पी. आर.** एम.ए.
**श्री. कारंडे एस्. पी.**
**श्री. सपकाळ पी. जे.** बी. ए.
**श्री . भोसले व्ही. व्ही.**
**श्री. खोत एस. जी.**




प्र. प्राचार्य,
डॉ. एम्. के. पाटील
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ, जि. सांगली.

# वसंत

वार्षिक, दोन हजार एकवीस



पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ.


वसंत
वार्षिक दोन हजार सतरा, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली


वसंत
वार्षिक, दोन हजार अठरा
वसंतदादा पाटील महाविद्यालय कवठे महांकाळ, जि. सांगली.


वसंत
२०१९


वसंत
वार्षिक, दोन हजार वीस
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ.

शिक्षण प्रसारक मंडळ कवठे महांकाळ संचलित

# पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ.

# वसंत

२०२०-२१

वर्ष : ४३

अंक : ३६

## संपादन समिती

अध्यक्ष

प्र. प्राचार्य डॉ. एम्. के. पाटील

प्रमुख संपादक

प्रा. डॉ. मोहन लोंढे

## विभागीय संपादक

प्रा. विजय कोष्टी
प्रा. महेश कांबळे
प्रा. आप्पासाहेब कोळेकर
प्रा. रविंद्र पाटील

डॉ. दिलीप गाडे
डॉ. मयुर शिंदे
डॉ. विनायक शिंदे
डॉ. भगवान मोहिते

## मांडणी/ मुखपृष्ठ

श्री. अतुल पाटील

**२०२०-२१**

**।। प्रकाशनाचा काळ ।।**

वार्षिक

**।। प्रकाशक ।।**

प्र. प्राचार्य, डॉ. एम्. के. पाटील
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। मुद्रक ।।**

श्री. सुरेश नानासो पाटील
महांकाली प्रिंटींग प्रेस, कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। राष्ट्रीयत्व ।।**

भारतीय

या अंकात व्यक्त झालेल्या विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ५ |
| फोटोफिचर | | |
| प्रेरणा | | ९ |
| मार्गदर्शक | | १० |
| संस्थापक | | ११ |
| मार्गदर्शक | | १२ |
| संचालक मंडळ | | १३ |
| सन्मान | | १४ |
| परंपरा दिन | | १५ |
| विविध कार्यक्रम | | १५ |
| सेवानिवृत्ती | | १९ |
| श्रध्दांजली | | २० |


## गद्य


| | | |
|---|---|---|
| कोरोना योध्दा | माधुरी सुधीर देवकरे | २१ |
| आई विषयी | घोडके अंकिता नंदकुमार | २३ |
| आजादी का अमृत महोत्सव | स्नेहा कुमार रुकडे | २५ |
| वारकरी संप्रदाय आणि संत परंपरा | तेजश्री रघुनाथ पवार<br>स्नेहल बाळासो पाटील | ३२ |
| लसीकरण सर्वेक्षण : कोरोना काळातील कृतीयुक्त शिक्षणाचा संख्याशास्त्र विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम ! | संख्याशास्त्र विभाग | ५० |
| लहानपण देगा देवा | विद्या दयानंद कांबळे | ५४ |

| | | |
|---|---|---|
| भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे | शुभांगी यादव | ५६ |
| सांगली जिल्ह्यातील साहित्यिक | श्री. रविंद्र भगवान पाटील | ६० |
| काहूर | प्रा. मुल्ला फैरोज जहांगीर | ८२ |
| | **पद्य** | |
| पाऊस आला | धनश्री अशोक शिंदे | ८७ |
| श्रावण मास | धनश्री अशोक शिंदे | ८७ |
| वेड मैत्रीचे | लक्ष्मी बनसोडे | ८८ |
| मुलगी झाली जड | लक्ष्मी बनसोडे | ८८ |
| माझी आई | लक्ष्मी बनसोडे | ८९ |
| उडान | धनश्री अशोक शिंदे | ८९ |
| वक्त का पहिया | प्रा. धर्मेंद्र पंडीत थोरात | ९० |
| Why We Should Love Statistics | Gurudas Shinde | ९१ |
| Most Dangerous Time In His Tory | Dhanashri Shinde | ९२ |
| Importance of Statistics And Statlical Data | Akanksha Vijay Koshti | ९३ |
| अध्यापकनपूरक व अध्यापनेतर कार्याचा वार्षिक अहवाल | | ९५ |

# संपादकीय

शिक्षण प्रसारक संस्था, कवठे महांकाळ संचलित पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयास या वर्षी ४३ वर्षे पूर्ण होत आहेत. दरवर्षीप्रमाणे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या वसंत या वार्षिकाचा हा ३६ वा अंक प्रसिध्द होत आहे.

आमच्या प्रेरणास्थानी असणारे वसंतरावदादा पाटील, संस्थापक आनंदरावदादा शिंदे यांच्या विचार कार्याची परंपरा पुढे वृद्धिंगत करणारे अध्यक्ष मा. बाळासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे.

महाविद्यालयाचे कुशल मार्गदर्शक आणि तंत्रस्नेही प्र. प्राचार्य मा. डॉ. एम्. के. पाटील यांच्यामुळे महाविद्यालयात अनेक विविध आणि नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. याशिवाय महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या मुळे हे महाविद्यालय विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करीत आहे. यासाठी कवठे महांकाळ परीसरातील पालकांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे.

महाविद्यालयामध्ये २५०० च्या आसपास विद्यार्थी-विद्यार्थिनी ज्ञानार्जन करीत आहेत. ग्रामीण भागातील एक नावारुपास आलेले, पुरोगामित्वाची जपणूक करणारे हे महाविद्यालय आहे. दुष्काळाच्या झळा पचवून, हातावर पोट भरणारा बहुसंख्य समाज असूनही शिक्षणाची ओढ लागलेला आणि शिक्षणाच्या जोरावर स्वत: ची प्रगती करु पाहणारा विद्यार्थी वर्ग महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याचे समाजभान त्यांच्या लेखनातून दिसून येते. यातूनच कोरोना योध्दा, आई विषयी, आजादी का अमृत महोत्सव, वारकरी संप्रदाय आणि संत परंपरा, लसीकरण सर्वेक्षण: कोरोना काळातील कृतीयुक्त शिक्षणाचा संख्याशास्त्र विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम !, लहानपण देगा देवा, सांगली जिल्ह्यातील साहित्यिक, काहुर अशा वैचारिक गद्यात्मक लेखनाबरोबरच पाऊस आला, श्रावण मास, वेड मैत्रीचे, मुलगी झाली जड, माझी आई असा पद्यात्मक हुंकार विद्यार्थानी या अंकात मांडला आहे. अशा प्रकारे वैचारीक वास्तववादी अनुभूतीतून साकारलेली गद्य-पद्य आणि हिंदी, इंग्रजी मधील गद्य म्हणजेच हा अंक आहे.

सामाजिक, सांस्कृतिकतेचे भान ठेवून परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय घडवला जातो. यातूनच खास अशी भूमिका घेऊन महाविद्यालयात विविध उपक्रम राबविलेले आहेत. परंपरा दिनानिमित्त दत्तोबा शंकर खिलारे (तिसंगीकर) यांचे तमाशाचे

सादरीकरण हा कार्यक्रम झाला.

या वर्षामध्ये कोरोनाचा फैलाव सुरु असल्यामुळे शारीरिक अंतर, लॉक डाऊन मुळे संकलन, संपादन करणे अवघड होते तरी ही आमच्या महाविद्यालयामध्ये अनेकविध अभासी माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यामध्ये डॉ. गिरीश मोरे (कोल्हापूर), प्रा. राकेश वानखेडे (नाशिक), शिक्षक दिन, जागतीक संख्या शास्त्र दिना निमित्त मॉडर्न कॉलेज पुणे-माजी उपप्राचार्य डॉ. पि. जी. दिक्षीत यांचे व्याख्यान, शासकीय महाविद्यालय औरंगाबाद माजी-प्राचार्य डॉ. कुमोद गोरे यांचे व्याख्यान अशा विविध विषयावर आभासी माध्यमाद्वारे विद्यार्थ्यापर्यंत संपर्क साधन्याचा प्रयत्न केला. अशा कार्यक्रमास विद्यार्थानी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. त्या प्रमाणे राजर्षी शाहू महाराज जंयती, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती, महात्मा गांधी जयंती, ॲड. सतीश पटोळे यांचे व्याख्यान, मौलाना अब्दुल कलाम आझाद जयंती, पयोद उद्योग समुहास भेट, माजी विद्यार्थी स्नेह मेळावा, संविधान दिन, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिन, मराठी भाषा संवर्ध पंधरवडा निमित्त विविध कार्यक्रम, हुतात्मा दिन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, मराठी राजभाषा दिना निमित्त दै. लोकमतचे संपादक श्रीनिवास नागे सांगली यांचे व्याख्यान, आझादी का आमृत महोत्सव निमित्त व्याख्याने असे कार्यक्रम शासनाच्या सुचनेचे पालन करुन घेण्यात आले.

'वसंत' हा महाविद्यालयीन कर्तृत्वाचा आरसा आहे. विद्यार्थांनी आपल्या सुप्त गुणांना वाव देत सामाजिकतेचे दर्शन आपल्या विविधांगी लेखनातून व कवितातून व्यक्त केले आहे. महाविद्यालयात वर्षभरात उत्तमोत्तम कार्यक्रम झाले. त्याकडे डोळसपणे पाहिले तर विद्यार्थ्यामध्ये माणूस घडविण्याचे कौशल्य महाविद्यालयाचे सामाजिकतेची दृष्टी असणारे कुशल प्राचार्य डॉ. एम्. के. पाटील यांच्याकडे आहे. त्यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन यातून प्रस्तुत अंक पूर्णत्वास पोहचला आहे.

मुख्यपृष्ठ श्री. अतुल पाटील यांनी तयार करुन दिले. त्यांचे आभार तसेच संपादक मंडळातील सर्व प्राध्यापकांनी वेळो-वेळी दिलेल्या सहकार्यासाठी त्यांचेही आभार. या अंकासाठी योगदान देणाऱ्या सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सर्व विद्यार्थी व अंक वेळेत पूर्ण करुन दिल्याबद्दल महांकाली प्रेसचे शतश: आभार, विशेष म्हणजे सुबक मांडणी साठी अतुल पाटील यांचे ही आभार !

**प्रा. डॉ. मोहन लोंढे**

'गिनिपिग' ही कादंबरी राकेश वानखेडे यांची आहे. या कादंबरीत शोषणमुक्तीचा धागा आहे. गिनिपिग म्हणजे प्रयोगशाळेत ऑपरेशनसाठी वापरला जाणारा बेडूक. या बेडकाला तसा काही अर्थ नसतो. केवळ प्रयोग करुन ज्ञान मिळवायचे, पैसा कमवायचा या बदल्यात बेडकाला काय मिळते तर पोटफाड आणि शेवटी मृत्यू. भारतीय सामान्यजनाचा आज गिनिपिग सारखी अवस्था आहे. या गिनिपिग होण्याच्या प्रक्रियेला नकार देत नवी भाषा बोलणाऱ्या या कादंबरीचे प्रतिकात्मक शिर्षक बरेच काही सांगून जाते.

## कोरोना हॉस्पिटल

"मी कदाचित दोन दिवसांनी उठलो होतो. डोळे चोळत आयसोलेशन वॉर्डमध्ये दैना मी पहात होतो. मला अधिकच गुदमरु लागले होते. माझा श्वास मोकळा करावा, असे मला वाटे. डोळे लावले की मला काय काय आठवायचे...

जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा व्हेंटीलेटरवर होतो. मी तीव्र अंगदुखीने कितीतरी दिवस पडून आहे. कळले नव्हते. घशात मोठी सुरुंग लागल्यासारखा दाह होता. एसीच्या हवेचा वास मी ओळखू शकत होतो. माझी ऑक्सिजन लेवल खाली गेली होती आणि अचानकच माझे गोष्ट सांगणे थांबले होते. अनकॉन्शियस असताना खांद्यावरच्या नळीचा प्रेशर कमी जास्त केला जातोय असे जाणवे. लंग्ज पूर्णपणे भरले आहेत, ते थरावर थर रचत गळ्यापर्यंत चिकाचे गोळे झालेत, असे वाटे. त्याचा पॉझिटिव प्रेशर कसा मॅनेज करावा? हे बाजूच्या पेशंटला सांगितले जात होते. तो बहुदा तेलंग किंवा खंडू असावा. मला ते पहायचे होते, पण मी कितीही प्रयत्न केला तरी डोळे उघडत नव्हते किंवा माझा आवाजही निघत नव्हता. नसो नॉसोगेस्ट्रिक ट्युब नाकात सोडली होती. कधी आणि का सोडली मला काहीच कळले नव्हते. इंडोट्रकल ट्युबने हवा आत जात होती. बहुतेक एक ट्युब हवा सोडत असावा दुसरी बाहेर काढत असावा. उच्छासासारखं. डॉक्टर

आपल्या सहाय्यकाला, 'टोटली रिस्ट्रिक्ट पेशंट ॲक्टिव्हिटी अँड लिमिटस् देअर मुव्हमेंट' म्हणून सूचना देत होते. व्हेंटीलेटर कक्षातले किती पेशंट व्हीएनिंग ऑफच्या स्टेजला आले, हेही कानावर येत होते. हवा आणि ऑक्सिजन यांचे मिक्सर करणाऱ्या पेशंटबाबतच्या सूचनाही येत होत्या. मशीनच्या आतले सेन्सस आणि बाहेरचे सेन्सस याचीही जाणीव होते. फ्लो व्हाल्युमवाला अलार्मही मला कळत होते. उत्सफुर्त श्वास घेण्याचा प्रयत्न केल्यास ही सारी मशिनरी उच्छावास मदत करत होती. ऑक्सिजनचा फ्लो जसा मेंदूला जाई तसे माझे काय-काय आठवणींचे पापुद्रे उडू लागत आणि मी पुन्हा स्वत:शीच पुढे सुरु होई..."[१]

संदर्भ-

१ राकेश वानखेडे : 'गिनिपिग' , हस्ताक्षर प्रकाशन गृह, नांदेड,२०२१
पृ. २३४, २३५



डॉ. वसंतरावदादा पाटील



**श्री बाळासाहेब शिंदे**
अध्यक्ष



**श्री सुरेश पाटील**
उपाध्यक्ष



**श्री. सुदर्शन शिंदे**
सचिव

संस्थापक



आनंदराव (दादा) शिंदे



**प्रा. डॉ. एम्. के. पाटील**
प्र. प्राचार्य



**प्रा. बी. एन. पाटील**
उपप्राचार्य
कनिष्ठ विभाग



**प्रा. एस. व्ही. कर्चे**
पर्यवेक्षक
कनिष्ठ विभाग

# संचालक मंडळ



श्री. औदुंबर पाटील



श्री. जे.वाय. भोसले



श्री. दिनकर शिंदे



श्री. एकनाथ जगताप



श्री. अशोक पाटील



श्री. तात्यासो फाकडे



श्री. गणपती शिंदे



श्री. एच. बी. पाटील



श्री. ए. जे. खोत



श्री. शहाजी पाटील



श्री. विलास नलवडे



**प्रा. डॉ. मोहन लोंढे**
महाराष्ट्र राज्य शाळा कृती समीती
'कृतीशील प्राध्यापक पुरस्कार'
पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून निवड



**प्रा. व्ही. व्ही. कोष्टी**
कोविड योध्दा पुरस्कार, राष्ट्रीय शिक्षक रत्न,
जय भारत चेतना, उत्कृष्ट वृत्तपत्र
लेखन इ. पुरस्कार ने सन्मानीत



**प्रा. सुनिल तोरणे**
राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद पुणे यांचे कडून
लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्य पुरस्कार,
विश्वमराठी अध्यापक परिषद, औरंगाबाद कवितेला
दुसरा क्रमांक



**डॉ. एस. एस. शेंडगे**
पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून निवड



**डॉ. एन्. एस्. पोळ**
पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून निवड



**डॉ. एम्. एस. सुर्यवंशी**
प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ
महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडून
कोविड योध्दा सन्मानपत्र ने सन्मानित



**प्रा. आशिया सावनूरकर**
इंग्रजी विषयात सेट उत्तीर्ण



**प्रा. रविंद्र पाटील**
मराठी विषयात सेट उत्तीर्ण

## परंपरा दिन




दत्तात्रय खिलारे तिसंगीकर यांचे एकपात्री लोकनाट्य सादरीकरण

## विविध कार्यक्रम



राजर्षी शाहू जयंती,
प्र. प्राचार्य डॉ. टी. एम. भोसले



महात्मा गांधी जयंती,
मा. सुदर्शन शिंदे



अण्णा भाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टीळक स्मृती दिन, प्र. प्राचार्य डॉ. टी. एम. भोसले




भ्रष्टाचार निर्मुलन, ॲड. सतिश पाटोळे



मौलाना आझाद जयंती



कोरोनाचे नियम पाळून कार्यक्रम



स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी

# विविध कार्यक्रम

## माजी विद्यार्थी स्नेह संमेलन




स्नेह संमेलन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष यांचा सत्कार



संघटना अध्यक्ष मा. विशाल शिंदे यांचा सत्कार करताना मा. प्र. प्राचार्य डॉ. एम. के पाटील



माजी विद्यार्थी सचिन गिड्डे (अकौंट अधिकारी, नगरपरिषद विटा)



स्नेह संमेलन प्रसंगी मार्गदर्शन, प्र. प्राचार्य डॉ. एम्. के. पाटील



MOU साठी पयोद उद्योग समुहाला भेट



महापरीनिर्वाण दिन

## आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रम प्रसंगी



स्वागत करताना डॉ. दिलीप गाडे



प्रास्ताविक करताना
प्र. प्राचार्य डॉ. एम. के. पाटील



कोरोनाचे नियम पाळून
कार्यक्रमाचा अस्वाद घेताना



व्याख्यान देताना डॉ. संतोष बाबरे,
आर. आर. पाटील कॉलेज सावळज.







हुतात्मा दिना निमीत्त हुतात्म्यांना श्रध्दांजली

# सेवानिवृत्ती



प्राचार्य डॉ. अशोक बाबर



प्रा. डॉ. टी. एम्. भोसले



प्रा. एस्. आर. मुलाणी



प्रा. डी. एस्. पाटील



प्रा. बी. एस्. पाटील



प्रा. जी. के. ऐनापूरे



प्रा. आर. एल. शिंदे

## भावपूर्ण श्रध्दांजली



कै. साहेबराव पवार

# कोरोना योध्दा

देशाची सेवा करणे ज्यांचे पहिले काम अशा शूर कोरोना योध्यांना माझा सलाम...

डिसेंबर २०१९ प्रथम सापडलेल्या कोरोना या अतिसुक्ष्म विषाणूने अल्प काळात जगभर थैमान घातले. घड्याळाच्या काट्यावर धावणारे जग अक्षरश जागेवर थांबले. अशा घातक, भयंकर, जीवघेण्या संसर्गजन्य कोरोना महामारीविरुध्द लढण्यासाठी प्रत्येक देशात कोरोना योध्दे सज्ज झाले. स्वत:च्या जीवाची पर्वा न करता केवळ देशसेवेचा विचार या कोरोना योध्यांनी केला.

कोरोना विरुध्द लढाई जिंकण्यासाठी समाजातील अनेक घटक कोरोना योध्दा म्हणून कार्य करीत आहेत. त्यातील अत्यंत महत्वाचा घटक डॉक्टर हा विशेष कोरोना योध्दा आहे. डॉक्टरांनी कोरोनावर उपचार करण्यासाठी स्वत:ची व कुटूंबाचीही पर्वा केली नाही. ते दिवसरात्र कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्यात व्यस्त आहेत.

आपल्या देशात ऐन उन्हाळ्यात रात्री नको वाटनारे पीपीई किट वापरुन रुग्णांची आहोरात्र सेवा केली. कोविड ड्युटीवर असताना कित्येक डॉक्टरांना कोरोनाची लागण झाली व प्राणही गमवावा लागला.दिल्ली येथील बेगमपूर हॉस्पिटलमधील कोरोना योध्दा सुप्रसिध्द डॉक्टर जावेद अल्ली हे ज्वलंत उदाहरण आहे.

डॉक्टरांच्या बरोबरच नर्स, आरोग्य कर्मचारीही कोरोना योध्दा म्हणून विशेष भुमिका बजावत आहेत. प्रत्येक कोरोना बाधितांची ते जीव धोक्यात घालून देखभाल करीत आहेत. महाराष्ट्र सरकारने माझे कुटूंब माझी जबाबदारी ही मोहिम राबवल्यावर तर प्रत्येक नागरीकाची घरोघरी जाऊन तपासणी करण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. कोरोना लढाईतील पोलीस हा कोरोना योध्दाही अहोरात्र झटून कार्य करीत आहे. लॉकडाऊनच्या काळात बेसावधपणे फिरणाऱ्या



नागरिकांवर योग्य कारवाई करणे. विनाकारण नागरिकांनी गर्दी करणे, सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे यावर त्यांनी चोख बंदोबस्त केला. त्यामुळे कोरोना अटकाव करणे सोपे झाले. हे करीत असताना कित्येक पोलिसांना कोरोनाची लागण झाली. प्रसंगी जिवही गमवावा लागला.

कोरोना महामारी संकटात अनेक उद्योगधंदे बंद पडल्याने नागरीक हवालदिल झाले. अशा वेळी स्वस्त धान्य दुकानातील राशनदाराने आपले कार्य चोख बजावले. सरकारने पुरविलेले धान्य गरीब, गरजुंना वेळेवर पोहोचविले. बँक कर्मचाऱ्यांनाही कोरोना योध्दा ही भूमिका पार पाडताना जीवाची पर्वा केली नाही. कित्येक सामाजीक संस्थांनी स्वयंसेवका मार्फत मास्क, सॅनिटायझरचे वाटप गरजुंना केले. महत्वाच्या ठिकाणी चेक पोस्टवर शिक्षकांनी केलेली कोरोना योध्दाची भुमिकाही खुप महत्वाची ठरली. कोरोना लढाई प्रत्येक नागरिकाला घरी राहून जिंकायची होती. या परिस्थितीत सोशल मिडीयाने देशाच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक बातमी पोहचवण्याचे कार्य केले.

कोरोना लढाईमध्ये गावच्या सरपंचापासून ते देशांच्या पंतप्रधानापर्यंत प्रत्येक कोरोना योध्दा या महामारी विरुध्द लढत आहे.

देशाच्या राजकिय, सामजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. सर्व क्षेत्रांतील कोरोना योध्दयांचे कार्य वाखानन्यायोग्य आहे. या सर्व कोरोना योध्यांचे कार्य आपण सदैव स्मरणात ठेवू. कारण त्यांच्यामुळे आपण उद्या मोकळा श्वास घेणार आहोत. विशाल सुंदर अशा जगात पुन्हा ताठ मानेने मिरवणार आहोत.

*कोरोना योध्यांचा ठेवू मान*
*कार्य त्यांचे आहे महान....*

माधुरी सुधिर देवकरे
बी. ए. भाग २

# आई विषयी

आईच मन.....

नाही रे कळणार बाळा
आईचे ऱ्हदय तुला...
आनंदात लहानाचा मोठा हो
हेच मागण देवाला...

अशी असते आई ... आईच मन आजपर्यंत कोणाला कळले नाही. आई ही आई असते, तिची जागा जगात कोणी घेऊ शकत नाही. आई विना पोर हे भिकारी आहे. ज्या घरात आई आहे त्या घराला घरपन आहे. समाजात मान आहे. चांगल्या नजरेने पाहिले जाते. बाळांचा पहिला गुरु आई, पहिला उच्चार आई, पहिला संस्कार आई. आई हि व्यक्ती आहे की तिच्यामुळे पूर्ण घरात संस्कार व नीटनीटकेपणा आहे. आईच्या असण्यामुळे घरात सुख, मांगल्य, प्रेम, माया, समृध्दी सगळे भरभरुन असते. आई म्हणजेच आ– म्हणजे आत्मा आणि ई– म्हणजे ईश्वर असा आईचा अर्थ आहे. आपल्यापाशी आपली आई म्हणजेच साक्षात ईश्वर आहे.

आईविषयी काय बोलावे आई म्हणजे देव, पृथ्वीवरचा आई म्हणजे साठा सुखाचा, आई म्हणजे मैत्रीण गोड, आई म्हणजे मायेची ओढ, आई म्हणजे प्रेमाची बाहुली, आई म्हणजे दयेची सावली, आई म्हणजे स्वत: उपाशी राहून आपल्याला भरवणारी, आई म्हणजे जीवनाचे रान करुन आपल्यासाठी राबणारी, आई म्हणजे जगण्याचा अर्थ शिकवणारी, आई म्हणजेच ओरडून समजवणारी, आई म्हणजे आपले बोट धरुन चालायला शिकवणारी, आई म्हणजेच आपले अस्तित्व घडवणारी, आई विषयी जेवढे बोलावे आणि जेवढ्या उपमा द्याव्या तेवढ्या कमी आहेत. जगात जर आई नसते तर हे जग पूर्णपणे अर्थहिन झाले असते. बाळ जन्माला येते तेव्हा पाहिल्यांदा आई बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकून हसते, परंतू आयुष्यभर बाळाच्या रडण्यावर आई चिंता, काळजी करते. आई कधीही आपल्या बाळाच्या डोळ्यात पाणी आलेले पाहवत नाही. आई ही ईश्वराने तयार कलेली माता, देवी, बहिण, मावशी व मुलगी आहे. यांनी याच्यामुळे दोन घरे जोडली जातात. तिच्यामुळेच घरची प्रगती होते. ज्या घरातील आई शिकलेली ते घर संस्कारी व सुसंस्कृत असते. आई विना घर हे घर नाही. म्हणून

‘स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी’

कोठे ही न मागता भरभरुन मिळालेले दान म्हणजे आई.

आई आपल्या जवळ असते तेव्हा तिचे अस्तित्व आपल्याला माहित नसते. आई आपल्या जवळ असते तेव्हा आपल्याकडे सगळे असते, आई नसते तेव्हा आपल्याकडे काहीच नसते. म्हणूनच आई आहे तो पर्यंत काळजी घ्या आपण देवाला मानतो तसे आई माना. आई हाच आपला देव आणि ईश्वर आहे. जगामध्ये आईवर भरभरुन प्रेम करा ती आपली असो किंवा दुसऱ्यांची कारण आई ही आईच असते.

निरपेक्ष प्रेमाची ती एकच ग्वाही असते.

लावतात जीव हजारो पण एकच आई असते.

प्रेम म्हणजे काय हे आईकडून कळते आपल्याला ते कुणाच्याही सांगण्यावरुन जुळू नये व कोणाच्याही सांगण्यावरुन तुटू नये असे असते ते आईचे प्रेम असते.

अंकिता नंदकुमार घोडके
बी.ए. भाग १

# आजादी का अमृत महोत्सव

" स्वातंत्र्य विरांना
करुया शत शत प्रणाम
त्यांच्या निस्वार्थ त्यागानेच
भारत बनला महान.... "

१८५७ साली इंग्रज सत्तेला हादरवून टाकणारा मोठा लढा भारतात झाला. हा लढा काही अचानक उद्‌भवला नाही. ह्यापुर्वीही भारतात इंग्रजांविरुध्द अनेक लढे झाले होते.

भारतात ज्या ज्या भागात इंग्रजांची सत्ता स्थापन झाली तेथील लोकांना इंग्रज शासनाचे दुष्परिणाम भोगावे लागले. कंपनीच्या सत्तेमुळे आपले सर्व स्तरांतून शोषण होत आहे याची जानीव भारतीयांच्या मनात निर्माण होऊ लागली आणि या सत्तेविरुध्द असंतोषही वाढत गेला.

शेतकरी व सामान्य जनता कंपनी सरकारच्या काळात कंगाल झाली. अशातच १७७० मध्ये बंगाल प्रांतात मोठा दुष्काळ पडला. इंग्रजी राज्यकर्त्यांचे जनतेशी वर्तन मात्र उदासिन व संवेदनशुन्य राहिले. सन १७६३ ते १८५७ या काळात बंगालमध्ये प्रथम संन्याशांच्या व त्यानंतर फकिरांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी लढे दिले.

उमाजी नाईक यांनी दिलेला लढाही असाच उग्र होता. उमाजींनी आपल्या रामोशी बांधवांना व स्थानिक युवकांना संघटित करुन इंग्रजांविरुध्द बंड केले. त्यांनी एक जाहिरनामा काढून इंग्रजांविरुध्द लढा देण्याचे व इंग्रजी सत्ता झुगारुन देण्याचे आवाहन केले. पुणे, सातारा, अहमदनगर, सोलापूर, नाशिक, भोर इत्यादी भागात त्यांनी आपला दरारा निर्माण केला. १८३२ मध्ये कंपनी सरकारने उमाजी नाईक यांना अटक केली. त्यांना पुणे येथे फाशी देण्यात आले.

भारतातील अदिवासी व वन्य जमातींनीही इंग्रज सत्तेला आव्हान दिले. या जमातींचा उदर निर्वाह जंगलातील संपत्तीवर होत होता. ब्रिटीशांनी कायद्याने त्यांच्या हक्कांवर गदा आणली. परिणामी बिहार, गोंड, बिहारमधील संथाळ यांनी ब्रिटीशांच्या विरोधात लढे दिले. महाराष्ट्रातील भिल्ल, कोळी, रामोशी यांनी इंग्रजांविरुध्द लढे दिले. कोल्हापूर परिसरात गडकऱ्यांनी, तर कोकणात फोंड-सावंतानी इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. १८५७ सालापुर्वी देशाच्या निरनिराळ्या भागांत काही जमिनदार आणि राजेरजवाड्यांनीही लढे दिले.

हे सर्व लढे त्या त्या परिसरात झाले. ते स्थानिक स्वरुपाचे व एकाकी होते. इंग्रजांनी बळाचा उपयोग करुन ते मोडून काढले. लोकांचा असंतोष दडपला गेला. पण तो नाहिसा झाला नाही. हा वणवा १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात भडकला. ब्रिटीश कंपनी सत्तेविरुध्द अनेक ठिकाणी लढे उभे राहिले. दारुच्या कोठारावर ठिणगी पाडावी आणि त्याचा मोठा स्फोट व्हावा अशी अवस्था झाली. भारतातील विविध वर्गांमध्ये साठलेला असंतोष या लढ्याच्या रुपाने बाहेर पडला आणि त्याचा उद्रेक अभुतपूर्व अशा सशस्त्र लढ्याने झाला.

देशभक्तांच्या बलिदानामुळे
स्वतंत्र झालो आपण कोणी
विचारल्यावर गर्वाने सांगतो
आम्ही भारतीय आहोत

जय हिंद....

ब्रिटिशांनी १८५६ साली हिंदी सैनिकांना लांब पल्लयाच्या एन्फिल्ड बंदुका दिल्या. त्यात वापरण्यासाठी नवी काडतुसे दिली. त्या काडतुसांवरील आवरण दाताने तोडावे लागे. या आवरणाला गाईची व डुकराची चरबी लावलेली असते अशी बातमी चहुकडे पसरली. यामुळे हिंदू व मुस्लीम सैनिकांचे धार्मिक भावना दुखावल्या व सैनिकांमध्ये असंतोष निर्माण झाला.

बराकपुरच्या छावणीतील मंगल पांडे हे इंग्रज अधिकाऱ्याच्या अन्यायी वृत्तीला विरोध करण्याच्या भावनेने ब्रिटिश अधिकाऱ्यावर गोळी झाडली. मंगल पांडे यांना अटक करुन फाशी देण्यात आली. ही बातमी वणव्यासारखी चहुकडे पसरली. मेरठ छावणीतील हिंदी सैनिकांची पूर्ण पलटणच बंड करुन उठली. १२ मे १८५७ रोजी सैनिकांनी दिल्लीचा ताबा घेतला. दिल्ली ताब्यात येताच सैनिकांचा आत्मविश्वास वाढला.

आज सलाम आहे त्या विरांना ज्यांच्यामुळे
आज हा दिवस पाहिला.....
ती आई आहे भाग्यशाली
जिच्यापोटी जन्मलेल्या वीरांमुळे हा देश अखंड राहिला....

भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण इंग्रजांनी स्विकारले. त्याचबरोबर भारतीय समाज सामाजिक दृष्टीने एकसंघ होणार नाही. अशी काळजी घ्यायला सुरवात केली. भारतीयांमध्ये जात, धर्म, वंश, प्रदेश या कारणावरुन नेहमी संघर्ष निर्माण होतील. एकमेकांविषयी भारतीयांची मने कलुषित होतील हे धोरण राबविले जाऊ लागले. फोडा आणि राज्य करा हेच इंग्रजी राज्याचे सुत्र राहिले.

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यामुळे इंग्रजी राज्यसत्तेला संघटीत विरोध केला पाहिजे असे भारतीयांना वाटू लागले. १८५७ चा स्वातंत्र्यलढा हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्त्रोत ठरला.

**वासुदेव बळवंत फडके :-** महाराष्ट्रात इंग्रजांविरुध्द सशस्त्र लढा वासुदेव बळवंत फडके यांनी दिला. ब्रिटिश साम्राज्याशी शस्त्राने लढले पाहिजे अशी त्यांची धारणा झाली. त्यांनी वस्ताद लहुजी सावळे यांच्याकडे शस्त्रविद्येचे शिक्षण घेतले. ब्रिटिश सत्तेविरुध्द व सशस्त्र उठाव करण्यासाठी त्यांनी रामोशी बांधवांना संघटित करुन बंड पुकारले. हे बंड अयशस्वी झाले. ब्रिटिश सरकारने त्यांची रवानगी एडनच्या कारागृहात केली. तेथेच त्यांचा १८८३ मध्ये मृत्यू झाला. स्वात्रंत्र्यासाठी त्यांनी सशस्त्र लढा उभारला.

**चाफेकर बंधू :-** सन १८९७ साली पुण्यात प्लेगच्या साथीचा बंदोबस्त करताना प्लेग कमिशनवर रँड याने जुलूम, जबरदस्ती केली. त्याचा बदला म्हणून दामोदर व बाळकृष्ण या चाफेकर बंधूनी २२ जून १८९७ रोजी रँडचा वध केला. दामोदर बाळकृष्ण व वासुदेव हे तीन बंधू व त्यांचे सहकारी महादेव रानडे यांना फाशी झाली. एकाच घरातील तीन भावांनी देशसेवेसाठी हौतात्म्य पत्करले.

**चंद्रशेखर आझाद :-** सरकारच्या दडपशाहिने क्रांतीकारी चळवळ संपुष्टात आली नाही. गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केल्यावर अनेक तरुण क्रांतीमार्गाकडे वळले. चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, योगेश चटर्जी, सचिंद्रनाथ संन्याल इत्यादी क्रांतीकारक एकत्र आले. क्रांतीकार्याला लागणारा पैसा जमवण्यासाठी त्यांनी रेल्वेतून नेला जाणारा सरकारी खजिना ९ ऑगस्ट १९२५ रोजी काकोरी या उत्तर प्रदेशातील रेल्वे स्टेशनजवळ लुटला. यालाच काकोरी कट म्हटले जाते. सरकारने तात्काळ कारवाई करुन क्रांतीकारकांना अटकेत टाकले. त्यांच्यावर खटले चालविण्यात आले. अशफाक उल्ला खान रामप्रसाद बिस्मिल्ल, रोशन सिंग, राजेंद्र लाहिरी यांना फाशी देण्यात आले. चंद्रशेखर आझाद मात्र पोलीसांच्या हाती सापडले नाहीत.

**भगतसिंह, राजगुरु, सुखदेव :-** समाजवादी विचारांनी प्रभावित झालेल्या तरुणांनी देशव्यापी क्रांतीकारी संघटना उभी करण्याचे ठरवले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंह, राजगुरु, सुखदेव इत्यादी तरुण यांमध्ये प्रमुख होते. हे सर्व क्रांतीकारक धर्मनिरपेक्ष विचारसरणीचे होते. १९२८ साली दिल्लीच्या फिरोजशहा कोटला मैदानावर झालेल्या बैठकीमध्ये या तरुणांनी हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिशन असोसिएशन या संघटनेची स्थापना केली. भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून मुक्त करणे हे या संघटनेचे

उद्दिष्ट होते. त्याचबरोबर तिला शेतकरी कामगारांचे शोषण करणारी अन्यायी, सामजिक– आर्थिक व्यवस्थाही उलथुन टाकायची होती. सामजिक न्यायावर व समतेवर आधारित समाज निर्माण करण्याला भगतसिंग यांनी महत्व दिले.

शस्त्रे गोळा करणे आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे, ही कामे या संघटनेच्या स्वतंत्र विभागाकडे सोपवली होती. या विभागाचे नाव होते, हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी आणि तिचे प्रमुख होते चंद्रशेखर आझाद.

या संघटनेच्या ससदस्यांनी  अनेक क्रांतिकारक कार्ये केली. भगतसिंग व राजगुरु यांनी लाला लजपतराय यांच्या मृत्युचा बदला घेण्यासाठी सॉंडर्स या अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार केले.

सरकारने तत्काल हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीच्या केंद्रावर धाडी घातल्या. त्यातुन सॉंडर्सच्या हत्येने धागेदोरे ही पोलिसांच्या हाती लागले सरकारने क्रांतिकारकांची धरपकड सुरु केली. त्यांच्यावर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटले भरले. भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च१९३१ रोजी लाहोराच्या तुरुंगात फाशी देण्यात आली.

चंद्रशेखर आझाद मात्र शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती सापडले नाहीत. पुढे अलाहाबादच्या अल्फेड पार्कमध्ये पोलिसांशी झालेल्या चकमकीत ते शहीद झाले.

**सूर्य सेन :-** सूर्य सेन हे बंगालमधील चितगाव येथील क्रांतिकारी गटाचे प्रमुख होते. त्यांनी आपल्याभोवती अनंत सिंग, गणेश घोष, कल्पना दत्त, प्रीतिलता वड्डेदार अशासारख्या निष्ठावान क्रांतिकारकांची फौज गोळा केली. त्यांच्या साहाय्याने चितगाव येथील शस्त्रागारावरील हल्याची योजना सूर्य सेन यांनी आखली योजनेप्रमाणे १८ एप्रिल १९३० रोजी क्रांतिकारकांनी चितगांवमधील दोन शास्त्रागारांतील शास्त्रास्त्रे ताब्यात घेतली टेलिफोन व टेलिग्राम यंत्रणा त्यांनी तोडुन टाकली आणि संदेशवहन यंत्रणा ठप्प करण्यात यश मिळाले. त्यानंतर त्यांनी ब्रिटिश फौजांशी रोमहर्षक लढत दिली.

१६ फेब्रुवारी १९३३ रोजी सूर्य सेन व त्यांचे काही सहकारी पोलिसांच्या हाती सापडले. सूर्य सेन व त्यांच्या बारा सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. कल्पना दत्त यांना जन्मठेप झाली. प्रीतिलता वड्डेदारने पोलीसांच्या हाती न लागला आत्माहुती दिली.

चितगांव उठावामुळे  क्रांतिकारी चळवळीला गति मिळाली. शांती घोष व सुनीती चौधरी या दोन शाळकरी मुलींनी जिल्हा न्यायाधीशाला ठार केले. तर बीना दास या

युवतीने कोलकाता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात गव्हर्नरवर गोळ्या झाडल्या. अशा अनेक क्रांतिकारी घटना या काळात घडल्या.

चला पुन्हा एकदा
आठवुया तो नजारा...
शहिदांच्या हृदयातील
ज्वाला आठवा
जिच्यामुळे आज देशाचं
स्वातंत्र्य कायम आहे
देशभक्त्यांच्या रक्ताची ती धार...

जालियनवाला बाग हत्याकांडाला जबाबदार असणाऱ्या ओडवायर याचा वध सरदार उधम सिंह यांनी इंग्लंड मध्ये १९४० साली केला.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये क्रांतिकारी चळवळीने महत्वाचे योगदान दिले. क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेशी लढताना साहस व निर्धाराचे दर्शन घडवले. त्यांचे राष्ट्रप्रेम व समर्पणवृत्ती केवळ अजोड होती. त्यांचे बलिदान भारतीयांना स्मृतिदायी ठरले आहे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतरही चंद्रनगर, पुदुच्चेरी, कारिकल, माहे व याणम या प्रदेशांवर फ्रांन्स चे आधिपत्य होते. तेथील भारतीय रहिवासी भारतात सामील होण्यास उत्सुक होते. हे प्रदेश भारताचे घटक असल्यामुळे ते भारताच्या स्वाधीन करावे, अशी मागणी भारत सरकारने केली.

फ्रान्सने १९४९ साली चंद्रनगरमध्ये सार्वमत घेतले. तेथील जनतेने भारताच्या बाजुने कौल दिला. चंद्रनगर भारताच्या स्वाधीन करण्यात आले. त्यानंतर फ्रांन्सने भारताचे इतरही प्रदेश भारत सरकारच्या हाती सोपवले.

वाऱ्यामुळे नाही
भारतीय सौनिकांच्या श्वासामुळे
फडकतोय आपला तिरंगा...!

वंदे मातरम् चळवळी द्वारे विद्यार्थी हैदराबाद मुक्तिलढ्यात सहभागी झाले. तसेच हैदराबाद मुक्तिसंग्रामात वेदप्रकाश, श्यामलाल, गोविंद पानसरे, बहिर्जी शिंदे, श्रीधर वर्तक, जर्नादन मामा, शोएब उल्ला खान इत्यादींनी हौतात्म्य पत्करले. त्यांचे बलिदान भारतीयांना प्रेरणादायी ठरले आहे. यावरुन हैदराबादच्या मुक्तिलढ्यात मराठ्यावाड्यातील नेत्यांचा व जनतेचा सिहांचा वाटा होता. हे लक्षात येते.

१७ सप्टेंबर हा हैदराबाद मुक्तिसंग्रामचा दिवस मराठवाड्यात मराठवाडा मुक्तिदिन म्हणून साजरा केला जातो. स्वतंत्र्य भारतात मराठवाड्याचा समावेश १५ ऑगस्ट १९४७ मध्ये झालेला नव्हता. हा प्रदेश १९४८ मध्ये जनतेच्या स्मृतिदायी लढ्यानंतर स्वंतत्र भारतात विलीन करण्यात आला.

भारत स्वतंत्र झाल्यानंतरही चंद्रनगर, पुदुचेरी, कारिकल, माहे व याणम या प्रदेशांवर फ्रान्सचे आधिपत्य होते.  तेथील भारतीय रहिवासी भारतात सामील होण्यास उत्सुक होते. हे प्रदेश भारताचे घटक असल्यामुळे ते भारताच्या स्वाधीन करावे, अशी मागणी भारत सरकारने केली.

गोव्यातील स्वांतत्र्यलढ्याने उग्र स्वरुप धारण केले. भारत सरकार पोर्तुगीज सरकारशी समोपचाराने वाटाघाटी करत होते. मात्र त्याला दाद मिळत नव्हती. शेवटी भारत सरकाने नाइलाजाने लष्करी बळाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. १९६१ च्या डिसेंबरमध्ये भारतीय सैन्याचे गोव्यात प्रवेश केला. अल्पावधीतच पोर्तुगीज लष्कराने शरणागती पत्करली. १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगिजांच्या वर्चस्वातुन मुक्त झाला. भारताच्या भूमीवरुन साम्राज्यवादाचे पुर्णपणे उच्चाटन झाले. भारताच्या स्वांतत्र्यलढ्याची खऱ्या आर्थाने परिपूर्ती झाली.

अभिमान आणि नशीब आहे की<br>
भारत देशात जन्म मिळाला<br>
इग्रंजापासून मुक्त झालो.<br>
तसे आता भ्रष्ट्राचारमुक्त<br>
भारत करुया

भारत स्वतंत्र झाला तरी स्वांतत्र्यलढा अद्याप संपलेला नव्हता. भारतात अनेक संस्थाने हाती. संस्थानांना भारतात सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा हक्क मिळालेला होता. त्यामुळे अखंड भारताचे राष्ट्रिय सभेचे स्वप्न अपुरे राहिले होते. संस्थाने स्वतंत्र राहिल्यामुळे भारताचे अनेक तुकडे पडणार होते. पोर्तुगीज आणि फ्रेंच सत्तांनी भारतातील काही भागांवरील सत्तांनी भारतातील काही भागांवरील सत्ता सोडुन दिलेली नव्हती.

ऑगस्ट क्रांती मैदान हे एक रणमैदान होते. स्वातंत्र्य चळवळीची आठवन देणाऱ्या या मैदानाचे नुसते नुतनीकरण न करता या मैदानात स्वांतत्र्यलढा जिवंत करणारे स्मारक करावे. स्वराज्य आधी की सुराज्य आधी हा मुद्दा होता. आता स्वराज्याला ७५ वर्षे

झाली. कुर्बानी देऊन हे स्वांतत्र्य मिळाले आहे. त्याचे रक्षण करणे हे आपलं कर्तव्य आहे.

भारत देश महान आमुचा
भारत देश महान
स्फुर्ती देतिल हेच आमुचे
राम कृष्ण हनुमान

हे वर्ष जितके ऐतिहासिक, गौरवपूर्ण देशासाठी जितके महत्वपूर्ण आहे. देशदेखिल तितक्याच भव्यतेने आणि उत्साहाने हे वर्ष साजरे करेल.

हा अमृत महोत्सव साजरा करण्याची जबाबदारी देशाने आपल्या सगळ्यावर सोपविली आहे हे आमचे भाग्य आहे. स्वातंत्र्य अमृत महोत्सवाचे लढ्याची भावना त्यामागील त्याग हे सगळे अनुभवता आले पाहिजे. ज्यात देशातील हुतात्म्यांना श्रध्दांजली देखिल वाहिली जाईल आणि त्यांच्या स्वप्नांमधील भारताच्या वैभवाची झलक देखिल असावी. ज्यामध्ये सनातन भारतच्या वैभवाची झलक देखिल असावी. आणि आधुनिक भारताची चमक देखिल असावी.

आपल्या येथे असे म्हटले जाते की 'उत्सवेन बिना यस्मात् स्थापनम् निष्फलम् भवेत्' अर्थात कोणताही संकल्प उत्सवा शिवाय यशस्वी होत नाही जेव्हा एखादा संकल्प उत्सवाचे रुप धारण करतो तेव्हा त्यात लाखो, कोटी लोकांचे संकल्प जोडले जातात, लाखो, कोट्यावधी लोकांची ऊर्जा त्यात जोडली.

भारतात स्वतंत्र्याच्या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य देण्यात आले.

या जन्माचा नजराणा
मायभूमीस पेश व्हावा...
तिरंगाच माझा
गणवेश व्हावा...
सांडावे रुधीर,
या मातृभूमीसाठी...
हरेक जन्मी
भारत माझा देश व्हावा...

स्नेहा कुमार रुकडे
बी. ए. भाग ३

# वारकरी संप्रदाय आणि संत परंपरा

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय आणि भक्तिमय संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय यालाच भागवत संप्रदाय असेही म्हणतात. वारकरी म्हणजे जो नित्य नियमाने आपल्या उपास्य देवताची वारी किंवा यात्रा न चुकता करतो त्या प्रत्येक वारकऱ्यांच्या गळ्यात तुळशीची १०८ मनी असलेली माळ असते. यावरुन माळकरी असेही नाव पडले. या संप्रदायातील भक्तांनी वर्षातून दोन वेळा म्हणजे आषाढ शुध्द एकादशीला आणि कार्तिक शुध्द एकादशीला अशा दोन वाऱ्या केल्या पाहिजेत याला खुप महत्व आहे या व्यतिरिक्त शुध्द माघी एकादशी आणि शुध्द चैत्री एकादशी या दोन दिवशी ही तुम्हाला पंढरपूर क्षेत्री वैष्णवांची एकच गर्दी झालेली दिसेल. वारकरी हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त आहेत ते विठ्ठलाची नित्य नियमाने भक्ती करतात. तसेच या संप्रदायामध्ये विठ्ठलाच्या उपासनेला आणि त्याच्याकडे जाण्याच्या भक्तांच्या वोडीला किंवा नियमित वारी याला खुप महत्व आहे. वारकरी संप्रदाय हा विठ्ठल भक्तांचा साधासुध्दा भक्ती संप्रदाय नाही तर शैव, नाथ, दत्त, सुफि इत्यादी पंथातील चिंतनशील संस्कारक्षम अशा भक्तांना सामावून घेतलेले ते एक सांस्कृतिक केंद्र आहे.

या संप्रदायाचे प्रवेशद्वार सर्व जाती पंथाच्या स्त्री–पुरुषांना खुले आहे. त्यात उच्चनिच, गरीब–श्रीमंत असा भेदभाव नाही. वारकरी संप्रदायाने शास्त्र प्रामाण्याला व जातिव्यवस्थेला धक्का न लावता स्त्री व शुद्रांना आत्मविकासाचा मार्ग खुला करुन दिला. वारकरी संप्रदायात विठ्ठल भक्तीचा महीमा विशेष असला तरी राम, कृष्ण, दत्त, विष्णू, शिव इत्यादी देवतांच्या भक्तांना त्यांनी आपल्यात सामावून घेतले. विष्णू व शिव यांच्या ऐक्यावर भर दिला. स्वत: ज्ञानेश्वर महाराज गुरुपरंपरेने नाथपंथीच होते. तेव्हा त्यांच्या विचार सरणीवर नाथपंथीयातील तत्वज्ञानाचा ठसा आहे. तसेच शांकर वेदांन्त व काश्मिरी शैवमत यांचे ही संस्कार त्यांच्यावर होते. त्यामुळे शैवांची निष्ठा व तपश्चर्या त्यांनी स्विकारली. वैष्णव संप्रदायातील सात्विकता, दयाशीलता, विश्वबंधुत्व इत्यादी गुण उचलले उत्तर दक्षिण दिशांनी आलेल्या साऱ्या प्रवाहांना



सामावून घेणारा असा हा वारकरी संप्रदाय आहे. या संप्रदायात व्रत वैकल्याचे स्तोम नाही, कर्मठपणा नाही तर त्याग, भोग, स्वधर्माचरण व नैष्कर्म्य यांचा मेळ घालण्याचा उपदेश आहे. अद्वैत, भक्ती, ज्ञान, उपासना, श्रध्दा व विवेक यांच्या एकात्मतेवर त्यांनी भर दिला. वारकरी संतांची वृत्ती नेहमीच लोकाभिमूख होती. रात्रंदिवस लोकांत राहून बहुजन समाजात नवचैतन्य ओतण्याचा सफल प्रयत्न वारकरी संप्रदायाने केला. अशा या महान संप्रदायातील संत महात्म्यांची ओळख करुन घेऊ.

## * संत ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे :-

### ● संत ज्ञानेश्वर :-

संत ज्ञानेश्वर हे तेराव्या शतकातील प्रसिध्द मराठी संत आणि कवी भागवत/वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक, योगी व तत्वज्ञ होते. त्यांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणजवळ गोदावरी नदीच्या काठावर वसलेले आपेगांव या ठिकाणी, श्रावण कृष्ण आष्टमी, शके ११९७ (इ.स. १२७५) रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी त्यांच्या आई रुक्मिणीबाई या होत. निवृत्ती हे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू व सोपानदेव व मुक्ताबाई ही धाकटी भावंडे, संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांचा मराठी संस्कृतीवर असलेला प्रभाव आजही अबाधित आहे. निवृत्तीनाथ हेच ज्ञानेश्वरांचे सद्‌गुरु होते नेवासे क्षेत्रात आपल्या गुरुंच्या कृपाशीर्वादाने गीतेवर त्यांनी प्रख्यात टीका लिहिली. खरे पाहता ज्ञानेश्वरांनी ही टीका सांगितली व सच्चिदानंद बाबा यांनी ती लिहिली. या ग्रंथास 'ज्ञानेश्वरी' किंवा 'भावार्थदीपिका' असे म्हणतात. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील ज्ञान प्राकृत भाषेत आणले. "माझा मराठाचि बोलू कौतुके । परि अमृतातेहि पैजासी जिंके । ऐसी अक्षरे रसिके, मेळवीन" (ज्ञाने.६.१४) असे म्हणत त्यांनी हा ग्रंथ इ.स. १२९० मध्ये लिहिलागेल्याचे मानले जाते. ज्ञानेश्वरीत १८ अध्याय असून सुमारे ९००० ओव्या आहेत. त्यांचा दुसरा ग्रंथ 'अमृतानुभव' किंवा 'अनुभवामृत' होय. हा विशुध्द तत्वज्ञानाचा जीव ब्रहम ऐक्याचा ग्रंथ आहे. सुमारे ८०० ओव्या (दहा प्रकरणे) या ग्रंथात आहेत. चांगदेव या महान योग्याला ६५ ओव्यांचे लिहिलेले पत्र म्हणजे 'चांगदेव पासष्ठी' हा ग्रंथ होय. संत ज्ञानेश्वरांचा 'हरिपाठ' (अभंगात्माक २८ अभंग) हा नामपाठ आहे. यात हरिनामाचे महत्व सांगितले आहे. याशिवाय त्यांनी पसायदान ही लिहीले. जोजे



वांछील तोते लाहो असे म्हणत अखिल विश्वाची जणू काळजी वाहणाऱ्या संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायासह सर्वच भक्त प्रेमाणे 'माऊली' म्हणतात. इ.स. १२९६ मध्ये आळंदी येथे या महान संताने संजीवन समाधी घेतली.

**● संत निवृत्तीनाथ :-**

संत निवृत्तीनाथ महाराजांचा जन्म इ.स. १२७३(माघ वद्य प्रतिपदा, शके११९५) ला आळंदी येथे कुलकर्णी कुळात झाला. निवृत्तीनाथ हे संत ज्ञानेश्वरांचे मोठे बंधू आणि गुरुही होते. नाथ संप्रदायातील गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना दीक्षा दिली. त्यांनी ज्ञानेश्वरांना संस्कृमध्ये असणारी गीता सामान्य लोकांना उमजेल अशा शब्दात लिहिण्याचा आदेश दिला त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका लिहून काढली. सुमारे तीन-चारशे अभंग आणि एक हरिपाठ एवढी रचना निश्चितपणे निवृत्तीनाथांची आहे असे म्हणता येईल. संत निवृत्तीनाथांनी ब्रहमगिरीच्या सानिध्यात जेष्ठ वद्य १२ शके १२१९ रोजी (इ.स.१२९९) संजीवन समाधी घेतली.

**● संत सोपानदेव :-** (१२७७-१२९६)

संत ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधू यांच्या जन्मसनांबाबत मात्र दोन मते आहेत. पहिल्या मतानुसार सोपानदेवांचा जन्म शके ११९९ मध्ये म्हणजे १२७५ साली झाला. तर दुसऱ्या मतानुसार तो शके ११९६ मध्ये म्हणजे १२७४ साली झाला. सोपानदेवांच्या रचनेत पंचीकरण, नमन, हरिपाठ, प्राकृत गीता इ. प्रकरणे तसेच 'सोपानदेवी' ही गीतेवरील टिका, अभंग, पदे, ह्यांचा समावेश होतो. पंचीकरण, प्राकृतगीता आणि सोपानदेवी ह्या रचना सोपानदेवाच्याच असे निश्चयाने सांगता येत नाही असे एक मत मांडले गेले आहे. सोपानदेवांची अभंग रचना थोडी असली तरी गोड आहे. त्यांच्या अभंगावर ज्ञानेश्वरांचा प्रभाव जानवतो. परखडपणा हा त्यांच्या अभंगाचा एक विशेष म्हणता येईल. सोपानदेवांनी सासवड येथे समाधी घेतली.

**● संत मुक्ताबाई :-** (जन्म- आपेगांव, महाराष्ट्र इ.स.१२७९, समाधी कोथळी (जळगांव जिल्हा)इ.स.१२९७)

संत मुक्ताबाई या महाराष्ट्रातील संत व कवयित्री होत्या. यांना 'मुक्ताई' या नावानेही आळखले जाते. संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेव हे मुक्ताबाईचे थोरले भाऊ होत. संत मुक्ताबाईंनी रचलेले ताटीचे एकूण ४२ अभंग प्रसिध्द आहेत. त्या बरोबरच कल्याण-पत्रिका, मनन, हरिपाठ हे त्यांचे अन्य साहित्य आहे.



त्यांची 'निवृत्तीप्रसादे मुक्ताबाई' ही अभंगरुपी कविता अद्याप अप्रसिध्द आहे. मुक्ताबाईंनी 'ज्ञानबोध' या ग्रंथाचेही लेखन केले आहे असे संशोधनान्ती स्पष्ट होते. ह्या ग्रंथामध्ये संत निवृत्तीनाथ समाधी घेण्याच्या थोडेसे आधी हे लेखन झाले असावे असे त्यातील अंतर्गत संदर्भावरुन लक्षात येते.

*** इतर प्रमुख संत :-**

**● संत नामदेव :-**

भक्तशिरोमणी संत नामदेव हे ज्ञानेश्वरांच्या कालखंडात होऊन गेले. सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसीबामणी हे संत नामदेवांचे जन्मगांव होय. त्यांचा जन्म शके ११९२ (इ.स.१२७०) मध्ये झाला. त्यांचे बालपण पंढरपूर येथे गेले. त्यांनी लहानपणापासूनच श्री विठ्ठलाची अनन्यसाधारण भक्ती केली.

संत नामदेवांची अभंगगाथा (सुमारे २५०० अभंग) प्रसिध्द आहे. त्यांनी अपांग रचना  त्यांनी शौरसेनी भाषेतही काही अभंग रचना (सुमारे १२५ पदे) केली. त्यातील सुमारे बासष्ठ अभंग (नामदेवजीकी मुखबानी) शिख पंथाच्या गुरुग्रंथसाहेब मध्ये गुरुमुखी लिपीत घेतलेले आहेत. संत नामदेवांनी आदि, समाधि व तीर्थावळी किंवा तीर्थावली या गावातील तीन अध्यायातून संत ज्ञानेश्वरांचे चरित्र सांगितले आहे. ते चांगले किर्तनकारही होते. "नामदेव किर्तनकरी पुढे देव नाचे पांडुरंग" अशी त्यांची योग्यता होती. "नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी" हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. भागवत धर्माचे एक आद्य प्रचारक म्हणून संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर सुमारे ५० वर्षे भागवत धर्माचा प्रचार केला भावीक भक्तांचा व साधूसंतांच्या चरण धुळीचा स्पर्श व्हावा म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारी 'पायरीचा दगड' होण्यात त्यांनी धन्यता मानली. संत नामदेव हे शके १२७२ मध्ये (दि. ३ जुलै १३५० रोजी) पंढरपूर येथे पांडुरंग चरणी विलीन झाले.

**● संत विसोबा खेचर:- (तेरावे शतक)**

रा. चिं. ढेरे यांनी विसोबा खेचर विरचित ष्टस्थल पुस्तकात विसोबा हे पांचाळामधील सोनार समाजाचे होते. असे दाखवून दिले आहे. संत नामदेवांच्या अभंगातून उपलब्ध संदर्भाच्या आधारे असे म्हणता येते की पंढरपूर पासून ३६६ किलोमीटर दूर हिंगोली जिल्ह्यात औंढ्या नागनाथ हे



त्याचे मुळ गांव असावे विसोबा खेचर लिखित शदूस्थळी (षट्स्थळ) ग्रंथाच्या हस्ततिखिताचा शोध जेष्ट संशोधक रा. चिं. ढेरे यांना सासवड येथील सोपानदेव समाधी मंदिरातील कागदपत्रांच्या गाठोड्यात सन १९६९ मध्ये लागला श्री संत नामदेव महाराज गाथामध्ये विसोबांचे दोन अभंग आढळतात संत नामदेवांनी विसोबांचा काही अभंगात आदरपूर्वक गुरु म्हणून उल्लेख केला असला तरी त्यांनी विसोबांचा योगमार्ग स्विकारलेला नाही उलट विसोबाच पुढे वारकरी संप्रदायाचा एक भाग झालेले आढळतात.

● **संत परिसा भागवत :-**

हे संत नामदेवांचे प्रथम शिष्य म्हणून परिसा भागवतांना वारकरी संप्र–दायामध्ये मान दिला जातो. संत परिसा भागवतांचे पुर्वायुष्य अतिशय प्रखर अहंकारात गेले पण नामदेवांच्या सहज संवादात आल्यानंतर मनाची पवित्रता, विचाराची नम्रता आचरणात आली समतेचा सहजभाव भक्तीच्या माध्यमातून जन्माला आला आणि वाळवंटी नामदेव किर्तनासाठी हाती टाळ घेऊन रामकृष्ण हरी म्हणण्यासाठी उभे राहिले.

श्री ज्ञानदेव–नामदेव यांच्या काळातच परिसा भागवतांचे आयुष्य वारकरी संप्रदायात प्रवाहित झाले त्यांच्या जीवनाच्या उत्तरायुष्यात त्यांना संत नामदेवांचा सहवास लाभला. समकालीन कोणत्याही संतांनी परिसा भागवतांच्या आपल्या अभंगात उल्लेख केलेला सापडत नाही. परंतू नामदेवांच्या सोबत चार प्रदीर्घ अभंगात संत नामदेव–परिसा भागवत यांचे संवाद दिलेले आहेत. परिसा भागवतांचा गर्वपरिहार, परिसा भागवतांनी केलेली नामदेव स्तुती एकूण श्री ज्ञानदेव, चांगदेव याशिवाय इतर संतांच्या संदर्भात परिसा भागवतांनी अभंग रचनेतून नामनिर्देश केला श्री ज्ञानदेव, चांगदेव व नामदेव यांच्या संदर्भात अपरंपार आदराची भावना परिसांनी व्यक्त केली आहे. संत परिसा भागवतांचे विविध अभंग भावरसांनी जरी फार ओथंबलेली नसले तरी नामदेवकालीन भक्ती संप्रदायाचे भक्तिमय रुपात एकरुप झालेले दिसतात.

● **संत जनाबाई :-**

जनाबाई या संत नामदेवांच्या समकालीन वारकरी संत कवयित्री होत्या त्यांचा जन्म परभणी येथील गंगाखेड येथे दमा नावाच्या विठ्ठल भक्ताच्या घरी झाला. त्यांच्या त्यांच्या आईचे नांव कुरुंड होते. तिच्या वडिलांनी जनाबाईला नामदेवांचे वडील दामाशेठ शिंपी यांच्याकडे नोकरीसाठी पाठवले तेंव्हापासून त्या संत नामदेवांच्या



कुटुंबातील एक घटक बनल्या त्या स्वत:ला नामयाची दासी म्हणवून घेत असत.

संत जनाबाईच्या नावावर असलेले एकूण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथा या ग्रंथात मुद्रित झाले आहेत. त्यांचे अभंग कृष्णजन्म, थालीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा या विषयांवर आहेत. हरिचंद्राख्यान नामक अख्यान रचनापण त्यांच्या नावावर आहे. संत जनाबाईची भावकविताही ही भगवतांच्या प्रेमाने ओतप्रोत भरलेली आहे.

जनाबाईच्या जीवनातील अनेक अनुभूती त्यांनी त्यांच्या रचनांतून रेखाटल्या आहेत. संत नामदेवांवरील भक्ति-प्रेमभाव संत ज्ञानदेवांविषयी असलेला उत्कट भाव संत चोखोबांच्या भावसामर्थ्याचे अनुसरण तसेच विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेला दिसून येतो. वेळप्रसंगी देवाशी भांडायला पण त्या कमी करत नाहीत. वात्सल्य, कोमल, ऋजुता, सहनशीलता, त्यागीवृत्ती, समर्पनकृती, स्त्री विषयीच्या भावना संत जनाबाईंच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात. असे जेष्ठ अभ्यासक रा. चिं. ढेरे हे जनाबाईच्या काव्याचे रसग्रहण करताना म्हणतात.

● **संत एकनाथ :-**

संत एकनाथ हे वारकरी संप्रदायातील एक संत होते. त्यांचा जन्म इ.स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. संत भानुदास हे एकनाथांचे पणजोबा ते सुर्याची उपासना करीत श्री संत एकनाथांच्या वडिलांचे नाव सुर्यनारायण होते. आईचे नांव रुक्मिणी होते. आई वडिलांचा सहवास त्यांना फार काळ लाभला नाही. एकनाथांचे पालन-पोषण आजोबांनी केले. चक्रपाणी आणि सरस्वती हे त्यांचे आजोबा व आजी होत. एकनाथांचे गुरु जनार्दन स्वामी होते. कवि मुक्तेश्वर हे नाथांचे मुलीकडून नातू होत.

संत ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे २५० वर्षांनी एकनाथांचा जन्म झाला. 'बये दार उघड' असे म्हणत नाथांनी अभंगरचना, भारुड, जोगवा, गवळणी, गोंधळ, यांच्या सहाय्याने जनजागृती केली. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनतेचे रंजन व प्रबोधन केले ते 'एका जनार्दन' म्हणून स्वत:चा उल्लेख करतात. 'एका जनार्दनी' ही त्यांची नाममुद्रा आहे. नाथांच्या लेखन कार्याचा आढावा पुढिलप्रमाणे घेता येईल. आनंदलहरी, एकनाथांची अभंग गाथा, चिरंजीवपद, एकनाथी भागवत, (भागवत पुराणातील आकराव्या स्कंधावर ओवीबध्द मराठी टीका) चतु:श्लोकी भागवत, भावार्थ रामायण (४० हजार ओव्या यांचा हिंदीसह अनेक भाषांत भाषांतरे) भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, शुकाष्टक टीका

समाजाच्या जागृतीसाठी अभंग, गवळणी व भारुडे यांची रचना हस्तमालक टीका,

ज्ञानेश्वरीच्या उपलब्ध प्रतींचे शुध्दीकरण (ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतर जवळजवळ २५० वर्षानंतर) ज्ञानेश्वरीच्या शुध्दीकरणाचे काम त्यांनी शके १५०६ मध्ये पूर्ण केले. संत ज्ञानेश्वरांच्या आळंदी येथील समाधी स्थळाचा शोधही त्यांनी लावला. त्याचबरोबर दत्ताची आरती (त्रिगुणात्मक त्रयमुर्ति दत्त हा जाण) ही देखील लिहिली आहे. नाथ हे महावैष्णव होते. दत्तभक्त होते. देवीभक्तपण होते. आपल्या साहित्याच्या माध्यमातून जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. शके १५२१ (२६ फब्रुवारी इ.स. १५९९) या दिवशी त्यांचे देहावसन झाले.

*** संत मेळ्यातील इतर संत :-**

**● संत सावता माळी :-**

संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांचे समकालीन असलेले संत सावता माळी यांचा जन्म इ.स. १२५० साली महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील 'अरण' या गावी माळी घराण्यात झाला. सावतोबांचे आई-वडील दोघेही विठ्ठलभक्त होते त्यामुळे त्यांनीही लहाणपणापासून भक्तीचे धडे गिरवले. दिवसभर मळ्यात राबावे, रात्री भजन किर्तनात रमावे असा त्यांचा दिनक्रम राहत असे. पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना पाणी, भाकरी, फळे-फुले देऊन पुजा करत असत. हा मळा हेच माझे पंढरपूर असे ते म्हणत होते. मळ्यात काबाडकष्ट करणे, भाज्या, फळे विकणे, वाटसरुला भाकरी देणे, हिच माझी विठ्ठलभक्ती आहे. पांडुरंग माझ्या मळ्यात राहतो. असे म्हणणारे सावतोबा कधीही स्वत: पंढरपूरला गेले नाहीत. प्रपंच करता करता केवळ अंत:करणपूर्वक नामस्मरण केल्याने ईश्वर प्रसन्न होतो आणि दर्शन देतो. असा विचार त्यांनी अग्रहाने मांडला त्याचे अभंग काशिबा गुरव हा लिहुन ठेवत असे सावता माळी यांच्या अभंगरचना या रसाळ आहेत ज्या मध्ये त्यानी दैनंदीन जीवनातील शब्द वापरले आहेत. "कांदा, मुळा, भाजी । अवघी विठाई माझी, लसून, मिरची, कोथिंबीरी, अवघा झाला माझा हरी ।।" "आमुची माळियाची जात, शेत लावू बागाईत, आम्हा हाता मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ।।" अशा प्रकारे सावता माळी यांनी आपल्या बाग-बागायतीच्या व्यवसायातील वाक्प्रचार, शब्द आपल्या अभंगात वापरले आहेत त्यामुळे तत्कालीन मराठी अभंगाच्या भाषेत नव्या शब्दरचनेची भर पडली. संत सावता महाराज आजारी पडल्यावर त्यांनी सर्व गोष्टींचा त्याग केला आणि ते अखंड नामस्मरण करु लागले. अरण या त्यांच्या गावी शके १२१७ (इ.स. १२३५) रोजी ते

पांडुरंग चरणी अनंतात विलीन झाले.

● **संत गोरोबा कुंभार :-** (इ.स. १२६७–२० एप्रील १३१७)

हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत होत. ते ज्ञानदेव नामदेवांचे समकालीन मानले जातात. संत गोरा कुंभार यांना 'गोरोबा काका' म्हणूनही ओळखले जाते. ते विठ्ठलाचे मोठे भक्त होते. तज्ञांच्या मते शा.श.११८९ साली त्यांचा जन्म झाला असावा. उस्मानाबाद तालुक्यातील चिखली हे गाव त्यांचे जन्मस्थळ आहे. आपला पिडीजात व्यवसाय करत व विठ्ठलाची भक्ती करत संत गोरोबा कुंभार यांची उपलब्ध काव्य रचना अत्यल्प आहे. त्यांची काही पदरचना (धुळे) येथील समर्थ वाग्देवता मंदिर येथील बाडात सापडते. त्यांचे सुमारे २० अभंग सकल संत गाथेत समाविष्ट केले आहेत. संत गोराकुंभार हे साक्षात्कारी संत होत. 'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे. तव झालो प्रसंगी गुणातीत', अशा त्यांच्या अभंगात अद्वैत साक्षातकाराची अनुभूती केवळ प्रकट झालेली दिसते. 'म्हणे गोरा कुंभार' ही त्यांची नाममुद्रा होय. संत ज्ञानेश्वरांनी प्रतिपादलेला ज्ञत्तोत्तर भक्तीचा मार्ग संत गोरोबांनी स्विकारलेला दिसतो. प्रपंच करत परमार्थ साधता येतो याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे संत गोरोबाकाका, त्यांची समाधी तर गावी आहे. हे गाव सध्या उस्मानाबाद जिल्ह्यात आहे.

● **संत नरहरी सोनार :-**

वारकरी संप्रदायातील प्रथम शैवपंथी संत नरहरी सोनार यांचा जन्म इ.स. १३१३ (शके ११९५) च्या सुमारास पंढरपूर येथे सोनार कुळात झाला. त्यांचे मुळ आडनाव महामुनी होते. संत नरहरी हे वडिलोपार्जीत सुवर्णकाम करत असल्याने पुढे त्यांचे आडनाव सोनार झाले. संत नरहरीचे मोजकेच अभंग उपलब्ध आहेत. पांडुरंगाच्या भक्तीमध्ये बुडून गेल्यावर ते म्हणतात. "देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार । मनबुध्दीची कातरी । रामनाम सोने चोरी ।।" सगुण – निर्गुण एकच असून त्यावर देवाची सत्ता आहे. आकाशाप्रमाणे विशाल व निशब्ध अशा अद्वैत ज्ञानाचा आश्रय नामस्मरणाने केला जातो असे ते आपल्या अभंगात म्हणतात. त्यांच्या समकालीन संतांचे वर्णनही ते अभंगातून करतात. 'दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी' या जगदंबेच्या प्रसिध्द आरतीचे कवी हे नरहरी सोनार आहेत माघ तृतीया १२३५ ला विठ्ठलाचे नामस्मरण करता करता नरहरी सोनार समाधिष्ट झाले. पंढरपूर मधील विठ्ठल मंदिरासमोर त्यांची समाधी आहे.

● **संत सेना महाराज :-**

संत सेना महाराज यांचा जन्म श्री देविदास आणि प्रेम कुंवर बाई यांच्या पोटी शके १३५७ या साली मध्यप्रदेशमधील बांधवगड मध्ये झाला. ते विठ्ठलाचे निस्सीम होते. संत सेना महाराजांचा

भक्त होते. संत सेना महाराजांचा मुळ व्यवसाय नाभिकाचा (न्हावी) होता. सेना महाराज बांधवगडच्या राजाकडे नाभिक काम करीत होते ते आपले कर्तव्य पार पाडत असले तरी मन हे देवपूजा, नामस्मरण यामध्ये दंग असायचे त्यांनी लिहिलेली मराठी रचना आज उपलब्ध आहे. अनेक भाषांवर त्यांचे वर्चस्व असल्यामुळे उत्तर भारतातील पंजाब, राजस्थान, गुजरात उत्तरप्रदेश या प्रदेशातील भाषेत त्यांच्या काही रचना आढळतात. सेना महाराजांच्या अभंगामध्ये नामपर, पंढरी वर्णनपर, उपदेशपर, आत्मपर, रामनाम महात्म्य आणि संत महिमा सांगणारे अभंग उपलब्ध आहेत. काही रचना शिखांच्या धर्मग्रंथ, गुरुग्रंथसाहेब या ग्रंथात समाविष्ट आहेत. संत सेना न्हावी यांचे सुमारे ११० अभंग, गवळणी, वासुदेव, सासवड महात्म्य, आळंदी महात्म्य त्रिंबक महात्म्य आदी रचना आहेत. "आम्ही वारीक वारीक । करु हजामत बारीक ।।" अशा व्यवसाय बोलीचाही वापर त्यांनी आपल्या अभंगात केला.

एकादशीला दिवसभर घरातच चिंतनात मग्न राहिले श्रावण वद्य द्वादशीच्या दिवशी विठ्ठलाचे नामस्मरण करत करत समाधी लागली व

"जाता पंढरीची सुख वाटे जीवा । आनंदे केशवा भेटतांची ।।
या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी । पाहिली शोधोनी अवघी तीर्थे ।।"

● **संत रोहिदास महाराज :-**

उत्तर प्रदेशातील काशीजवळ असणाऱ्या मांडूर गावात इ.स. १३७६ साली माघ पोर्णिमेस चर्मकार कुळात एका साधूच्या आशिर्वादाने रघू आणि कालसी यांच्या पोटी एक तेजस्वी पुत्र जन्माला आले ते म्हणजेच संत रोहिदास काहिंच्या मते संत रोहिदासांचा जन्म हा वाराणसी मधील काशिजवळ गोवर्धनपूर येथे झाला. पण रविदास यांनी रैदास रामायणात लिहिल्याप्रमाणे त्यांचे जन्मस्थळ मांदूर हेच असल्याचे सिध्द होते. सुर्याप्रमाणे तेजस्वी असल्याने त्या पुत्राचे नांव रविदास असे ठेवण्यात आले. आणि पुढे त्यांना भारतभर 'संत रोहिदास' या नावाने ओळखू लागले. संत रोहिदास भारतातील एकमेव असे संत आहेत कि ज्यांना विविध नावांनी ओळखले जाते. बंगालीमध्ये, रुईदास, रुमदास, राजस्थानीमध्ये रोहिदास, मराठीत रविदास, पंजाबीमध्ये रैदास अशि त्यांची प्रचलित नावे आहेत. स्वामी

रामानंद यांना संत रोहिदासांनी आपले गुरु मानले. संत रोहिदास हे रामभक्ती करण्यात दंग असे. ते हाताने चप्पल बनवायचे काम करत तर तोंडाने राम नावाचा जप करत संत रोहिदास म्हणतात–

"अब कैसे छुटे राम रटलागी । प्रभुजी तूम चंदन हम पानी,
जकी अंग–अंग वास सभानी ।।"

या ओळीवरुन कळते की संत रोहिदास भक्तीपंताला आपला अविभाज्य भाग मानत. मन शुध्द । पवित्र असेल तर कुठेही समाधान लाभते. असा विचार असणारे रविदास त्यांच्या दोह्यातून म्हणतात. 'मन चंगा तो कठौती में गंगा' संत रोहिदास यांनी भारतभर फिरुन समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचे धडे देत भारताला आध्यात्मिक आणि सामाजिक उंचीवर नेऊन ठेवले. 'गुरुग्रंथसाहेब' या शिखांच्या धर्मग्रंथामध्ये रविदासांच्या ४१ कवितांचा समावेश आहे. संत रोहिदास यांचा मृत्यू इ.स. १२२७ साली भारताच्या राजस्थान राज्यातील उद्यपूर जवळील चित्तोडगड येथे झाला.

● **संत चोखामेळा (चोखोबा)** जन्म अज्ञातवर्ष– इ.स. १३३८

हे यादव काळातील नामदेवांच्या संत मेळ्यातील वारकरी संत कवी होत. चोखोबाचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात देऊळगावराजा तालुक्यातील मेहूणा किंवा मेहूणपुरी या गावी झाला. संत चोखामेळांचे कुटूंब हे जातीने महार होत संत नामदेव हे त्यांचे गुरु होते. संत चोखामेळा हे प्रापंचिक ग्रहस्थ ते उदरनिर्वाहासाठी मोलमजूरी करत, पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. तत्कालीन गाव गाड्यातील सामाजिक विषमतेमुळे, शिवाशिवीच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. परंतू प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांना जवळ केले. त्यांचे अनेक अभंग प्रसिध्द आहेत. "जोहार मायबाप जोहार तुमच्या महाराचा मी महार । बहू भुकेला जाहलो तुमच्या उष्ट्यासाठी आलो ।।", "कोण तो सोवळा, कोण तो ओवळा, दोन्हीच्या वेगळा, विठू माझा ।।" त्यांनी आपल्या अभंगातून जातीव्यवस्थेवर प्रहार केला. १४ व्या शतकात संत चोखोबा एका अपघातात माती खाली गाढले गेले.

● **संत सोयराबाई :-**

संत सोयराबाई या १४ व्या शतकातील मराठी संतकवयित्री असून संत चोखामेळा यांच्या पत्नी होत्या. सोयराबाईंनी बरेच अभंग लिहिले पण केवळ १२ उपलब्ध आहेत. तिच्या अभंगामध्ये ती स्वत:ला चोखामेळ्याची महारी म्हणते सोयराबाईंचा असा

विश्वास होता की केवळ शरीर अपवित्र किंवा प्रदुषित असू शकते परतू आत्मा कधीही अशुध्द नसतो. ज्ञानार्जन हे शुध्दच असते

"देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुध्द बुध्दा ।
देहाचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो झाला कवण धर्म ।"

● **संत कर्ममेळा :-**

संत कर्ममेळा महाराष्ट्रातील चौदाव्या शतकातील संत कवी होत ते संत चोखामेळा आणि सोयराबाई यांचे पुत्र होत. " जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुमच्या चित्ता ।।" असा खडा सवाल देवाला त्यांनी विचारला. त्यांच्या नावावरही काही अभंग प्रसिध्द आहेत.

● **संत बंका :-**

हे १४ व्या शतकातील एक संत कवी होते ते संत निर्मळाचे पती आणि संत चोखामेळा यांचे मेहूणे होत. बंका यांचा जन्म अस्पृष्य समजलेल्या महार जातीत झाला. त्यांच्या बहुतांश अभंगात त्यांनी विठ्ठलाची प्रशंसा केली. वारंवार त्यांनी त्यांच्या निम्न जातीच्या जन्माचे वर्णन केले. बंका यांनी अस्पृष्यते बद्दल आवाज उठवला जो सध्याच्या दलित साहित्याशी अतिषय संबंधित आहे.

● **संत निर्मळाबाई :-**

निर्मळाबाई या संत चोखामेळा यांच्या धाकट्या बहीण होत्या व त्यांनीही आपल्या भावाप्रमाणे पवित्र मानन्यात आले. त्यांच्या अभंगातून जाती व्यवस्थातील अन्याय व असमानतेचे वर्णन येते. निर्मळा यांनी संत बंका यांच्याशी विवाह केला असला तरी संसारीक जीवनाचा पश्चाताप केला आणि पंढरपूरच्या देवामध्ये आनंद मानला. त्यांनी आपल्या पती बंकाचा उल्लेख कधीही त्यांच्या कवितांमध्ये केला नाही.

● **संत कान्होपात्रा :-**

संत कान्होपात्रा यांचा जन्म पंढरपूर जवळ मंगळवेढा या गावी एका गणिकेच्या पोटी झाला. शामा नर्तिकेच्या पोटी सुरेख अशी कन्या जन्माला आली. कान्होपात्राने आपल्या प्रमाणेच व्यवसाय करुन श्रीमंत आणि धनवान मंडळींना खुष ठेवावे अशी तिच्या आईची इच्छा होती. पण पुर्व पुण्याईमुळे कान्होपात्रेला लहाणपणापासूनच विठ्ठलाच्या भक्तीची ओढ होती. गावातील वारकऱ्यांसमवेत ती पंढरपूरला जात असे त्यामुळे आईचा व्यवसाय पुढे न्यावा असे विचार तिच्या मनाला कधी शिवले देखील नाहीत.

कान्होपात्रेला संतसंग लाभला. प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊलींची भेट झाली आणि त्यांचा सहवास लाभला. या संत संगतीमुळे ती पुरती बदलली सतत हरिनामात दंग राहणे आणि किर्तन करणे या तिच्या अत्यंत आवडीच्या गोष्टी झाल्या. बिदरच्या बादशहापर्यंत कान्होपात्रेच्या सौंदर्याची ख्याती पोहोचली. तिला पकडून आणण्यासाठी त्याने आपले सरदार मंगळवेढ्यास पाठविले. स्वत:च्या शिलाचे रक्षण करण्याकरता कान्होपात्रा वेश बदलून वारीत सहभागी झाली आणि पंढरपूरी पोहचली. विठोबाच्या चरणी डोके ठेवून आपले रक्षण करण्याची आर्त विनवणी तीने केली.

" नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वता जावू पाहे ।।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले । मजलाही झाले तैसे देवा ।।
मोकलुन आस जाहले उदास । घेई कान्होपात्रेस ऱ्हदयात ।। "

बादशहाच्या सरदारांनी तिचा पंढरपूरच्या मंदिरापर्यंत पाठलाग केला. मंदिराच्या व्यवस्थापकांना कान्होपात्रेला हवाली करण्यास फर्मावले. अन्यथा मंदीर उध्वस्त करण्याची धमकी दिली. आपल्या भगवंताचे, आपल्या विठ्ठलाचे मंदीर उध्वस्त होताना कान्होपात्रा कशी पाहू शकणार होती. तीने यवनांसोबत जाण्याची तयारी दर्शवली. परंतू शेवटचे विठ्ठलाच्या चरणावर डोके ठेवण्याचे विनंती केली. विठ्ठलाच्या पायाला कडकडून मिठी मारुन तिने आपले प्राण त्याक्षणी त्यागले पण आपल्या आणि पांडुरंगाच्या भक्तीत अडसर ठरु पाहणाऱ्या यवनांसोबत गेली नाही.

● **संत सखुबाई :-**

महाराष्ट्रातील प्रचलित असलेल्या संत सखुबाई विठ्ठल परमभक्त होत्या. घरातील सर्व कामे करत असताना सतत देवाचे नाव आपल्या मुखी घेत असत व शारिरीक सामर्थ्यापेक्षाही जास्त काम त्या करुन दाखवत असत. परंतू त्यांचा सासरच्या लोकांनी केलेला छळ किती भयंकर होता आणि विठू माऊली आपल्या भक्ताच्या हाकेला कशा प्रकारे धावले हे त्यांच्या जीवनचरित्रावरुन दिसून येते.

● **संत तुकाराम :-** (तुकाराम बोल्होबा अंबिले)

हे इ.स. च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संत कवी होते. त्यांचा जन्म देहू या गावात वसंत पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्य दैवत होते. तुकारामांना वारकरी 'जगद्गुरु' म्हणून ओळखतात. तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवला. वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा

त्यांनी निर्माण केली. सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सुधाकर संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकाराम महाराज वास्तववादी निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभीकपणावर रोखठोक शब्दामध्ये प्रहार करणारे संत होते. व्यवसायाने ते वाणी, शेती, दुकानदारी व सावकारी करत. वडील बोल्होबा अंबिले आई कनकाई, पत्नी आवली व अपत्ये – महादेव, विठोबा, नारायण व भागुबाई हा त्यांचा परिवार होता. तुकाराम महाराज हे साक्षातकारी व निर्भिड संत कवी होते. वेदांत तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. 'अभंग म्हंटला की तो फक्त तुकारामांचाच' एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगाला मिळाली. भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्‌भाग्य

त्यांना लाभले. संत तुकारामांनी लिहिलेली पुस्तके गीतगाथा (संपादक– प्रभाकर जोगदंड) तुकारामांच्या भगवद्‌गीतेवरील भाष्याचा 'गीतगाथा' हा ग्रंथ आहे. 'तुकारामांच्या अभंगाची गाथा' महाराष्ट्र सरकारने आणि शिवाय अनेक प्रकाशकांनी पुस्तक रुपाने प्रसिध्द केली आहे. 'तुकाराम गाथा' (संपादक– माधव कानिटकर) 'श्री तुकाराम गाथा' (संपादक– स.के. नेऊरगावकर) 'श्री संत तुकाराम महाराजांची गाथा' (संपादक– ह.भ.प. श्री पांडुरंग अनाजी घुले) इत्यादी संपादित पुस्तके त्यांच्या अभंगाची आहेत. इ.स. १६६० देहू येथे त्यांचे निर्वाण झाले. ते सदेह वैकुंठाला गेले असे सांगीतले जाते.

**● संत निळोबा :-**

संत निळोबा हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक संत होते. ते अहमदनगर जिल्ह्यातील पिंपळनेराचे होते. संत चरित्रकार महिपती यांनी निळोबा विषयी भक्तिविजयच्या ५९ व्या अध्यायात विवेचन केलेले असून त्यांच्या विषयीच्या काही आख्यायिकाही सांगीतल्या आहेत त्याचां काळ इ. स. च्या १७ व्या शतकाचा पुर्वार्ध असावा. ते शा.श. १५८०(इ.स. १६५८) सालच्या सुमारास विदर्भात होते. ते प्रतिवर्षी नाथाष्टमीला पैठणच्या वारीस येत. त्यांनी तुकारामांना गुरुस्थानी मानले होते. त्यांनी तुकारामांविषयी ३९२ श्लोक लिहिले. त्यांच्या अभंगरचनेची संख्या सुमारे १९०० असावी.

**● संत दामाजी पंत :-**

मंगळवेढ्यात अनेक संत होऊन गेले त्यापैकीच दामाजी पंत हे एक आहेत. यांच्या अस्तीत्वाचा काल शालिवाहन शके १३०० ते १३८२ हा आहे ते बिदर येथील महंमदशहाच्या दरबारात सैन्याचे सेनापती होते. त्यांनी अब्दूलशहाशी झालेल्या लढाईत

विजय मिळविल्यामुळे त्यांना खजिनदारपद देणेत आले. त्यात हुशारी दाखवल्यामुळे त्यांची मंगळवेढ्याच्या मामलेदार पदी नेमनुक झाली त्यांचा जन्म शेतकरी कुटुंबातील पण, अंगच्या हुशारी मुळे त्यांना ती पदे मिळाली. शके १३७६ मध्ये भयंकर दुष्काळ पडला. पुन्हा १३७७ सालीही पाऊस पडला नाही. आणि १३७८ सालीही भिषण दुष्काळ पडला. जनता हवालदील झाली. दामाजी पंतांनी धान्याची दोन कोठारे बांधली होती त्यांनी धान्याने भरलेली ती कोठारे लोकांसाठी खुली केली. बादशहाने त्यांना अटक करण्यासाठी सैन्य पाठवले व बिदल येथे येण्यास फर्मावले. दंतकथा अशी आहे. की त्या प्रवासादरम्यान पांडुरंगाने दामाजी पंताच्या विठू महार या नोकराचे रुप घेऊन बादशहाला सव्वा लाख रुपये किमतीच्या सोन्याच्या मोहरा देऊन त्याची पावती घेतली. त्यामुळे श्री दामाजी पंतांना बिदर दरबारात हजर करताच बादशहाने त्यांचा सत्कार करुन त्यांना बंधमुक्त केले. अशा प्रकारे दामाजी पंताना पांडुरंगाची ही कृपा झाल्याची खात्री पटताच त्यांनी नोकरीचा राजनामा तात्काळ दिला व

राहिलेले आयुष्य पांडुरंगाच्या सेवेत खर्च केले. त्यांच्या नावावरही काही भाग प्रकाशित आहेत. दामाजी पंत शके १३१२ मध्ये मरण पावले. मंगळवेढ्याला त्यांची समाधी आहे.

● **संत तुकाराम शिष्या बहिणाबाई पाठक** (शिरुरकर) :–

संत तुकारामांच्या समकालीन पुढच्या पिढीतील वारकरी संप्रदायातील मराठी स्त्री संत कवयित्री आणि संत तुकारामांच्या शिष्या श्री संत मालिकेतील त्यांचे अग्रेसर स्थान आहे. त्यांचा जन्म कन्नड तालुक्यातील वेनगंगा नदीच्या काठी देवगांव येथे शके १५५१ मध्ये झाला. तिच्या आईचे नाव जानकी व पित्याचे नाव आऊजी होते. अभंग, ओव्या, श्लोक, आरत्या इत्यादी मिळून ७३२ कविता त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या कवितेतून भक्तिभावाचा उत्स्फुर्त अविष्कार दिसून येतो. त्यांच्या अभंगापैकी

'संत कृपा झाली । इमारत फळा आली ।।' हा अत्यंत प्रसिध्द आणि 'घट फुट लिया परी नभ नाभाचे अंतरी ।।' हा शेवटचा अभंग सांगितल्यावर त्या २ ऑक्टोंबर १७०० रोजी समाधिष्ट झाल्या. त्यांची समाधी शिऊर या गावी आहे.

● **संत, समर्थ रामदास स्वामी** (१६०६ ते १६८२)

त्यांचे मुळ नाव नारायण सुर्याजीपंत ठोसर असे आहे. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील 'जांब' या गावी शके १५३० (२४ मार्च १६०८) रोजी झाला ते महाराष्ट्रातील कवी व समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते. श्री रामाला व हणुमंताला

उपास्य मानणाऱ्या समर्थ रामदासांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांच्या प्रसारार्थ महाराष्ट्रात प्रबोधन व संघटन केले. ते संत तुकारामांचे समकालीन होते. राजकारण, धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होते. 'जय जय रघुविर समर्थ' हे रामदास स्वामींच्या संप्रदायाचे जयघोष आहे. आणि 'श्री राम । जय राम । जय जय राम।।' हा जप मंत्र आहे. समर्थ रामदासांची ग्रंथरचना पुढील प्रमाणे– दासबोध, करुणाष्टके, एकवीस समासी, मनाचे श्लोक, दोन रामायणे, परचक्रनिरुपण, आनंदवनभुवन जुनाट पुरुष, निर्गुन ध्यान, जनस्वभाव गोवसावी, मानस पुजा इत्यादी ग्रंथरचना करुन ९० पेक्षा अधिक आरत्या व १०० पेक्षा जास्तच देवी–देवतांचे स्त्रोत्र समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेली आहेत. समर्थ रामदास स्वामींच्या जीवनाचा शेवटचा काळ त्यांनी सातारा जिल्ह्यातील जवळच असलेल्या परळी या किल्यावर घालवला. प्रभू श्रीराम, माता–सिता आणि भगवान लक्ष्मण यांच्या मुर्ती समोर बसून रामदास स्वामींनी त्यांच्या जीवनातील शेवटचा पाच दिवस निर्जल उपवास केला आणि सन १६८२ राम नाम जप करत करत पद्मासन मध्ये बसून ते ब्रम्हालिन झाले. पुढे तेथेच त्यांची समाधी ही बनवली आहे. 'दासनवमी' ह्या नावाने त्यांच्या समाधी दिवसाला ओळखले जाते.

● **संत गाडगे बाबा :-** (२३ फेब्रुवारी १८७६ – २० डिसेंबर १९५६)

एक थोर आधुनिक मराठी संत व समाजसुधारक त्यांचा जन्म शेंडगांव (जि. अमरावती) येथे परीट जातीत झाला. वडिलांचे नाव झिंगराजी व आईचे नांव सखुबाई, आडनांव जाणोरकर त्यांचे मुळनांव डेबुजी असे होते. तथापी त्यांचा वेश म्हणजे अंगावर फाटकी गोधडी आणि हाता गाडगे असा असल्यामुळे लोक त्यांना गोधडे महाराज किंवा गाडगे महाराज असे म्हणूनच ओळखत. १९१२ मध्ये त्यांचा कुंताबाईशी विवाह झाला. परतू संसारात त्यांचे मन रमले नाही. पुढे काही वर्षांनी घर सोडून तीर्थयात्रा करीत ते फिरु लागले. समाजातील कमालीचे आज्ञान अनिष्ट चालीरीती व अंधश्रध्दा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व लोकशिक्षणाचे व्रत स्विकारले. लहानपणापासूनच त्यांना भजन किर्तनांची आवड होती. आणि त्यांची वृत्तीही धार्मीक व परोपकारी होती. समाज सुधारणेसाठी व लोकशिक्षणासाठी त्यांनी किर्तनाचे माध्यम प्रभावीपणे वापरले ते निरक्षर असले तरी त्यांची भाषा सुबोध व सर्वसामान्यांच्या एकदम ऱ्हदयाला जाऊन भिडणारी होती. महाराष्टात सर्वत्र तसेच गुजरात, कर्नाटक व आंध्रप्रदेशाच्या काही भागात त्यांनी गावोगाव किर्तन करुन लोकजागृती केली. स्वच्छता, प्रामाणिकपणा व भुतदया यावर त्यांचा विशेष भर असे.

तीर्थयात्रेच्या ठिकाणी ते जात परंतू देवदर्शन न घेता मंदिराच्या बाहेर थांबून यात्रेकरुंची सेवा करीत व तेथील परिसर स्वत:च्या हातांनी स्वच्छ करी. अनेक ठिकाणी देवधर्माच्या नावावर चालणारी पशुहत्या त्यांनी बंद केली. संत तुकाराम महाराज आमचे गुरु आहेत व माझा कोणीही शिष्य नाही असे ते म्हणत.

गाडगे महाराजांविषयी बहुजन समाजात कमालीचा आदरभाव आहे. त्यांनी महाराष्ट्रात केलेले लोकजागृतीचे व लोकसेवेचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. प्रवास करीत असता अमरावतीजवळ त्यांचे अचानक निधन झाले त्यांची समाधी अमरावती येथे आहे.

● **संत तुकडोजी महाराज** (पुर्णनांव–माणिक बंडोजी इंगळे–१९०९ ते १९६८)

तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरु त्यांनी त्यांचे मुळचे माणिक हे नाव बदलून तुकडोजी असे केले. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्रभरच न्हवे तर देशभर हिंडून ते आध्यात्मीक, सामाजीक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच न्हवे तर जपान सारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक झाली होती. 'आते है नाथ हमारे' हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फुर्तीगान ठरले होते. भारत हा खेड्यांचा देश आहे हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल अशी तुकडोजी महाराजांची श्रध्दा व विचारसरणी होती. अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकुंज आश्रमाची स्थापना हे तुकडोजींच्या आयुष्यातील जसे लक्षणीय कार्य आहे. त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवन कार्यातील अत्यंत महत्वाचा टप्पा आहे. खेडेगांव स्वयंपूर्ण कसे होईल या विषयीची जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सुचविली होती ती अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशिक्षित व्हावे सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत. गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे असा त्यांचा प्रयत्न होता. या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून व्यसनाधिनतेचा तीव्र निशेध केला, ऐहीक व पारलौकीक यांचा सुंदर समन्वय तुकडोजी महाराजांच्या साहित्यात झाला आहे. त्यांनी मराठी प्रमाणेच हिंदी भाषेतही विपूल लेखन केले. राष्ट्रपतीभवनात झालेल्या त्यांचे खंजिरी भजन ऐकून राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना 'राष्ट्रसंत' म्हणून संबोधिले होते.

'ग्रामगीता' हा त्यांचा ग्राम विकासावरील ग्रंथ प्रसिध्द आहे. या शिवाय

हिंदीतून लिहिलेले 'लहरकी परखा' हे पुस्तकही प्रसिध्द आहे. त्यांचे ग्रामगीता या ग्रंथामधील विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहोचावेत या करिता महाराष्ट्र शासनाने ग्रामगीता हा ग्रंथ पुनर्मुद्रित करुन सवलतीच्या १० रु या किमतीत उपलब्ध करुन दिला आहे.

तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण अश्विन कृष्ण पंचमी शके १८९० (३१ ऑक्टोबर १९६८ रोजी झाला)

**समारोप :-**

महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली आहे हे खरेच पण, संत म्हंटले की काही ठराविक नावे पटकन डोळ्यापुढे येतात. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम महाराज या संतांचा मोठा प्रभाव मराठी मनांवर सातत्याने टिकून आहे. तो इतका की कोणत्याही काळात या परंपरेशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी पाया घातला. आणि तुकोबांनी कळस रचला. अशी मांडणी केली जाते. पण या दरम्यान होऊन गेलेल्या अनेक संतांनीही प्रबोधनाचे मोठे काम केले आहे. प्रस्तूत निबंधात उल्लेखलेल्या संतांव्यतिरिक्त पेशवेकालीन व आधुनिक काळातील आणखी काही संतांचा नामोल्लेख करता येईल. त्यातुन संत भानूदास, संत महिपती, संत केशवदास, संत जळोजी-मळोजी, संत माणकोजी बोधले, संत नरसी मेहता, शहा अब्दुल लतीफ, संत कान्हो पाठक, राष्ट्रसंत जनार्दन स्वामी, संत कान्होबा, संत शेख महंमद, संत तुका विप्र, संत महात्मा बसवेश्वर, संत कबिरदास, संत वेणाबाई, सेवालाल महाराज, संत मीराबाई, संत गुलाबराव महाराज, संत जगनाडे महाराज, संत जगंमित्र नागा, संत जोगा परमानंद, संत राका कुंभार, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, संत काशिनाथ महाराज, संत बाळूमामा, संत गजानन महाराज, श्री स्वामी समर्थ, संतश्री साईबाबा, श्री सत्य साईबाबा, या व्यतिरिक्त अजून काही संत यांचा विचार करता येईल. हे सर्व संत त्यांच्या कार्याचा आढावा घेता दैवत्व पदावर पोहोचले आहेत. त्यांची मंदीरे ट्रस्ट स्थापन होऊन तेथे त्यांची नित्य नियमाने पुजा-अर्चा केली जाते. अशा प्रकारे संतांचा महीमा थोर आहे. प्रस्तुत निबंधाची व्याप्ती लक्षात घेता त्यांचा फक्त नामोल्लेख करणे उचीत ठरेल. त्यामुळे संत परंपरा असे म्हणताना या सर्वांचा एकत्रित विचार आवश्यक ठरतो. आणि तसा तो मांडण्याचा इथे प्रयत्न केला. वारकरी संप्रदायात होऊन गेलेले संत त्यांच्या बद्दल इतर जीवनकार्य व लेखनांविषयी माहिती मांडण्याचा प्रयत्न केला. याचा सर्व वाचकांना फायदा होईल. व त्यांच्या ज्ञानात भर पडेल असे वाटते.

**संदर्भ :-**


१) संतदर्शन चरित्रग्रंथ एकूण १३ खंड संच – श्री गंधर्व वेद प्रकाशन
२) जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश खंड – १४
३) मराठी वाड:मयाचा इतिहास खंड – १, २, इ. संपादक– रा. श्री. जो
४) वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य – डॉ. शिवाजीराव मोहिते
५) नाथ संप्रदायाचा इतिहास – रा. चि. ढेरे
६) संत तुकाराम चरित्र – ल. रा. पांगारकर
७) प्राचीन मराठी वाड:मयाचा इतिहास – ल. रा. बहिरट
८) संत वाड:मयाची सामाजीक फलश्रुती – गं. ब. सरदार
९) संत कवयित्री – इंदुमती शेवडे



**संकलक :-**
तेजश्री रघुनाथ पवार
स्नेहल बाळासोा पाटील
बी. ए. भाग–३

## लसीकरण सर्वेक्षण : कोरोनाकाळातील कृतीयुक्त शिक्षणाचा संख्याशास्त्र विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम !

कोरोना संकटावर मात करण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहिम राबवली जात असून अनेक राज्यांनी मोफत लसीकरण ही सुरु केले आहे. केंद्र सरकारने १८ वर्षांवरील सर्वांना लसीकरणासाठी मान्यता दिली आहे. आरोग्य मंत्रालयाच्या वेबसाईटवर दररोज लसीकरणाची ताजी आकडेवारी मिळू शकते. गेल्या दीड वर्षापासून कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर देशातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून इतर सर्व व्यवहार पूर्ववत सुरु झाले असले तरी शाळा, महाविद्यालये अद्याप पूर्ण क्षमतेने सुरु नसल्याने विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थाचालक या सर्वांचा गोंधळ उडाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय कवठे महांकाळ (जि. सांगली) येथील संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी कृतीयुक्त शिक्षणाचा आनंद घेत घरोघरी भेटी देऊन लसीकरणाची माहिती गोळा करुन एक वेगळा अनुभव प्राप्त केला. येथील बी.एस्सी. संख्याशास्त्राच्या विद्यार्थांनी तालुक्यातील आपापल्या गावातील प्रत्येकी दहा कुटुंबाना भेटी देऊन १८ वर्षावरील स्त्री-पुरुषांपैकी किती जणांचे लसीकरण झाले, लसीकरणातील त्यांना आलेल्या अडचणी, अनुभव, एकंदर देशातील, राज्यातील कोरोना परिस्थिती बद्दलचे त्यांचे मत, मास्कचा वापर आणि लॉकडाऊन विषयीची रोखठोक मते तसेच कोरोना महामारी हाताळणी बाबतच्या सुचना आदी बाबी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यासाठी सुमारे ५० विद्यार्थांनी २५ गावे व एका शहरातील (कवठे महांकाळ) ५०३ कुटूंबातील १०५२ पुरुष आणि १०४५ महिलांची कोरोना आणि लसीकरणाविषयीची मते आणि माहिती जाणून घेतली. या सर्वेक्षणाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना आलेले अनुभव, नागरिकाच्या सर्वेक्षणाविषयी आणि एकंदर महाविद्यालये आणि शिक्षण पध्दतीबाबतच्या प्रतिक्रिया आणि तालुक्यातील कोरोना आणि लसीकरणाची वास्तव स्थिती यांचा थोडक्यात घेतलेला आढावा...

**सारणी १ : पहिला आणि दुसरा डोस घेणाऱ्या स्त्री पुरुषांची संख्या (कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात)**

| डोस १ (पहिला) | | एकूण | डोस २ (दोन्ही) | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष | स्त्रिया | | पुरुष | स्त्रिया | |
| ६९८(६६) | ५७०(५४.५४) | १२६८(६०.४६) | ४३१(४१.२४) | ३४०(३२.५३) | ७७१(३६.७६) |




**सारणी २ : लसीकरण, लसीकरणामुळे झालेला त्रास, गावातील स्थिती, लॉकडाऊन, सरकारी उपाययोजना बाबत कुटूंबाच्या प्रतिक्रिया (मते) (कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शवितात)**

| | लसीकरण फायदेशीर | | लसीकरणामुळे त्रास झाला | | गावातील कोवीड स्थिती | | | लॉकडाऊन बाबत मत | | | सरकारी उपाययोजना | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | होय | नाही | बरी | चांगली | वाईट | असावे | नको | गरजेनुसार | योग्य | सुधारणा |
| कुटूंबाची संख्या | ४२८ | १९ | २७६ | १९३ | २२९ | ६५ | ५० | १६४ | १०५ | २२४ | ३५९ | १४४ |
| | (८५) | (३) | (५५) | (३८) | (४६) | (१९) | (१०) | (३३) | (२१) | (४५) | (७१) | (२९) |

(काही कुटूंबांनी माहिती नसल्याचे सांगितलेतर काहींनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला)



विद्यार्थ्यांना सर्वेक्षणा दरम्यान जेव्हा कुटूंबाना भेटी दिल्या त्या वेळी कुटूंबानी भेटीचे कारण जाणून घेतले. आणि महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाचा हा एक भाग आहे हे कळल्यावर त्यांना आश्चर्य आणि समाधान वाटले. महाविद्यालय आणि त्यातील विद्यार्थीही समाजासाठी काही उपक्रम राबवतात याचे त्यानंतर कुटूंबाने विद्यार्थ्यांचे स्वागत आणि अभिनंदन केले व माहिती ही दिली. सारणी १ नुसार ३१ जुलै पर्यंत सुमारे ६० टक्के नागरिकांनी लसीचा पहिला डोस तर ३६ टक्के नागरिकांनी लसीचा दुसरा डोस घेतला असल्याचे दिसून आले. हे प्रमाण त्यावेळच्या राज्यातील आणि देशातील प्रमाणापेक्षा जास्त होते, यावरुन आरोग्य यंत्रणा शहरापुरतीच कार्यरत नसून ग्रामीण भागापर्यंत ही पोहचली असून ग्रामीण जनतेचा लसीकरण मोहिमेला प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट झाले.

सारणी २ नुसार सर्वेक्षण केलेल्या ५०३ कुटूंबापैकी सुमारे ४२८ (८५ टक्के) कुटूंबांनी लसीकरण फायदेशीर असल्याचे सांगून लसीकरणादरम्यान १९३ (३८ टक्के) कुटूंबातील व्यक्तींना कोणताही त्रास झाला नसल्याचे दिसून आले तर २७६ (५५ टक्के) कुटूंबातील व्यक्तींना किरकोळ डोकेदुखी, अंगदुखी, ताप, मळमळ आणि अशक्तपणा आदींचा सामना करावा लागला. २२९ (४६ टक्के) कुटुंबांनी गावातील कोरोना बाबतची स्थिती समाधानकारक, ६५ (१९ टक्के) कुटूंबांनी चांगली असल्याचे मत व्यक्त केले तर ५० (१० टक्के) कुटूंबांनी ती वाईट असल्याचे मत नोंदविले. लॉकडाऊन विषयीच्या नागरीकांच्या प्रतिक्रिया संमीश्र असल्या तरी जिल्हा, राज्य आणि देशपातळीवर त्या सारख्याच आहेत हे स्पष्ट झाले. १६४ (३३ टक्के) कुटूंबांनी लॉकडाऊन कडक असावे, २२४ (४५ टक्के) कुटूंबांनी लॉकडाऊन गरजेनुसार करावे आणि केवळ १०५ (२१ टक्के) कुटूंबांनी लॉकडाऊनची आवश्यकता नसल्याचे सांगितले. देशात, राज्यात आणि गावपातळीवर शासन करत असलेल्या उपाय योजना बाबत नागरिकांनी समाधान व्यक्त करताना तब्बल ३५९ (७१ टक्के) कुटूंबांनी सरकार करत असलेल्या उपाययोजना योग्य असल्याचे मान्य केले तर १४४ (२९ टक्के) कुटूंबांनी सरकारने कोविड केंद्रे, औषध पुरवठा, बेडची संख्या, ऑक्सिजन पुरवठा आदी मध्ये वाढ केली जावी असे मत मांडले. जवळपास सर्वच कुटूंबांनी मास्कचा वापर, शारीरिक अंतराचे महत्व मान्य केले तसेच सरकारने लसीकरणाची गती वाढवावी असे सुचविले. काही दिवसापुर्वी (४ सप्टेंबर) आलेल्या बातमीनुसार महाराष्ट्र हे लसींच्या दोन्ही मात्रा देण्यात देशात अव्वल ठरले आहे. या पार्श्वभुमीवर विद्यार्थ्यांनी (३१ जुलै) केलेले सर्वेक्षण अचुक ठरले असून यातून विद्यार्थ्यांनाही चार भिंतीमध्ये मिळणारे शिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवातून, प्रयोगातून मिळणारे ज्ञान, अनुभव आणि शिक्षण यामध्ये

मिळणारे ज्ञान, खुपच फरक असल्याचे समजून आले. कोरोना कालावधीमध्ये महाविद्यालये बंद असताना या सर्वेक्षणामुळे विद्यार्थ्यामध्ये उत्साह निर्माण झाल्याचे दिसून आले तर पुस्तकामधील शिकवल्या जाणाऱ्या संकल्पना आणि प्रत्यक्ष कृतीतून उमगलेल्या त्या संकल्पना यामध्ये खुप फरक असल्याचे जाणवले. विद्यार्थ्यामध्ये जिज्ञासावृत्ती, संवाद कौशल्ये वाढण्याबरोबरच, माहिती कशी मिळवायची आणि तिचा योग्य अन्वयार्थ कसा लावायचा तसेच सर्वेक्षणातून निघालेल्या निष्कर्षाचा समाजासाठी, राष्ट्रासाठी काय उपयोग होऊ शकेल याचा विचार करण्याची प्रेरणा मिळाली, हेच या अभ्यासाचे ठळक फलित म्हणावे लागेल. सदर सर्वेक्षणासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एम. के. पाटील, संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, उपाध्यक्ष सुरेश पाटील, सचिव सुदर्शन शिंदे, सर्व संचालक मंडळ, संख्याशास्त्र विभागाचे प्रा. विजय कोष्टी, प्रा. अभिलाष पाटील, प्रा. शुभांगी भोसले, प्रा. शितल पाटील तसेच बी.एस.सी. संख्याशास्त्राच्या अंकिता पाटील, गुरुदास शिंदे, स्नेहा चव्हाण, भाग्यश्री पाटील, वैष्णवी पाटील, स्वाती पवार, कोमल कदम, राधिका जाधव, तेजश्री खांडेकर, आकांक्षा कोष्टी, उत्कर्षा शिंदे, ऋतुजा सुर्शवंशी, निखील देसाई, आशुतोष कुंभार, विकास पवार, सुधिर पाटील, विक्रांत देसाई, सुरज बाबर, ऋतुजा देशमुख, ऋतुजा कदम, ऋतुजा साळुंखे, ऋतुजा भोसले, पूजा गिड्डे, प्रियांका बाबर, श्वेता भोसले, श्रध्दा भोसले, अश्विनी शिंदे, महादेवी पवार, आरती सुर्यवंशी, शितल माळी, मुस्कान मुल्ला, वैष्णवी माने, प्रज्वल पाटील, पूजा हजारे, निकिता कुंभार, मेघराज सगरे, अनुराधा माळी, संजय शिंगाडे,प्रणाली जगताप, तनया पुरोहित आदी विद्यार्थांनी सहकार्य केले.

**प्रोफे. डॉ. एम. के. पाटील**
(प्र. प्राचार्य)

**प्रा. विजय कोष्टी**
(सहयोगी प्राध्यापक)

**प्रा. अभिलाष पाटील**
सहाय्यक प्राध्यापक

**प्रा. शुभांगी भोसले**
सहाय्यक प्राध्यापक

**प्रा. शितल पाटील**
सहाय्यक प्राध्यापक

# ‘लहानपण देगा देवा’ !

अशक्य आहे पण, खरच यावं लहानपण पुन्हा. किती भारी होत ना ते लहानपण जिथे मार कमी पण लाड जास्त होता. आता लोक विचार करुन करुन वेडे होतात. पण लहानपणी विचारच नव्हते. त्यामुळे वेडे होण्याचा प्रश्नच नव्हता. तरीही सगळे ये वेडाबाई का म्हणायचे अजुनही कळल नाही.

*‘लहानपण देगा देवा*
*मुंगी साखरेचा रवा’*

लहानपण हे लहानपणच असतं. लहानपणासारख सुंदर काहीच असू शकत नाही.

लहानपणी आई चांदोबाला दाखवत हाताने जेवण भरवायची. आता चांदोबाला बघत जेवला तरी जेवण जात नाही. कारण आता आई तिच्या हाताने भरवत नाही. कारण आता आम्ही लहान राहिलोच नाही. जेव्हा लहानपणी पहिल्यांदा १ रु. च्या पेन्सिलने पाटीवर एखादा शब्द लिहला जायचा त्यात जो आनंद होता तो आता अख्खी वही १०० रु च्या पेनने जरी लिहून काढली तरी तो आनंद सापडणार नाही कारण आता आम्ही लहान राहिलोच नाही. किती छान होतं ना लहानपण ना कोणाच बंधन, ना वर्चस्व, ना कुठलं दडपण म्हणजे कस ‘आपने मन का राजा’ मन अगदी जग फिरुन यायचं.

लहानपणी फुलपाखरु उडत असताना पाहिल की विमान उडत असल्यासारख वाटायच पण आता विमान उडत असल्यासारख वाटायला फुलपाखरुच नाहीत आणि असली तरी आता आम्ही लहान राहिलोच नाही. ‘जाणून भुजून मेनबत्तीला हात लावणार ते बालपण असतं’.

लहानपणी जानूणभुजून जरी मेनबत्तीला हात लावला तरी काळजी असायची.

पण आता चुकून जरी मेनबत्तीला हात लावला तर बोलण असत. कारण आता आम्ही लहान राहिलोच नाही.

लहानपणी कोणाचीच भिती नव्हती



भिती होती ती फक्त अंधाराची कारण हळूच वारा यायचा आणि दिवा विझवून जायचा आता अंधार उरलाच नाही. कारण आता दिव्याऐवजी वीज आली आणि त्याबरोबर इनव्हेटर आल. मग आता अंधाराची भिती वाटायला आम्ही लहान राहिलोच नाही. लहानपणी ती छोटीशी भिंगरी घेऊन रस्त्यावर वारा शोधत पळत असताना जी उत्सुकता, जो आनंद वाटायचा तो आता मोठ्या पवनचक्क्या बघुनही होत नाही. कारण आता आम्ही लहान राहिलोच नाही.

लहानपणी समजूतदारपणा मुळीच नव्हता. पण कोणाच मन दुखेल अस कधी कोण वागलच नाही. लहानपणी जास्त बोलता येत नव्हत पण तीतकही बोलण ऐकूण आई-बाबांना आनंद व्हायचा पण आता सगळ बोलायला येत असूनही आई-बाबांना हे बोलण ऐकूण आनंदाऐवजी दु:खच होतं. लहानपणी विचार नव्हते कृती होती तरीही चुक करत नव्हतो आता मात्र विचार असून चुका नेहमीच करतो. हाच तर फरक आहे. लहानपणाचा आणि आताचा लहानपणी वाटायच की पटकन मोठ व्हावं आणि आता वाटत की,

'*लहानपण देगा देवा*'

विद्या दयानंद कांबळे
बी.ए. भाग-१

# भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे

भारताच्या स्वातंत्र्याला आता लवकरच ७५ वर्षे होतील आपण सर्व त्या दिवसांचे स्वागत करण्यासाठी उत्सुक आहोत. हे वर्ष जितके ऐतिहासिक, गौरवपूर्ण, देशासाठी जितक महत्त्वपर्णू आहे, देश देखील तितक्याच भव्यतेने आणि उत्साहाने हे वर्ष साजरे करेल.

हा अमृत महोत्सव साजरा करण्याची जबाबदारी देशाने आपल्या सगळ्यांवर सोपविली आहे हे आमचे भाग्य आहे. या महोत्सवाबाबत ज्या आशा–अपेक्षा आहेत ज्या सूचना येत आहेत त्या सर्व आशा–अपेक्षा आणि सुचना पूर्ण करण्यासाठी ही समिती अथक परिश्रम करेल आणि लोकांपर्यत पोहोचवण्याचा प्रयत्न करताना कोणतीही कमतरता ठेवणार नाही. सतत नवीन कल्पना, नवीन सुचना, जनतेला पुन्हा एकदा देशासाठी जगण्यासाठी प्रेरित करणे. या संधीचे कसे सोने करायचे या सगळ्यासाठी तुम्ही मार्गदर्शन करत राहाल आपल्याला आताही काही सन्माननीय सदस्यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. आज एक सुरुवात आहे.

इथे आता आमच्या समोर स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या पार्श्वभूमीवर एक सादरीकरण केले गेले. एक प्रकारे विचारांच्या प्रवाहाला वेग देणे हे त्याचे काम आहे. अमुक एक गोष्टींची अंमलबजावणी करायची आहे आणि त्यापुरतेच मर्यादित राहायचे आहे. अशी कोणतीही यादी नाही. एक–एक मोघम विचार प्राथमिक आहे कारण कुठून तरी सुरुवात करण्यची आवश्यकता आहे. हळूहळू जशी यावर चर्चा होईल याला एका कार्यक्रमाचे स्वरुप प्राप्त होईल. वेळ निश्चित केली जाईल. वेळापत्रक तयार केले जाईल स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षाचे आयोजन, स्वातंत्र्याचा हा अमृत महोत्सव हा भारतातील प्रत्येक देशातील प्रत्येक व्यक्तींचा भारतातील प्रत्येकाच्या मनाचा हा उत्सव असावा यासाठी प्रयत्न आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाचा हा उत्सव, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे आयोजन अशा प्रकारे केले पाहिजे की स्वातंत्र्य लढ्याची भावना, त्यामागील त्याग हे सगळे अनुभवता आले पाहिजे ज्यात देशातील हुतात्म्यांना श्रध्दांजली देखील वाहिली जाईल आणि त्यांच्या स्वप्नांमधील भारत घडविण्याचा संकल्पना ही असावी ज्यामध्ये सनातन भारताच्या वैभवाची झलक देखील असेल आणि आधुनिक भारताची चमक देखील असावी. ज्यामध्ये अध्यात्माचा प्रकाश देखील असेल आणि आपल्या शास्त्रज्ञांची प्रतिभा आणि सामर्थ्य देखील दिसून येईल हा कार्यक्रम. ७५ वर्षातील आपली कामगिरी संपूर्ण जगासमोर

सादर करण्याची आणि पुढील २५ वर्षासाठी एक आराखडा, एक संकल्प घ्यायची संधी देखील प्रदान करेल. कारण २०४७ मध्ये जेव्हा देश स्वातंत्र्याचे शतक साजरे करेल तेव्हा आपण कुठे असू, जगात आपले स्थान काय असेल, आपण भारताला कुठेवर घेऊन जाऊ आणि स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि स्वातंत्र्य लढा आपल्याला प्रेरणा देईल. एक मंचाची स्थापना केली जाईल आणि या मंचाच्या आधारे स्वातंत्र्याची ७५ वर्षे भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दीसाठी त्या दिशेने पुढे जाण्यासाठी आमच्यासाठी दिशादर्शक प्रेरणादायक आणि प्रयत्नांची भावना जागृत करणारा असावा. आपल्या येथे असे म्हटले जाते, की – 'उत्सवेन बिना यस्मात् स्थापनम् निष्फलम् भवेत्' अर्थात कोणताही प्रयत्न कोणताही संकल्प हा उत्सवाशिवाय यशस्वी होत नाही जेव्हा एखादा संकल्प उत्सावाचे रुप धारण करतो. तेव्हा त्यात लाखो, कोटी लोकांचे संकल्प जोडले जातात, लाखो, कोट्यावधी लोकांची ऊर्जा त्यात जोडली जाते. याच भावनेने आपल्याला १३० कोटी देशवासीयांना सोबत घेऊन हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाचा हा उत्सव साजरा करायचा आहे. लोकसहभाग ही या कार्यक्रमाची मूळ भावना आहे. आणि जेव्हा आपण लोकसहभागाविषयी बोलतो तेव्हा त्यात १३० कोटी देशवासियांची भावना, त्याची मते आणि सूचना आणि त्यांची स्वप्नेही असतात. या सर्वामध्ये देशातील १३० कोटी लोकांच्या कल्पना, भावनांचा समावेश असला पाहिजे.

स्वातंत्र्यलढ्यातील ज्या सैनिकांना आपण ओळखतो त्यांना आम्ही श्रध्दांजली अर्पण करु. परंतू असेही काही स्वातंत्र्य सैनिक होते ज्यांना इतिहासात स्थान मिळाले नाही. ज्यांना योग्य ओळख प्राप्त झाली नाही त्यांची जीवनगाथा देखील आपल्याला जनसामान्यापर्यंत पोहोचवायची आहे. आपल्या देशात क्वचितच असे स्थान किंवा देशाचा एखादा कोपरा असेल जिला भारत मातेच्या मुलांनी आणि मुलींनी स्वातंत्य लढ्यात योगदान दिले नसेल, बलिदान दिले नसेल. या सर्वाचे बलिदान आणि त्यांच्या योगदानाच्या प्रेरणादायक कथा जेव्हा संपूर्ण देशासमोर येतील तेव्हा त्या प्रेरणेचे खुप मोठे स्त्रोत असतील त्याचप्रमाणे आपल्यालादेशातील कानाकोपऱ्यातून प्रत्येक वर्गातील योगदान देशासमोर आणले पाहिजे. पिढ्यान् पिढ्या् देश व समाजासाठी काहीतरी महान कार्य करणारे असे अनेक लोक आहेत. देशाला त्यांच्या प्रयत्नांशी जोडायचे आहे ही देखील अमृत महोत्सवाची मुळ भावना आहे.

७५ वर्षाच्या प्रवासात एक एक पाऊल पुढे टाकत आज देश इथे पोहोचला आहे. ७५ वर्षात अनेक लोकांचे योगदान आहे. सर्व प्रकारच्या लोकांनी योगदान दिले आहे.

प्रत्येकाचे योगदान स्विकारुन त्यांचे स्वागत करुन, सन्मान करुन पुढे मार्गक्रमण करुनच देशाचा विकास होतो आणि याच मंत्राच्या आधारे आपण मोठे झालो आहोत. आपल्याला हाच मंत्र घेऊन पुढे जायचे आहे. जेव्हा देश स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरा करेल तेव्हा अशक्य वाटणाऱ्या लक्ष्यपूर्तीसाठी महत्वपूर्ण पावले उचलून देश ते लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने मार्गक्रमण करेल मात्र खात्री आहे की तुमच्या सर्वाच्या पाठींब्याने हा कार्यक्रम भारताच्या ऐतिहासिक वैभवाला साजेसा होईल तुम्ही सर्व वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञ आहात. तुमच्या योगदानाने हा कार्यक्रम भारताचा अभिमान संपूर्ण जगासमोर ठेवेल, उर्जा मिळेल, प्रेरणा मिळेल, दिशा मिळेल. तुमचे योगदान खुप मोलाचे आहे.

स्वातंत्र्याच्या वर्ष पुर्तीनिमित्त होणाऱ्या अमृत महोत्सवाला महात्मा गांधीच्या ऐतिहासिक दांडी यात्रेच्या स्मृतिदिनी प्रारंभ होत आहे. स्वातंत्र्याला १५ ऑगस्ट २०२२ ला ७५ वर्षे पुर्ण असली तरी अमृत महोत्सव कार्यक्रम २०२४ च्या लोकसभेच्या निवडणूकीच्या आधीपर्यंत म्हणजेच ऑगस्ट २०२३ पर्यंत होण्याचे नियोजनही सरकारने केले आहे. दांडी यात्रेच्या धर्तीवर मोदी सरकारचे मंत्री देखील पदयात्रा काढणार आहेत. या निमित्ताने देशभरात सर्व राज्यामध्ये आगमानी आठवडे विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. महात्मा गांधीजींनी केलेल्या मिठाच्या सत्याग्रहाचे गांधीजींनी काढलेल्या ऐतिहासिक दांडी यात्रेच्या स्मृतिनिमित्त साधून सांस्कृतिक कार्यक्रमंत्री प्रल्हाद पटेल हे साबरमती ते नडीयाद अशी ७५ कि.मि. पदयात्रादेखील आहेत.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव च्या संबंधित सर्व कार्यक्रम भारताच्या सर्व राज्यात आणि संघ राज्याच्या क्षेत्रांमध्ये आयोजन केले जाणार आहे. भारत सरकारने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनिय पध्दतीने स्वातंत्र्य दिवसाची ७५ वर्षे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर त्या दिवसाच्या आठवडे आधी म्हणजेच आज (१२ मार्च) पंतप्रधान नरेंद्र मोदीने यांनी हे वर्ष साजर करण्याच्या दृष्टीने आझादी अमृत महोत्सव (स्वातंत्र्याचा महोत्सव) या कार्यक्रमाची घोषणा केली.

स्वातंत्र्याच्या ७५ वा वर्धापन दिन करण्यासाठी वर्षभर चालणाऱ्या चळवळी उपक्रमाची सुरुवात झाली. लोकमान्य टिळकाच्या निधनानंतर महात्मा गांधींनी केल देशाला सर्वसमावेशक चळवळ सुरु झाली स्वातंत्र्याचा ७५ वर्षाचा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी अनेक विचार, कल्पना समोर आल्या होत्या. त्या सर्व एकत्र करुन जी एक मोघम रुप रेषा तयार झाली होती तिला आपण ५ स्तंभामध्ये विभागू शकतो. एक म्हणजे स्वातंत्र्य लढा, ७५ वर्षाच्या कल्पना, ७५ वर्षातील कामगीरी, ७५ वर्षा–

तील विविध कामे आणि ७५ संकल्प स्तंभ आहेत. या पाच स्तंभाच्या आधारे आपल्याला पुढे जायचे आहे. हा कार्यक्रम ७५ वर्षातील आपली कामगिरी संपूर्ण जगासमोर सादर करण्याची आणि पुढील २५ वर्षासाठी एक आराखडा, एक संकल्प घ्यायची संधी देखील प्रदान करेल कारण २०४७ मध्ये जेव्हा देश स्वातंत्र्याचे शतक साजरे करेल. आपण स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि स्वातंत्र्य लढा आपल्याला प्रेरणा देईल. आपला अनुभव या सुचनामधूनही दिसून येतो आणि भारताच्या विविध विचारासोबत असणारी तुमची कनेक्टिव्हिटी देखील दिसते. आपण पुढे यांवर तपशीलवार चर्चा करु. आपल्याकडे अजून ७५ आठवडे आणि नंतर संपूर्ण वर्ष आहे. म्हणून जेव्हा आपण या सगळ्यांना सोबत घेऊन पुढे जाऊ, तेव्हा  या सुचना खुप महत्वपूर्ण असतात. त्याला अधिक समृध्द करण्याच्या दिशेने  आज सुरुवात झाली आहे. काळाच्या ओघात या सर्व योजनांना मूर्त स्वरुप प्राप्त होईल. अधिक प्रभावी होतील आणि या प्रेरणादायक तर नक्कीच असतील जेनेकरुन आपली सध्याची पिढी ज्यांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी मरण्याची संधी मिळाली नाही परंतू आपल्या सगळ्यांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी जगण्याची संधी मिळाली. आपल्याला देशासाठी काहीतरी करण्याची संधी मिळाली आहे आणि हीच भावना आपल्या भावी पिढ्यांमध्ये देखील रुजली पाहिजे. देशातील नविन निर्णय, नविन कल्पना, आत्मनिर्भर भारत  यांसरखे संकल्प या प्रयत्नांचे मूर्त स्वरुप आहे. भारताला एका उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी अनेक शूर वीर फासावर चढले, आपले संपूर्ण जीवन कारागृहात घालवले.

शुभांगी यादव
बी. ए. भाग ३

# सांगली जिल्ह्यातील साहित्यिक

प्रस्तावना :–

प्राचीन इतिहास असलेल्या सांगली जिल्ह्याने मौर्य, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, यादव, बाहमनी व मराठी आदी सत्तांचा उत्कर्ष व ऱ्हास अनुभवला. पेशवाईच्या काळात सांगली हे स्वतंत्र संस्थान होते या संस्थानावर पटवर्धन घराण्याची सत्ता होती सांगली भारताच्या प्रजासत्ताकामध्ये सन १९४८ मध्ये विलीन करण्यात आले. आद्य मराठी नाटककार विष्णूदास भावे यांची ही जन्मभुमी आहे. सांगली संस्थानाचे तत्कालीन राजा चिंतामणराव पटवर्धन ह्यांच्या पुढाकाराने संस्थानामध्ये (सीतास्वयंवर) ह्या संगीत नाटकाचं पहिल्यांदाच (इ.स. १८४३) सादरीकरण करण्यात आलं. जे विष्णूदास भावे ह्यांनी लिहिलं आणि दिग्दर्शित केलं. होतं. महाराष्ट्राच्या इतिहासात नाटक ह्या गोष्टीची सुरुवात सांगली पासून झाली. त्यामुळे सांगलीला (नाट्यपंढरी) ह्या नावानेही संबोधले जात. संस्कृती आणि परंपरेने नटलेल्या या जिल्ह्यातील अनेक मोठमोठे व्यक्तिमत्व होऊन गेले आहेत. अनेक नामवंत लेखक या जिल्ह्यात होऊन गेले व सध्या लिहित आहेत. त्यांच्या लेखन कार्याचा, साहित्याचा परिचय करुन घेणे हाच या प्रस्तृत लेखाचा उद्देश आहे.

*** विष्णूदास भावे :-** (९ ऑगस्ट १८१९ ते १९०१)



विष्णूदास भावे हे सांगली संस्थानचे राजे चिंतामणराव पटवर्धन यांच्या पदरी असणाऱ्या अमृतराव भावे यांचे पुत्र विष्णूदास भावे हे स्वत: अतिशय बुध्दिमान हस्तकला कारागीर होते अगदी बरीक–सारीक हालचाल करवून घेता येऊ शकतील. अशा लाकडाच्या असंख्य बाहुल्या त्यांनी बनवल्या होत्या. रंगमंचावर सीता स्वयंवर नाटकाचा प्रयोग बाहुल्या वापरुन करावयाचा त्यांचा इरादा होता. परंतू तत्पूर्वी कर्नाटकातील भागवत मंडळी, किर्तन, 'खेळ' करीत, त्याप्रमाणे खेळ रचण्याची चिंतामणराव पटवर्धनांनी भाव्यांना आज्ञा केली १८०३ साली राजांच्या पाठबळावर भाव्यांनी सितास्वयंवर हे मराठीतील पहिले नाटक रंगमंचावर आणले. सांगली संस्थानच्या राजवाड्यातील 'दरबार' हॉल मध्ये नोव्हें. ५, १८४३ रोजी या नाटकाचा पहिला खेळ झाला. पुढे त्यांनी ९ मार्च १८५३ रोजी मुंबईला 'ग्रॅंट रोड थिएटर' येथे 'इंद्रजित वध' या नाटकाचा पहिला प्रयोग केला. या

नंतर विष्णूदास भावे यांनी १८६१ पर्यंत महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आपल्या नाटकाचे प्रयोग केले. 'राजा गोपीचंद' १८५४ (हिंदी) हे नाटकही त्यांनीच निमार्ण केले.

*** गोविंद बल्लाळ देवल :-** (नोव्हें. १३, १८५५ – जुन १४, १९१६)



गोविंद बल्लाळ देवल हे प्रसिध्द नाटककार आणि नाट्यदिग्दर्शक होते. त्यांचा जन्म १३ नोव्हेंबर १८५५ रोजी सांगली संस्थानातील हरिपूर या गावी झाला. त्यांचे वडील बल्लाळ उर्फ बाळाजीपंत हे अल्प वेतनावर संस्थानी नोकर होते सांगलीचा नाट्यानुकूल परिसर, वडीलबंधू संगीतशास्त्रज्ञ, दुसरे बंधू हे कुशल नट आणि किर्लोस्कर सारखे मुरब्बी नाट्यगुरु असे त्यांच्या भोवतालचे वातावरण नाट्याला पोषक होते. साहजिकच अल्पकाळ शिक्षकाचा व्यवसाय केल्यावर देवलांनी हयातभर नाट्यसेवेला वाहून घेतले. पुण्यात असताना देवल आणि शंकरराव पाटकर यांनी 'आर्योध्दारक' नावाची नाटक मंडळी नाट्यकलेला नवे वळण लावण्याच्या हेतूने स्थापन केली. या मंडळीत असताना परशुरामपंततात्या गोडबोल्यांनी मराठीत अनुवादिलेल्या 'वेणीसंहार' नाटकातील अश्वत्थामा आणि महादेवशास्त्री कोल्हटकरांच्या अथेल्लोमधील अजितसिंह या त्यांच्या भुमिका विशेष गाजल्या १८८० साली किर्लोस्कर नाटक मंडळी स्थापन झाली. किर्लोस्करांच्या शाकुंतलातील शकुंतलेची पदे देवलांनी रचली. आणि त्या मंडळीचे ते आधारस्थंभच बनले. देवलांनी इंग्रजीवरुन तीन, संस्कृतवरुन तीन व एक स्वतंत्र अशी एकूण सात नाटके रचली. टॉमस सदर्नकृत द फेटल मॅरेज वरुन गॅरिकने तयार केलेल्या इझाबेला या रंगावृत्तीच्या आधारे दुर्गा (१८८६), शेक्सपिअरकृत ऑथेल्लोची रंगावृत्ती झुंजारराव (१८९०), व मर्फी आणि माल्येर यांच्या अनुक्रमे ऑलइन द रॉन्ग आणि गॉनारेल या नाटकावरुन फाल्गुणराव अथवा तसबिरीचा घोटाळा (१८९३), ही त्यांची परकीय नाट्यकृतींची रुपांतरे होत. पुढे फाल्गुणरावचे गंधर्वनाटक मंडळीसाठी केलेले संगीत रुपांतर संशयकल्लोळ (१८१६) हे कमालीचे लोकप्रिय ठरले. मृच्छकटिक (१८८९), विक्रमोर्वशीय (१८८९), व बाणांच्या कादंबरीवर आधारलेले शापसंसंभ्रम (दुसरी आवृ.१९००), ही त्यांची संस्कृतआधारे रचलेली नाटके तथापी याहीपेक्षा त्यांचे सं. शारदा (१८९९) हे नाटक साहित्यीक आणि प्रायोगिक या दोन्ही दृष्टीने अद्वितीय ठरले. शारदेसारखी अस्सल सामाजिक नाट्यकृती तत्पुर्वी मराठी रंगभूमीवर आलेली नसल्याने मराठी सामाजिक रंगभूमीचा पाया घालण्याचे श्रेय देवलांना मिळते ते उत्तम नाट्यशिक्षकही

होते. भाऊराव कोल्हटकर, नानासाहेब जांगळेकर, गणपतराव बोडस, काशिनाथपंत परचुरे व बालगंधर्व यासारख्या नटश्रेष्ठांना देवलांनीच तालीम देऊन तयार केले.

अत्यंत प्रयोगक्षम नाट्यकृतीचे लेखन आणि स्वाभाविक अभिनयशिक्षण या व्दिविध प्रकारे रंगभूमीशी तादात्म्य पावून देवलांनी जी रंगभूमीची सेवा केली ती चिरंतन स्वरुपाची आहे. शेवटी काही वर्षे देवल रंगभूमीवरुन निवृत्त झाले होते. मधुमेहाच्या विकाराने त्यांचे मिरज येथे देहावसान झाले.

*** कृ. प्र. खाडिलकर :-** (२३ नोव्हेंबर १८७२ ते २७ ऑगस्ट १९४८)



कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे एक श्रेष्ठ मराठी नाटककार, संपादक, राजकीय प्रश्नाचे चिकित्सक, अध्यात्मवादी होते. यांचा जन्म व शालेय शिक्षण सांगली येथे झाले त्यांनी १९०१ माध्ये गनिमी काव्याचे युध्द ही लेखमाला लिहिली ते १९०७ मध्ये ३ ऱ्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते, १९०८ पासून टिळकांच्या तुरुंगवासाच्या काळात ते केसरीचे संपादक होते, १९१७ मध्ये पुण्यास नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. १९१८ मध्ये त्यानी केसरीचे संपादकत्व स्विकारले, १९२० मध्ये त्यांचा केसरीशी संबध तुटला आणि १९२१ पासून मुबईस लोकमान्य दैनिकाचे संपादन केले १९२१ मध्ये गांधर्व महाविद्यालया तर्फे भरलेल्या संगीत परीषदेचे ते अध्यक्ष होते. १९२३ मध्ये लोकमान्य दैनिकाचे संपादकत्व सोडले आणि त्याच साली स्वत: च्या मालकीच्या नवाकाळ ह्या दैनिकाचे ते संपादक झाले. १९२५ माध्ये आठवड्याचा नवाकाळ सुरु केला ऐकूणच त्याचा परीचय नाटककार व पत्रकार म्हणूनच आहे. पहिल्या महायुध्दावर त्याच्या लेख मालेचे ५ भाग आहेत. त्याच्या नाववर असलेली नाट्यसंपदा:– कांचन गडची मोहना(१८९८), सवाई माधवराव यांचा मृत्यू(१९०६), कीचकवध(१९०७), संगित बायकांचे बंड(१९०७), भाऊबंदकी (१९०९) प्रमेध्वज(१९११), संगीत मानापमान(१९११), संगीत स्वयंवर(१९१६), संगीत द्रोपदी(१९२०), संगीत त्रिदंड संन्यास(१९२३), संगीत मेनका (१९२६), सवतीमत्सर(१९२७) आणि संगीत सावित्री(१९३३) अशी एकंदर १५ नाटके आहेत. खाडिलकरांच्या लेखणीमुळे मराठी गद्य आणि संगीत रंगभूमीला खरा वैभवाचा काळ लाभला त्यांनी आपल्या नाटकातून श्रीकृष्ण, कीचक, राम, कच, शुक्राचार्य, रामशास्त्री, आंनदीबाई, द्रोपदी, कंकभट ही एका पेक्षा एक अशी अविस्मरणीय पात्रे मराठी रंगभूमीवर उभी केली. त्याच्या जिवनाचे नाट्य जेवढा भूतकालीन घटनावर प्रकाश टकते तेवढाच

वर्तमान कालीन घटनांचा अर्थ लावते, असा प्रत्येय मराठी प्रेक्षकाना सतत आला. स्वाभावीकच कर्झनशाहीचे खरे स्वरुप प्रकट करु पाहणाऱ्या त्यांच्या कीचकवध नाटकाच्या प्रयोगावर १९१० साली इंग्रज सरकारणे बंदी घातली. आणि ते जप्त केले यावरुन खाडीलकराचे असाधारन नाट्ययश  आपणास दिसून येते. अशा महान नाटककाराचा मृत्यू २३ ऑगस्ट १९४८ रोजी झाला.

*** पठ्ठे बापूराव :-** (११ नोव्हेंबर १८६६ ते २२ डिसेंबर १९४५)



हे प्रसिध्द मराठी शाहीर होते मुळ नाव श्रीधर कृष्ण कुलकर्णी जन्म हरणाक्ष रेठरे (तालुका वाळवे, जिल्हा सांगली) ह्या गावी झाला. इंग्रजी चार–पाच इयत्तापर्यंत झालेले पठ्ठे बापूरावांनी गण, गौळण, भेदिक, झगड्याच्या, रंगबाजीच्या, वगाच्या इ. लावण्या रचिल्या त्यातील काही तीन भागांत प्रसिध्द झाल्या आहेत. (१९५८) तथापी त्यांची बरीचशी रचना आजही अनुपलब्ध आहे. पुणे येथे ते निधन पावले.

*** निवृत्तीनाथ रावजी उर्फ पी सावळाराम :-** (४ जुलै १९१३ – २२ डिसेंबर १९९७)



हे एक मराठी भावकवी होते. मुळच्या येडेनिपाणी येथील सावळारामांचे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण झाले. त्यानंतर १९४४ मध्ये ते ठाणे येथे स्थायिक झाले. ते ठाण्याचे नगराध्यक्ष होते. भावगीते मराठीत रुजवण्यात ग. दी. माडगुळकर, शांता शेळके यांच्यासह सावळाराम यांचे नाव घेतले जाते. मराठी गीतांना सुवर्णकाळ आणण्यात त्यांचाही मोठा वाटा होता. सावळाराम याचे 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का' हे गाणे विशेष गाजले. याबरोबरच त्यांची अनेक भावगीते गाजली. 'लख लख चांदणं', 'विठू माझा लेकुरवाळा', 'विठ्ठल तो आला आला', 'सावध हरिणी सावध', 'तूच कर्ता आणि करविता'... इ.

*** ग. दी. माडगुळकर  :-** (१ ऑक्टोबर १९१९ ते १४ डिसेंबर १९७७)

गजानन दिगंबर माडगुळकर म्हणजेच ग. दी. माडगुळकर यांचा जन्म आटपाडी तालुक्यातील शेटफळ या गावी झाला. हे विख्यात मराठी कवी व पटकथा–संवाद लेखक



होते. त्यांनी मराठी चित्रपटासाठी लिहिलेली गीते चैत्रबन (१९६२) ह्या नावाने संग्रहित आहेत. तसेच त्यांनी लिहिलेल्या काही मराठी चित्रकथाही पुस्तकरुपाने प्रसिध्द झाल्या आहेत. (तीन चित्रकथा) (१९६३) युध्दाच्या सावल्या (प्रयोग १९४४) ह्या नावाने एक नाटक त्यांनी लिहिले होते. तथापी ते फारसे यशस्वी झाले नाही. त्यांच्या उल्लेखनिय पुस्तकांपैकी काही अशी – कविता :– जोगिया (१९५६), चार संगितीका (१९५६) काव्यकथा (१९६२), गीत रामायण (१९५७), गीत गोपाल (१९६७), गीत सौभद्र (१९६८), कथासंग्रह :– कृष्णाची करंगळी (१९६२), तुपाचा नंदादिप (१९६६), चंदनी उदबत्ती (१९६७), कादंबरी :– आकाशाची फळे (१९६०), आत्मचरित्रपर:– मंतरलेले दिवस (१९६२), अजून गदिमा आणि वाटेवरल्या सावल्या (१९८१) इत्यादी त्यांना 'महाराष्ट्र वाल्मीकि' ही सन्माननीय पदवी लोकांनी स्वयंस्फुर्तीने दिली. गीत रामायणाच्या गायनाचे शेकडो कार्यक्रम झाले व अजुनही होत आहेत. अन्य भारतीय भाषांत त्यांचे अनुवादही झाले. त्यांच्या जोगिया, मंतरलेले दिवस, चैत्रबन इ. अनेक पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळाली. भारत सरकारने पद्मश्री देऊन (१९६९) त्यांचा सन्मान केला. १९७३ मध्ये यवतमाळ येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना देण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेचे ते काही काळ नियुक्त सदस्य होते. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाचेही ते सदस्य होते. त्यांच्या नावाचे गदिमा प्रतिष्ठान काढण्यात आले आहे. माडगुळकर यांचे पुणे येथे निधन झाले.

*** वि. स. खांडेकर :-** (जानेवारी, ११, १९८८ – सप्टेंबर, २, १९७६)



विष्णू सखाराम खांडेकर म्हणजेच वि. स. खांडेकर यांचा जन्म महाराष्ट्रातील सांगली येथे झाला. मराठी साहित्यात ते ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक ठरलेले आहेत. रुपककथा हा नवा प्रकार त्यांनी रुढ केला. त्यांनी कादंबरीसह कथा, कविता, लघुनिबंध, समीक्षा, चित्रपट, कथा, नाटक, व्यक्तिचित्रे, अनुवाद अशा विविध साहित्य प्रकारांसह अगदी विपूल असे लेखन केले. वृत्तपत्रीय लेखन व ग्रंथ संपादन या क्षेत्रांतही त्यांनी ठसा उमटवला. त्यांच्या कथालेखनातून व्यक्त होणारे जीवनदर्शन आणि ध्येयनिष्ठा वाचकांना प्रभावित करतात. म्हणूनच तर वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक म्हणून

ओळखले जातात. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर अनेक भाषांमध्ये चित्रपट, दुरदर्शन मालीकाही निर्माण झाल्या. त्यांच्या साहित्याचे अन्य भारतीय व विदेशी भाषांत अनुवाद झाले त्यांच्या उल्का या कादंबरीवर मराठी चित्रपट निघाला.

खांडेकर लिखीत काही उल्लेखनिय पुस्तके अशी -

अजुन येतो वास फुलांना, अमृत (पटकथा), अमृतवेल, अविनाश, अश्रू, अश्रू आणि हास्य, आगरकर : व्यक्ति आणि विचार, उल्का (१९३०) (कादंबरी व पटकथा) उःशाप, कल्पकता, कांचनमृग (१९३१), कालची स्वप्ने, कालिका, क्रौचवध(१९४२), घरटे, घरट्याबाहेर, चंदेरी स्वप्ने, चांदण्यात, छाया (पटकथा), दोन ध्रुव(१९३४), दोन मने (१९३८), धर्मपत्नी(पटकथा), जळलेला मोहर (१९४७), जीवनशिल्पी, ज्वाला (पटकथा), झिमझिम, तिसरा प्रहर, तुरुंगातील पत्रे भाग- १,२,३, ते दिवस ती माणसे, दवबिंदू, देवता (पटकथा), धुके, नवा प्रातकाळ, परदेशी (पटकथा), पहिली लाट, पहिले पान, पहिले प्रेम (१९४०), पाकळ्या, पांढरे ढग(१९४९), पारिजात (भाग-१,२) पाषाणपूजा, पूजन, फुले आणि काटे, फुले आणि दगड, मंजिण्या, मंजधार, मंदाकिनी, मध्यरात्र, मृगजळातील कळ्या, ययाती (ज्ञानपिठ पूरस्कार प्राप्त कांदंबरी) रंग आणि गंध, रिकामा देव्हारा (१९३९) रेखा आणि रंग, लग्न पहावे करुन (पटकथा व संवाद) वामन मल्हार जोशी: व्यक्ति विचार, वायुलहरी, वासंतिका, विद्युतप्रकाश, वेचलेली फुले, (कथासंग्रह १९४८), समाधीवरील फुले, सहा भाषणे, सांजवात, साहित्यशिल्पी, (लेख-संपादन-सुशिलकुमार लवटे) सुखाचा शोध, सुवर्णकण, सुर्यकमळे, सोनेरी सावली (पटकथा), सोनेरी स्वप्ने, भंगलेली स्वप्ने, स्त्री आणि पुरुष, हिरवळ, हिरवा चाफा (१९३८), ऱ्हदयाची हाक(१९३०), क्षितिज स्पर्श आणि अंतरिचा दिवा हा खांडेकरांच्या पटकथांचा पुस्तकरुपात संग्रह आहे.

वि. स. खांडेकर सोलापूरला १९४१ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. याशिवाय त्यांच्या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार (१९६०) व ज्ञानपीठ पुरस्कार (१९७४) मिळाला. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी लिट (डॉक्टर ऑफ लिटरेचर) बहाल केली. मिरज येथे २ सप्टेंबर १९७६ रोजी त्यांचे निधन झाले.

*** यशवंतराव चव्हाण :-**

यशवंराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्रे जि. सांगली येथे झाला. इ.स. १९५६ मध्ये स्थापन झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री



म्हणून त्यांची निवड झाली तसेच मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर (२ मे १९६०) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणूनही त्यांचीच निवड झाली. इ.स. १९६२ मध्ये चीन युध्दाच्या काळात तत्कालीन पंतप्रधान पंडीत नेहरुंनी यशवंतरावांची नेमणूक देशाच्या संरक्षण मंत्रीपदावर केली हा त्यांच्या कारकिर्दीचा सर्वोच्च बिंदू म्हणता येईल. पुढील काळात त्यांनी उपपंतप्रधान केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, ही पदे यशस्वीरित्या भुषविली. केंद्रात जनता पक्षाचे सरकार असताना (१९७७–७८) ते विरोधी पक्षनेते होते. तसेच पुढे ते आठव्या केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्षही झाले.

असे अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले यशवंतराव चव्हाण उत्तम रसिक व साहित्यिकही होते. त्यांची ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणे– आपले नवे मुंबई राज्य (इ.स. १९५७) ऋणानुबंध (ललितलेख) (१९७५), कृष्णाकाठ (आत्मचरित्र १ ला खंड) (१९८४) भुमिका (१९७९), महाराष्ट राज्य निर्मीती विधेयक (१९६०), विदेशदर्शन, सह्याद्रीचे वारे (१९६२), भाषणसंग्रह, युगांतर (१९७०) स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर हिंदूस्थानच्या प्रश्नांची चर्चा विचारधन (भाषणसंग्रह–१९६०) या व्यतिरिक्त त्यांचे अनेक भाषण संग्रह पुस्तिकाही प्रकाशीत आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या जिवनावर 'यशवंतराव चव्हाण बखर एका वादळाची' (मार्च२०१४) हा चित्रपट प्रकाशित झाला आहे. (दिग्दर्शक–जब्बर पटेल) त्यांचा मृत्यू नोव्हेंबर २५ इ.स. १९८४ रोजी दिल्ली येथे झाला.

*** अण्णाभाऊ साठे :-**



अण्णाभाऊ साठेंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांचे मुळ नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते. वडील– भाऊराव साठे व आई वालुबाई साठे, अण्णाभाऊंचे फारसे शिक्षण झाले नव्हते. ते केवळ दिड दिवस शाळेत गेले. परंतू त्यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्वपूर्ण ठरलेले आहे. त्यांनी लिहिलेल्या ३५ कादंबऱ्या, १५ कथासंग्रह, नाटक, प्रवासवर्णन, पटकथा, पोवाडाशैलीतील १० गाणी व काही लावण्या असे विपूल साहित्य त्यांच्या नावावर आहे. त्यांनी लिहीलेली पुस्तके पुढीलप्रमाणे–

आकलेची गोष्ट (१९४५), कापऱ्या चोर, देशभक्त, घोटाळे (१९४६), पुढारी मिळाला (१९५२), बेकायदेशीर (१९४७), माझी मुंबई, मुक मिरवणूक, लोकमंत्र्याचा दौरा (१९५२) शेटजीचे इलेक्शन (१९४६), इत्यादी लोकनाट्य, आवडी, गुलाम, चंदन, चिखलातील कमळ, चित्रा (१९४५), पाझर, फकिरा (१९५९), मथूरा, माकडीचा माळ (१९६३), रत्ना, रानगंगा, रुपा, वारणेचा वाघ (१९६४), वैजयंता, वैर इत्यादी कादंबऱ्या, अमृत, आघात, आबी, कृष्णाकाठच्या कथा, खुळंवाडी, गजाआड, गुऱ्हाळ, चिरागनगरची भुतं, नवती, निळारा, जिवंत काडतुस, तारा, पिसाळलेला माणूस, फरारी, बरबाद्या कंजारी, रानबोका इत्यादी कथासंग्रह, सुलतान, सुगंधा, पेंग्याचं लगीन, इनामदार इत्यादी नाटक, माझा रशियाचा प्रवास हे प्रवासवर्णन, पोवाडे व लावण्या हे काव्यपर लिखान त्यांच्या कादंबऱ्यावर चित्रपटही निर्माण झाले आहेत. अशा या महान लेखकाचे १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले.

*** सरोजिनी बाबर :-** (७ जानेवारी १९२० - २० एप्रील २००८)



सरोजिनी बाबर या मराठी लोकसाहित्याच्या संकलक, संशोधक आणि अभ्यासक होत्या. त्यांचा जन्म बागणी (ता. वाळवा, जि. सांगली) या गावी कृष्णराव आणि गंगुबाई या दांपत्यापोटी झाला. सन १९५२ ते १९५७ या कालखंडात त्यांना विधानसभेचे सदस्यत्व मिळाले. सन १९६३ ते १९६६ या काळात त्या विधान परिषदेवर सदस्य म्हणून कार्यरत होत्या तर सन १९६८ ते १९७४ या कालखंडात त्या राज्यसभा सदस्य होत्या. त्या बरोबरच वेगवेगळ्या समित्यांवर त्यांनी सदस्य म्हणून काम केले. त्यांची लोकसाहित्याची संपादने ग्रंथरुपाने प्रसिध्द आहेतच पण समाजशिक्षण मालेची २७० संपादने ही त्यांच्या संपादन कार्यात समाविष्ट आहेत. समाज शिक्षण माला ही त्यांचे वडील कृ. भा. बाबर यांनी सुरु केलेली पुस्तक माला सर्वपरिचित आहे. शिक्षण, समाजकारण, लोकसाहित्य इत्यादी क्षेत्रातली २८० लहान-लहान पुस्तके या मालेद्वारे त्यांच्या वडीलांनी प्रसिध्द केली. प्रारंभापासूनच वडिलांना त्यांच्या लेखन कामात सहाय्य करणाऱ्या सरोजिनीबाईंनी वडीलांच्या निधनानंतर २७० पुस्तकांची मालेत भर घातली. याशिवाय मी पाहिलेले यशवंतराव आणि वसंतदादा पाटील गौरव ग्रंथ या दोन ग्रंथांची संपादने केली होती. या बरोबरच कथा, कादंबऱ्या, बालवाङ्‌मय प्रकारांचे त्यांनी स्वतंत्रपणे लेखन केले आहे.७ कादंबऱ्या, ११ कथासंग्रह, २६ ललितलेख संग्रह, २ कविता संग्रह आणि ४ न्याट्य

वाङ्:मयाची पुस्तके आणि आत्मचरित्र अशी ५१ स्वतंत्र पुस्तके त्यांच्या ३०७ संपादित पुस्तकांच्या जोडीला ठेवली तर त्यांच्या ग्रंथाची एकूण संख्या ३५८ आहे. याशिवाय रानजाई या नावाने त्यांनी शांता शेळके यांच्यासह केलेली दुरदर्शन मालिकाही लोकसाहित्याकडे जनसामान्यांचे लक्ष वेधण्यात महत्वाची ठरली. त्यांच्या ग्रंथसंपादनासाठी विविध पुरस्कार आणि सन्मान त्यांना प्राप्त झाले. शेवटी दिर्घ आजाराने त्यांचे निधन झाले.

*** व्यंकटेश माडगुळकर :-**



व्यंकटेश दिगंबर माडगुळकर हे त्यांचे पूर्ण नाव. त्यांचा जन्म ५ एप्रिल १९२७ रोजी सांगली जिल्ह्यातील माडगुळ या गावी झाला. मराठी कवी, गीतकार ग. दि. माडगुळकर यांचे ते धाकटे बंधु होते. आंरभी काही काळ त्यांनी पत्रकारिता केली ते १९५० च्या सुमारास मुंबईस आले व आकाशवाणीवर ते दीर्घ काळ (१९५५–८५) नोकरीस होते मुंबईस आल्यानंतर त्यांनी मराठी चित्रस्मृतीत पटकथा लेखन करु लागले तत्पूर्वी माणदेशी माणसे (१९४९) हा त्यांचा कथासंग्रह प्रसिध्द झाला होता. त्यानंतर गावाकडच्या गोष्टी (१९५१), हस्ताचा पाऊस (१९५३), सीताराम एकनाथ(१९५१), काळी आई (१९५४), जांभळीचे दिवस (१९५७), उंबरठा, ओझ, गोष्टी घराकडील, चरित्ररंग, चित्रकथा, डोहातील सावल्या, नागझिरा, परवचा, पांढऱ्यावर काळे, रानमेवा, वाटा, वारी, वाळुचा किल्ला, बाजार, वाघाच्या मागावर इत्यादी त्यांचे कथासंग्रह प्रसिध्द झाले. त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी, आणि रशियन अशा विविध जागतिक भाषांत झाले आहेत.

ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. बनगरवाडी (१९५५), वावटळ (१९६४), पूढच पाऊल (१९५०), कोवळे दिवस (१९७९) करुणाष्टक ((१९८२) ह्या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. व्यंकटेश माडगुळकर हे १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते. कोवळे दिवस ह्या कादंबरीत अशाच एका कोवळ्या स्वातंत्र्य सैनिकाचे अनुभव आहेत. पांढरी मेंढरे, हिरवी कुरणे हे प्रवासवर्णन, व्यंकटेश माडगुळकरांनी नाटकेही लिहिली. तु वेडा कुंभार, सती, पती गेले गं काठेवाडी, ही त्यातील काही विशेष उल्लेखनिय होत. कुणाचा कुणाला मेळ न्हाई आणि बिनबियांचे झाडं ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्येही गाजली. 'प्रवास एक लेखकाचा' हे व्यंकटेश माडगुळकरांचे आत्मचरित्र आहे. अशी माणसं, अशी साहसं, चित्रे आणि चरित्रे,

जनावनातली रेखाटणे, बिकटवाट वहिवाट हे व्यक्तिलेख संग्रह, व्यंकटेश माडगुळकर यांच्या ४१ पुस्तकांचे पुण्यातील मेहता प्रकाशनकडून १८ मे २०१२ रोजी नव्याने प्रकाशन झाले. त्यांच्या 'सत्तांतर' या कादंबरीला १९८३ साली साहित्य आकादमी पुरस्कार मिळाला त्याच बरोबर जनस्थान पुरस्कारानेही त्यांना सन्मस्नित केले. सन १९८३ साली भरलेल्या मराठी साहित्य संमेलन (अंबेजागाई) याचे ते अध्यक्ष होते. या महान लेखकाचा मृत्यू २८ ऑगस्ट २००१ रोजी झाला.

**✻ चारुता सागर :-**



चारुता सागर हे प्रसिध्द ग्रामीण कथाकार त्यांचे मुळ नाव दिनकर दत्तात्रय भोसले त्यांचा जन्म २१ नोव्हेंबर १९३० रोजी सांगली जिल्ह्यातील कवठे महांकाळ तालुक्याजवळचे मळणगांव या गावी झाला. चारुता सागर या नावाने कथा लेखन तर धोंडूबूवा किर्तनकार या नावने किर्तने केली. सुरवातीला चारुता सागर यांनी लष्करात काम केले होते. काही दिवसांनी त्यांनी लष्करातील नोकरी सोडली आणि बिहार-बंगाल मध्ये भ्रमंती केली. बंगालमध्ये फिरत असताना शरदचंद्र चट्टोपाध्याय यांच्या सर्व कादंबऱ्या वाचून काढल्या. चटर्जींच्या एका कादंबरीत एका पात्राचे नाव चारुता सागर असे आहे. ते नाव त्यांना आवडल्यामुळे त्याच नावाने त्यांनी आपले लेखन केले. न लिहिलेली पत्र ही चारुतासागर यांनी लिहिलेली पहिली कथा. त्यांनतर नागीण, नदीपार, मामाचा वाडा हे कथासंग्रह प्रसिध्द झाले. त्यांच्या अनेक कथा कन्नड भाषेत भाषांतर झाल्या आहेत. त्यांच्या 'नागीण' या कथेला कॅप्टन गो. ग. लिमये पूरस्कार व १९७७ साली चारुता सागर यांना सर्वोत्कृष्ट लघुकथाकाराचा पूरस्कार देण्यात आला. २९ मे इ.स. २०११ रोजी निधन झाले.

**✻ ना. स. इनामदार :-**



यांचा जन्म २३ नोव्हेंबर १९२३ रोजी सांगली येथे झाला. ते शासनाच्या भुमिअभिलेख (मोजणी खाते) संचालक पदावरुन निवृत्त झाले. त्यांचे लेखन वाचकांना इतिहासाकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक बनविते तसेच घटनेतील विविध पैलुंचा अर्थही समजाविते. औरंगजेब, यशवंतराव होळकर, त्रिंबक डेंगळे, दुसरा बाजीराव हे त्यांच्या कथांचे नायक आहेत. त्यांनी आपले लेखन प्रथम 'अनिल' साप्ताहिकातून वर्षे १९४५ मध्ये सुरु केले.

'बंड' ही त्यांची पहिली कादंबरी १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामावर आहे परंतू ती कादंबरी त्यांनी लिहिलेल्या 'झेप' (१९६३) या त्यांच्या दुसऱ्या कादंबरीनंतर वर्षे १९९६ मध्ये प्रकाशित झाली. त्रिंबकजी डेंगळे या इतिहासाने फारशी दखल न घेतलेल्या व्यक्तिचे त्यांनी झेप या कादंबरीतून वाचकांना ओळख करुन दिली. झेप या कादंबरीच्या १० आवृत्या निघाल्या. उत्तर पेशवाईतील जीवनमानाचे यथार्थ दर्शन यातून होते. या कादंबरीस राज्य शासनाचा पुरस्कार ही मिळाला.

'मंत्रावेगळा' ही दुसरे बाजीरावावरील कादंबरी १९६९ मध्ये प्रकाशित झाली. यशवंतराव होळकर यांच्या झुंज या कादंबरीचा हिंदी अनुवाद 'प्रतिघात' या नावाने भारतीय ज्ञानपीठ नवी दिल्ली यांचे मार्फत १९६६ मध्ये प्रकाशित झाला. त्यांचा थोरले बाजीरावावरील (राऊ) सर्वांना भावला. या कादंबरीचे 'राऊ स्वामी' या नावाने हिंदी भाषांतरेही झाली. औरंगजेबाची संशयी वृत्ती, धार्मिक व साधी राहणी याचे यथार्थ दर्शन 'शहेनशाह' या कादंबरीतून होते. ही कादंबरी १९७६ मध्ये प्रकाशित झाली. सदाशिवराव भाऊ पेशवे पानिपतच्या लढाईत बेपत्ता झाल्यावर त्यांची पत्नी पार्वतीबाई यांच्या व्यथा त्यांनी 'शिकस्त' या कादंबरीतून मांडल्या आहेत. 'राजेश्री' ही शिवाजी महाराजांवरील कादंबरी १९८६ मध्ये लिहिली आहे. त्यांनी तीन आत्मकथने लिहिली. त्यापैकी 'त्या स्वप्नांच्या आठवणी' मध्ये शासकीय सेवेतील आठवणी, 'चांदराती रंगल्या' मध्ये वाड:मयीन आठवणी व 'वाळल्या फुला' मध्ये जीवनातील स्वानुभाव लिहिले आहे. १९९७ मध्ये नगर येथील साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्यांनी ३ वर्षे उपाध्यक्ष भुषविले. १६ ऑक्टोबर २००२ रोजी त्यांचे पुणे येथे निधन झाले.

**✼ डॉ. भिमराव बळवंत कुलकर्णी :- (४ नोव्हेंबर १९३२–२७ सप्टें. १९८७)**



सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील मुचंडी हे त्यांचे गाव. पुणे विद्यापिठात 'ऐतिहासिक मराठी नाटके' या विषयावर प्रबंध सादर केला. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९ विद्यार्थ्यांनी पुणे विद्यापिठात प्रबंध सादर करुन पी. एचडी पदवी प्राप्त केली. त्यांनी संपूर्ण गडकरी खंड १ ते ३ नव्याने संपादित केला आणि त्याला प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली. तसेच गोविदाग्रज यांचा काव्यसंग्रह 'संपूर्ण वाग्वैजयंती' त्यांनी नव्याने संपादित केला.

भिमराव कुलकर्णी यांनी मराठी कथा, कादंबरी, बालसाहित्य, ऐतिहासिक,जीवनकथा, चरित्रलेखन समीक्षा आणि संपादने या प्रकारात विपूल लेखन केले. त्यांचे साहित्य :- कादंबरी- हरिनारायण(१९६५), समशेरबहादूर(१९७२), ओंकार(१९८६), कथासंग्रह- मुर्दाड(१९६२), स्त्रीफळा(१९७०), घाईस पोरं झालीस पाहिजेत (१९८२) समीक्षा- वाङ:मयीन रसास्वाद(१९६५) ऐतिहासिक मराठी नाटके (१९७१) काही सहित्यिक, काही साहित्यकृती, ललितलेखन- देवाची माणसं(१९८१) साहित्य संमेलनाचे महाभारत, साहित्यिकी, बालसाहित्य- बाळू शेतकरी आणि भूत(१९६५), माणूस बोलू लागला(१९६७), गडकऱ्यांचा रानमेवा, जोडाक्षर विरहित छिटकुली, इसापनिती भाग १ आणि २ (१९८४) ऐतिहासिक जीवनकथा- स्वामी विवेकानंद(१९६४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर(१९६६) हिरोजी फर्जंद(१९८२) सखाराम हरी(१९८३) इतिहासातील स्वामी निष्ठांच्या कथा(१९८५) बापू कान्हो(१९८५) संकीर्ण- युध्द पेटले घराघरातून(१९६९) संभाषण कला(१९८१) सभेत कसे बोलावे(१९८४) नवे मराठी व्याकरण लेखन (१९८५) संकलने, संपादने- अच्युत बळवंत कोल्हटकर : वाङ:मयदर्शन (१९६२), सहस्त्रबुध्दे डॉ. पु. ग. व्यक्तिदर्शन(१९६४) संगीत सौभद्र(१९६४) गद्य प्रसाद(१९६४), मो. के दामले शास्त्रीय मराठी व्याकरण(१९६६), आमचे जीवन आमच्या स्मृती(१९६६), मराठी गद्यांचा पूर्वरंग(१९६६), भाऊसाहेबांची बखर (१९६६) ऐतिहासिक पत्रबोध, कथा नवनीत(१९६६), मल्हार रामराव चिटणीस विरचित श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र(१९६७), पारिजात(१९६८), अस्मिता महाराष्ट्राची(१९७१), अक्षर चिंतामणी (१९७२), मराठी साहित्य संमेलने अध्यक्षीय भाषणे खंड-१ (१९७१) खंड २ (१९७१), खंड ३ (१९७२), साहित्य आणि नाट्य काही समस्या (१९७४), मुक्तेश्वरांचे विराटपर्व(१९८१), काव्यगंध(१९८४), गद्य शिखरे(१९८४), गुर्जर कथा(१९८५) वामन पंडितांची सुधाकाव्ये(१९८५), कथाविमर्श(१९८७) मराठी फार्स (१९८७) मराठी वाङ:मय चर्चा आणि चिकित्सा(१९६३) इत्यादी. १९८६ साली अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे मुंबई येथे त्यांनी अगदी नेटके आयोजन केले. दरम्यान महाराष्ट्र राज्य साहित्य संकृती मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. तसेच त्यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्षपद भुषविले आहे. मुंबई येथे त्यांचे निधन झाले.

*** म. द. हातकणंगलेकर:-**

प्राचार्य मधुकर दत्तात्रय हातकणंगलेकर यांचा जन्म १ फेब्रुवारी १९२७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथे झाला परंतू वडिलांच्या अकाली निधनामुळे ते



मामाकडे सांगलीत आले आणि सांगलीकर होऊन गेले. हातकणंगलेकर हे वास्तविक इंग्रजीचे प्राध्यापक पण त्यांचा मराठी साहित्याचा व्यासंग खूप मोठा होता. त्यांचे समीक्षात्मक लेख अनेक नियतकालीकातून प्रकाशित झाले आहेत. मराठीतील नामवंत कथालेखक जी. ए. कुलकर्णी ह्यांच्याशी त्यांचा स्नेह जुळला. जी एं शी झालेला पत्रव्यवहार पूढे हातकणंगलेकरांनी खंडरुपाने प्रसिध्द केला. त्यांनी अनेक इंग्रजी कथांचे मराठीत अनुवाद केले. तसेच गो. नी. दांडेकर यांची 'माचीवरचा बुधा' आणि व्यंकटेश माडगुळकर यांची 'सती' या कादंबऱ्याचे इंग्रजीत अनुवाद केले. आपल्याला आलेल्या अनेक अनुभवावरुन 'उघडझाप' हे आत्मवृत्त वाचकांसमोर आणले. त्यांनी लिहिलेली काही पुस्तके – साहित्यातील अघोरिखीते (१९८०), मराठी साहित्य– प्रेरणा आणि प्रवाह (संपा), मराठीकथा – रुप आणि परिसर, निवडक मराठी समीक्षा (संपा), साहित्यविवेक, आठवणीतील माणसं, भाषणे आणि परीक्शने, विष्णू सखाराम खांडेकर, साहित्यसोबती, इत्यादी– ललित तर काही संपादणेही त्यांच्या नावावर आहेत. सांगलीत झालेल्या ८१ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषविले. त्यांना 'सांगली भुषण' या पुरस्काराने २०१४ साली सन्मानित करण्यात आले. त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या विलींग्डन महाविद्यालय सांगली येथे अधिव्याख्याता पासून प्राचार्य पर्यंत सलग १९८७ सालापर्यंत काम केले. २५ जानेवारी २०१५ रोजी त्यांचे सांगली येथे निधन झाले.

*** जी. के. ऐनापुरे :-**

गडहिंग्लज तालुक्यातील ऐनापूर हे त्यांचे मुळगांव त्यांचे वडील मुंबईला गिरणी कामगार असल्याने त्यांची जडणघडण मुंबईतच झाली. पुढे ते सांगली जिल्ह्यातील कवठे महांकाळ येथे पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. ते मुळचे विज्ञान शाखेतील प्राध्यापक असले तरी त्यांचे मराठीतील दीर्घकथा आणि कादंबरी तसेच समीक्षालेखन दर्जेदार आहे. त्यांचे प्रकाशित साहित्य पुढीलप्रमाणे– अधुरा(कादंबरी इ.स. २००६) अभिसरण (कादंबरी २००२) अवकाश (१९९७) कांदाचिर(दीर्घकथासंग्रह २००५) जईच्या घरी जाई (२०१०) झिंझुरडा (कथासंग्रह २०१२) सर्पसावल्या (या कथासंग्रहाची नवी आवृत्ती खंगोल या नावाने २०१० साली) स्कॉलर ज्युस या व्यतिरिक्त अनेक समीक्षात्मक लेखन प्रकाशित आहे. त्यांच्या 'रिबोट' या

कादंबरीसाठी महाराष्ट्र फाऊंउेशनचा पुरस्कार आणि अन्य पुरस्कार मिळाले समीक्षात्मक:– मराठी कथा: मुल्य आणि ऱ्हास, ग्रेसची कविता अर्थबोधाचे तपशील, सूर्याचे सांगाती: बाबूराव बागुल यांच्या असंग्रहित कथा (संपादीत) चारुता सागर दु:खाचा गिरव, 'देहरासर' आणि 'आयोध्या' या कादंबऱ्या नुकत्याच प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. पुण्यात २० ते २४ फेब्रुवारी २०१९ या काळात भरलेल्या ७ व्या सम्यक साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. ते आता प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त झाले असून त्यांचे लेखन कार्य चालूच आहे.

**✻ डॉ. अशोक बाबर :-**

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अशोक बाबर हे जेष्ठ लेखक व समीक्षक आहेत. ते इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. परंतू त्यांचे मराठीतील समीक्षात्मक लेखन खुप दर्जेदार आहे. त्यांची देशीवाद, आंबेडकरवाद व इतर इंग्रजी भाषेतील पुस्तके प्रकाशित आहेत. तसेच अनेक समिक्षात्मक लेख विविध नियतकालीकातून प्रकाशित झाले आहे आणि अजुनही त्यांचे लेखनकार्य सुरु आहे.

**✻ डॉ. मोहन लोंढे :-**

खानापूर तालुक्यातील पळशी हे त्यांचे मुळ गांव– सध्या ते पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय कवठे महांकाळ येथे मराठी विषयाचे प्राध्यापक मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तसेच नुकतीच त्यांची प्रोफेसर पदावर नियुक्ती झाली आहे. ते उत्तम असे लेखक, कवि, समिक्षक, संपादक आहेत. त्यांचे प्रकाशित साहित्य– 'चाक' (कवितासंग्रह) 'मांग संस्कृती आणि भाषा' (संशोधन) 'कादंबरीतील कामगार विश्‍व' (संशोधन) अण्णाभाऊ साठे जन्म शताब्दी गौरव ग्रंथ (संपादक) या ग्रथांची दुसरी आवृत्ती ही प्रकाशित झाली. इत्यादी याबरोबरच त्यांचे संशोधनात्मक शोधनिबंध विविध नियतकालीकातून प्रकाशित झाले आहेत. तसेच त्यांना दलितरत्न पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, वाङ:मयभूषण पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार अशा एकूण ११ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अजुनही त्यांचे लेखनकार्य सुरु आहे.

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयातील आणखी तीन कविंचा उल्लेख करणे महत्वाचा आहे. दिवंगत **जगन्नाथ जाधव :-** मुळ गांव हिंगणगांव ता. कवठे महांकाळ यांचा 'बंदिस्त वर्तुळाच्या बाहेर' हा कविसंग्रह प्रकाशित आहे. तसेच रसायणशास्त्र विषयाचे प्राध्यापक **सुनिल तोरणे** यांचा 'श्‍वास' हा कवितासंग्रह प्रकाशित असून त्यांचे

सोशल मिडीयावरुन काव्यलेखन सुरुच आहे. अनेक नियतकालिके, दिवाळी विशेषांकात त्यांच्या कविता प्रकाशित आहेत. अनेक ऑनलाईन कविसंमेलनात निमंत्रित कवि म्हणून उपस्थिती राहिले आणि त्यांना विश्वस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळाले आहे. डॉ. **आबासाहेब शिंदे** हे दै. केसरीचे पत्रकार व चारुता सागर प्रतिष्ठाणचे अध्यक्ष, आणि लावणी वाङ्मयाचे अभ्यासक आहेत. त्यानी चारुता सागर विशेषांकाचे संपादन केले. तसेच साहित्य सागर या नावने प्रसिध्द होणारे महाराष्ट्रातील देर्जेदार साहित्यिक दिवाळी अंकाचे संपादक आहेत. त्यांनी काही कविता व कथा लिहिल्या व सांगली आकाशवाणीवरुन त्या प्रसारीत झाल्या. त्यांचे अजुनही लेखन कार्यातील सातत्य चालुच आहे.

**✻ प्रा. अरुण कांबळे बनपुरीकर :-**

प्रा. अरुण विठ्ठल कांबळे यांचे मुळ गांव बनपूरी ता. आटपाडी, जि. सांगली. ते बुधगांव ता. मिरज, जि. सांगली. येथील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आहेत. त्यांचे ई.काव्यसंग्रह, दैनिक वृत्तपत्र, मासिके यामधून लेखन साहित्य प्रसिध्द झाले आहे. माझे मातीतले पाय (काव्य), काळजातला बाप (काव्य), प्रिय कॉलेज कट्टा (ललितसंग्रह) तसेच चविष्ट आठवणी (लेख), बरबाट (कथासंग्रह), भू-भू चं घर (बालकथासंग्रह) ही आगामी पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. [झोळी (आत्मकथन) डॉ. कालिदास शिंदे, हाकारी (कादंबरी) मनोहर भोसले] या पुस्तकाचे पुस्तक समिक्षणही केले आहे. अजुनही त्यांचे लेखनकार्य सुरुच आहे.

**✻ सौ. मनीषा पाटील :-**

मनीषा पाटील यांचे देशिंग-हरोली, ता. कवठे महांकाळ , जि. सांगली. हे मुळ गांव त्या श्री महालक्ष्मी हायस्कूल देशिंग-हरोली येथे सहाय्यक शिक्षिका म्हणून काम करतात तसेच त्या अभिव्यक्ति साहित्य प्रतिष्ठाण देशिंग-हरोलीच्या संस्थापक अध्यक्षा, अग्रणी साहित्य प्रतिष्ठाण देशिंग-हरोलीच्या संचालिका, चारुता सागर प्रतिष्ठाण कवठे महांकाळच्या महिला समन्वयक, अशा अनेक पदावर कार्यरत आहेत. तसेच अनेक साहित्य संमेलनाच्या निमंत्रित कवियित्री परिसंवादामध्ये सहभाग आणि विविध नियतकालिकातून काव्यलेखन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे प्रकाशित साहित्य-पायवाटेवरील दिवे, माती विश्व (कवितासंग्रह) विचार मंथन (भाषणसंग्रह) प्रकाशवारा (स्मरणिका) संपादन इत्यादी. त्यांनी आपले लेखनकार्य अजुनही सुरु ठेवले आहे.

**⁕ दयासागर बन्ने :-**

हे देशिंग ता. कवठे महांकाळ, जि. सांगली. येथील प्रथितयश कवी आहेत. त्यांचे प्रकाशित कवितासंग्रह पळसफुल, पेचपर्व, प्रिय हायकू, पडझड, फुलबाग व पाखरांचे पंख मनाला हे बालकाव्यसंग्रह इत्यादी

**⁕ यशवंत माळी :-**

जेष्ठ लेखक यशवंत माळी हे मोरगांव ता. कवठे महांकाळ, येथील आहेत. त्यांचे प्रकाशित साहित्य- केकत्याचा बिंडा (कथासंग्रह) प्रतिज्ञा (बालकादंबरी) पोटगी (कथासंग्रह) मिनीचं लग्न (बाल कादंबरी) सखी (कविता संग्रह) किराळ (कथासंग्रह) इत्यादी

**⁕ आप्पासाहेब पाटील :-**

जेष्ठ लेखक आप्पासाहेब पाटील हे बोरगांव ता. कवठे महांकाळ येथील आहेत. त्यांनी काही कथासंग्रह व कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यात तडजोड, चक्रव्युह, आक्रित इत्यादीचा समावेश होतो.

**⁕ किशोर वाघमारे :-**

श्री महांकाली हायस्कूल कवठे महांकाळ येथे कार्यरत असलेले कवि किशोर वाघमारे हे प्रसिध्द कवि आहेत. त्यांनी गाणी बुध्द-भिमाची, कल्याणमित्र, मुलभूत इत्यादी पुस्तके लिहिली आहेत.

⁕ कोकळे गावचे लेखक **ॲड. अजित पुरोहित** (कवठे महांकाळ) यांचे संखा आणि इतर कथा तर जेष्ठ **शाहिर राजा पाटील** यांचा 'तुकोबा निघाले वैकुंठाला' हा पोवाडा प्रकाशित आहे. तसेच त्यांनी अनेक नाटके व वगनाट्य लिहिली आहेत.

**⁕ श्री महेशकुमार गुंडाप्पा कोष्टी :-** हे मालगांव रोड मिरज, जि. सांगली येथील आहेत. त्यांनी चला बनुया चित्रकार, संस्काराची सापशिडी, बाराखडीची गाणी इत्यादी बालसाहित्य प्रकाशित आहे.

**⁕ श्री. सिराज करीम शिकलगार** यांनी सहकार विकास विशेषांक प्राथमिक सेवा सहकारी साहित्य त्यांनी लिहिले

**⁕ राहूलराज, श्री. राहूल एम. पाटील** मिरज हे कवीआणि गीतकार म्हणून प्रसिध्द आहेत. यांनी मराठी चित्रपटात गीत-लेखन व चित्रपट संवाद लेखक-गोफणीचा खेळ तसेच अभिनेता म्हणून मराठी चित्रपटात काम केले

**※ वैभव आण्णासो चौगुले :-**

हे सांगली पोलीस दलात कार्यरत आहेत. त्यांना चारोळी, कविता, गझल, लेख इत्यादी लिखाणाची आवड आहे. अनेक दिवाळी अंकातून लेख गझल प्रसिध्द आहेत. त्यांचा 'स्पर्श' हा चारोळी संग्रह प्रकाशित आहे.

**※ भिमराव ईश्वरा धुळूबुळू :-**

ज्ञानपीठ अकौंटंसी क्लासेस, मिरज ते कॉस्टिंग तज्ञ, कवी व लेखक आहेत. त्यांनी 'कवडसे' कविता संग्रह, 'मोक्ष व इतर एकांकिका' 'मोक्ष' दोन अंकी नाटक आकाशवाणी सांगलीवर प्रभातीचे रंग व घरोघरी या मालीकाचे लेखन केले. ते गीत लेखकही आहेत. चित्रपट दोन हजार चौदा, राजकारण व रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनावरील रमाई यांचे उत्कृष्ट निवेदक आहेत.

**※ सुधाकर वासुदेव इनामदार :-**

मु. पो. गोमेवाडी ता. आटपाडी, जि. सांगली यांचे प्रकाशित साहित्य 'जागर' (काव्यसंग्रह) 'इजांची मखमल' (गझलसंग्रह)

**विजय जंगम :-**

यांचे 'जोगडा' (कादंबरी) गावपांढरी (ग्रामीण कथासंग्रह) 'निसर्ग माझा मी निसर्गाचा' वैचारिका, पारे गावचा महांकालेश्वर, ऐतिहासिक व संशोधनात्मक हे साहित्य प्रकाशित

आहेत.

**※ डॉ. वि. दा. वासमकर :-**

निवृत्त प्राध्यापक विलींग्डन महाविद्यालय सांगली यांचे 'संदर्भ आयुष्याचे' (कवितासंग्रह), समन्वयवादी (संपादन) मराठीतील कलावादी समीक्षा इत्यादी साहित्य प्रकाशित आहेत.

**※ प्रा. वैजनाथ महाजन :-**

हे सांगली येथील आहेत ते वक्ते, ललितलेखक, भाष्यकार आणि वाड:मयीन चळवळीतील अग्रदुत म्हणून सर्वदूर परिचित आहेत.

**※ डॉ. श्रीपाद जाशी :-**

श्रीपाद जोशी हे येडे निपाणी ता. वाळवा जि. सांगली येथील आहेत. त्यांनी सहशिक्षक म्हणून उत्तूर विद्यालय उत्तूर ता. आजरा, जि. कोल्हापूर, वारणा विद्यालय

वारणानगर, ता. पन्हाळा मुख्याध्यापक तथा प्राचार्य: दि फ्रेंडस असोसिएशन , जत संचलित, जत हायस्कुल, जत जि. सांगली, येथे सेवा केली. त्यांचे लेखनकार्य दर्जेदार आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तके– शिक्षण संवाद, शिक्षण: शोध आणि बोध, विवेक, महाराष्ट्र वाल्मिकी ग. दि. माडगुळकर, वाङ्मय दर्शन (२ री आवृत्ती) गदिमा आणि गीतरामायण, असे होते आपले दादा, शिक्षण तज्ज्ञ : डॉ. ग. श्री. खैर, माध्यमिक शाळांचे प्रशासन, मराठी : तत्व आणि व्यवहार, आव्हाने आणि आवाहने, समाज मनातील यक्षप्रश्न, शिक्षण: दृष्टी आणि दृष्टिकोण, शिक्षणातील यक्षप्रश्न, लोकशाही–चिंता आणि चिंतन, होरपळ आणि हिरवळ (आलवृत्त ४ थी आवृत्ती) युवास्पंदन अशी असतात मोठी माणसे, आकाश भाषिते, एक शाळा बहरताना, या बरोबरच अनके वर्तमानपत्रातून स्थंभलेखन व स्फूट लेखन, विविध लेखन–श्रृतिका–१०, चिंतने–६०, संवाद–१०, मुलाखती–५, भाषणे– १५, त्यांना,अनेक नामांकीत पुरस्कार मिळाले आहेत.

**⁕ डॉ. अरुण मिरजकर :-**

शामराव नगर सांगली येथील डॉ. अरूण मिरजकर हे सहशिक्षक म्हणून काम करतात त्यांनी नाटके, कांदबरी, कथा असे विपूल लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तके–फिरकी(कांदबरी), द पिलर्स ऑफ डेमो क्रसी, ज्योती म्हणे, निब्बाण, मिशन २९, डायरी, रेसकोर्स, दंगल, वाद, एका धोतराची गोष्ट, डॉलर, अंधारातील बाहुली, ब्लॅक नाईट, इत्यादी नाटके, शिल्पा, रॉकेलची रांग, मनवेडा या कथा, पटकथा–रमाई, इज गांदी डेड, अश्म, इत्यादी साहित्य त्यांच्या नावावर आहे. अनेक सन्मान व पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

**⁕ नवनाथ गोरे :-**

हे मुळचे सांगली जिल्ह्यातील उमदी (जत तालुका) येथील आहेत. त्यांना त्यांच्या 'फेसाटी' या कादंबरीसाठी २०१८ सालचा युवा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबरोबरच अनेक पुरस्कार त्यांच्या फेसाटी कादंबरीला मिळाले. त्यांचे लेखनकार्य अजुन चालूच आहे.

**⁕ सचिन वसंत पाटील :-**

हे विजय भारत चौक कर्नाळ ता. मिरज, जि. सांगली येथील प्रसिध्द लेखक आहेत. त्यांची प्रकाशित पुस्तके– सांगावा (चार आवृत्ती) (कथासंग्रह) अवकाळी विळखा (दोन आवृत्ती) (कथासंग्रह) येरे येरे पैसा (दोन आवृत्ती) त्यांच्या कथासंग्रहांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. याशिवाय अनेक वाड:मयीन दिवाळी अंक, मासिके, दैनिकातून विविध

कथ/ललित लेख प्रकाशित होत असते.

**⁕ नामदेव माळी :-**

यांनी १९८९ ते १९९५ संगमेश्वर येथील पैसाफंड विद्यालय येथे शिक्षक म्हणून काम केले. ते मुळचे विसापूर ता. तासगांव, जि. सांगली येथील आहेत. पुढे काही काळ ते गट शिक्षणाधिकारी म्हणूनही कार्यरत होते. त्यांनी चार कथासंग्रह दोन कादंबऱ्या यासह नियतकालीकांतूनही त्यांनी विपूल लेखन केलं आहे. 'शाळा भेट' ही त्यांची लेखमाला २०११ च्या ११ जून पासून साधना साप्ताहिकात क्रमश: प्रसिध्द झाली. 'खरडछाटणी' आणि 'छावणी' या दोन कादंबऱ्या आठ प्राथमिक शिक्षकांची आत्मवृत्त शाळाभेट इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

**⁕ दत्तात्रय पांडुरंग मानुगडे :-**

हे जुळेवाडी, ता. तासगांव, जि. सांगली येथील ग्रामीण लेखक आहेत त्यांची ग्रंथसंपदा– पहिले पुस्तक–हुरडा (१९९०) त्यानंतर पैशाचे इमान, टीप्पिरा, आकडी जत्रा, आणखी एक सावित्री, बुवाने उडवली धमाल, रोजी रोटी, राम रावण युध्द, खाली काय पडलाय बघा, त्याची प्रकाशनाच्या मार्गावर असलेले साहित्य–गुज अंतरीचे (प्रदीर्घकादंबरी), विचार यात्रा भाग–३, तमाशाचा बाज, लबाड नमा(कथासंग्रह), अज्ञीची पोथडी, फाटकी झोळी (कादंबरी), नानाची आई (कादंबरी), नाट्यलखन– सुखाचा संसार, बाईने रंगविला पैजेचा विडा, पाटलाचा खुन, लावणीच्या नादात बेड्या पडल्या हातात, नवं शिमोल्लान्हान (सांगली आकाश वाणीवर प्रसारीत लोकनाट्य) पटकथा लेखन– जोगतामी देवीचा, रकनुकाचा भंडारा (आकाशवाणीवरुन प्रसारित झालेले) – १/१२/१९९८ शोर्ट स्टोरी वार्ता सांगली आकाशवाणी, घरपट्टी कथा, गावाकडची गोष्ट(६ महिने प्रसारण) त्यांना अनेक नामवंत पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले आहे.

**⁕ श्री. दिं. बा. पाटील :-**

हे मु. पो. कामेरी, शिवाजी पेठ ता. वाळवा जि. सांगली येथील रहिवाशी आहेत. त्यांचे प्रकाशित साहित्य–कादंबरी– वादळ, वेदना, रक्तबंध, मंतरलेली मनं, होकार, प्रतिस्पर्धी, डियर मॅडम, झुंज, मास्तर, धामाचे आप्पू, सावलीचे घर उन्हात, कथासंग्रह– विसावा, हिरवा चुडा, वाल्या, त्यांचा 'नोट बंदी' हा कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. व्यक्तिचित्रे– भली माणसं या पुस्तकातील बाबमस्तर या व्यक्तिचित्राचा शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. भाग–३ च्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात समावेश झाला आहे.

त्यांच्या साहित्याला विविध १६ पूरस्कार मिळाले आहेत. ते अनेक साहित्य संस्थांच्या, संस्थापक अध्यक्ष, सदस्य, साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष अशा विविध पदावर कार्यरत आहेत. त्यांचे दर्जेदार लेखन अजुनही सुरुच आहे.

इस्लामपूर येथील प्रसिध्द कवी व कासेगाव शिक्षण संस्थेतील मराठी विषयाचे प्राध्यापक **प्रदीप पाटील**: यांचे 'आत्मसंवाद' व 'अंतरीचा भेद' हे दोन कविता संग्रह प्रकाशित असून त्यांना महाराष्ट्र शासनाच्या राज्य पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले. तसेच सोलापूर विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या अभ्यासक्रमांमध्ये त्यांच्या कवितांचा समावेश झालेला आहे. **अनंदहरी**: हे लेखकही सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथील आहेत. त्यांचे पाऊलखुणा, वादळ, बुमरँग या कादंबऱ्या, 'ती ची गोष्ट', 'त्रिकोन' हे दोन कथासंग्रह आणि 'तू कोरडा भवताल' व 'काळीज झुला' हे कविता संग्रह प्रसिध्द झाले आहेत. **अनंत हबळे**: हे आष्टा, जि. सांगली येथील आहेत. त्यांचा 'अंधारपक्षी' हा कविता संग्रह प्रकाशित आहे. सांगली येथील **सौ. प्रतिभा पद्माकर जगदाळे**: यांचे मभावनांच्या हिंदोळ्यावरफ(ललितगद्य), अनुबंध (ललितगद्य), मिश्किली (विनोदी लेखसंग्रह), चंदनवृक्ष (चरित्रलेखन), भावतरंग (काव्यसंग्रह) इत्यादी साहित्य प्रकाशित आहे. तसेच वर्तमानपत्रे, दिवाळी अंक, मासिकांमधून लेखन केले आहे. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. ओंकार निवास, नवजीवन कॉलनी , मिरज, जि. सांगली. येथील **सौ.मनीषा रायजादे-पाटील**: यांचा 'काव्यमनिषा' कवितासंग्रह प्रकाशित आहे. **कवि मेहबुब जमादार**: हे रा. नायकवाडी पो. पेठ. ता. वाळवा, जि. सांगली. येथील आहेत. त्यांचे- पुरुष, माया, माफी, वाढदिवस, घुंगरु, कात्रणी हे कथासंग्रह, चांदण मनातल, मनातल्या कविता हे कविता संग्रह आणि 'गोष्ट एका रात्रीची' ही कादंबरी प्रकाशित आहे. अंकलखोप जि. सांगली येथील **सौ. लता ऐवळे-कदम**: या प्रसिध्द कवयित्री आहेत. त्यांचा मबापफहा कविता संग्रह महाराष्ट्रभर गाजला. मिरज येथील **डॉ. विजयकुमार माने**: हे लेखनातील सिध्द हस्त कवी, गायक, चारोळीकार आहेत. त्यांचा 'काळजातल्या जाणीवांची सोनोग्राफी' हा कविता संग्रह प्रकाशित आहे. शामरावनगर सांगली येथील **श्री. मुबारक बाबू उमराणी**: हे प्रसिध्द कवी आहेत. त्यांनी अनेक दिवाळी अंकातून कविता व कथालेखन केले आहे. त्यांना विविध १८ पुरस्कार मिळाले आहेत. नागठाणे ता. पलूस येथील कथाकार **हिम्मत पाटील सर**: साधन, लोकसत्ता यातून कथालेखन पूणेपोस्ट मधील 'हरवलेली माणसं' हा व्यक्तिचित्रण साधन प्रकार प्रकाशित सांगली जिल्ह्यातील अंकलखोप

येथील **ज्ञानेश्वर कोळी**: हे मराठी सहित्यातील नामवंत कवी आहेत. 'आभाळ पेलताना' हा त्यांचा गाजलेला कवितासंग्रह आहे. कडेगांव. जि. सांगली येथील बालपणापासून अंध व शिक्षणाचा कसलाही गंध नसलेले संवेदनशील व्यक्तिमत्व म्हणजे **अंधकवी चंद्रकांत देशमुख**: समाजातील अनिष्ट रुढी परंपराचा नायनाट करण्यासाठी नागरीकांमध्ये देशभक्ती रुजविण्यासाठी त्यांनी काव्यरचना केली. सांगली जिल्ह्यातील **शाहिर मार्तंड**: यांचे लेखन प्रसिध्द आहे.

जत तालुक्यातील कवी, **सोनुकुमार कुलकर्णी, डॉ.वैशाली सनमडीकर, डॉ. श्रीकांत कोकरे, डॉ. सरिता पट्टनशेट्टी, यदुसुदू वाघमारे** यांचा गुटूरंगू हा कविता संग्रह, विटा येथील **स्वाती शिंदे, रघुनाथ मेटकरी, किरण भिंगारदिवे, आटपाडीचे चंद्रकांत लांडगे, बेबीताई कांबळे, खरसुंडीचे रमेश जावीर**, हिंगणगांव येथील **बी. के. पाटील**, यांचे नयनी दाटले अश्रू (नाटक) ऐतवडे खुर्द येथे कार्यरत असलेले डॉ. **सुरज चौगुले** यांचे बखर एका बेकाराची (काव्यसंग्रह) तसेच हिंदीतील दोन काव्यसंग्रह आणि चिमणी चिमणी दार उघड ही एकांकिका प्रकाशित आहे. इचलकरंजी येथील कवी **चंद्रकांत बाबर** यांचा यास्मिन एक आठवण हा दीर्घ कवितासंग्रह, **आबासाहेब पाटील** यांचा साध्या माणसाच्या कविता, **वसंत केशव पाटील** यांचा कविता धरणा आधीच्या आणि नंतरच्या, **चैतन्य माने** यांचा आत्मघाताच्या कैक वाटेवर (काव्यसंग्रह), **ऋतुजा माने** यांचा उमाळा (काव्यसंग्रह), कवयत्री डॉ. **अनिता खेबुडकर, निर्मला लोंढे** यांचा अस्तित्व (कवितासंग्रह) लेखक **अंजनकुमार** यांचे अमिनी शाहीरा, काळीज खुणा, हे (समीक्षात्मक लेखन) एक विजलेला दिवस ही चरीत्रात्मक कादंबरी, **आमदार अमिन सत्तार** यांचे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि महम्मद पैगंबराचे चरित्र ही पुस्तके त्याबरोबरच मिरज येथील लेखक **नामदेव भोसले**, रायवाडी ता. कवठे महांकाळ येथील कवी **धनाजी पाटील**, बेंद्रीचे **अविनाश पाटील बेंद्रीकर**, तासगांव येथील कवयत्री **सुचित्रा पवार**, गव्हाण येथील कवी **विनायक सरवदे, सुरेश सरवदे**, यांचा एका चिमणीची गोष्ट (कथासंग्रह), तुफानाची हाक (कवितसंग्रह), लाखात एक लाडाची लेक (नाटक), वाईप इज फाईन (एकांकिका) इत्यादी प्रकाशित आहेत. वरील सर्व साहित्यिकांचे लेखनकार्य खुप महत्वाचे आहे. सांगली जिल्ह्याच्या साहित्य मांदीआळीत त्यांचा समावेश करणे खुप गरजेचे आहे.

*** समारोप-**

मराठी साहित्यिकांच्या आजपर्यंत झालेल्या संकलन कार्यात काही मोजक्याच साहित्यिकांचा आढावा घेण्याचे काम झाले आहे परंतू स्वतंत्र एखाद्या जिल्हातील

साहित्यिकांच्या लेखन कार्याचा आढावा घेण्याचे काम फारसे झालेले दिसून येत नाही. म्हणून 'सांगली जिल्ह्यातील साहित्यिक' हा लेख लिहिण्याचा प्रयत्न केला. 'नाट्यपंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांगली जिल्ह्यात अनेक नामवंत साहित्यिक जन्माला आले, काही व्यवसाय/ नोकरी निमित्त येथे स्थायीक झाले. अजुन नवोदीत साहित्यिक निर्माण होत आहेत. सदर लेखाचे संकलन कार्य करीत असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृतींचा आढावा घेण्यात आला. त्यातही काही साहित्यिकांच्या साहित्यकृती आणि बरेचसे साहित्यिक यांची नांवे त्यांच्याबद्दल माहिती मिळाली नसल्याने समाविष्ट करण्यात आली नाहीत. त्यांच्यापर्यंत पोहचता आले नाही त्याबद्दल दिलगीरी व्यक्त करतो आणि सदर संकलन स्वरुपांच्या लेखाला पूर्णविराम देतो.

संकलन :– **रविंद्र भगवान पाटील**
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग

**संदर्भ :-** काही लेखकांच्या प्रत्यक्ष भेटी, ठराविक लेखकांच्या फोनवरुन, संभाषणातून आणि अंतरजालावरील माहितीच्या आधारे संकलन केले आहे.

# काहूर

'सणाट' सूर्य पूर्वेकडून पश्चिमकडे सुटलेला होता. काळोख पडत होता. चंद्राचा प्रकाश पडत होता. टिपूर चांदणं पडत होते. मायाचे वडिल जड पाऊलांनी धपधप पाय टाकत घरच्या दिशेकडे परतत होते. रात्र किड्यांनी थैमान घातले होते. रात्र किड्यांची किर्र..किर्र.. आवाजच्या धूंदी मायाचे वडिल घरी परतले. मायाने वडिलांना तांब्याभर पाणी दिले आणि स्वयंपाक घरच्या चौकटीत उभी राहिलेली होती. मायाचे वडिल पाण्याचा तांब्या जमिनीवर ठेवत म्हणाले,''माया तुझ्या लग्नासाठी एक स्थळ आले आहे. माझ्या मित्राचाच मुलगा आहे. शिक्षण झाले आहे; पण नोकरी मिळाली नाही म्हणून बागायत शेती करत आहे. मुलगा निर्व्यसनी आणि माझ्या डोळ्यासमोरील आहे.'' एकंदरीत स्थळ चांगले आहे असे म्हणत मायाचे वडिल जेवणासाठी उठले. माया विचाराच्या प्रवाहात आपल्या खोलीकडे गेली.

'माया' एक गरिब कुटुंबात जन्माला आलेली अत्यंत हुशार, कष्टाळू आणि भावनिक मुलगी होती. मायाला एक भाऊ आणि सर्वात लहान बहिण होती. मायाच्या बहिणीला घरातील सर्वजण लाडाने 'चुलबुली' म्हणत होते. मायाने आईला घरकामात आणि शेतमजूरात मदत करत आपले एम.ए.बी.एड्. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते. मायाचे लग्नाचे वय झाले होते म्हणून तीच्या घरी लग्नाविषयी चर्चा सुरू झाली होती. मायाच्या मनात काहूर माजला होता. नेहमी हसत-खेळत राहणारी, नोकरीसाठी आहोरात्र प्रयत्न करणारी जिद्दीने संघर्ष करणारी माया स्वत:च्या विचारात गुंफून गेली होती. तीच्या मनात अनेक विचाराने पिंगा घातलेला होता. तीला वाटत होते त्या आई-वडिलांच्या कुशीत लहानांची मोठी झाली; त्यांच्यापासून आयुष्यभर कसे पोरके व्हायचे? हे माझे घर, माझे सवंगडी, माझ्या आठवणी त्यांच्या वाचूनी मी कसे राहू शकेल...या विचाराच्या भोवऱ्यात आडकलेली होती. माया आता स्वत:च्या मनाशी बोलत होती. माझ्या भावंडाबरोबर भांडल्याशिवाय आजी-आजोबांच्या गप्पा ऐकल्याशिवाय माझा दिवस कसा मावळेल? या विचाराच्या जाळ्यात मायाला कधी डोळा लागला कळालेच नाही.

माया पहाटे लवकर उठून अंघोळ आटपून देवपूजा आवरली आणि आईला स्वयंपाक घरात आईला मदत करण्यास गेली. माया स्वयंपाक घरात जाताच आईचे लक्ष मायाच्या चेहऱ्याकडे गेले..मायाच्या चेहऱ्यावरील उदासिनता तीच्या चेहऱ्यावर झळकत होती. आईने मायाला विचारलो..माया तुझी तब्येत ठिक आहे ना ? तुझा चेहरा इतका अबोल का झाला आहे ? आईचे हे शब्द ऐकताच मायाच्या दोन्ही डोळ्यातून आश्रू वाहू लागले. मायाने दाठलेल्या कंठाने आईला विचारले. आई सर्वकाही स्त्रीलाच का त्याग करावे लागते गं ? आईला मायाच्या बोलण्याचा अर्थच समजला नाही. आई पुन्हा म्हणाली बाळा माया काय झाले आहे ? डोळे पुसून घे आणि सांग मला काय झाले आहे तुला ?

तोपर्यंत चुलबुली आईजवळ येऊन बसली आणि आईला म्हणाली आई दादाला सांग ना गं मला अंघोळ करायला नंबर देत नाही. आई चुलबुलीला म्हणाली दादाची अंघोळ होईपर्यंत तू इथेच बस. दादाची अंघोळ अटोपली की तू अंघोळीला जा. आईने पुन्हा मायाला विचारले माया बोल बाळा काय झाले आहे तुला ? मायाच्या मनात असंख्य प्रश्नांनी थैमान घातलेले होते. मायाला काय सांगू, काय विचारू,

कोठून सुरुवात करू हेच कळत नव्हते. माया आईला म्हणाली आई तू ही लहान असताना आमच्या सारखीच लाडावेली असेल मग तुला कसे जमले लग्न करून सासरी यायचे. आई क्षणभर थांबली..आईला लक्षात आले होते कि रात्री मायाला तीच्या बाबांनी लग्नाविषयी सांगितल्यामुळे ती खूपच भावनिक झाली आहे म्हणून असे प्रश्न विचारत आहे. आई पुढे म्हणाली माया हिच आपली भारतीय संस्कृती आहे. मुलगी जोपर्यंत आपल्या जवळ आहे तीचे सगळे हट्ट पुरवा, तीच्यावर जीवापाड प्रेम करा, तीला उच्च व चांगल्या दर्जाचे शिक्षण द्या आणि मुलगी ज्यावेळेस लग्नाच्या वयात येते त्यावेळेस
सोने–नाणे, गाव जेवण घालून तीला सासरी पाठवा. आईचे हे बोलणे ऐकून मायाने लगेचंच आईला पुढचा प्रश्न विचारला...अशा भारतीय संस्कृतीमुळेच मुलगी म्हणजे आई–वडिलांना खांद्यावरचे ओझे वाटत असेल ना गं ? आईने पुढे मायाला समजावून सांगितले असे काय नाही आपल्या भारतीय संस्कृती मध्ये मुलगी म्हणजे ''घरची लक्ष्मी मानली जाते.'' पण अजून ही हुंडा बळीमध्ये गुरफटणाऱ्या समाजाला मुलगी म्हणजे खांद्यावरचे ओझे वाटत असते कारण आई–वडिलांची परिस्थिती नसताना तीचे संगोपन करायचे. तीचे शैक्षणिक व सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडावे लागतात आणि मुलगी स्वावलंबी झाली म्हणजे सावकाराकडून कर्ज काढून मुलीचे लग्न थाटामाटात लावून द्यायचे.

चुलबुली मात्र या माय–लेकिचे संवाद ऐकत बसली होती. चुलबुली आईला म्हणाली आई आपल्या मायाताईचे ही लग्न होणार ? आणि लग्न झाल्यावर मायाताई आपल्या सगळ्यांना सोडून कशी राहणार ? चुलबुलीच्या या प्रश्नावर आई शांतपणे म्हणाली. सासरचे लोक, नवरा प्रेमळ स्वभावाची असतील तर तुझ्या मायाताईला संसारात रुळायला वेळ लागणार नाही. पण जर सासरी ''जाच'' असेल तर मात्र स्त्रीचं जगणं कठिण जाते. चुलबुली हे सगळ लक्ष देवून ऐकत होती. आईचे बोलणे झाल्यावर चुलबुली ने हळू अवाजात आईला विचारले..आई ''जाच'' म्हणजे काय गं?...आईने चुलबुलीला प्रतीउत्तर देतांना म्हणाली चुलबुली तुला तर नुसत चुरूचुरू बोलायला पाहिजे. दादाची आंघोळ आवरली असेल, जा आंघोळ करून घे. चुलबुली आईला म्हणाली 'जाच' म्हणजे काय सांग ना ? मग मी आंघोळीला जाते. चुलबुलीने हट्ट मांडून बसल्यावर आई पुढे म्हणाली, ''एखाद्या गोष्टीची चूक नसताना त्या व्यक्तीवर शारीरिक, मानसिक अत्याचार करणे याला 'जाच' म्हणतात.''

लक्ष्मीची व्यथा सांगतांना आई पुढे म्हणाली लक्ष्मी मावशीला मुल होत नाही म्हणून तीचा नवरा रोज दारू पिवून मारहाण करतो. लक्ष्मी मावशीला मूल होत नाही म्हणून तिची सासू तीला 'वांझूटी' म्हणून हाक मारते. माया आणि चुलबुली या दोन्ही बहिणी आईचे बोलणे शांतपणे ऐकत होत्या. मायाने आईचे बोलणे झाल्यावर एम. इंग्रजी अभ्यासक्रमातील ढ्हश ढ्हीरपव ऋरलश`ष छळसहीं या कादंबरीमधील 'मायाम्मा' या पात्राची व्यथा सांगितली. मायाम्माला मुल होत नव्हते म्हणून तीचा नवरा रोज रात्री दारू पिवून येत होता आणि तीच्याबरोबर एखाद्या संतापलेल्या बैलासारखा घासाघस करत होता आणि याबाबतीत तीचा नाईलाज होता. मायाम्माची सासू तर खूपच अंधश्रद्धाळू होती. ती मायाम्माला आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी स्वत:चे स्तन चिरून येणाऱ्या रक्तानं शिवलिंगाला रक्त अभिषेक घालायला लावत होती. एवढेच नव्हे तर आठवड्याच्या प्रत्येक शुक्रवारी तीचा भात बंद केला होता. माया म्हणाली मला एवढे कळत नाही असा जर देव पावला असता दर दवाखाने, डॉक्टर यांची गरज नव्हती.

विज्ञानयुगात असून सुद्धा ऐवढा कसा अंधश्रद्धाळूपणा कळत नाही. चुलबुली मध्येच म्हणाली आता मला समजले 'जाच' म्हणजे काय असते. असे म्हणत चुलबुली आंघोळ करण्यास निघून गेली होती.

मायाच्या मनात अजूनही विचारांचा गोंधळ चालूच होता. माया आईला म्हणाली एक स्त्री ऐवढे हाल–अपेक्षा सहन करत असते. स्त्रीकडे दैवी शक्ती तर नसेल? मायाच्या बोलण्यावर आईने थोडा दीर्घ श्वास घेतला आणि पुढे म्हणाली खरचं स्त्री म्हणजे एक दैवी शक्तिचेच रूप आहे आणि बिचारी करणार तरी काय ? सहन केल्याशिवाय पर्याय राहत नाही. कारण आई–वडिलांच्या घरी यायचे म्हणजे त्यांचे भाऊबंद, समाजामध्ये बदनामी शिवाय शेजाऱ्यांची चर्चा अशी की, वडिलांनी वळण लावले नसेल म्हणून नवऱ्याला सोडून माहेरी येऊन राहिली आहे. नवरा सोडून आली म्हणजे हिच्याच अंगात पाणी असेल. कोठेतरी पाय घसरला असेल म्हणून नवऱ्याने घराच्या बाहेर काढले असेल. अशा प्रकारे सगळा दोष हा स्त्रीवरच दिला जातो. शिवाय नवऱ्याने सोडून दिलेली 'बाई' म्हणून पुरुष जातीच्या अश्लील नजरेतून वाचण्यासाठी ती आपल्यावरील होणारे अत्याचार डोळे मिटून सहन करीत असते.

माया हे सर्व शांतपणे एकून घेत होती. तेवढ्यात
माया पुढे म्हणाली अगं आई...आता स्त्रीयांना पन्नास टक्के आरक्षण मिळाले आहे. स्त्री आता आबला नाही सबला आहे ती आपल्या हक्कांसाठी कोर्टात का न्याय मागत नाही. आई थोडी हसली आणि म्हणाली 'कोर्ट' म्हणजे पुराव्यांचा खेळ, पैशांची उधळपट्टी, पायाची झीज आणि वेळेचा खर्च. कोणीतरी असे म्हणतात ''शाहण्यांनी कोर्टाची पायरी चढू नये.'' शिवाय बाई जातीची तर उरली–सुरली अब्रु वेशीला टांगली जाते. कोणती ही गोष्ट पुस्तकात वाचणे आणि प्रत्यक्षात करणे यात खूप तफावत असते. आईने पुढे माहेरी राहणाऱ्या आलमास दिदीचा अनुभव सांगितला.

आलमास दिदीच्या बाबतीत घडलेली घटना अत्यंत वाईट आहे. नवरा–बायको दोघे ही नोकरीला असून तीचा नवरा आपल्या वहिनीचे ऐकून आपल्या बायकोच्या नोकरीवर कर्ज काढतो. ये णारा सगळा पगार वहिनीवर खर्च करतो, वहिनीचे ऐकून आपल्या बायकोला मारहाण करतो. या अत्याचाराला कंटाळून तीन जेव्हा माहेरी जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा तो मुलांना आपल्या जवळ ठेवून तीला एकटीला जबरदस्तीने माहेरी पाठवून देतो आणि आता मुलांना शिकवून एवढ्या तयारीत ठेवले आहे की मुले आईजवळ येण्यास नकार देत आहेत. गेली ५ वर्षे ती आपल्या मुलांसाठी कोर्ट–कचेरीच्या फेऱ्या घालत आहे. तारखांवर–तारखा वाढतच आहेत पण; निकाल काय लागत नाही. तील आपल्याच पोटच्या पोरांसाठी गेली ५ वर्ष झाले नवऱ्याजवळ झोळी पसरायला लागत आहे. तीच्या नवऱ्याने दुसरे लग्न करून घेतले आहे. आलमास दिदीला सोन्यासारखी दोन पोरे शिकऱ्याच्या दारी सोडून तीचे जीवन 'येसू ख्रिस्ता'सारखे झाले आहे. मायाने आईचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले आणि पुढे आईला प्रश्न केला मग आता आलमास दिदि काय करते ? आईने थोडे स्मित हास्य केले आणि पुढे म्हणाली आलमास दिदि प्राथमिक शाळेवर नोकरीला आहे. नोकरीच्या आलेल्या पगारातून आपला उदरनिर्वाह करते आणि त्यातून उरलेले पैसे पोरांना आपल्या जवळ आणण्यासाठी कोर्ट कचेरीला लावत आहे.

आलमास दिदि शिकलेली होती म्हणून ती स्वत:चा उदरनिर्वाह स्वत: करत आहे. म्हणून मुलींनी शिकले पाहिजे स्वत:च्या पायावर उभे राहता आले पाहिजे. मुलींनी नुसत्या 'चुल आणि मुल' यामध्ये

गुरफटून जाऊ नये. सरकारने स्त्रीयांना पन्नास टक्के आरक्षण दिले आहे. स्त्रीयांना सुद्धा आता पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याचा अधिकार आहे. जर एखाद्या स्त्रीवर अन्याय अत्याचार होत असेल तर ते सहन न करता लढण्याची धमक तिच्याजवळ असणे गरजेचे आहे. प्रत्येक स्त्रीने शिक्षण घेणे गरजेचे आहे. अजून ही काही जातीमध्ये स्त्रीयांना शिक्षण दिले जात नाही. त्यांना 'बुरख्या' आड झाकून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो प्राशन करेल तो वाघासारखा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.'' आईच्या बोलण्याने माया थोडी सुखावली गेली होती. मायाची आई सुशिक्षित होती. त्यांच्याजवळ ज्ञानाचा भंडार होता.

याविषयावर चर्चा रंगतच होती. मायाच्या मानातील जो काहूर माजला होता तो अजून शांत झाला नव्हता. मायाने नंतर हळूच आवाजात आईला विचारले जर लग्नानंतर एवढे भोगावे लागत असेल तर लग्न का करावे ? मायाच्या या प्रश्नाकडे आईने हळूवारपणे बघितले आणि आई पुढे म्हणाली हाताची पाची बोटे सारखी नसतात. आता माझ्यावरूनच विचार कर मी ही तुझ्यासारखी विचार करणारी कोणाची तरी मुलगी होते. माझ्या आई वडिलांनी तुझ्या बाबांशी माझे लग्न लावून दिले तुझे बाबा, तुझे आजी–आजोबा, घरातील इतर लोक खूपच प्रेमळ स्वभावाचे आहेत आणि तुझ्या बाबांनी स्वत:च्या कष्टावर जमीन घेतली आहे. सरकारी नाही पण ; नोकरी आहे त्यामुळे तुझ्या बाबांना आणि मला संसार करायला अवघड वाटले नाही. तुझे बाबा आणि मी खूप सुखात संसार करत आहोत.

एकंदरीत 'विवाहबंधन' एक नियतीचा खेळ आहे. निसर्गाच्या चक्राप्रमाणे सर्व गोष्टी घडल्याचं पाहिजेत.तरचं सृष्टीचे संतुलन सुरळित चालू शकते. तुझ्यासारखा विचार प्रत्येक स्त्री जातीने केला तर निसर्गाचे चक्र कसे फिरणार ? सामाजिक, मानसिक शारीरिक गरजांचे निवारण कसे होणार, संजीवसृष्टीची

निर्मिती कशी होणार ? तुला सरळ भाषेत सांगायचे झाले तर मीच जर तुझ्यासारखा विचार केला असता तर तुझा जन्म झाला असता का ? जिजामातेने असा विचार केला असता तर...शिवबा जन्माला आले असते का ? भिमाबाईनी असा विचार केला असता तर..डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले असता का ? याचा अर्थ असा नाही की ''स्त्री ही मूल जन्माला घालणारी मशिनच आहे'' ; पण जे निसर्गाचे चक्र आहे त्याप्रमाणे घडलेच पाहिजे.

याशिवाय आधुनिक काळामध्ये काळाजी पाऊले उलटी पडत आहेत. सध्या स्त्रीयांवरच अत्याचार होतात असे नाही तर पुरुषांवर सुद्धा अत्याचार होत आहेत. पुरूषालासुद्धा आपल्या अस्तित्वासाठी झगडायला लागत आहे. माया पुढे म्हणाली पुरूषाला आपल्या अस्तित्वाचे संरक्षण करण्यासाठी 'पत्नी पीडीत पुरुष'' संघटना उदयास आली आहे. त्याचबरोबर पुरूषांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी साहित्यामध्ये ''मॅननिजम चळवळ'' आग्रेसर आहे.

काळानुरूप सगळे बदलत चालेले आहे. जसे प्रत्येक कर्तबगार पुरूषाच्या पाठीमागे स्त्रीचा हात असतो तसेच प्रत्येक कर्तबगार स्त्रीमागे पुरूषाचा हात असतो. जोतिबा फुले होते म्हणून सावित्रीबाई फुले यांना पहिली महिला शिक्षिका होण्याचा मान मिळाला, गोपाळराव जोशी होते म्हणून आनंदीबाई जोशींना भारतातील पहिली महिला डॉक्टर होण्याचा मान मिळाला. आईच्या या अनुभवाच्या बोलण्याने माया

आता खूपच भारावून गेली होती. माया पुढे म्हणाली आई तू जे बोलतेस ते योग्य आहे. मी एका मासिकामध्ये वाचले होते. एका गरीब कुटुंबातील अत्यंत हुशार मुलगी होती. तीचे नाव राणी होते. वडिलांच्या घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे राणीच्या आई-वडिलांनी तीचे लग्न लावून दिले होते. लग्नानंतर राणीची हुशारी बघून तीच्या नवऱ्याने तीला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले आज राणी एका 'तहसिलदार' या पदावर काम करत आहे.

शिवाय आईने मायाचे शांतपणे ऐकून घेतल आणि पुढे म्हणाली...आजचे दिवस उद्या राहत नसतात आमच्या माघारी तुमचे कोण आहे ? भाऊ एक तुमचे आहेत वहिनी मिळाली चांगली ठिक नाही तर...? या जगात कोणी कोणाचे नसतात. या दुनियेत खरे निस्वार्थ प्रेम करणारे कोणी असतील तर...ते आई-वडिल आणि ज्याचे त्याला केलेय कशाला ? जोडिदाराची खरी ही म्हातारपणी जास्त असते ही गोष्ट  लक्षात ठेव. तरूणपणाचे दिवस निघून जातात पण; म्हातारपणाचे दिवस जाता-जात नाहीत. कोणीतरी असे म्हणतात की, ''म्हातारपण म्हणजे कुतरपण'' म्हातारपणी आपल्याला द्यायला कोणाकडे वेळ नसतो. आपल्या भाव-भावना, सुख-दु:ख, गप्पा-गोष्टी ऐकणारा कोणी असेल; तर तो आपला जोडिदार असतो. म्हणून जोडिदाराल म्हातारपणाचा सवंगडी म्हणतात.

आता सर्वकाही मायाच्या लक्षात येत होते. माया आईला म्हणाली तरीच, मळातील धोंडू आजी मला म्हणत होती; पोरी वेळी लगीन करून टाक कोणी कोणाचे नसतात. आई-वडिल आहेत तोपर्यंत आपले माहेर नंतर आपलंच घर परके होते. धोंडू आजीचे हे बोल एकून मी तर क्षणभर शून्यातच गेले बघ आई...

माया पुढे म्हणाली खरचं स्त्रीचे जीवन एखाद्या रंगमंचावरील पात्रासारखे आहे जसे रंग मिळतील त्या रंगात ती रंगत जाते. स्वत:च्या अशा आकांक्षा, मोह, माया, नाती-गोती या सर्वांचा त्याग करून जे रंग मिळतील त्या रंगात रंग भरते आणि जीवन सप्तरंगासारखे फुलवत राहते.

– मुल्ला फैरोजा जहाँगीर

# पाऊस आला

काळा कुट्ट मोठा ढग
फिरुनी आला सारे जग
पाहूनी घेतले नाना देश
वेगवेगळे त्यांचे वेश
हिरवी झाडे समुद्र निळे
सारे जग त्यास पहाया मिळे
वाटेत मोठ्ठा डोगर आला
'तिकिट पाहू' असे म्हाणाला
ढग गेला फार घाबरुन
डोळ्यात पाणी आले भरुन
ढसाढसा रडू लागला
लोक म्हणाले पाऊस आला
पाऊस आला

धनश्री अशोक शिंदे
(१२ वी सायन्स)

# श्रावण मास

स्फटिक जळातून हासत खिदळत
आला श्रावण मास
दिशादिशांनी उधळीत फुलवित
ऱ्हदयी हिरवी आस
जलवंतीच्या घेऊन झाऱ्या
मेघ अंबरी घालीती फेऱ्या
क्षणभरी करिती नाजूक चाळा
क्षणात वर्षाभास
आला श्रावणमास !

धनश्री अशोक शिंदे
(१२ वी सायन्स)

# वेड मैत्रीचे

का? आठवण तुझी
दाटते हो मनी
भरुनी या येई
ही नयन पापणी

हाक कानी येता तुझी
हुरहुर वाढे मनाची
तुझ्या दु:खाच्या क्षणी
साथ देईन सुखाची

तुझी वाट पाहणे
वेड्या मनाशी आशा
खऱ्या मैत्रिणींसाठी जगणे
ही वेड्या मैत्रीची नशा

लक्ष्मी बनसोडे
(११ वी सायन्स)

# मुलगी झाली जड

का ठेवले त्यांचे आयुष्य अंधारात
जीवन काढलं त्यांनी तिमिरात

का मिळत नाही त्यांना न्याय
पहिल्यापासूनच चाललाय अन्याय

का नसतो तिला मुक्त संचार
तिच्यापुढे आईवडील असतात लाचार

का लादतात तिच्यावर बंधने
तिला समाज्यापासून वंचित ठेवणे

का मध्येच बंद करता तिची शाळा ?
कधीतरी मारली का हाक म्हणू बाळा

कोवळ्या वयातच का करता तिचे लग्न?
मग बिचारी होते संसारात मग्न

स्वत:लाच समजते ती अभागी
साऱ्या जगाला जड झाली का मुलगी ?

लक्ष्मी बनसोडे
(११ वी सायन्स)

# माझी आई

जन्मो जन्मी भेटावी
अशी माझी आई
हसरा चेहरा
जशी जाई जुई
श्वास श्वास जोडुनी
जगते आमच्यासाठी
नात्यातले धागे धागे जोडुनी
राबते घरासाठी
अशी माझी माय माऊली
तिची आमच्यावर सावली
कृतज्ञतेचे प्रतीक ती
जणू मायेची सागर ती
कृतज्ञतेने वंदन करतो
देवतेस या घरराऊळी

लक्ष्मी बनसोडे
(११ वी सायन्स)

# उडान

जिसकी ऊँची उडान होती है,
उसको भारी थकान होती है ।

बोलता कम जो देखता ज्यादा,
आँख उसकी जुबान होती है ।

बस हथेली ही हमारी हमको,
धूप में सायबान होती है ।

एक बहरे की एक गुँगा दे,
जिंदगी वो बयान होती है ।

तीर जाता है दूर तक उसका,
कान तक जो कमान होती है ।

खुशबू देती है, एक शायर की,
जिंदगी धूपदान होती है ।

धनश्री शिंदे
(१२ वी सायन्स)

# वक्त का पहिया

समय रुकता नहीं एक जगह
वक्त का पहिया आगे ही बढता है ।
मैंने सुना है, बडे–बडे सूरमा,
राजा–महाराजा रोक न सके
इस पहिये को ।

वक्त आने पर किसी को
किसी ने मारा, तो कोई
अपनी मौत खुद मरा ।
मरते–मारते थे मगर
लालच धन–दौलत, पद–प्रतिष्ठा का
किसी का कम न हुआ ।

जब वह समझने लगा
अपने आप को बडा तभी
वक्त का पहिया उसे
कुचलकर आगे बढा ।

मत कर गुरुर अपने वक्त पर
नादन देख इतिहास के पन्नों को,
समझ वक्त के निर्दयी
खेल को...।

वक्त देता है सबको मौका
आज का वक्त इसका तो
कल का उसका । फिर उसके वक्त को
कुचलकर वक्त का पहिया
आगे बढा...।

प्रा. धर्मेंद्र पंडित थोरात

## WHY WE SHOULD LOVE STATISTICS ???

We all know, its part of Mathematics and most of the time deals with data manipulation and prediction through data. Almost every subjects requires use of statistic for data analysis once in a while. statistics provides numeracy and its as important as being literacy, especially in 21 st century. Still it has been underrated field. As we acknowledge that statistics has got some what on “IMAGE PROBLEM”. It's the part of mathematics that even mathematicians don't particulary like. Its because whereas the rest of the maths is all about precision and certainty statistics is almost reverse of that. It magnificent part of our life which being used for modern conjectures through some sort of analysis. still its better than working on calculus.

So what’s makes to think that statistics as actually on interesting field which has got data in its soul ? Its really because statistics is all abut us. Not as an individuals but as in group. If you look at the etymology of the word statistics it's the science of dealing with data. And in case you didn't know in this digital era- every single thing is governed through data so. there is slightly highest probability that this underrated field would be skyrocketing. Due to this digital era and data oriented world. The world has became jungle and data is your weapon which is being made by manuscript of statistics. I m not exaggerating about statistics but, its what it is.

In this modern civilization data has huge role in almost everything. Because as a social animals we share this fascination about how as individuals relate to our data. since dot com bubble every thing has changed. Data oriented companies has become more greedy and aggressive for data accumulation of its users. whenever we talk about data companies like Google, Facebook, Apple. Amazon stands in front of our eyes. Because of their consumers data they have got more healthy balance sheet. But

I think this could assassinate our privacy. Im not going deep into data and business models of this companies because this essay is on statistics. And were got some off topic information. I know our teachers are not going to read all of our essays. So it doesn't matter. its off topic or not.

this world needs more statisticians to handle data. Because data has tremendous growth in last decades. We have been managed to generate more data in last two decades than past few centuries. As Statisticians manipulate data and conclude through it some new strong predictions would b made using their statistical model and "Statisticians like artists have the bad habit of falling in love with their models".

At last, we look at statistics as being the science of uncertainty, but in actuality statistics is the science at humanity and that's why "We should love statistics".

Gurudas Shinde
B.Sc. Part 3

## MOST DANGEROUS TIME IN HISTORY

The Famous Physics Professor Stephen Hawking has warned that mankind is facing the most dangerous time in its history today. He said that the world today is facing huge challenges like climate change, overpopulation, epidemic diseases. 'We have the technology to destroy the planet on which we live and have not yet developed the ability to escape it Perhaps in a few hundred years from now, we will have built colonies amid the stars, but right now, we have only one planet and we need to work together to protect it Hawking wrote recently in the Guardian newspaper.

Dhanashri Shinde
12 th Sci

## IMPORTANCE OF STATISTICS AND STATISTICAL DATA

Statistics is the discipline that concerns the collection, organization, analysis, interpretation and presentation of data. Data and Statistics are the two important things we see everywhere. But every data isn't Statistical data and hence cannot be trusted. Thus to raise awareness on the importance of trustworthy and authentic data and to combat the misuse of misinformation, the United Nations came up with "World Statistics Day" which is celebrated every five years on 20 *h* October by people all over the globe. This year the theme of "World Statistics Day" was "Connecting the world with data we can trust". The theme intends to emphasize on the importance of trust, authoritative data and innovation.

Statistics is the part of Mathematics that even Mathematicians don't particularly like because, whereas the rest of Mathematics is all about precision and certainty, Statistics is almost reverse of that. Statistics is about us. If we look at the etymology of the word "Statistics", it's the science of dealing with data about the state or community we live in. So, Statistics is about us as a group and not as an individual.

There are 7.8 billion people in the world out there. No person can possibly talk to everyone and know their stories. But Statistics can do this by conducting surveys, classifying the different sets of observation and analyzing the data and then interpreting and presenting in a form that is understandable to common people. Hence Statistics can be called "Macroscope" as it take big things and shrink it down small enough to study and to understand.

Statistics is the backbone of everything. Every single subject ever studied rely on extensively tested theories or research and this all is backed up by the Statistics. Since Statistics is involved in pretty much every field out there and it challenges your analytical skills, it can help you to opt any field.

Statistics is looking at numbers and coming to conclusion with some sort of meaningful interpretation. It converts data into knowledge and helps you communicate numbers in words.

As social animals, we share this fascination about how we as individuals relate to our groups. Statistics in this way are most powerful when they surprise us. Because there is a big variation between what we think (i.e. our perception) and the reality. And this is thus given by Statistics. For example, A survey was conducted where Saudi Arabians were asked, “For every 100 adults in your country, how many of them are overweight or obese?”. The average answer of the Saudis was just over a quarter, 28 to be precise. The official figures show, actually it's nearer to three quarters, which is 71.

Daniel Kahneman, who was awarded the “2002 Nobel Memorial” prize in “Economics”, said “ We can be blind to the obvious but we are also blind to our blindness about it. It means that people aren't able to see something from any other perspective but their own. And this problem can be solved by Statistics which gives us accurate and reliable perspective of data and thus helps in decision making.

Statistics is incredibly useful in a wide variety of majors. Knowing Statistics really well will help you stand out and make you an attractive candidate for any job in this developing world. Statistics skills are in demand across nearly every industry. According to Linked In, this was the first most in-demand skill in 2014
and the second most in-demand skill in 2018. So, the fastest growing jobs today have to do with Statistics and statistical skills.

Statistics is a huge field. It is the center of everything. So if you want to be in the middle of everything and this entire information network that the world is generating then you need to be a Statistician.

Akanksha Vijay Koshti
B. Sc . Part II

# अध्यापनपूरक व अध्यापनेतर कार्याचा वार्षिक अहवाल २०२०-२१

**सांस्कृतिक विभाग**

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करणेत आले. याशिवाय इतर महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या स्पर्धा आणि कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सांस्कृतिक विभाग (मराठी विभाग, संख्याशास्त्र विभाग, शा. शिक्षण विभाग, राज्यशास्त्र विभाग, कै. आनंदराव शिंदे स्पोटर्स असोशिएशन, एन.एस.एस., वाणिज्य विभाग इत्यादीच्या संयुक्त विद्यमाने)

महाविद्यालयात वेळोवेळी आयोजित केलेले विविध कार्यक्रम खालीलप्रमाणे

१. छ. शाहू महाराज जयंती दिनांक २६/०६/२०२०

२. लोक शाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लो. टिळक पुण्यतिथी दिनांक ०१/०८/२०२०

३. शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम व्याख्याते डॉ. एम.जी. लोंढे दिनांक ०५/०९/२०२०

४. कै. आनंदराव दादा शिंदे यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १८/०९/२०२० परंपरा दिन साजरा. यानिमित्त आयोजित श्री. दत्तोबा तिसंगीकर यांचा विनोदी कार्यक्रम.

५. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान 'गांधी विचारधारा' - डॉ. एम.जी. लोंढे दिनांक ०२/१०/२०२०

६. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन कट्टा व वाचन प्रेरणा दिन आणि प्रा. राकेश वानखेडे यांचे ऑनलाईन व्याख्यान दिनांक १५/१०/२०२०

७. दक्षता जन जागृती सप्ताह निमित्त मा. ॲड. सतीश पाटोळे यांचे व्याख्यान दिनांक २७/१०/२०२०

८. मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती 'राष्ट्रीय शिक्षण दिन' वक्ते मा.प्रा.डी.एस. पाटील दिनांक ११/११/२०२०

९. पयोद उद्योग समुहास भेट दिनांक ११/११/२०२०

१०. माजी विद्यार्थी स्नेह मेळावा दिनांक १६/११/२०२०

११. 'संविधान दिन' साजरा करण्यात आला, प्रमुख पाहुणे मा. पोलिस निरीक्षक आप्पासाहेब कोळी, कवठेमहांकाळ दिनांक २६/११/२०२०

१२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिन दिनांक ६ डिसेंबर साजरा करणेत आला.

१३. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध कार्यक्रम दिनांक ८/१/२०२० ते १४/१/२०२०

१४. हुतात्मा दिना निमित्त ठिक ११.०० वाजता ५ मिनिटे मौन बाळगून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली दिनांक ३०/१/२०२१

१५. छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यातआली याप्रसंगी श्री. अण्णासाहेब जमदाडे यांचे व्याख्यान दिनांक १९/०२/२०२१

१६. 'मराठी राजभाषा दिन' निमित्त पत्रकार श्रीनिवास नागे, सांगली यांचे व्याख्यान दिनांक २७/०२/२०२१

१७. 'आझादी का अमृत महोत्सव' भगतसिंह, राजगुरु, सुखदेव स्मरण दिना निमित्त डॉ. संतोष बाबरे, सावळज यांचे व्याख्यान दिनांक २७/०३/२०२१

१८. 'शिवस्वराज्य दिन' निमित्त श्री. अण्णासाहेब जमदाडे यांचे व्याख्यान दिनांक ६/६/२०२१

१९. छ. शाहू महाराज जयंती दिनांक २६/६/२०२१

२०. डॉ. पी.व्ही. सुखात्मे यांची जयंती निमित्त व्याख्यान प्रमुख पाहुणे डॉ. अनिल गोरे, पुणे दिनांक २७/७/२०२१

२१. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लो. टिळक पुण्यतिथी निमित्त व्याख्यान प्रमुख वक्ते डॉ. एम.जी. लोंढे दिनांक १/८/२०२१

महाविद्यालयात आयोजित इतर विशेष उपक्रम

१. माजी विद्यार्थी स्नेह मेळावा

दिनांक १६/११/२०२० रोजी (गुढी पाडवा) महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेह मेळावा आयोजित करणेत आला. याप्रसंगी अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांमध्ये चर्चा आणि पुढील कार्याविषयी आखणी करण्यात आली.

२. आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रम

दिनांक २७/०३/२०२१ रोजी आझादी का आमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत डॉ. संतोष बाबरे, सावळज यांचे व्याख्यान आयोजित केले. तसेच विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा घेण्यात आली. या मध्ये १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त काव्य लेखन आणि प्रश्न मंजुषा स्पर्धा

दिनांक १४/०४/२०२१ ते ३०/०४/२०२१ या कालावधीत फुले, शाहू, आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विद्यार्थ्यांची काव्य लेखन स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेमध्ये ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

४. आंतरराष्ट्रीय महिला दिन दिनांक ८ मार्च २०२१ या निमित्त मा.सौ. प्रा. साधना कांबळे यांचे 'महिला सक्षमीकरण' या विषयावर व्याख्यान

५. ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजन

अ) ख्यातनाम संख्याशास्त्रज्ञ डॉ.पी.व्ही. सुखात्मे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज २७/७/२०२०

ब) प्रेमचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक ३१/०७/२०२०

क) डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक १५/१०/२०२०

ड) जागतिक सांख्यिकी दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक २०/१०/२०२०

इ) अणूशास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक ३१/१०/२०२०

ई) विज्ञान दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक २८/०२/२०२१
प) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त प्रश्न मंजुषा स्पर्धा दिनांक १४/४/२०२१
फ) ख्यातनाम संख्याशास्त्रज्ञ डॉ.पी.व्ही. सुखात्मे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज २७/७/२०२१

डॉ. दिलीप गाडे, सांस्कृतिक विभागप्रमुख
प्रा. विजय कोष्टी, संख्याशास्त्र विभाग

## वाणिज्य विभाग

१. दिनांक १० नोव्हेंबर २०२० रोजी 'जागतिक वाणिज्य दिन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
२. दिनांक १५ डिसेंबर २०२० रोजी 'निलया फौंडेशन' पुणे व पी.व्ही.पी. महाविद्यालय कवठेमहांकाळ यांचे सहकार्याने वाणिज्य विभागातील करीयर संधी याविषयावर स्मित मेहता (सी.ए.) यांचे व्याख्यान झाले.
३. दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी प्रा.एस.एस. पाटील (उद्योजक) यांचा 'उद्योजकांशी गप्पा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
४. दिनांक १० मार्च २०२१ रोजी प्रा. डी.एस. सूर्यवंशी यांचे 'आर्युविम्यातील विविध योजना'या विषयावर वेबिनार झाले.

वरील सर्व कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग व प्रतिसाद मिळाला.

## संख्याशास्त्र विभाग

सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये संख्याशास्त्र विभागात बी.एस्सी. भाग १ मध्ये १०४, बी.एस्सी. भाग २ मध्ये २१, बी.एस्सी. भाग ३ मध्ये, बी.कॉम. भाग २ मध्ये १४५ आणि बी.ए. भाग १ मध्ये ४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. विभागाच्या वतीने वर्षभरात खालील उपक्रम राबविणेत आले.
विविध कार्यक्रमामध्ये सहभाग

महाविद्यालयात वेळोवेळी साजऱ्या होणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग नोंदविला.
अ) शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम दिनांक ५/९/२०२० साधन व्यक्ती डॉ. मोहन लोंढे, कवठेमहांकाळ
ब) ख्यातनाम संख्याशास्त्रज्ञ डॉ.पी.व्ही. सुखात्मे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज २७/७/२०२०
क) प्रेमचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक ३१/०७/२०२०
ड) डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक १५/१०/२०२०
इ) जागतिक सांख्यिकी दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक २०/१०/२०२०

ई) अणूशास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक ३१/१०/२०२०

उ) विज्ञान दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज दिनांक २८/०२/२०२१

ऊ) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रम दिनांक ८/१०/२०२० ते १४/०१/२०२०

प) ख्यातनाम संख्याशास्त्रज्ञ डॉ.पी.व्ही. सुखात्मे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन क्वीज २७/७/२०२१

ड) एकदिवशीय राष्ट्रीय वेबिनार

१. जगप्रसिद्ध संख्याशास्त्रज्ञ डॉ.सी.आर. राव यांच्या जन्मशताब्दिनिमित्त साधन व्यक्ती डॉ. कुमुद गोरे, औरंगाबाद दिनांक ९/१०/२२०

२. तिसऱ्या जागतिक सांख्यिकी दिनानिमित्त चित्ताकर्षक संख्याशास्त्र : साधन व्यक्ती डॉ. पी.जी. दिक्षित, पुणे दिनांक २०/१०/२०२०

३. ख्यातनाम संख्याशास्त्रज्ञ डॉ.पी.व्ही. सुखात्मे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित Why study Statistics ? साधन व्यक्ती डॉ. अनिल गोरे, पुणे २७/७/२०२१

इ) जागतिक सांख्यिकी दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन : निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तीचित्र स्पर्धा

ई) ऑफलाईन व्याख्याने / कार्यक्रम उपस्थिती

१. विज्ञान दिनानिमित्त व्याख्यान डॉ. संजय लट्टे, जत दिनांक २५/०२/२०२१

२. विज्ञान दिनानिमित्त व्याख्यान डॉ. व्ही.टी. मोरे, मिरज दिनांक ३/३/२०२१

३. विज्ञान दिनानिमित्त व्याख्यान डॉ. एम.के. पाटील, कवठेमहांकाळ, दिनांक १/०३/२०२१

४. जागतिक महिला दिन आणि संख्याशास्त्र विद्यार्थी महिला पालक-शिक्षक मेळावा दिनांक ८/३/२०२१

व्याख्यान महिला सक्षमीकरण, साधन व्यक्ती प्रा. साधना कांबळे.

५. राष्ट्रीय गणित दिन / रामानुजन जयंती - व्याख्यान प्रा. विजय कोष्टी, प्रा. दुधाळ आर.ए. दिनांक २२/१२/२०२०

६. मराठी भाषा - साधन व्यक्ती श्रीनिवास नागे दिनांक २७/०२/२०२१

७. आजादी का अमृत महोत्सव - साधन व्यक्ती डॉ. संतोष बाबरे दिनांक २७/०३/२०२१

* विशेष उपक्रम

ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे (माजी संख्याशास्त्र विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या वतीने कवठेमहांकाळ तालुक्यातील 'लसीकरण मोहिम : सांख्यिकीय अभ्यास' एक सर्वेक्षण

– प्रा.डॉ. एम.के. पाटील, संख्याशास्त्र विभागप्रमुख

– प्रा. व्ही.व्ही. कोष्टी, सहयोगी प्राध्यापक

सहा. प्रा. अभिलाषा पाटील,

प्रा.कु. शुभांगी भोसले, प्रा.कु. शीतल पाटील

* निमंत्रितांची व्याख्याने

विभागाची माजी विद्यार्थी ॲड्. विद्या पवार यांची संख्याशास्त्र विभागाला भेट आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिनांक ६/३/२०२१

प्रा. डॉ. एम्. के. पाटील
संख्याशास्त्र विभाग

**मराठी विभाग**

१) दि. १६, सप्टेंबर २०२० रोजी ग्रंथालय विभाग व भाषा वांङमयमंडळ यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय वेबिनारचे आयोजन केले यानिमित्ताने डॉ. गिरीश मोरे यांचे ग्रंथालयाचे महत्व, वाचन, लेखन आणि भाषण या विषयावर व्याख्यान झाले.
२) दि. १५, ऑक्टोबर २०२० हा दिवस डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला त्यानिमित्त मा. राकेश वानखेडे यांचे व्याख्यान आयोजित केले.
३) दि. ०८, जानेवारी २०२१ ते १४, जानेवारी २०२१ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले.
४) दि. २७, फेब्रुवारी २०२१ रोजी मराठी भाषा दिन साजरा केला यानिमित्त दैनिक लोकमतचे संपादक श्रीनिवास नागे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
५) दि. ६,जुन २०२१ रोजी ग्रामीण पत्रकारिता आणि जनसंवाद या अभ्यासक्रमाचा उद्‌घाटन समारंभ (ऑनलाईन) आयोजित करण्यात आला यानिमित्त प्रमुख वक्ते डॉ. बाळासाहेब चव्हाण यांचे व्याख्यान झाले.
वरील सर्व कार्यक्रम विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग व प्रतिसाद मिळाला.

डॉ. मोहन लोंढे
मराठी विभाग

| **Dr. M. K. Patil (Participation in Seminar/Webinar /FDP )** | | | |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | Title | Agency/ Institution | Date |
| 01 | 3day national webinar on Assessment & Accreditation : A Revised Accreditation Framework for Affiliated colleges. | Government college of Arts & Science Aurangabad. | 21.05.2020 to 23.05.2020 |
| 02 | National webinar on AQAR writing and Submission As per New NAAC Guidelines. | Miraj Mahavidyalaya, Miraj & S. m. Dnyandeo Mohekar Mahavidyalaya, Kalamb0 | 6.06.2020 to 07.06.2020 |
| 03 | Webinar on Data Analytics with Power BI. | Computer Technology Department of K.K.Wagh Politechnic, Nashik | 06.06.2020 |
| 04 | One week National Level Online **Faculty Development program** on G Suit & Allied Tools in Education | Sant Gadge baba Amaravati University, Amaravati | 29.06.2020 to 04.07.2020 |
| 05 | National Workshop on Google Apps for Education & Moodle | Department of Commerce, Rajaram College, Kolhapur | 02.7.2020 to 03.07.2020 |
| 06 | State level webinar on Opportunities Towards Educational Digitalization | Department of Computer Application and IQAC, Adarsh College Vita | 06.07.2020 |
| 07 | One day webinar on Entrepreneurship Opportunities in Statistical Data Analysis | Department of Statistics, Sadguru Gadage Maharaj College, Karad | 17.07.2020 |
| 08 | International Webinar on Advances in Statistics and data Science for Sustainable Human Development. | Indian Society for probability and Statistics and Department of Statistics, S. V. university, Tirupati | 07.09.2020 to 10.09.2020 |
| 09 | Online Webinar on Online Teaching – Learning Process & Changing Mindset of Society | Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur | 14.10.2020 |
| 10 | International webinar on Advances in Operational Research For Optimal Humanosphere | Indian Society for probability and Statistics and Department of Statistics, S. V. university, Tirupati | 20.11.2020 to 22.11.2020 |
| 11 | Lean Six sigma Beginners E-Learning Session | Adarsh College, Vita & Pursullence Global Business Solutions, Pune | 25.11.2020 |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | One day webinar on Statistical Data Analysis Using SPSS | Balwant College Vita & Adarsh College Vita | 13.02.2021 |
| 13 | One day online workshop on revised syllabus in B. Sc. III (Statistics) Sem V & VI | Yashvantrao Chavan College of Science, Karad | 16.02.2021 |
| 14 | One day national webinar on Intellectual Property Rights (IPRs) and IP Management for startup | Dahiwadi College, Dahiwadi | 06.03.2021 |
| 15 | National Webinar on Data Science Future Directions & career Opportunities | Department of Statistics, Kisan Veer Mahavidyalya, Wai & eduplus now | 12.03.2021 |
| 16 | One day State level webinar on Revised AQAR 2020-21 | IQAC of Willingdon College, Sangli | 13.03.2021 |
| 17 | National e-Conference on Recent Advances in Applied Statistics (NCRAAS-2021) | Department of Statistics, School of Computational Sciences, punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur | 24.04.2021 |
| 18 | Two day National Level Workshop on " Quantitative Data Analysis by Statistical Software 'jamovi' | Department of Mathematics and Statistics, N.S.S. College of Commerce & Economics, Mumbai and Sheth NKTT College, Dhane | 21-22 May, 2021 |
| 19 | National Webinar on "Statistical Modeling" | Department of Statistics and IQAC of Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur | 28.05.2021 |
| 20 | One day state level workshop on " Understanding NAAC Manual" | IQAC and Yashvantrao Chavan Institute of Science, Satara (Autonomous) | 02.06.2021 |

**Prof. (Dr) Suvarna Balkrishna More**

1 . Research paper Published - **'Amphibian Diversity from Patharpunj area of Sahyadri Tiger Reserve(Maharashtra , India)'** *International Journal of Science and Research* (IJSR), ISSN2319-7064Vol. 10 Issue 2, Feb. 2021 paper ID- SR21226174454 Impact factor- 7.583

2. Book Published – A Field Guide to Siders of Western Ghats (India) ISBN:978-93-82451-77-8

3. Worked in LIC at Raje Ramrao Mahavidyalaya Jath on 13.1.2021

5. Research Guide for Ph. D. Students and member of Research Monitoring Committee of Wildlife

4 Organized online webinar for B Sc III Zoology students by Resource persons,

i) Dr. Shilpa Khairmode, Dr. Bapuji Salunkhe Mahavidyalaya , Miraj on 1.8.2022

ii) Dr. Jini Deshmane Kasturbai Walchand College , Sangli on 19.7.2021 and 28.7.2021.

iii) Rahul Patil, Balwant College Vita on 25.1.2021.

**प्रा. डॉ. मोहन लोंढे**

ग्रंथाचे प्रकाशन – १ ऑगष्ट २०२० 'अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी गौरव ग्रंथ' ललित प्रकाशन मुंबई ISBN978-81-940148-4-3

शोधनिबंध – २९ जुलै २०२१ 'अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील निसर्ग चित्रण' आयुष्य रिसर्च जरनल ISSN 2349-638X

पुरस्कार – 'कृतीशील प्राध्यापक पुरस्कार' २०२०–२१ महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती

व्याख्याने – ५ सप्टेंबर २०२० 'शिक्षक दिन' आभासी माध्यम

२ आक्टोंबर २०२० 'गांधी विचारधारा'

मार्गदर्शक – ३ फेब्रुवारी २०२० एम्. फिल., पीएच. डी. मार्गदर्शक मान्यता शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

संयोजक– १५ आक्टोंबर २०२० 'वाचन प्रेरणादिन' वक्ते–राकेश वानखेडे

१६ सप्टेंबर २०२० 'ग्रंथालयाचे महत्व' राज्यस्तरिय वेबिनार वक्ते–डॉ. गिरीश मोरे

**V. V. Koshti (Statistics)**

| Sr. No. | Activity | Organized by | Duration |
|---|---|---|---|
| 01 | Attended One day National E- conference on Fundamentals of Research Methodology | Uma Mahavidyalaya Pandharpur | 27/06/20 |
| 02 | Attended National Webinar on Digital Transformation | Arts , Commerce & Science College Lanza | 14/07/20 |
| 03 | Attended State Level Webinar on Significance of Yoga for Better Health | Adarsh College Vita | 17/07/20 |
| 04 | Attended National Webinar on Maharshi V.R. Shinde | Chhatrapati Shivaji College , Satara | 02/01/21 |
| 05 | Attended Online Workshop on B.Sc. III Revised Syllabus | Rajashri Shahu College, Kolhapur | 01/02/21 |
| 06 | Attended Online Workshop on B.Sc. III Revised Syllabus | Adarsh College Vita | 05/02/21 |
| 07 | Attended Online Workshop on B.Sc. III Revised Syllabus | Ajara Mahavidyalaya Ajara | 12/02/21 |
| 08 | Attended Online Workshop on B.Sc. III Revised Syllabus | Y. C. College of Science, Karad | 16/02/21 |
| 09 | Convener of National Webinar on "Prof. C. R. Rao: The Role Model" | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 9/09/20 |
| 10 | Convener of National Webinar on "Fascinating Statistics" | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 20/10/20 |
| 11 | Convener of National Webinar on "Why study statistics?" | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 27/07/21 |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | Convener of National Webinar on "Preparation of Competitive Examinations" | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 11/09/21 |
| 13 | National Webinar on Ground water literacy and Water awareness | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 09/07/21 |
| 14 | One day Workshop on Designing & Attainment of CO's, PO' s & PSO's | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | 08/09/21 |
| 15 | One day Webinar on Biotechnology | P.V.P. Mahavidyalaya K. Mahankal | |
| 16 | Lean Six Sigma Beginners E learning session | Adarsh College Vita and Pursullence Pune | 2020-21 |
| 17 | e-Seminar on 'Global human values education' | Arts & Commerce College Fondaghat | 22/10/20 |
| 18 | National Webinar on Anna Bhau Sathe | Mahavir Mahavidyalaya Kolhapur | 19/08/20 |
| 19 | प्रतिसरकार चळवळीचे अंतरंग | G.D.Bapu Lad, Mahavidyalaya Kundal | 10/08/20 |
| 20 | National Webinar on Data analysis and Statistical Computing | Dr. Bhimrav University, Agra | 27/05/20 |

**Examination Work**

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | Paper Setting B.Sc. I, Sem I, SemII 8Sets | P.V.P. College K. M. | 8 days |
| 02 | Paper Setting B.A. I Sem I, Sem II 8 Sets | P.V.P. College K. M. | 8 days |
| 03 | Paper Setting B.Sc. III Sem V, 1 Sets | Shivaji University, Kolhapur | 1 day |
| 04 | Paper Setting B.Com. III Sem V, 3 Sets | Shivaji University, Kolhapur | 3 days |
| 05 | Examiner at B.Sc. I, II, III Practical | P.V.P. College K. Mahankal | 7 days |
| 06 | Assessment B.A.I, B.Sc. I, B.Com. II, | P.V.P. College K. Mahankal | 6 days |
| 07 | Junior Supervision | P.V.P. College K. Mahankal | 10 |

**Achievements**

| | |
|---|---|
| 01 | प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य : कोविड योद्धा पुरस्कार : ऑगस्ट २०२० |
| 02 | स्वरकुल ट्रस्ट मुंबईचा "Online Teacher Expert Award- 2020" : १२ सप्टेंबर २०२० |
| 03 | काव्यमित्र संस्था पुणे यांचा 'राष्ट्रीय शिक्षक रत्न' पुरस्कार : १७ जानेवारी २०२१ |
| 04 | भारतीय समाजोन्नती संघ , मुंबई चा 'जयभारत- राष्ट्रचेतना पुरस्कार २०२१' : २३ फेब्रुवारी २०२१ |
| 05 | आसाम साहित्य सभा आणि आपली मुंबई यांचा 'हिंदुस्थान बुक ऑफ अवार्ड २०२१' प्रबोधनकार ठाकरे सामाजिक न्याय पुरस्कार |
| 06 | सोलापूर जिल्हा पत्रलेखक मंच चा 'उत्कृष्ट वृत्तपत्र पत्रलेखन पुरस्कार २०२१' |
| 07 | Participated in e Marathon (15 Nov. to 19 Nov.2020) |
| 08 | Central Vigilance Commission: Certificate of Commitment 2020-21 |
| 09 | Conducted online Quiz on various occasions =07 |
| 10 | Conducted Vaccination Survey |
| 11 | Published **1000+** articles in leading newspapers in Maharashtra on various topics |
| 12 | Participated in more than 20 Corona awareness & other quiz programs organized by various colleges |

**Dr. Dilip Akaram Gade**

**Member of college committee and work done**

1 Head of Cultural Department P. V. P. Mahavidyalaya Kavathe Mahankal
2 Head of Student Development Cell P. V. P. Mahavidyalaya Kavathe Mahankal
3 Convener of NAAC Criteria No. V- Student Support and Progression
4 Coordinator of MPSC Center - P. V. P. Mahavidyalaya Kavathe Mahankal
5 Coordinator of Carrier Katta -Maharashtra State Higher Education and Maharashtra Information Technology Support Center.
6 Placement Officer - Placement cell of P. V. P. Mahavidyalaya Kavathe Mahankal
7 Secretary and Member of Student Grievance Committee
8 Chairman of B.A. II Admission Committee
9 Member of "VASANT" annual Magazine P. V. P. Mahavidyalaya Kavathe Mahankal

## Research Publications

1 Research Paper Published entitled "Ichalkaranji as a Commercial Tourism Center in Kolhapur District (MS): A Geographical Study Power of Knowledge peer review Journal special Issue II Aug. 2020 ISSN 2320-4494, Impact factor 2.7286 pp-79-87
2 Research Paper Published entitled "Impact of COVID-19 on Indian Tourism Industry" 'Akshar Wangmay' UGC care listed, International Research Journal, December- 2020, Vol. IV, ISSN 2229-4929 pp-126-128
3 Research Paper Published entitled "Geographical Study of Male and Female Literacy in Ahmednagar District, Maharashtra State, India" EPRA International Journal of Multidisciplinary Research (IJMR) - Peer Reviewed Journal, Volume: 7, Issue: 8 August 2021 Impact Factor 2021: 8.047, ISSN (Online): 2455-3662. pp-380-386
4 Research Paper Published entitled "Dependency Ratio Of Solapur District: A Geographical Analysis" Aayushi International Interdisciplinary Research Journal - Peer Reviewed Journal Special Issue No.86 ( ISSN 2349-638x ) Impact Factor 7.149

## Participation in various Conferences, Seminars, Webinar

1. Participated in One Day National E- Conference on "Geographic Environment During Covid-19 Lockdown Period" jointly organized by dept. of Geography & IQAC , Arts, Science& Commerce College, Ramanandnagar, Tal- Palus, Dist- Sangli on dated July 15, 2020
2. Participated in the Online Statistical Quiz on "Contribution of Dr. P. V. Sukhatme" organized by Dep. Of Statistics Adarsh College Vita on the occasion of National Statistics day , 27 July 2020
3. Participated in one day National webinar on "Impact of COVID-19 on Indian Economy" organized by IQAC, Dept. of Economics & Commerce, Vishwasarao Naik Arts, Commerce & Baba Naik Science Mahavidyalaya, Shirala, 28th July 2020.

4. Participated in One Day National Level Webinar on "The Issue of Climate Change & Moral Education during the Crisis of Covid-19" organized by dept. of Geography & IQAC, Shrikrishna Mahavidyalaya, Gunjpati on 29th July 2020.
5. Participated in one day National webinar on "Effective Strategies to Face NAAC Peer Team" " organized by IQAC, Arts and Commerce College Pusegaon and D. G. College of Commerce Satara, 29th July 2020
6. Participated in one day National webinar on "Marathi Vidnyan Sahitya" organized by department of Marathi & Shivaji Vidyapeeth Marathi Shikshak Sangh, held on 30th July, 2020.
7. Participated in one day National webinar on"प्रतीसरकारच्या चळवळीचे अंतरंग" Jointly organized by department of Marathi & IQAC, Krantiagrani G. D. Bapu Lad Mahavidyalaya, Kundal On 10th Aug. 2020.
8. Participated in one day National webinar on "अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन-साहित्यातील जागतिक संदर्भ" organized by department of Marathi, Mahaveer Mahavidyalaya, Kolhapur & Shivaji Vidyapeeth Marathi Shikshak Sangh, held on 19th Aug, 2020.
9. Participated in one day International webinar on " Language and Literature Research: Rethinking and New Directions" Jointly organized by department of Marathi & IQAC, Shivaji Vidyapeeth Marathi Shikshak Sangh, Kolhapur, Chhatrapati Shivaji College, Satara, on 26th Aug, 2020.
10. **Coordinator** in the online Quiz on "Contribution of Dr. Homi Bhaba" organized by department of Statics and Geography P. V. P. Mahavidyalaya, Kavathe Mahankal on the occasion of birth anniversary of Dr. Homi Bhaba, 30th Oct, 2020.
11. Actively participated in one day International Webinar on "COVID-19 & Global Tourism: New Challenges" organized by dept. of Geography & IQAC, Kisan Veer Mahavidyalaya, Wai, Dist- Satara on 25th Sept., 2020.
12. Participated in a Webinar on "ICT Enablement in Higher Education" organized by Shri Shivaji Vidya Prasarak Sanstha's – Bhausaheb N S Patil Arts & MFMA Commerce College Dhule & Master Soft ERP Nagpur on dated 5th Jan, 2021.
13. Participated in one day National webinar on "Geo-informatics and Disaster Management" organized by dept. of Geography & IQAC Yashwantrao Chavan Warana Mahavidyalaya, Warnanagar on 7th January 2021.
14. Participated in the National level webinar on "Importance of Geospatial Technology in Geographical Studies" organized by IQAC and Department of Geography, Milliya Arts, Science and Management Science College, Beed on dated 16th Jan., 2021.
15. Actively participated in one day webinar on "Biotechnology" organized by department of Zoo, P.V.P. Mahavidyalay, Kavathe Mahankal on dated 20th Jan. 2021.

16. Participated in National Conference on "स्त्री शिक्षणातील समाज सुधारकांचे योगदान" organized by department of culture, Krishna Mahavidyalaya, Rethare BK on dated 3rd February 2021.

17. Participated in the National level webinar on "COVID-19 Effect on Environment" organized by Department of Geography, Vasantdada Patil Arts, Commerce & Science College Patoda Dist- Beed held on 15th Feb, 2021.

18. Actively Participated in National Webinar on "An Effect of COVID-19 on Global Tourism" jointly organized by Dept. of Geography and IQAC, PDVP Mahavidyalaya, Tasgaon Dist- Sangli on dated 2th January 2021.

**Participation in various Workshops**

1 **Workshop** on "Revised Syllabus of B. A. III (Geography) Paper no. VIII & XI" jointly organized by Shivaji University, Kolhapur and Department of Geography & IQAC D. P. Bhosale College Koregaon, Dist- Satara, on dated 1st Feb., 2021.

2 **Workshop** on "Revised Syllabus of B. A. III (Geography) Paper no. VII & X" jointly organized by Shivaji University, Kolhapur and Department of Geography & IQAC, Dahiwadi College Dahiwadi Tal- Man Dist- Satara on 6th Feb. 2021.

3 **Workshop** on "Revised Syllabus of B. A. III (Geography) Paper no. VII & X" jointly organized by Shivaji University, Kolhapur and Department of Geography & IQAC, Dahiwadi College Dahiwadi Tal- Man Dist- Satara on 6th Feb. 2021.

4 **Two day Online Workshop** on "Revised Syllabus of B. A. III (Geography) Paper no. XIII & XIV" jointly organized by Shivaji University, Kolhapur and Department of Geography & IQAC, Krantisinh Nana Patil College Walwa on 9th Feb, 2021.

5 **One day workshop** on "API and CAS Promotion of Associate Professor" organized by Shivaji University, Teachers Association (SUTA) Kolhapur on 14th Feb, 2021.

**Mahesh Maruti Kamble**

| Sr. No | Theme | Sponsered / Organizer | Date |
|---|---|---|---|
| 01 | ACCESS TO FREE E-RESOURCES IN COVID-19 PANDEMIC SITUATIONS | Knowledge Resource Center & QAC, Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe Mahavidyalaya, Miraj | 11.08.2021 |
| 02 | Recent Trends in Libraries and Research | Department of Library and Internal Quality Assurance Cell in association with Public Library, Malkapur | 01.08.2021 |
| 03 | Research Methodology and IPR | G. H. Raisoni College of Arts, Commerce and Science, Wagholi, Pune | 26.04.2021 to 01.05.2021 |
| 04 | INFLIBNET & LIBRARY SERVICES FOR TEACHING, LEARNING & RESEARCH IN PANDEMIC SCENARIO | Department of Library and Internal Quality Assurance Cell ( IQAC ) | 07.07.2021 |
| 05 | Research Methodology | Amar Sewa Mandal's Kamla Nehru Mahavidyalaya, Nagpur | 26.04.2021 to 01.05.2021 |
| 06 | ICT Tools for Effective Teaching Learning | Amar Sewa Mandal's Kamla Nehru Mahavidyalaya, Nagpur | 08.07.2021 to 10.07.2021 |
| 07 | SPSS, Web-2 Tools and Plagiarism in Research | Dept. of Pol. Sci., Research Committee and IQAC in collaboration with Department of Political Science, Shivaji University, Kolhapur | 14.07.2021 |
| 08 | Gender and Environmental History | Dept. History, Women Empowerment Cell & QAC Cell with Collaboration with Shivaji University History Conference. | 26.07.2021 |
| 09 | Intelectual Property Right and Quality impowerment | Kisan Veer Mahavidyalaya, Wai | 30.06.2021 |
| 10 | Thoughts of Bharatratna Dr. Babasaheb Ambedkar | NSS, Political Science and History Department of Sahakarbhushan S K Patil College, Kurundwad | 19.04.2021 |
| 11 | Effective Use of Open E-Resources for Academics abd Research | IQAC and Department of Library Science Arts and Commerce College Kadepur | 05.07.2021 |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | Research Funding Opportunities | PG and Research Department of Commerce Chandramohan Planters Association College, Bodinayaknur | 20.04.2021 |
| 13 | Recent Trends in Education, Technology & Management | MILAGRES COLLEGE, KALLIANPUR & GFGC KAVOOR, MANGALORE | 30.07.2021 to 08.08.2021 |
| 14 | Cyber Security, Cyber Crime and Its Challenges in Educational Institutions & Libraries | Division, Social Development Federation, Agra, U.P. | 24.07.2021 |
| 15 | Groundwater Literacy | Groundwater Survection and Development Mechanism Department Maharashtra Government, Internal Quality Assurance Cell (IQAC) & National Service Scheme department of Jaywant Mahavidyalaya ,Ichalkaranji | 08.07.2021 |
| 16 | Know your pension rule | IQAC Padmabhushan Dr. Vasantraodada Patil Mahavidyalaya, Tasgaon, Sangli | 10.07.2021 |
| 17 | OPEN ACCESS RESOURCES AND IT'S SIGNIFICANCE | Devchand College, Arjunnagar | 23.07.2021 |
| 18 | I.P.R. & Plagiarism | IQAC & Department of Library, SJMSM's Arts & Commerce College, Khapar, Dist. Nandurbar | 05.07.2021 |
| 19 | Emerging Technologies and Higher Education : E-Learning Approach | Dept. of Library and Information Science (KRC), Yashavantrao Chavan Institute of Science, Satara | 24.07.2021 |
| 20 | Koha Open Source Library Management Software | Softech Solutions and Services, Pune | 16.01.2021 to 17.01.2021 |
| 21 | DCPS and NPS | Maharashtra Association of Social Work Educators (MASWE) & College of Social Work (Autonomous) Nirmala Niketan, Mumbai | 16.05.2021 |
| 22 | Competitive Examination & Reading Culture | Vivekanand College, Kolhapur | 11.07.2021 |

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | N-List and open access E-Resources for Research | Research Promotion Cell & readers Forum Ansar Womens College, Perumpilauv | 20.10.2020 |
| 24 | Research Excelence and Academic Development | Nilkanthrao Shinde Science and Arts College Bhadravati, Chandrapur | 09.08.2021 to 14.08.2021 |
| 25 | Cyber Crime and Cyber Security | Sundrabai Maganlal Biyani Law College, Dhule | 30.07.2021 to 31.07.2021 |

**Publication**

| Sr. No. | Theme | Title | Author | Date |
|---|---|---|---|---|
| 01 | Knowledge Resonance Half Yearly Peer Reviewed Research journal Vol no 10 Issue 1 ISSN - 2231-1629 | ROLE OF LIBRARIES IN HUMAN RESOURCE DEVELOPMENT OF HIGHER EDUCATION: AN OVERVIEW | Mr. Mahesh M. Kamble Dr. Pradipkumar B. Ghante | Jan-June 2021 |
| 02 | Akshar Wangmay International Research Journal UGC Care Listed Vol - II Special Issue ISSN - 2229-4929 | Information Communication Technology(ICT) Based Library Services in Higher Education Libraries : An Overview | Mr. Mahesh M. Kamble | Jul-21 |

**Ravindra B. Patil**

* Eligibility Test for Assistant professor (set) Qualified 27th december 2020

*** Participated in the webinar**

1. on consumerism and financial literaci in the midst of COVID-19 Pandemic "Jointly organised by Arts and Science college, Atpadi and consumer Guidance society of India on 12th August 2020.

२. वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड, मराठी विभाग आयोजित (१४ जानेवारी ते २० जानेवारी २०२१) निमित्ताने 'मराठी भाषा व साहित्य' ऑनलाईन प्रश्नमंजुषा-सहभाग

३. पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय कवठेमहांकाळ, सांगली मराठी विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त प्रश्न मंजुषा २०२१. ऑनलाईन स्पर्धेत सहभाग - २५ जानेवारी २०२१

४. श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय; कापशी ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर (खटअउ) आणि भाषा विभाग (मराठी, हिंदी, इंग्रजी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन नॅशनल वेबिनार 'भाषेचे

उपयोजन आणि अनुवाद' सहभाग – दि. २० मार्च २०२१.

5. Maharashtra knowledge corporation limited has actively participated in e-test on Dr. Babasaheb Ambedkar (MKCL) on 14th April 2021.

6. Activity participated in online Quiz on 5th june international Environment day oraganized by Department of Geography of Mohanrao Patangrao Patil Mahavidalya, Borgaon on 5th June 2021.

7. National Webinar on IA programme on awarness in secrities market oraganised by Arts and science college atpadi, on 20th July 2021.

**Examination work**

1) Paper setting B.A.-I Complsary Marathi Sem I & II
2) Paper setting B.A.-I Marathi sem. I & II

# कला, वाणिज्य व विज्ञान विभाग

### सिनीअर विभाग

### प्र. प्राचार्य – डॉ. एम्. के. पाटील

**इंग्रजी**

**प्रा. कांबळे एस्. एस्.** एम.ए., नेट
**प्रा. ढेरे ए. डी.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. मगदूम व्ही. ए.** एम.ए.,बी. एड.
**प्रा. कु. सावनूकर आशिया** एम.ए.,सेट
**प्रा. शिंदे राहुल** एम.ए.,बी. एड.
**प्रा. सुतार व्हि. पी.** एम.ए.
**प्रा. मुल्ला एफ. जे.** एम.ए.

**मराठी**

**प्रा. डॉ. लोंढे एम्. जी.** एम.ए.,एम्.फिल.,पीएच. डी.
**प्रा. डॉ. शिंदे ए. एस्.** एम. ए.,एम्.फिल, पीएच. डी.
**प्रा. पोरे एस. डी.** एम. ए.
**प्रा. पाटील रविंद्र** एम.ए, बी. एड., सेट
**प्रा. कु. इमडे ए. आर** एम.ए.,बी. एड. सेट, नेट

**हिंदी**

**प्रा. सोनवणे एस्. जी.** एम.ए.
**प्रा.डॉ. शिंदे व्ही. एस.** एम. ए. पीएच. डी.

**अर्थशास्त्र**

**प्रा. डॉ. भोसले टी. एम्.** एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.
**प्रा. सकट के. एल.** एम.ए. नेट
**प्रा. पाटील सी. बी.** एम.ए. बी.एड., सेट
**प्रा. कु. अवसरे ए. एस.** एम.ए.

**शारीरिक शिक्षण**

**प्रा. भोसले ए. पी.** एम.पी.एड्.
**प्रा. पाटील बी. एस्.** एम.पी.एड्.

**वाणिज्य विभाग**

**प्रा. डॉ. मोहिते बी. एच.** एम.कॉम. पीएच.डी.
**प्रा. माने ए. एम.** एम.कॉम., सेट, नेट
**प्रा. खांडेकर ए. एम.** एम. कॉम.
**प्रा. शिंदे एस. एम.** एम.कॉम., सेट

**इतिहास**

**प्रा. पोळ एस्. एन्.** एम.ए.
**प्रा. जमदाडे ए. ए.** एम.ए.,एम. एड.
**प्रा. पाटील एस. एस.** एम.ए.
**प्रा. क्षीरसागर जयश्री** एम. ए.
**प्रा. एनापूरे के. जी.** एम. ए. सेट

**भूगोल**

**प्रा. डॉ. कुंभार टी. ई.** एम.ए. पीएच. डी.
**प्रा. डॉ. पोळ एन्. एस्.** एम.ए.एम्.फिल., पीएच. डी.
**प्रा. डॉ. गाडे डी. ए.** एम.ए., पीएच. डी., नेट
**प्रा. माळी ए. एम.** एम. ए. सेट
**प्रा. घाटगे व्ही. पी.** एम. ए. सेट
**प्रा. माळी बी.** एम. ए.

**राज्यशास्त्र**

**प्रा. मुलाणी एस्. आर.** एम.ए.
**प्रा. पाटील डी. एस्.** एम.ए.

**समाजशास्त्र**

**प्रा.सौ. पवार एस. एस.** एम. ए.
**प्रा. यादव एस. एस** एम. ए.

**मानसशास्त्र**

**प्रा. डॉ. कांबळे व्ही. डी.** एम.ए., सेट, नेट, पीएच.डी.
**प्रा. डॉ. सुर्यवंशी एम्. एस्.** एम.ए.एम.फिल.,पीएच.डी.
**प्रा. सुर्यवंशी डी. एस्.** एम. ए. सेट
**प्रा. सौ. देसाई पी. पी.** एम. ए.

**संख्याशास्त्र**

**प्रा. डॉ. पाटील एम्. के.** एम.एस्सी.एम्.फिल. पीएच.डी., डी.आया.टी.
**प्रा. कोष्टी. व्ही. व्ही.** एम.एस्सी.एम्.फिल., डी.आय.टी.

**गणित**

**प्रा. दुधाळ आर. ए.** एम.एस्सी.एम.फिल.

**वनस्पतीशास्त्र**

**प्रा. पाटील टी. जी.** एम.एस्सी.,एम्.फिल.
**प्रा. डॉ. जाधव बी. टी.** एम. एस्सी.,पीएच.डी.
**प्रा. पाटील एस. बी.** एम. एस्सी., बी. एड.
**प्रा. साबळे एस. एम.** एम. एस्सी.
**प्रा. पाटोळे एस. एस.** **प्रा. पाटील एस. एम.**
**प्रा. कदम ए. एस.** **प्रा. पाटील एस. एस.**

**पदार्थ विज्ञान**

**प्रा. सौ. महामुनी पी. यु.** एम. एस्सी.
**प्रा. पाटील एस्. बी.** एम. एस्सी.
**प्रा. डॉ. शेंडगे एस्. एस्.** एम. एस्सी.,पीएच.डी.
**प्रा. साळुंखे ए. जी.** एम. एस्सी., बी. एड.
**प्रा. शिंदे एम. एस.** एम. एस्सी.
**प्रा. मोरे जी. एस.** एम. एस्सी.
**प्रा. गोडसे एस. टी.** एम. एस्सी.
**प्रा. पाटील एम. ए.** एम. एस्सी.
**प्रा. बीह्ले ए. बी.** एम. एस्सी.

**रसायनशास्त्र**

**प्रा. पाटील एस्. व्ही.** एम.एस्सी.एम्.फिल.
**प्रा. डॉ. कोरे जी. डी.** एम. एस्सी., पीएच. डी.
**प्रा. कांबळे ए. ए.** एम. एस्सी. सेट
**प्रा. कु. पाटील पुजा** एम. एस्सी., बी. एड.
**प्रा. शिंदे एस. एस.** एम. एस्सी.
**प्रा. शिंदे टी. पी.** **प्रा. माने एस. आर.**
**प्रा. साळुखे ए. पी.** **प्रा. फुटाने एस. बी.**
**प्रा. सावनुरकर टी. यु.** **प्रा. पाटील एस. एस.**
**प्रा. चव्हान पी. आर.**

**प्राणिशास्त्र**

**प्रा. डॉ. कु. मोरे एस. बी.** एम.एस्सी., पीएच.डी.
**प्रा. जमगे पी. के.**
**प्रा. चौगुले एस. ए.**

**शारीरिक शिक्षण संचालक**

**प्रा. डॉ. शिंदे एम. एम.** एम.पी.एड्., सेट, पीएच.डी.

**ग्रंथालय विभाग / ग्रंथपाल**

**प्रा. कांबळे एम. एम.**
एम.ए.एम.लिब ॲण्ड आय.एस्सी, सेट

## ज्युनिअर विभाग

## उपप्राचार्य – डॉ. बी. एन. पाटील

**इंग्रजी**

**प्रा. कोळेकर ए. एस.** एम.ए.बी.एड., नेट, सेट
**प्रा. मासाळ सचिन** एम. ए., बी. एड

**मराठी**

**प्रा. सौ. सुर्यवंशी एस्. एस्.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. सौ. ओलेकर एस. डी.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. पोरे एस. डी.** एम. ए.

**हिंदी**

**प्रा. थोरात डी. पी.** एम.ए.,बी.एड. नेट, सेट

**भूगोल**

**प्रा. यादव डी. पी.** एम.ए.,बी.एड.

**अर्थशास्त्र/सहकार**

**प्रा. वाघमारे टी. ए.** एम.ए.,बी.एड.
**प्रा. पाटील सी. बी.** एम.ए.,बी.एड. सेट

**राज्यशास्त्र / इतिहास**

**प्रा. पाटील बी. एन्.** एम.ए.,बी.एड.

**इतिहास**

**प्रा. सौ. तोरणे व्ही. एस.** एम.ए.,बी.एड.

**वाणिज्य विभाग**

**प्रा. पाटील एस. एस.** एम.कॉम., बी.एड.
**प्रा. शिंदे एस. पी.** एम.कॉम.

**शारीरिक शिक्षण संचालक**

**प्रा. डॉ. शिंदे एम. एम.**
एम.पी.एड्., सेट, पीएच.डी.

**पदार्थ विज्ञान**

**प्रा. शिंदे आर. एल.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. कर्चे एस्. व्ही.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. पाटील सुरेश तुकाराम** एम.एस्सी.,बी.एड्.

**रसायनशास्त्र**

**प्रा. तोरणे एस्. एन्.** एम.एस्सी.,बी.एड्.
**प्रा. के. एस. पाटील** एम.एस्सी.,बी.एड्.

**गणित**

**प्रा. कु. पवार एस. एन.** एम. एस्सी.

**जीवशास्त्र.**

**प्रा. कांबळे जी. के.** एम.एस्सी.,बी.एड्.

**प्रशासकीय कर्मचारी**

**कुलसचिव तथा प्रबंधक – श्री. स्वामी आर. ए.** एम. ए. जीडीसी & ए

**मुख्य लिपीक**

**श्री. चंदनशिवे बी. टी.** बी.एस्सी.,एम.ए.

**कनिष्ठ लघुलेखक**

**श्री. शिंदे एस. एस.** बी. कॉम., लघुलेखन

**ग्रंथालय लिपीक**

**श्री. थोरात टी. ए.** बी. ए. बी. पी. एड.

**श्री. शिंदे एस. बी.** एम. ए. बी. लिब.

**प्रयोगशाळा सहाय्यक**

**श्री. मुजावर एस्. एन्.** एच. एस. सी.

**श्री. जाधव एस्. जे.** बी.एस्सी.

**कनिष्ठ लिपीक**

**श्री. शिंदे ए. एस्.** बी. ए.

**श्री. सोनंद बी. एस्.** एम. ए.

**श्री. पाटील जी. आर.** बी.एस्सी

**श्री. मुलाणी ए. एम.** बी. एस्सी.

**प्रयोगशाळा परिचर**

**श्री. पवार व्ही. आर.**

**श्री. शिंदे जी. व्ही.**

**श्री. झांबरे बी. जे.**

**श्री. पाटील व्ही. जी.**

**श्री. चव्हाण ए. बी.** बी. ए.

**श्री. गावडे बी. डी.** बी. ए.

**श्री. खोत व्ही. पी.**

**ग्रंथालय परिचर**

**श्री. बोदगीरे एस्. एन्.** बी.कॉम

**श्री. माने एस्. आर.**

**श्री. गायकवाड ए. आर.**

**श्री. व्हनमोरे ए. व्ही.**

**श्री. पवार आर. एस्.**

**शिपाई**

**श्री. भांगले पी. बी.**

**श्री. वडर आर. बी.**

**श्री. कुंभार डी. आर.** बी. ए.

**श्री. पवार एम्. बी.** बी. ए.

**श्री. जंगम पी. आर.** एम.ए.

**श्री. कारंडे एस्. पी.**

**श्री. सपकाळ पी. जे.** बी. ए.

**श्री . भोसले व्ही. व्ही.**

**श्री. खोत एस. जी.**

# वसंत

वार्षिक, दोन हजार वीस
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ.

प्राचार्य,
डॉ. अशोक बाबर
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय
कवठे महांकाळ, जि. सांगली.

‘वसंत’ च्या नव्या अंकाचे मुखपृष्ठ हे काही वर्षापूर्वी केलेल्या एका जुन्याच अंकाच्या मुखपृष्ठाचे पुनर्मुद्रण आहे. असे करण्याचे कारण हे मुखपृष्ठ आरंभ म्हणून सुरवातीला ज्या काळात केले होते त्या काळात महाविद्यालयात एका नव्या वातावरणाची सुरुवात झाली होती. या वातावरणाचे सगळे श्रेय त्या काळातले महाविद्यालयाचे नवे प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांच्या कडे जाते. त्या काळी काही नव्या गोष्टी सुरू झाल्या त्यामध्ये विद्यार्थीसाठी वाचन, लेखन, श्रवण, सम्यक्य दृष्टी इत्यादींचा अंर्तभाव होतो. यातून एक सांस्कृतिक प्रारुप तयार होत गेले याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रभर होत राहिली. परंपरा दिन, आधुनिकता दिन हे या सांस्कृतिक कार्यक्रमाचे भाग धर्मनिरपेक्षता हे मूल्य विद्यार्थामध्ये रुजावे या साठी केलेला हा अटीतटीचा प्रयत्न याचे प्रतिक म्हणून हे चार चौकोन (four squares) हे त्याचे प्रतिक आहे. ही परंपरा अखंड चालावी आणि संपूर्ण राज्यात महाविद्यालाचे नाव उज्वल व्हावे, ही इच्छा. आरंभ बिंदूच्या काळात जे मुख्यपृष्ठ केले होते त्याचे पुनर्मुद्रण करत आहोत. या स्मरणाचा अर्थ सगळ्यांनी ध्यानात घेणे तितकंच महत्वाचं आहे.












शिक्षण प्रसारक मंडळ कवठे महांकाळ संचलित

# पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ.

# वसंत

२०१९-२०
वर्ष : ४२
अंक : ३५

## संपादन समिती

अध्यक्ष

प्राचार्य डॉ. अशोक बाबर

प्रमुख संपादक

प्रा. डॉ. मोहन लोंढे

## विभागीय संपादक

| | |
|---|---|
| प्रा. विजय कोष्टी | प्रा. डॉ. दिलीप गाडे |
| प्रा. महेश कांबळे | प्रा. डॉ. मयुर शिंदे |
| प्रा. रविंद्र पाटील | प्रा. आप्पासाहेब कोळेकर |

## मांडणी/ मुखपृष्ठ

प्रा. जी. के. ऐनापुरे

२०१९-२०

**।। प्रकाशनाचा काळ ।।**

वार्षिक

**।। प्रकाशक ।।**

प्राचार्य, डॉ. अशोक बाबर
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। मुद्रक ।।**

श्री. सुरेश नानासो पाटील
महांकाली प्रिंटींग प्रेस, कवठे महांकाळ - ४१६ ४०५
सांगली.

**।। राष्ट्रीयत्व ।।**

भारतीय

या अंकात व्यक्त झालेल्या विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ६ |
| फोटोफिचर | | |
| प्रेरणा | | ९ |
| मार्गदर्शक | | १० |
| संस्थापक | | ११ |
| मार्गदर्शक | | १२ |
| संचालक मंडळ | | १३ |
| सन्मान | | १४ |
| सेवानिवृत्ती | | १५ |
| परंपरा दिन | | १६ |
| आधुनिकता दिन | | १७ |
| पदवी प्रदान समारंभ | | १८ |
| विविध कार्यक्रम | | १९ |
| राष्ट्रीय सेवा योजना | | २२ |
| श्रध्दांजली | | २४ |
| | **मराठी विभाग** | |
| | **गद्य** | |
| नवशीचं लगीन | देवयानी कांबळे | २६ |
| मराठी माझा अभिमान | प्रतिक्षा प्रभाकर माने | ३२ |
| जनसामान्य लेखक : अण्णाभाऊ साठे | प्रमोद कृष्णदेव यादव | ३८ |
| राजा राममोहन रॉय | बाळासोा म्हाळाप्पा मोटे | ४४ |
| महाराज सायसाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रियांका प्रभाकर माने | ४९ |

| | | |
|---|---|---|
| आधुनिक भारताचे शिल्पकार महाराज सयाजीराव गायकवाड | पूजा पांडुरंग व्हनखंडे | ५३ |
| समाजमाध्यमे आणि आजचा युवक | नुतन रमेश शिंदे | ५८ |
| समाजाला काय हवे श्रध्दा की विवेक | प्राची मच्छिंद्र लोंढे | ६१ |
| साहित्यिकांच्या भेटी | जयश्री घेरडे | ६४ |
| | **पद्य** | |
| लेक वाचवा | देवयानी कांबळे | ६६ |
| पुस्तक | प्रियांका माने | ६६ |
| महापुर २०१९ चा | माधुरी संजय पाटील | ६७ |
| आठवण | माधुरी संजय पाटील | ६८ |
| आमचं कवठे महांकाळ | प्रतिक्षा माने | ६९ |
| दवाखान्यातील आयुष्य | दिपाली सुरेश चव्हाण | ७० |
| श्रावण | संदेश दत्तात्रय चव्हाण | ७१ |
| कुटुंब | प्रांजली जाधव | ७२ |
| माझा बाप | माधुरी संजय पाटील | ७३ |
| शेतकरी | कल्याणी तडवळे | ७४ |

| | | |
|---|---|---|
| स्त्री तुझे जीवन | कल्याणी तडवळे | ७५ |
| अभ्यासाला वेळच नाही | सोनाली सुनिल कांबळे | ७६ |
| | **हिंदी विभाग** | |
| सोच का निर्माण | अक्षय बाळासोा गेंड | ७८ |
| जिंदगी | प्रियांका माने | ८१ |
| मेरी माँ | ऐश्वर्या अरुन भोसले | ८१ |
| किसान | ऐश्वर्या अरुन भोसले | ८२ |
| मेरा देश | ऐश्वर्या अरुन भोसले | ८२ |
| | **इंग्रजी विभाग** | |
| To Achieve the Success | Vaishanavi Vijay Patil | ८४ |
| Success Mantr | Pranjali Jadhav | ८५ |
| My Dad | Aruna Aathvale | ८५ |
| | **अध्यापनपूरक व अध्यापनेतर कार्याचा वार्षिक अहवाल** | |
| अधिव्याख्याते प्रशासकीय<br>कर्मचारी | | १०२<br>१०४ |

# संपादकीय

शिक्षण प्रसारक मंडळ, कवठे महांकाळ संचलित पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयास या वर्षी ४२ वर्षे पूर्ण होत आहेत. दरवर्षीप्रमाणे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या वसंत या वार्षिकाचा हा ३५ वा अंक प्रसिध्द होत आहे.

आमच्या प्रेरणास्थानी असणारे वसंतरावदादा पाटील, संस्थापक आनंदरावदादा शिंदे यांच्या विचार कार्याची परंपरा पुढे वृद्धिंगत करणारे अध्यक्ष मा. साहेबराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य कुशल मार्गदर्शक मा. डॉ. अशोक बाबर यांच्यामुळे महाविद्यालयात अनेक विविध नवनवे उपक्रम राबविले जातात. याशिवाय महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या मुळे हे महाविद्यालय विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करीत आहे. यासाठी कवठे महांकाळ परीसरातील पालकांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे.

महाविद्यालयामध्ये २५०० च्या आसपास विद्यार्थी-विद्यार्थिनी ज्ञानार्जन करीत आहेत. ग्रामीण भागातील एक नावारुपास आलेले, पुरोगामित्वाची जपणूक करणारे हे महाविद्यालय आहे. दुष्काळाच्या झळा पचवून, हातावर पोट भरणारा बहुसंख्य समाज असूनही शिक्षणाची ओढ लागलेला आणि शिक्षणाच्या जोरावर स्वत: ची प्रगती करु पाहणारा विद्यार्थी वर्ग महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याचे समाजभान त्यांच्या लेखनातून दिसून येते. यातूनच गरीब शेतकऱ्याला मुलीचे लग्न करणे किती अवघड असते. हुंड्यासाठी लग्न मोडतात. आर्थिक विवंचनेमुळे घरच्या इज्जतीसाठी आत्महत्याच केली. हे समाजवास्तव मांडणारी नवशीचं लगीन सारखी कथा मराठी माझा अभिमान, जनसामान्य लेखक अण्णाभाऊ साठे, राजा राममोहन रॉय, महाराज सयाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आजचा युवक, समाजाला काय हवे श्रध्दा की विवेक अशा वैचारिक गद्यात्मक लेखनाबरोबरच लेक वाचवा, महापुर २०१९ चा, दवाखान्यातील आयुष्य, श्रावण, कुटुंब, माझा बाप, शेतकरी, स्त्री तुझे जीवन असा पद्यात्मक हुंकार विद्यार्थांनी या अंकात मांडला आहे. अशा प्रकारे वैचारीक वास्तववादी अनुभूतीतून साकारलेली गद्य-पद्य आणि हिंदी, इग्रजी मधील गद्य म्हणजेच हा अंक आहे.

सामाजिक, सांस्कृतिकतेचे भान ठेवून परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय

घडवला जातो. यातूनच खास अशी भूमिका घेऊन महाविद्यालयात विविध उपक्रम राबविलेले आहेत. परंपरा दिना निमित्त शिवलीला पाटील (बार्शी) यांचे किर्तन, भजन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, रक्तदान शिबीर याचे आयोजन केले. आधुनिकता दिनाच्या निमित्ताने विविध गुणदर्शन कार्यक्रम घेऊन मा. अशिष येरेकर, सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी स्पर्धा परीक्षा तयारी याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध कार्यक्रम राबविले गेले. यामध्ये चर्चासत्रे, शिबीरे, शैक्षणिक सहली, विविध क्रीडा स्पर्धा यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. यातूनच येथील विद्यार्थी विविध क्षेत्रात मौलिक कामगिरी करताना दिसत आहेत.

या वर्षामध्ये मार्च पासून कोरोनाचा फैलाव सुरु झाला. शरीरिक अंतर, लॉक डाऊन मुळे संकलन संपादन करणे अवघड होते.

'वसंत' हा महाविद्यालयीन कर्तृत्वाचा आरसा आहे. विद्यार्थांनी आपल्या सुप्त गुणांना वाव देत सामाजिकतेचे दर्शन आपल्या विविधांगी लेखनातून व कवितातून व्यक्त केले आहे. महाविद्यालयात वर्षभरात उत्तमोत्तम कार्यक्रम झाले. त्याकडे डोळसपणे पाहिले तर विद्यार्थ्यामध्ये माणूस घडविण्याचे कौशल्य महाविद्यालयाचे सामाजिकतेची दृष्टी असणारे कुशल प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांच्याकडे आहे. त्यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन यातून प्रस्तुत अंक पूर्णत्वास पोहचला आहे.

मुख्यपृष्ठ प्रा. जी. के. ऐनापुरे यांनी तयार करुन दिले. त्यांचे आभार तसेच संपादक मंडळातील सर्व प्राध्यापकांनी वेळो-वेळी दिलेल्या सहकार्यासाठी त्यांचेही आभार. या अंकासाठी योगदान देणाऱ्या सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सर्व विद्यार्थी व अंक वेळेत पूर्ण करुन दिल्याबद्दल महांकाली प्रेसचे शतश: आभार, विशेष म्हणजे सुबक मांडणी साठी अतुल पाटील यांचे ही आभार !

**प्रा. डॉ. मोहन लोंढे**

# कोरोना काळ

डॉ. सुवर्णा बा. मोरे

या पृथ्वीवर आत्तापर्यंत अनेक प्रकारच्या रोगांच्या साथी येऊन गेल्या आहेत. कोरोना महामारी हा त्यातलाच एक भाग आहे. निसर्गामध्ये नियमांचे साम्राज्य असते. म्हणजे दुष्काळ, महापूर, भूकंप अशा अनेक नैसर्गिक गोष्टी घडत असतात. जेव्हा कुढल्याही गोष्टीचा अतिरेक होतो त्यावेळी निसर्गात अशा काही वेगळ्या गोष्टी घडतात आणि मग निसर्गाचा समतोल राखला जातो. आपण जन्मलोय म्हणजे एक दिवस मरणार आहे हे अटळ सत्य आहे. तेव्हा कोरोना सारख्या महामारीला घाबरुन न जाता खंबीर व्हायला पाहिजे.

कोरोना हा एक सामान्य सर्दी खोकला आहे, पण तो संसर्गजन्य आहे. कोरानाची लागण कित्येकांना होऊनही काहीच लक्षणे न दिसल्याने आपोआप बराही झाला. जवळजवळ ९५% लोकांना कोरोनामुळे मृत्यू येत नाही उरलेल्या ५ % लोकांना याचा त्रास होतो. त्यांना टी. बी., मधुमेह, हृदयविकार किंवा जुना कुठलाही आजार आहे अशा लोकांना याचा त्रास होण्याची शक्यता असते. आपण सर्वांनी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, या विश्वात सर्व प्रकारचे पशू, पक्षी, प्राणी, किटक, जीवाणू , विषाणू हे निसर्गाचे अविभाज्य घटक आहेत. त्यांच्यासोबत आपल्याला आपले जीवन जगायचे आहे. हे आपण टाळू शकत नाही. त्यासाठी तेवढच खंबीर राहायला पाहिजे. त्यासाठी आपली रोगप्रतिकारक शक्ती चांगली असायला हवी. हा विषाणू जिवंत नाही. तो आपल्या शरीरात गेल्यानंतरच जैविक लक्षणे दाखवतो. तेव्हा आपल्याकडे असलेली रोगप्रतिकारक शक्ती उपयोगी पडते. ज्याची रोगप्रतािकरक शक्ती चांगली असते ते सहसा कुठल्या आजाराला बळी पडत नाहीत. एखादा संसर्ग झाला तर आपल्या शरीरातील रोगप्रतिबंध यंत्रणा कामाला लागते व आपण चार आठ दिवसात बरे होतो. म्हणजे आपले शरीर स्व:ताहूनच आजार बरे करते. म्हणून दक्ष रहाने खूप महत्त्वाचे आहे. जीवनात नेहमीच दक्षता बाळगणे ही खूप महत्वाची आणि आवश्यक गोष्ट आहे. रोग प्रतिकारक शक्ती चांगली ठेवायची असेल तर सकस आहार खूप महत्वाचा आहे. प्रत्येक सीझनमध्ये मिळणारी फळे, पालेभाज्या खायला हव्यात. यानिमित्ताने मला एक गोष्ट प्रामुख्याने सांगायची आहे की, प्रत्येकांनी आपल्या घराजवळ जी जागा शिल्लक असते तिथे आंबा, सीताफळ, चिक्कू अशी झाडे लावावित त्यामूळे खायला फळे मिळतील, शिवाय फुकट ऑक्सीजन मिळेल. घरा भोवतीची जागा स्वच्छ व जंतूविरहीत राहील. हे कोरोनापसून बरे होण्यासाठी खूप महत्वाचे आहे. कोरोनामूळे पेशंटच्या शरीरातील ऑक्सीजनचे प्रमाण कमी झाले तर प्राब्लेम होऊ शकतो. शुध्द हवा हे दुसरे औषध आहे. ते फक्त झाडेच फुकट देऊ शकतात. शिवाय झोपही शांत लागू शकते. कोरोना पेशंटला विश्रांतीची गरज असते. विश्रांती नाही मिळाली झोप नाही आली तर आपले स्नायू तानलेल्या स्वरुपातच राहतात. त्यामूळे शरीराला विश्रांती मिळत नाही. आपल्या शरीरातील प्रत्येक पेशीला ऑक्सीजनची गरज आहे, म्हणून शरीरातील ऑक्सीजन मात्रा चांगली असने खुप गरजेचे आहे.

या कोरोनाच्या महामारीमुळे विद्यार्थ्यामधे थोडी भितीचे व चिंतेचे सावट पाहायला मिळते पण विद्यार्थ्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, ही महामारी जागतिक आहे. सगळे जग या कोरोनाला बळी पडले आहे. आपण एकटे नाही विद्यार्थ्यापूढे एक ध्येय असते. ते गाठण्यासाठी त्यांची धडपड चालू असते. कोरोना महामारीमुळे हा अचानक सगळा बदल बहूतेक जनाना नको असतो, किंवा तो पचवतही नाही. संयम बाळगने खूप महत्वाचे आहे. पालकांनीही मुलांची मानसिकता जपायला पाहिजे. विद्यार्थ्यांनी या टाळेबंदी मधे मिळालेला वेळ कारणी लावावा. एखादा छंद जोपासावा की तो आयुष्यभर पूरेल. कोरोनाने शिकवलेला हा एक चांगला धडा आहे असे म्हणावे लागेल. तेव्हा स्वस्थ आणि निरोगी रहा.



# डॉ. वसंतरावदादा पाटील



**श्री साहेबराव पवार**

अध्यक्ष



**श्री सुरेश पाटील**

उपाध्यक्ष



**श्री बाळासाहेब शिंदे**

सचिव



# आनंदराव (दादा) शिंदे



**डॉ. अशोक बाबर**
प्राचार्य



**प्रा. बी. एन. पाटील**
उपप्राचार्य
कनिष्ठ विभाग



**प्रा. आर. एल. शिंदे**
पर्यवेक्षक
कनिष्ठ विभाग

# संचालक मंडळ


श्री. औदुंबर पाटील


श्री. जे.वाय. भोसले


श्री. दिनकर शिंदे


श्री. एकनाथ जगताप


श्री. अशोक पाटील


श्री. तात्यासो फाकडे


श्री. गणपती शिंदे


श्री. एच. बी. पाटील


श्री. ए. जे. खोत


श्री. शहाजी पाटील


श्री. विलास नलवडे



प्रा. डॉ. सुवर्णा मोरे
'प्रोफेसर' पदी निवड



प्रा. सी. बी. पाटील
अर्थशास्त्र विषयात
सेट उतीर्ण



प्रा. जी. के. कांबळे
सरचिटणीस
महाराष्ट्र प्रागतिक लेखकसंघ
पदी निवड



प्रा. व्ही. व्ही. कोष्टी
राष्ट्रीय शिक्षक भूषण, समाजरत्न,
जीवनगौरव आदी पुरस्कार

# सन्मान



प्रा. डॉ. बी. टी. जाधव
वनस्पतीशास्त्र
पीएच. डी पदवी मिळाल्याबद्दल



प्रा. डॉ. व्ही. डी. कांबळे
मानसशास्त्र
पीएच. डी पदवी मिळाल्याबद्दल

# सेवानिवृत्ती



मा. एस्. डी. जाधव



वाघोली येथून आलेली ज्योत स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष



शिवलिला पाटील (बार्शी) यांचे किर्तन





मंत्रमुग्ध प्रेक्षक



रक्तदान शिबीर

# आधुनिकता दिन



प्रमुख पाहुण्यांचे आगमन



प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन मा. अशिष येरेकर



प्रोफेसर पदी निवड झालेबद्दल सत्कार



सत्कार





आधुनिक दिन सत्कार स्विकारताना
शि. प्र. सं. चे अध्यक्ष मा. साहेबराव पवार, मा. सचिव बाळासाहेब शिंदे



ग्रंथ दिंडी आणि स्वागत करताना गाडे सर



प्रमुख पाहुणे डॉ. ए. एम. सरवदे यांचे स्वागत करताना प्राचार्य अशोक बाबर



निमंत्रित डॉ. टी. ई. कुंभार यांचे स्वागत करताना समन्वयक श्री. के. एल. सकट



पदवी धारक विद्यार्थांना मार्गदर्शन करताना डॉ. अशोक बाबर







पदवी प्रदान करताना डॉ. ए. एम्. सरवदे



पुस्तक प्रकाशन




पुस्तक प्रकाशन



कविसंमेलन मा. चंद्रकांत बाबर



प्रा. डॉ. सुवर्णा मोरे मार्गदर्शन करताना



काव्यवाचन




कादंबरीतील कामगार विश्व
प्रकाशन जी. के. ऐनापुरे

# विविध कार्यक्रम








'आधुनिक भारतीय जैन साहित्य' अविनाश सप्रे







चित्रपट निर्मिती प्रक्रिया
उमेश मालण







देवांची निर्मिती मा. प्रभाकर तांबट, कोल्हापूर




साहित्यिक आपल्या भेटीला, सचिव बाळासोहब शिंदे



भित्तीपत्रक प्रकाशन मा. सुरेश पाटील



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वान दिन



राजर्षी शाहू महाराज जयंती



अण्णाभाऊ साठे जयंती




रामानुजन जयंती






शिबीराचे उद्घाटन प्रसंगी प्रा. डी. एस. पाटील, सरपंच सौ. गिड्डे, माजी सरपंच मा. मधुकर पाटील आणि मा. प्रा. जे. वाय. भोसले शिबिरार्थींना मार्गदर्शन व उपस्थिती



सदिच्छा भेट मा. अशिष येरेकर
गटविकास अधिकारी तथा जिल्हाअधिकारी क.म.



सदिच्छा भेट व मार्गदर्शन
प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के



मा. डॉ. आबासाहेब शिंदे शिबिरार्थींना 'आधुनिक पत्रकारीता' या विषयांवर व्याख्यान देताना



मा. राजाराम पाटील शिबिरार्थींना 'सायबर क्राईम' या विषयावर व्याख्यान देताना



प्रा. डॉ. विनोद कांबळे शिबिरार्थीना सामाजिक न्याय या विषयावर व्याख्यान देताना



मतदान जागृती रॅली



प्लॉस्टिक निर्मुलन



श्रमदान



श्रमदान



श्रमदान



कै. विलासराव चव्हाण



कै. प्रा. जे. पी. जाधव

# मराठी विभाग

# नवशीचं लगीन

कु. देवयानी कांबळे
बी.ए. भाग – १

काळ्या आईची तनामनानं सेवा चाकरी करणारा, गाया, म्हशी, शेरडं, मेंढरं इतकच नव्हं तर कुत्र्या मांजरावर दिक्कल आंतकरणापसनं प्रेम करणारा शेतकरी मजी बळीराजा. बसवराजाला तर आपला भाऊबंध मानून त्येच्यावरनं जीव ववाळुन टाकणारा, अनंत जन्माचं दु:ख इसरुन त्यांच्या संगतीतच खरं सुख मानणारा जणू भोळा सांबच.

जिजाबा आपल्या मागं आपलं नाव चालवायला शेवटाला पाणी पाजायला एखादा दिवटा आपणाला असायला पाहिजे. या अपेक्षेनं एक म्हणता पाच पोरींचा बाप झाला होता पण पोरीबाळींच्या लग्नायवानं पारं गांजून गेला व्हता. पहिल्या चार पोरीच्या लग्नात व्हती चार दोन एकर ती पण हुंड्यापायी गेलेली. आता शेवटाला शेंडफळं नवशी तिलाच पोरगा मानून जिजाबा अन् आकणाबाई ही दोघं दालला बायको लोकांच्यात मिळलं तो रोजगार करुन आपलं पोट चालवत व्हती पर नवशी जशी लग्नाच्या वयात ईल तशी तिच्या हुंड्याची चिंता त्यासनी भेडसावतं व्हती. दिसामागनं दिस जात व्हतं. कैरी पाडाला येत चालली व्हती. चोरटं राघू घेरट्या घालतं व्हतं.

नवशी तशी दिसायला काळी सावळी, मध्यम बांधा, मोठालं डोळं तिच्या काळ्या कुळकुळीत कुरळ्या केसाच्या बटा डोळ्यावर नाचायच्या, लांबलचक नाकाची दांडी परं त्याला कुणाची दृष्ट लागुनी म्हणून जिजाबा आकणी तिला नकटी म्हणून बी चिडवायची मग लटकच् नवशी रागानं तोंडाचा चंबू करुन फुगून बसायची मग जिजाबा तिच्या केसावरनं हात फिरवून तिची समजूत काढायचा. नवशी अजून पोरसौदाचं व्हती परं कपाळावर टिकली कधीच लावायची नाय तर ह्या वयातबी भलं मोठं भडक कुंकू लावायची न् पुनवच्या चांदावानी गुंडगुळं ठेलं कोरायची. दोन्ही भवयाच्या मदोमद पिवळाधमक भंडारा लावायची. आकणानं आपल्या कानातली सोन्याची फुलं लाडक्या लेकीच्या नवशीच्या कानात घातली व्हती. अंगातलं झंपर फाटलं व्हतं म्हणून नवशीनं हिरव्यागार परकरावर आकनाची पिवळसर वानाची नव तुकड्याची चोळी घातली व्हतीन् नवशी खुडून घ्यावी अशीच दिसत व्हती. ह्या गरीबीनं माझ्या सोन्यासारख्या लेकीच्या अंगावर सणासुदीला दिक्कल एकादा नवा कपडा मिळणा म्हणून जिजाबा नवशीकडं बगून कदी कदी डोळ गाळत व्हता पर ह्यो आकणीला बी कळू देत नव्हता. लेक नवशी बी आगदी नवास करुन देवीला मागून घेतल्यावानी पोटाला आल्याली गरीब गाई देवाच्याच गुणाची. आपल्या आई–बाकडं ती कधी कसलाच हट्ट करायची नाय उलट आई बरुबर भांगलाटोंगलनाला जायाची न् आपल्या आई बाच्या फाटक्या प्रपंचाला ठिगाळ लावायसाठी मदत करायची. आपल्या भनीची आकनीची गरीबी बगून तिच्या भावानं यंक्यानं तिला दोन ल्हावर दिली व्हती आता जरा ती पिली मोठवाडं दिसत व्हती. आख्या घरादारात त्या दोन बारक्या मेंढ्या एक मांजार न् एक कुत्रं सोडून जिजाबाच्या दावनीला साधं रेडाक सुदीक नव्हतं. नवशी त्या मांजरावर लई जीव टाकायची तर जिज्याबा त्या कुत्र्याला

लहानग्या मुलागत साऱ्या अंगाखांद्यावरनं खेळवायचा. कुत्र्या मांजराची तर मायंदाळ दोस्ती रोज सकाळच्याला जेवायच्या वक्ताला एका घमेल्यात कोरड्यास दोन भाकरी कुस्करुन जिजाबा त्येचा काला कुत्र्याम्होरं ठिवायचा परं कुत्रं त्येला त्वांड लावायचं नाय. भुकून मांजराला बोलवायचं कुत्र्याची भाषा कळत आसल्यागत मांजार बी जिथं आसल तिथनं पळत याचं न् कुत्र्याम्होरं ठिवलेल्या भाकरी कोरड्याशाच्या काल्यात त्वांड घालून खाया लागायचं मग कुत्रबी खायाचं त्यातला काला खलासं व्हतं आला की जिजाबा पुन्यांदा एकादी भाकर कुस्कारायचा जर त्यास्नी खाया घातलं तर कुत्रं डाराडुर झोप घराची राखन व्हयाची नाय न् मांजार उंदरं धरायचं नाय अशी ती कुत्र्या मांजराची जोडी त्या वैर असतं म्हंत्यात पर त्यो बोल त्येनी साफ खोटा ठरविला व्हता.

सांजच्याला निजायच्या वक्ताला मात्र त्येनी आपापली हातरुन टाकली का मांजार पळत जावून नवशीच्या हातरुनावर बसायचं नवशीबी त्येला पुड्यात घ्यवून छातीसंग कवटाळून निजायची. मांजर बी गुरगुरअसं आपलं नरडं वाजवत बिनसुदी व्हवून झोपायचं आकणाबाई न् नवशी दोघी एकाच हातरुनावर निजायच्या पर मांजराच्या नरड्याच्या गुरगुरीनं आकणीला लौकर निज याचीच नाय. म्हणून ती नवशीला म्हणायची नवशे अगं मांजार पुढ्यात घ्यवून निजूनी कारण मांजराचा क्योस जर तोंडात गेला तर माणसाला दम लागतो मांजरावणीच त्यांचबी नरडं वाजत नवसी आईबाचा सबुद कंदी मोडत नव्हती का त्यास्नी कसलं दुक देत नव्हती पर मांजराबद्दल जे सांगितलं ते ऐकल्याचं नाय ऐकलं केलं. रोज रातच्याला मांजार पुढ्यात घ्यवून निजायचा नेम तिनं मोडला नाय. नवशी चुकून बाई जातीच्या जन्माला आलीवती परं गड्याला हिमतीची पोरं,... जिजाबा एकदा कायतर कामासाटनं पावण्याच्या गावाला गेलता दारात दोन मेंढ्या व्हत्या त्या भुवयाजून वरडत व्हत्या त्यास्नी आता हिंडवायचं कोण? मग नवसीनच दुपारच्या दोन वाजता त्या मेंढ्या सोडल्या न् संगतीनं आपल्या बाची झाडं सवाळायची कानाची कुराडी घ्येतली न् हिंडवाय निघाली. एका बाभळीच्या झाडाखाली शेंगाचं भुई भरवान झाल व्हतं. त्या शेंगा चार दोन, चार दोन उचलून मेंढ्या म्होरनी टाकल्या. मेंढ्यासनी शेंगा खायाला गुंतवलं, कुराडीचा दांडा दातात धरला न् नवशी सरासरा झाडावर चढली पार रोड्याला जावून भिडली न् तिथला यक हिरवागार ढापा तोडून खाली टाकला तसा मेंढ्यानी हावरल्यागत पानांचा न् शेंगाचा फडशा पाडला.

नवशीला कंच्याबी झाडाचं भ्याव नव्हतं? मग काय नवशी अगदी माकडासारखी ह्या ढाप्यावरनं त्या ढाप्यावर, त्या ढाप्यावरनं ह्या ढाप्यावर सहजगत्या येत जात व्हती. पर लेक नजरच्या आड झाल्यामुळं आकणीला घरात धीर धरवना नवसे ऽ ये नवसे ऽ म्हणत तिला हाळ्या देत तिला हुडकत आली परं जनावर मानसा परिस वळकबाज आसत्यात ते काय खोटं नाय. आकनीचा आवाज ऐकून मेंड्यानी खायाचं बंद केलं न् वरडून तिला साद देत आम्ही हित असल्याची साक्ष दिली. आकणीनबी मेंढ्याचा आवाज ऐकला न् तिच्या जिवात जिव आला तशी ती त्येंच्यापाशी गेली न् वर बगीतलं तर नवशी जळाण काढाय लागल्याली. मग आकणी म्हणली नवशेऽ आगं डोस्कं बिस्कं फोडून घेऊ का तुझ्या म्होरं ! काय म्हणून गं झाडावर चढलीस? पाय बिय निसटून खाली पडलीस मोडला बिडला पाय तर तुला कशानं बरी करु? आमच्यापाशी इख खायला पैसा नाय उतर खाली चटकन तशी दम बया उतरली म्हणत नवशी सरासरा खाली याय लागली. तिनं एका खानवटावर पाय दिला तस ते वाकून कुजल्यालं खनवाट

काडक्यानं मोडलं तशी नवशी वरणं पडली मग काय आकणीच्या काळजाचं पाणी झालं पर चलाख नवशी भुईला तर पडलीच नाय परं मधीच यका ढाप्याला धरुन बाहुलीवानी लोंबकळली हळूच खाली भुईवर टेकून उभी राहिली घाबरलेल्या आपल्या आईच्या गळ्याला मिठी मारुन हसायला लागली. तवर मागमाग जिजाबा ह्या दोघीस्नी हुडकत आला . तर त्या दोघी जळणाचा बिंड बांधत होत्या. जिजाबा आपल्याला बघताच मेंढ्या त्येला बिलगल्या. जिजाबानंबी त्यास्नी लाडानं जवळ घेवून कुरवळलं न् समधीजनच घराकडं येवून दाखल झाली तवा दिवस बुडलावता नवशीला आता पंधराव सरुन सोळावं लागलं व्हतं. परकर, झंपराची नवशी आता चोळी लुगड्यात आली व्हती. तिची अंगापिंडानं उभारी जडली व्हती. चोळी कचाय लागली व्हती. नवशीच्या चोळीला वर याकच बटण असायचं तर खाली गाठ बांधायची तिच्या टचटचीत उरोजानं ती गाठ नकळत आपणहून सुटायची. तशी नवशी सावध होवून मनातल्या मनात लाजून चूर होवून पुन्यांदा गाठ बांधायची. तशी चोळी खसकन फाटायची. नवशी आता खरुखरच केळीच्या कोक्यागत दिसत व्हती. अगोदरच काळी सावळी त्याच्यात पाडाला आलेल्या आंब्याला ललाई चडाची तशी नवशीच्या अंगावर जवानीची ललाई चढली व्हती. कधी हिरवं तर कधी तपकीरी वानाचं धनवडी नव वारी लुगडं नेसायची. गुडघ्यावर मांड कासोटा घालून डोस्क्यावरचा पदुर छातीवरनं घेवून डाव्या बगलला कंबरत खोचायची केसाची यकच वेनी सदा तिच्या छाताडावरच खेळत असायची. आता तर आकणीला तिच्याकडं बगवत नव्हतं. नवशी मजी हावनं भरल्याला फुगा कुणीतरी पिन लावल न् मोकळा करल म्हणून दोघं दाल्ला बायकु तिला आपल्या डोळ्याच्या पापण्यात लपवून ठेवत व्हती. नवशी भायर आली की समाजातल्या पापी नजरा तिच्या रसरसलेल्या ज्वानीला चावा घेत व्हत्या. पर नवशी कडव्या स्वभावाची अगदी हिरव्यागार मिरचीवानी तिकाट जर कुणी काढलीच छेड तर पायातलं काढून हाणायला कमी करायची नाय. त्याच्यामुळं कोण तिच्या वाटला जात नव्हतं तरी नवशी काय कायम घरात ठेवून घ्यायची वस्तू नव्हती. लवकरात लवकर तिच दोनाचं चार हात होत्याल न् आपला टांगणीला लागलेल्या जीव रिकामा होईल असं त्यास्नी वाटायचं. पर स्थळच कुठलं येत नव्हतं. एक आलं ते बी हुंडयापायी मोडलं व्हतं. आपल्या आईबाची केवीलवानी अवस्था बघून नवशी मनातल्या मनात झुरायची, आता नवशीनं सतरावं साल ओलांडलं व्हतं. बाईच्या जातीला मायंदाळी वाढ म्हंत्यात तशी नवशी भराभरा वाढत व्हती. त्याच्यामुळे जिजाबा काळजीनं झुरणी लागला व्हतां.

एक दिवशी अचानक एक पावणा घरला आला न् म्हणाला आम्ही दोघं चौघं उद्याच्याला तुमच्या पोरगीला बघाय येणार हाय. तवा सांगाय आलो व्हतो तसं जिजाबा आकणीला आपला जिव भांड्यात पडल्यागत झालं न् हरकूण जावून जिजाबा  पावण्याला म्हणाला पावणं आवं आसं भायरणच उभ्या उभ्या काय बोलताय असं आत या, बसा जरा येळ चहापाणी घ्या. तसा चंदू सरगर म्हणाला नग नग आता बसाय येळ नाय. कडब्याची ट्रक तिकड सडकला उभा करुन आलोय. दिस बुडायच्या आत कडबा खाली कराय पायजेल. आता हायच की उद्याच्याला बरं चलतो तयारीत न्हावा असं म्हणत पावणा भायरच्या भायर मागं फिरला. आता घरात समद्यांची तोंड जरा हसरी झाली व्हती, पर दातावर मारायला म्हणालातर घरात पैसा नव्हता. उद्याच्या खर्चापाण्याचं काय करावं त्यानास्नी कोडं पडलं व्हतं. दारातल्या दोन मेंढ्या सोडून घरात काहीच नव्हत. तर त्यांच्यातली एक मढी याला झाली व्हती, तर दुसरीला दोन महिन्याचा

अवधी व्हता. याला झालेली दुधासाठनं व्हैल म्हणून तिलाच ठिवून घेवून दोन महिन्याचा अवधी हाय तिलाच यरवाळी उठून जिजाबानं बाजार दावला न् आकरा वाजायच्या आत तिकडून माधारी आला. तसं समधं रुपे आकणीच्या हातात दिलं न् आता पावण्याच्या वाटकडं त्याचं डोळं लागलं व्हतं. दुपारच्या बारा वाजून गेल्या माथ्यावरचा दिस कलला पर मावळतीला गेला तरी पावण्याचा पत्ता नव्हता. दिवं लागणी झाली नवशीनं काडी वडून चिमणी पेटवली जिजाबा आकणी पावणं कसं आलं न्हाई म्हणून काळजी करत व्हती. एखाद्या पोरीबद्दल खोटं नाटं कायतरी सांगून तिचं लगीन मोडणारी किड्यानिस्टी मानसंबी समाजात असत्याती तसं माझ्या लेकीबद्दल कुणी काय सांगत्याल का काय म्हणूनच पावणं आलं न्हायती आस त्यास्नी वाटत व्हतं. सकाळचा दिस उगवाया आकणाबाईचा भाऊ यंक्या दोघा चौघा पावण्यांच्या संगट भनीच्या घरला आला न् म्हणला ताये पावणं आल्याती नवशीला बघाया तसं आकणीनं त्यास्नी पानी दिलं. जिजाबानं घोंगड हातरलं पावणं त्येच्यावर बसली च्या पाणी झाला. भाऊबंधात आपली लई मानहानीबी व्हाया नगं म्हणून जिजाबानं कुणालाच न बोलवता ठरवाठरवी सुरु झाली. पहिल्यांदा त्या ईषयाला नवरदेवाच्या चुलत्यानं त्वांड फोडलं म्हणाला हे बघा पावणं ऽ नवऱ्यामुलाचा बा मेलाय आई न् येक रंडकी मुंडकी एक भन हाय, पोरगा मिलीटरीत हाय तवा आमची लईबी अपेक्षा न्हाय पर त्याच्या तोलामोलानं हे लगीन व्हायला पाहिजे आसं आम्हांस्नी वाटतं. तसा जिजाबा म्हणाला तोलामोलानं व्हय पण ते कसं व्हया पाहिजे ते तरी कळू द्याकी, मग पुण्यांदा तो पावणा बोलला, म्हणाला तवा अस करा हे लगीन तुम्हीच करुन द्या न् वरणं हुंडा म्हणून नगं तर ओवाळणी म्हणून ताटात आकरा हजार रुपै टाका बास एवढंच आमचं म्हणण हाय. तरी बी जिजाबाच्या नरडीवर सुरी आल्यासारखं झालं व्हतं. तो काय बोलायचं धारीष्ठ करत नव्हता, त्यो गप झालेला बघून यंक्यानं आपल्या भनीला आत बोलावलं न् म्हणाला अग ताय आस गप बसून कसं चालल काय न्हाय म्हणलं तरी सुध्दा पाच पन्नास हजार रुपै का होईना तुला खर्चावं लागणारच तवा स्थळ चांगलं हाय. तवा आडयेड घेवू नका जुळवून टाका ही सोयरीक. तशी आकणाबाई म्हणाली आर यंक्या आता ह्या घडीला हे लगीन ठरलं न् पोरीला कुकू लावून जायाच जर पावण म्हणालं तर त्यास्नी टावीलटोपी कराया दिक्कल आमच्याकडं पैसा न्हाय त्याचं जिवारी लागून यंक्या म्हणाला आग ताय तसं मलाबी सरकाय कुठ जागा न्हाय बग त्याच्यातनबी माजी सात आठ मेंढ्या इकून का होईना माज्या भाचीसाटनं मी पाच च्यार हजारला हातभार लावीन पण ज्यास्ती काय माज्याच्यान द्यायचं व्हायचं न्हाय. तशी आकणी म्हणाली मग आपण अस करु आपली समधी जुळणी व्हईसतवर पावण्यासनीच चार दिस थांबाय सांगून् मग कळवू त्यासनी यंक्या म्हणाला चाललं तसं मी बी थांबून ठेवतो त्यास्नी न् तुबी सांग न् आकणी भायर आली न् म्हणाली हे बघा पावण! माजी लेक ह्याच घरात द्यायची पर चार दिस थांबाय पाहिजे. मग आम्ही येवू तिकडं तसा नवरदेवाचा चुलता म्हणाला काय हरकत न्हाय पर येळ घालत बसू नगा. चार दिस म्हंता आठवडाभर थांबू पर कळवा मजी झालं न् पावणं जागचं उठलं तस वाटला लागलं. येतू मी म्हणत यंक्या पावण्यांच्या मागुमाग गेला इकड जिजाबा न् आकणी ज्येला त्येला दात इचकत व्हती. तुमच्यात चाकरी ऱ्हावून पैस फेडीन म्हणत व्हती तोंडाला फेस यवूसतवर दिवसभर हिंडून सुदीक कोन हो म्हणल नव्हत. आजची माणस माणूसकीला विसरली ह्येचं त्यांना दु:ख होत व्हतं. आपलं लगीन कुठ जुळत नव्हतं ह्या काळजीन नवसीनबी आता खाली घेतलं

व्हतं. नवसीच्या काळजीनं साऱ्या घराला काजळी चढल्यागत झाल व्हतं न् यक दिसी यंक्यान सका सकाळीच यवून भनीला आनंदाची खबर सांगितली म्हणाला ताय आग लगीन मजी तिळा तांदळाच्या गाठी ढिगभर पैका आसणारांची बी लग्न मोडल्याती तिथ आपलं काय घ्यवून बसलीस? पर नवसीच नसीब चांगल तशी आकनी म्हणली आर यंक्या काय झाल ते तरी सांगकी मग म्हणला अग ताय काल बघून गेलेल्या पावण्यात करंजगावचा एक पावणा आला व्हता त्येनं त्येच्या पोरासाटनं नवसीला निवडलीया ते बी बिन हुंड्यापान्याचं तशी आकनी म्हणली मजी रं ! आग ताय पावणा लई शाना. त्येनं नवसीच गुण न् तिच देखूनपण बघीतलं न् म्हणाला सुन आम्हास्नी आवडली तिच्या म्होरं करणी धरणीला काय द्याची हाय किंमत तवा तुम्ही नुसत पोरीला घ्यवून या तांदूळ टाका न् जा त्यो बी खरचं आम्ही करु असं पावण्याचं म्हणणं यंक्यान आपल्या भनीला सांगितलं न् तिला इचारलं मग काय करायचं? तशी गळ्यातनं पेड पडल्यागत खुस व्हवून आकणी म्हणाली, आरं यंक्या नवसीच्या लग्नाच आता आम्हास्नी आता कसलच वज उचलायचं न्हाय. हे बरच हाय की परं आपल्या जाण्या-येण्याच बी त्येनीच बघायचं हे काय बर दिसत का? तवा आपण तेवढं तरी काराया पायजेल की तसा यंक्या म्हणला ताय तुला वचन दिल्या परमाणं पाच चार हजाराला हातभार लावीन म्हणल्या परमाण त्या पैशात तोळाभर सोन्याचा एकादा डाग करुन घालीन की मी माझ्या लाडक्या भाचीच्या गळ्यात तिला तरी रिकामं धाडायला आम्ही खुळ हाय व्हय. तसा यंक्या करंजगांवला गेला न् पावण्यास्नी तारीख धराया सांगितली. तसा पावणा यंक्याला म्हणला पावणं आता तुम्ही आला यसा तर बामना कडनच चोखाळा काढु ये दोघं जण बामनाकडनं म्हुर्त, तारीख बघुन आलं. घरला येवुन भनीला सांगितलं ताय उध्याच्या सोमवारी उरकुन टाकुया म्हंतोय पावना, तवा लागा तयारीला तसी आकनी म्हणाली नवसे देव हाय परं जाण्या-येण्या साटनं जरी झालं तरी हजार दोन हजार रुपै तरी नगतं का आपल्याकडं का नुसतच त्वांड घ्येवुन जायाचं. दारातली मेंडी आता दिसात हाय आज ना उद्या ती येईल तवा ती ईयाच्या आधी तिला इकुन टाकु तेवढ रुपै रगड होत्याल न् आयतवारी ढालगांवच्या बाजारात मेंडी घेवुन जाणार तवर करंजगांवच पावण येवुन दाखल झालं न् म्हणल नेमा परमाणं आम्ही पोरीला कुंकु लावायसाटनं आलोया. बाकीच काय करत बसु नकासा नुसती साखर तोंडात घाला मजी झालं तसी आकनी घाईघाईनं गावात गेली न् तिनं उधारीन दोन चोळ्या तिन टोपी टावील घ्येवुन आली. कुंकु लावला न् टावील टोपीचा कार्यक्रम झाला आपलं लगीन व्हनार आपल्या आईबाची काळजी दुर व्हनार ह्येन नवसी जरा आनंदातच व्हती न् ह्यातच भर म्हणून आकनी म्हणाली नवसे म्या तुझ्यसाठी येक जिन्नस ठिवलाया माझ्या  बी लग्नात माझ्या आईनं मला दिला व्हता तो मी तुझ्या गळ्यात घालणार हाय म्हणून लाकडाच्या मोठ्या पेटीत पितळच्या डब्यात ठेवल्याली जरटिक काढुन नवसीला दावली नवसी गळ्यात घालुन बघणार तोच... दारात बांधल्याली मेंडी मोठ्यानं वराडली तशी आकनी-नवसी भायर आल्या बघत्यात तर मेंडी ईया ला लागली व्हती तवर पावण्यास्नी घालवाया गेल्याला जिजाबा मेंढीचं वराडने आयकुन पळत आला तर मेंडीन वरडुन वरडुन जिव सोडला व्हता. ल्हावार आडवं आल व्हत ! झालं... नवसीच्या लग्नाला जायाच्या तयारीवर गदा आली व्हती. म्हणुन रागा वैतागानं आकनी बोलुन गेली म्हणली ह्या रांडच्या पायात आवदसा हाय. सपाट पायाची. हिच लगीन जुळना का जुळल्याल, व्हईना हे बोलणं नवसीला चांगलच झोबलं न् आत जावुन रडाय लागली.

तवर मेंढीला पुरुन टाकण्यासाठी कोडींबच्यातन कुदळ न् खोरं आणाया म्हणून तिकडं धाडलं न् जिजाबा मेंडीला उचलुन घेवुन आपल्या घरामागल्या उरिड्यापाशी आला तवर आकनीबी हत्यार घेवुन आली. डबर काढुन पुराय साठी जिजाबा भुई कुदळीनं उकराय लागला. चार सहा पाट्या मातीवर काढली. आसल नसल न् मेडीला हळद कुंकु आणाय गेलेल्या आकनीला जिजाबानं हाळी दिली न् म्हणला आकने अग माझ्या लेकीच्या पायात आवदसा हाय म्हणलीस नै का ! बघ त्या डबऱ्यात मला काय घावलं !!! तो धनाचा हांडा व्हता. त्यात तवर आकणीनं फोडल्याला हंबरडा त्याच्या कानावर आला. आक्रोष करत म्हणत व्हती धनी आता माझ्या लेकीचा कसलाच खर्च नाय व तुम्हास्नी तसं त्या डबऱ्यातल्या हांड्यावर घमेल पालत घातनं न् घराकड पळत आला न् बघुन नवसे माझ्या लेकी म्हणुन मोठ्यानं टोहो फोडला. तस शेजा–पाजारी तिकडं धावल न् साऱ्यांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. आया–बायाचं डोळ पाण्यानं डबडबलं. नवसीन आपल्या घरात गळफास लावुल घेतला व्हता. आपली आई आज आपल्याला सपाट पायाची म्हणली. आपल्या पायात आवदसा हाय म्हणली ह्येचच दु;ख तिच्या काळजात खोलवार जखम करत गेल व्हंत.

झालं,. शेवटाला म्हसनात तिची चिता पेटली न् बघता बघता लाडाची लेक मातीत मिसळली थोड्याशा गोष्टीचा राग घरुन नवशी आपल्या गरीब आईबाच्या मायेच्या पदराखालनं निसटुन परांगंदा झाली व्हती ती परतुन कधी न येण्यासाठी का पुण्यादा कुणाला न दिसण्यासाठी नवसी नव्हती. भुमी आईनं ते धन जिजाबाला दिलं व्हतं. परं हे कळायच्या आत काळानं नवसीवर झडप घातली व्हती. सात हांड धन व्हतं ते आता जिजाबा न् आकनी त्या धनाचा उपेग गोरगरीबाच्या लेकी बाळीची लग्न लावुन देण्यासाठी करत व्हती. आपल्या भावाच्या यंक्याच्या बी पोरीचं लगीन आकणी, जिजाबानं मोठ्या थाटात करुन दिलं न् नवशीच्या गळ्यात घालायसारखं आजवर काळजात दडवुन ठिवल्याली दोन तोळ्याची वजरटिक तिनं आपल्या भाचीच्या गळ्यात घातली.

# मराठी माझा अभिमान

कु. प्रतिक्षा प्रभाकर माने
बी कॉम २

" लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य एकतो मराठी "

मराठी ही एक खूप संदुर भाषा आहे जी मुख्यतः महाराष्ट्रात आणि थोड्या प्रमाणात गोवा येथे बोलली जाते. मराठी भारतातील २२ आधिकृत भाषांपैंकी एक आहे. मराठी भाषा ही भारतात सगळ्यात जास्त बोलली जाणारी चौथी भाषा आहे. मराठीच्या मुख्य चार पोटभाषा आहेत, त्या म्हणजे वऱ्हाडी, कोळी,मालवणी आणि कोकणी. मराठी भाषा चौथ्या शतकापासून आस्तित्वात आहे. म्हणूनच मराठीला अभिजात भाषाचा दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न चालू आहे. आपण मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी ला साजरा करतो. त्यादिवशी आपले साहित्यकार कुसुमाग्रजांचा वाढदिवस आसतो.

११८७ इ. स. नंतर यादव काळात मराठीचा वापर वाढला. यादव राजे आधी कन्नड आणि संस्कृत भाषा वापरत असत. १४०० शतकाच्या शेवटी पर्यत मराठी वर्णलेखाची प्रमुख भाषा झाली होती. असे मानले जाते की, यादवानी प्राधान्य मराठीला दिले कारण मराठी बोलणाऱ्या प्रजेशी स्वतःला जोडण्याचा प्रयत्न करत होते. यादव राजवटीतील शेवटच्या तीन राज्याच्या काळात ज्योतिष,पुरान, आयुर्वेद, वेदांत वर मराठी साहित्य गद्य आणि काव्य स्वरुपात तयार करण्यात आले.

आज मराठी ज्या रुपात जिवंत आहे ते फक्त शिवाजी महाराजांमुळेच त्यांच्या काळात मराठीला खरे महत्व प्राप्त झाले. शासकीय कामकाज आणि बोलीभाषा म्हणून मराठीचा विस्तार झाला. मराठी भाषावरील पार्शीयन भाषेचा प्रभाव या काळात कमी झाला. जसा जसा मराठी साम्राज्याचा विस्तार झाला तसा मराठीचा ही विस्तार झाला. या काळात मराठी ही मोडीलिपीत लिहली जात होती.

बऱ्याच वर्षापासून इंग्रजी माध्यामातून शिक्षणप्रणाली आल्यापासून मराठी माध्यमातील शिक्षणाला महत्व देणे कमी झालेले दिसत आहे. मराठी भाषेतील साहित्य, कविता, नाटके,प्रवासवर्णन, निबंध,लघुनिबंध यांचा दर्जा बघितला तर गर्व वाटतो. मराठी साहित्यातील साहित्यकांरानी आपल्यासाठी अतिशय मोलाचा ठेवा ठेवला आहे. ते आपण मुलांना वाचण्यास प्रवृत्त करायला हवा. आपल्या माहाराष्ट्राला बऱ्याच संताचा ठेवा लाभला.

भाषा कोणती असो, ती संस्काराचे, संस्कृतीचे आणि विकासाचे प्रभावी माध्यम आहे. भाषेच्या माध्यमातून आजचा मानव अत्याधुनिक बनला आहे. आपले मत, आपले विचार दुसऱ्या व्याक्तिपर्यंत पोहोचविण्याचे महत्वपूर्ण आणि सशक्त माध्यम म्हणजे भाषा. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषोचे संवर्धन करणे आवश्यक आहे. किंबहुना तंत्रज्ञानाच्या युगात वेगवेगळ्या भाषांसोबत आता मराठी भाषेचा वापर इंटरनेट चा उपयोग करणाऱ्याकडून होतो आहे, ही मराठी भाषक म्हणून आपल्यासाठी नक्कीच अभिमानाची बाब होय. महाराष्ट्रातील मराठी भाषा आणि इथल्या संतांची परंपरा हेच शिरवाडकरांच्या

श्रद्धेचा विषय होतो.

'माझ्या मराठी मातीचा
लावा ललटास टिळा
तिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यातील शिळा'

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या अवघ्या चार ओळीतून मराठी भाषेच्या स्वाभिमान उगवत्या सुर्याप्रमाणे प्रकाशमान झाला आहे. मातृभाषेतून अध्ययन व्हावे हा कुसुमाग्रजांचा आग्रह होता. ते अनेकदा म्हणायचे समाजाची प्रगती वा क्रांती स्वभाषेच्या किनाऱ्यावरच पेरता येते. आज मराठी भाषा व शिक्षणातील मराठी माध्यम याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मातृभाषेला दूर लोटून इंग्रजीची आराधना करणे हे भविष्यातील अनेक समस्यांना निमंत्रण देण्यसारखे आहे. मातृभाषेतून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यामुळे मुलांना कुटुंब, समाज यांच्याविषयी आस्था, वाचनाची गोडी, कविता आणि सामाजिक समरसता निर्माण होते. पण गेल्या दशकापासून इंग्रजी माध्यमातील शिक्षण पाल्याला देण्यावर पालकांचा भर आहे. काही पालकांना वाटते की मराठी किंवा मातृभाषेत शिक्षण घेतल्यामुळेच उच्च शिक्षणात इंग्रजी माध्यम असल्यामुळे समस्या निर्माण हाईल. पण पालकांच्या आग्रहामुळें मुलाला नीट इंग्रजीही येत नाही व पूर्णपणे आपली मातृभाषाही बोलता येत नाही. आजच्या घडीला शिक्षणाच्या विकासाचा जो डोंगर निर्माण झाला आहे, त्याला भाषेने आधार दिला आहे. संत ज्ञानेश्वर यांनी 'ज्ञानेश्वरी' सारखा ग्रंथ लिहीला आहे तसेच 'पसायदान' लिहले आहे. संत रामदास स्वामी यांनी मनोच श्लोक लिहले आहेत. या दर्जेदार लिखाणाला न विसरता वाचन, लेखन चिंतन करायला हवे.

मराठी ही एक प्राचीन आणि सुंदर भाषा आहे. तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळालाच पाहिजे. बदलत्या काळात इंग्रजी सुद्धा शिकली पाहिजे, हिंदीसुद्धा शिकली पाहिजे पण जो गोडवा मराठी भाषेत आहे तो कशातच नाही. आपण वेळेनुसार बदलली पाहिजे पण याचा अर्थ असा नाही की आपण आपले मुळ, आपली भाषा, आपली संस्कृती विसरली पाहिजे. या सोबत आपण हे पण लक्षात ठेवले पाहिजे की आदर, प्रेम हे परस्पर असते, म्हणजे दोन्ही बाजुंनी ते असावे लागते. जर आपल्याला भारतात, जगात मराठीला आदर आणि प्रेम मिळवून द्यायचे आसेल तर आपली दुसऱ्या भाषेचाही आदर केला पाहिजे.

''मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा,
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा !''

मराठी ही महाराष्ट्राची लोकभाषा, मातृभाषा व एकमेकांशी संवाद करण्याची भाषा म्हणून निदान सातशे वर्षे सातत्याने वापरात आहे. आपण ज्या भाषेत जन्मतो, वाढतो ती भाषा आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग असते आचार, विचार, भाषा व वेशभुषा यांची अनुकरण प्रक्रिया कालानुसार व परिस्थिती नुसार बदलत असली तरी ती एका ठराविक संथ गतीने प्रवाही राहिल्यास सामाजातील घटकांना त्यापासून धक्का बसत नाही. साहित्यिकांनी मराठी भाषेला नटवून थटवून सुंदर केले, शुद्ध केले. महाराष्ट्रातील आचार, विचारांच्या परंपरांनी मराठी संस्कृतीची जडणघडण केली. हे सर्व स्वातंत्र्यपूर्व काळात सहज संथप्रवाही स्थितीत बहरत राहीले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर मराठी भाषिकांना मात्र वेगळे राज्य न दिल्याने महाराष्ट्रावर अन्याय झाला व मराठी अस्मिता दुखावली. त्याचेच प्रत्यंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीत हाऊन तेरा वर्षे एकीकडे वनवास व दुसरीकडे लढा यात माणसे व वेळ खर्ची पडली.

''माय मराठी, साद मराठी
भाषांचा भावर्थ मराठी
बात मराठी, साथ मराठी
जगण्याला या अर्थ मराठी''

माझी माय म्हणजे मराठी. मायेच्या ममतेचा ठायी ठायी प्रत्यय देणारी, अगदी भुईकमळा सारखी उमललेली माझी मराठी आईमध्ये जशी विविध रुपे एकवटलेली असतात तशी विविध रुपे माझ्या मराठीची आहेत. भाषिक वाङमय अक्षर होण्याआधीपासूनचा प्रवास पाहिला तर अनेकांगी रुपे मराठीची दिसतात. प्रत्येक बारा मैलावर भाषा बदलते म्हणतात आपल्या मराठीची पण अगदी थोड्या थोड्या स्वरुपाचे ढोबळ बदल दाखवणाऱ्या बोलीभाषा आहेत. बोलीभाषा आणि लोकसाहित्य ह्या खरेतर त्या त्या सामाज जीवनाचा आरसाच ! प्रमाण भाषा अन बोली भाषा असे दोन प्रकार भाषेचे आहेत. मराठी मनाच्या मानसिक जडणघडणीचा प्रावास मराठी भाषा दाखवते. मराठी भाषा सप्ताहामुळे एक मराठीच्या इतिहासाला उजाळा देताना जाणवते.

''उद्धारीली ज्ञानदेवे जगती
मायबोली मराठी भाषा
अमृताची घेऊन ती गोडी
जगी वाढेल मराठी भाषा''

महाकवी कुसुमाग्रज म्हणजे वि. वा. शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मायबोली मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत युनेस्कोच्या पुढाकाराने जगातील सर्व भाषाना एकाच पातळीवरुन सन्मान देण्यासाठी सन २००० पासून २१ फेब्रुवारी हा 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन' साजरा करण्याचा उपक्रम सुरु केला. या दोन्ही सुदिनाचे औचिंत्य साधून २१ ते २७ फेब्रुवारी हा आठवडा मायबोली मराठी सप्ताह म्हणून साजरा केला जातो. हे दोन्ही दिवस आपल्या मायबोलीच्या सन्मानाचे आहेत.

काल परवा कुणीतरी मराठी भाषा मरणाच्या उंबरठ्या वर... मराठी मराठी करणारांच्या नाकाला मिरच्या झोंबाव्यात असे वादग्रस्त विधान करुन खरं तर मराठी विषयी परखड मत मांडले. आपल्याला मराठीत सही करण्याची देखील लाज वाटते मराठी भाषा अस्तित्वात राखण्याऐवजी व्यवहारशुन्य भाषा अशी अवहेलना करण्याचे आरिष्ठ असे साहस दाखवले जाते.

महाराष्ट्र शासन व्यवस्था इंग्रजीच्या आहारी गेलेली आहे. अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थीची यादी इंग्रजीतून प्रसिद्ध केलेली आहे. पोट भरण्याची मारामार, गरीब, गरजू आणि ग्रामीण भागातील ज्यांना साध मराठीचं ज्ञान अवगत नाही त्यांना इंग्रजीचा आधार घेऊनच सुविधा प्राप्त हाणार असतील तर आपले सत्ताधारी मराठीच्या नावाने २७ फेब्रुवारीला ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार व कविश्रेष्ठ वि. वा.

शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्ताने मराठी भाषा दिन साजरा करतील. जय हो चा उद्‌घोष करीत मराठीचा गुलाल या दिवसापुरता सर्वत्र उधळेल.

आम्ही मराठी माणसे इंग्रजीच्या इतके आहारी गेलेलो आहेत की, मराठी भाषा लिहिणे, वाचणे, बोलणे वा तिचा अभ्यासासाठी आणि जीवन व्यवहारासाठी माध्यम म्हणून उपयोग करणे यात आपल्याला अभिमान किंवा गौरवास्पद वाटण्यापेक्षा कमीपणा वाटत आहे. संत ज्ञानेश्वरानी ती आमृताला जिंकणारी भाषा आहे. हे मराठीला दिलेले सुवर्ण रत्नजडित प्रशस्ती पत्र.

एखाद्या शिंपी कामाचे दुकान या ऐवजी ज्ञानेश्वर अथवा तुकारामासारख्या संताचे नाव देऊन टेलरिंग फर्म अस्तित्वात येते. इंग्रजी भाषा ही जगातील एक समर्थ, सुंदर, संपन्न, रसाळ भाषा आहे. याबद्दल दुमत नाही. त्या भाषेचा  मत्सर करण्याचे कारणही नाही. इंग्रजी शिवाय जगात ज्ञान मिळत नाही. इंग्रजी ज्ञानभाषा आह. हे आपण बहुतेक जन सांगताना आढळतात, इतर सर्व भाषा अज्ञानभाषा आहे का...? पण अवास्तव महत्व देण्याचे कारण काय...?

कुंटुंबातील आईची जागा ही आईचीच आणि मावशीचीच जागा मावशीला हे अलिखीत सुत्र आहे. त्या प्रमाणे भाषेबाबतीत असले पाहिजे. मुंबई शहरात मराठींच्या शाळा ओस पडताहेत. इंग्रजी शाळा अव्वाच्या सव्वा देणगी, फी आकारुन गब्बर होत आहे. श्रमजिवी, कष्टकरी समाजाला दोन वेळेच्या अन्नाची भ्रांत तरी देखील पोटाला चिमटा काढून पालक आपल पाल्य इंग्रजीत शिकला पाहिजे हा अट्टहास का करताहेत...? ही स्पर्धा महाराष्ट्रातील शेतमजुराला, कामगारांना परवडणारी नाही. इंग्रजी शिडीचा आधार घेऊन गरिबांचा फायदा तर नक्की नाही. मुंबई शहरात मराठी शाळा आहेत. त्यामध्ये इंग्रजीचे अध्ययन होत आहे. या शाळांमध्ये गरीब व अशिक्षीत पालकांच्या मुलांना थारा नाही. पाल्याच्या प्रवेशापूर्वी पालकांची मुलाखत घेऊन त्यातून प्रवेश ठरविला जातो. जे पालक मुळात अशिक्षीत आहेत त्यांनी कधी शाळा कॉलेज पाहिले नसेल त्यांना त्यांच्या मुलांना उच्च वस्तितील शाळा प्रवेश नाकारुन नेमके काय साध्य करतात? मराठी बरोबर इंग्रजीचा उत्तम अभ्यास आजच्या तरुण पिढीने करावा. पण इंग्रजी माध्यमात मराठीला दुजाभाव देऊन नाही.

कवि सुरेश भट यांच्या खालील रचनेतून आपणास बरेच काही उमजले असेलच

"पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी !<br>
आपुल्या घरात हाल सोसते मराठी !!"

मराठीची महती आपण गातो, प्रसार करतो. मराठीचा ठसा सर्वत्र उमटविण्याचा प्रयत्न करतो. पण शासन याबाबत किती उदासीन आहे. महापालिका, नगरपालिका, मराठी संदर्भात किती बेफिकीरीने वागतात. मंत्री, आमदार, खासदार, नगरसेवक अन्य लोकप्रतिनिधी चे इंटरनेटवर ईमेल आहेत. किती तरी लोक त्यावर त्यांच्याशी सर्व सामान्य विषयावर मराठीतून हितगुंज करु पाहतात. समस्यांचा उहापोह करु इच्छितात. समस्या निवारणेचा हेतू असतो. पण कोणता प्रतिनिधी त्याची दखल घेतो? आता पर्यंत त्यांनी कुणाला उत्तरे दिली आहेत. आम्ही आपल्या प्रश्नावर कार्यवाही करु...! संगणक प्रणाली वरुन जर लोकप्रतिनिधींना लोंकाशी सुसंवाद साधण्याचे साधन उपलब्ध झाले असेल तर काय हरकत आहे. मराठी पत्रे आली तर त्या संगणकांवर त्या प्रकारचा Font असावयास हवा. आपण

इतके गांभीर्याने का घेत नाही. मंत्रालयातील मुख्यामंत्री असो वा मंत्री साधी पोहच पावती देणे देखील जीवावर येते. शिक्षण शास्त्रज्ञ देखील मान्य करतात की, शिक्षण मातृभाषेतून दिले जावे. आपल्या आजुबाजूला उच्च शिक्षण घेतलेले संशोधक, डॉक्टर, अभियंता झालेले पाहिले तर त्यांनी मातृभाषेत शिक्षण घेऊन प्रगती केली आहे. मुलांच्या कर्तृत्वाला उजाळा देण्याचे काम मातृभाषा करते. त्यामुळे मुलांना मातृभाषेवर व बोलीभाषेवर प्रेम करायला शिकवा. हेच वारंवार संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी आपल्या काव्यातून पटवून देण्याचा अट्टहास केला आहे.

''माझा मराठीची बोलु कौतुकें ।
परि अमृतातेंही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिकें । मेळवीन ।।''

आज जगात सहा हाजार भाषा बोलल्या जातात. वीस लाख लोक तिनशेच्या वर भाषा बोलतात. भाषिकांच्या संख्येनुसार मराठी भाषा देशातील चौथ्या क्रमांकाची भाषा आहे तर जगातल्या असंख्य भाषांमध्ये मोठे समुह बोलणाऱ्यामध्ये मराठीचा पंधरावा क्रमांक लागतो.

कोणत्याही राज्याचा नागरिक हा ज्या राज्यात वर्षानुवर्षे राहतो त्याला त्या राज्याची मातृभाषा शिकणे–बोलणे अनिवार्य असायलाच पाहिजे. कारण प्रत्येक राज्याचा कारभार हा त्या त्या राज्याच्या भाषेत चालतो. परंतु महाराष्ट्रात मराठीचा द्वेश असणाऱ्यांनी या गोष्टीला सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी महाराष्ट्र सरकारने मराठीबाबत आग्रही भूमिका घेतली नाही.

मराठी ही मायबोली असणाऱ्यांसाठी हा ठेवा आहे. तेव्हा मराठी भाषेचे भवितव्य काय? या विषयावर फक्त चर्चा करुन चालणार नाही. मराठी भाषेपुढे आव्हाने काय आहेत हे महत्त्वाचे आहे. मराठी भाषा जीवंत राहावी या साठी प्रत्येक मराठी माणसाने प्रयत्नशीलता आणि प्रयोगशीलता दाखवायला हवी. यासाठी प्रत्येकाकडे वेगवेगळे उपाय असू शकतात. प्रत्येकाने कल्पनाशक्ती वापरून ती टिकविण्याचे आणि समृद्ध करण्याचे प्रयत्न करायला हवेत. कारण आपल्या भाषेंचा विकास करणे आणि तिला उत्तम दर्जा प्राप्त करुन देऊन उच्चपदी नेहने हे आपल्या सर्व मराठी माणसांचे कर्तव्य आहे. ते सर्वांनी पार पाडायला हेव.

''आमुच्या मनामनात दंगते मराठी,
आमुच्या रंगारगांत रंगते मराठी,
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी,
आमुच्या नसानसात नाचते मराठी ।।''

भारताबाहेचा मराठी समाज हा मुख्यातः धनिक वर्ग आहे त्यामुळे मराठीच्या संवर्धनार्थ कार्य करणे त्यानां सुलभ जाते सर्व क्षेत्रातील मराठी श्रेष्ठ दिग्गज व्यक्तींना महाराष्ट्रातून आमंत्रित करुन मराठीचा संपर्क कायम ठेवणे हे पैशाच्या पाठबळावर सोपे काम आहे. मराठीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा ते भरपूर उपयोग करीत असतात. तिकडील मराठी संस्था व त्यांचे कार्यकर्ते मराठीच्या संवर्धनार्थ नेहमी प्रयत्नशील असतात. हे उल्लेखनीय व अभिनंदनीय आहे.

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती यांत इतरांना देण्यासारखे खरंच काही नाही का, असा प्रश्न

मला नेहमी पडतो. असेल तर ते नेमके काय आहे ? असे देणे इतरांना आमच्या हातून दिले गेले नाही की इतरांनी ते जाणीपूर्वक स्वतःच्या अभिमानासाठी टाळले, की आमच्या लेणी त्यांना क्षुल्लक वाटली ?

खरे तर सध्याचे जग हे स्पर्धेचे जग आहे. त्यात निरनिराळ्या भाषांची वर्चस्वासाठी स्पर्धा टाळता येणार नाही. मराठीपुरते बालायचे तर मराठीने आपली खिडक्या दारे दुसऱ्यांना आत शिरण्यासाठी सदैव खुली ठेवली. आपण त्यांची भाषा शिकलो ते त्यांच्या भाषेतील साहित्य आमच्या भाषेत आणण्यासाठीच.

''दगड झालो तर सह्याद्रीचा होईन
माती झालो तर महराष्ट्राची होईन
तलवार झालो तर भवानीमातेची होईन
पुन्हा मानव जन्म मिळाल्यास मराठीच होईन.''

# जनसामान्य लेखक : अण्णाभाऊ साठे

कु. प्रमोद कृष्णदेव यादव
बी कॉम

महाराष्ट्र हा विविधतेने नटलेला आहे. या महाराष्ट्राच्या मातीमध्ये विविध वृत्ती, प्रवृत्ती निर्माण झालेल्या दिसतात. त्यातुनच अनेक अशी उतुंग व्यक्तिमहत्त्व जन्माला आलेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे या दिग्गज व्यक्तिमत्वाचे विचारधन निर्माण केलेले आहे. त्यातीलच एक म्हणजे अण्णाभाऊ साठे त्यांनी मराठी साहित्यात महत्तपूर्ण अशी कामगिरी केली आहे. सर्वसामान्य दीनदुबळ्या कष्टकरी, माणसाचं दुःख साहित्यामधून मांडलेले आहे. कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, नाटक, शाहिरी, इत्यादी वाङमयामध्ये मोलाची भर घातलेली आहे.

अशा या व्यक्तित्वाबद्दल माझ्या विचाराप्रमाणे मांडणी केली आहे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० साली वाटेगांव जि. सागली येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नांव भाऊराव साठे, त्यांच्या आईचे नांव वालुबाई साठे.

स्वांतत्र्याच्या या घटनेचा अण्णाभाऊंनी सखोल विचार केलेला दिसतो. त्यांचे वय त्यावेळी अवघ्ये २७ वर्षाचे होते. ते हाडाचे कार्यकर्ते होते. त्यांची बुद्धी चौकस होती. परिस्थीतीचे यथार्थ अवलोकन करण्याची सक्षम कुवत होती. येथे एक गोष्ट आपण ध्येनात घेणे आवश्यक आहे असे मला वाटते, की प्रस्थापीत वर्गाची शिक्षणाची परिभाषा अत्यंत कुचकामी अशी आहे. आम्ही सगळ्यांनी ही परिभाषा (व्याख्या) स्वीकारलेली असून ती मान्यही केलेली आहे. या परिभाषेतून अण्णाभाऊ केवळ दिड दिवस शाळेत गेले होते. शाळा म्हणजे चार भिंतीची खोली, त्यात एक फळा, हातात छडी घेतलेली एक पांढऱ्या पोषाखातील मास्तर आणि त्याने जे शिकविले ती शाळा. वर्गिय दृष्टीकोणातून अण्णांनी साहित्य निर्माण केले. पण आयुष्याच्या शेवटच्या  काळात हा विचार भारतीय समाजात अपुरा ठरतो त्याची जाणीव अण्णाभाऊंना झालेली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या चळवळीबद्दल त्यांना विशेष आकर्षण होते.

या चळवळीबद्दल आत्मियता होती. जेव्हा दलित साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनाची जबाबदारी एकवेळी त्यांच्याकडे आली तेव्हा ती त्यांनी आनंदाने स्वीकारली आणि तिच संधी समजुन जातीशोषणाविरुद्ध लेखणी चालवली ''जग बदल घालुन घाव, सांगुन गेले मज भिमराव'' हे क्रांतीगीत त्यातुन जन्माला आले. या गीतातून जातीची  जन्मधिष्ठतता अण्णांनी आधोरीखीत केली. जातीव्यवस्थेच्या  पदसोपात्मक रचनेत दलित जातींना सर्वात तळात ढकलुन हिन मानले गेले. अण्णांनी लिहीले, ठरवुन आम्हा हिन कलंकित, जन्मोजन्मी करुन अंकित निर्मुनी हा भेदभाव उच्च जात वर्गियांना तळाच्या समाज घटकांना आंकित करुन ठेवले व त्यासाठी धर्मशास्त्राचा वापर केला. त्यातुन जातीय विषमता, गुलामगिरी लादली गेली.

हे वास्तव अण्णांनी पुढे आणले आणि म्हणूनच ते वर्गिय वास्तवाकडे वळलेले दिसतात. अण्णाभाऊ साठे हे क्रांतीकारी बुध्दिजीवी कार्यकर्ते होते. आणि म्हणूनच मोर्चात पायी चालून घोषणा देत सहभागी होऊन त्याच प्रश्नांवरची गाणीही त्यांनी लिहिली. आयुष्यात अखेरच्या काही वर्षात वाढत्या गरजा आणि त्या पुरवण्यासाठी साधनांची कमतरता यामुळे कधी जाणुनबुजून, कधी इच्छा नसताना तर कधी, असहायतेपोटी त्यांना आपल्या कथेचे कादंबरीत, कादंबरीचे कथेत, नाटकात किंवा लोकनाट्य रुपांतरं करावी लागली असे असले तरी मराठी साहित्यातील एक कथालेखक म्हणुन त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

अण्णाभाऊच्या कथांचे साधारधपणे पुढील प्रकारा मध्ये वर्गिकरण करता येईल.

१) सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय व दलित जीवनावरील कथा
२) कलात्मक व विनोदी कथा
३) शोकान्त व ऱ्हदयद्रावक कथा
४) गुन्हेगारी, जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा
५) आत्मचारित्रात्मक कथा
६) गुन्हेगारी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा
७) अंधश्रद्धाविरुद्धाच्या कथा
८) प्रेमकथा
९) कौटुंबिक कथा

एका झाडाखाली तीन दगडांची चुल करून मडक्यात अन्न शिजवून दोन मूलं नि बायको यांना जगविणारा हा दलित कंगाल दिसला तरी त्याची संसार करुण्याची इच्छ केव्हाही पवित्र अशिच असते. कुटुंबसंस्थेचा त्याचा विश्वास मुळीच ढळलेला नसतो. परंतु त्याची कुटुंब व्यवस्थाच भांडवलदारी जगाने त्या झाडाखाली हाकलून दिलेली असेल. त्याचे काही निरीक्षण करावे. याचे कारण परंपरा शोधावी आणि मग त्या कंगाल दिसणाऱ्या विषयी लिहावी. जपुन लिहावे. कारण या समाजाची धडीनूधडी त्या दलितांना व्यापलेली आहे. अधिक काव्यमय शब्दात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, ''हे जग, ही पृथ्वी, शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.'' अशा या दलितांचे जीवन खडकातून झिरपणाऱ्या पाझराप्रमाणे असते. ते जवळ जाऊन पहा. मग लिहा कारण ''जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे'' हे तुकारामांचे म्हणणे खोटे नाही. वरील उद्‌गार आहेत कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांनी १९५८ ला केलेल्या दलित साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनपर भाषणातील अण्णाभाऊंचे हे केवळ भाषण नव्हतेः अण्णाभाऊंच्या संवेदनशिल मनवी मनाचा तो आविष्कार होता. कारण जीवन माणसं शब्द देतात पण पाळत नाहीत, शब्दाशी जगत नाहीत. अण्णाभाऊच मत अगदी उलट आहे. जीवनात अण्णाभाऊनी दिलेला प्रत्येक शब्द पाळला. ते शब्दांनी जगले, शब्दांशी नाते जोडुन त्याच्यशी इमानेइतबीर जीवनभर साथ दिली. ''कुत्र्या मांजरासारखे जगु नका अन्यायाचा प्रतिकार करा. मनगटाच्या भरोशावर जगा'' अण्णाभाऊचे हे विचार आज, काल, भविष्यात परिस्थिती कितीही बदललेली असो परंतू ते तंतोतंत लागू पडतात.

आण्णाभाऊंच्या हातून मराठी साहित्यातील असा कुठलाच प्रकार दुर्लक्षून राहीला नाही. हे विशेष त्यांनी पोवाडा, लावणी, नाटक, लोकनाट्य, प्रवासवर्णन, कथा, कादंबरी आणि कविता या सर्वच साहित्य प्रकारास स्पर्शच केला नाही तर त्या–त्या साहित्यप्रकारात अनमोल स्वरुपाची भरच घातलेली आहे. असेच म्हणावे लागेल. अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे तावून सलाखून निघालेल्या दारिद्रयाच्या अनुभव धिष्ठीत पुरण्यांची खाण आहे.

अण्णाभाऊंच जीवन म्हणजे नियम आणि निसर्गाची प्रतिकृती, अक्षर ओळख नसलेला निरक्षर मुलगा. ज्याने दारिद्रय कोवळ्य वयात सोसले, उपेक्षेचे चटके सहन केले. वेठबिगार गिरणीकामगारांची पिळवणुक काळजात साठवली . स्त्री, दलित भाषीत आणि पिडीत यांचे नाकारलेल जगणं, गावशिवेच्या बाहेर हाकलुन दिले. त्यांच लाजीरवाण जगन अनुभवल. त्यातून त्यांनी वेगळाच वसा घेतला. मानव मुक्ती लढ्याचा. त्यांना ठाव होते साहित्य हे परिवर्तनाच्या चळवळीची बिज जनमाणसात रुजविण्याचे प्रभावी शस्त्र आहे आणि ते साहित्य शस्त्र अण्णाभाऊंनी उचलंल मुक्तीच्या लढ्यासाठी, ते लिहीत होते. त्यांच साहित्य हे बंद खोलीत बसून कल्पनेचे इमले बांधणारं, करमणुक करणार नव्हत, ते होते दुधारी शस्त्र उपेक्षिताना न्याय देणार आणि समाज कंठकांना नागवणारं.

महाराष्ट्र दलित संघाच्यावतीनं केलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात आण्णभाऊ म्हणतात आम्हाला ''गंगेसारखे निर्मल साहित्य हवे आहे. आम्हाला मराठी साहित्याचा थोर परंपरेचा अभिमान आहे. कारण मराठी साहित्याची नांदी आमच्याच जीवन संघर्षाने झडली आहे. जेव्हा दलितांची सावली असय्य होती, तेव्हा महानुभव पंथीय साहित्यीकांनी सर्वाना ज्ञान मिळवल पाहीजे. ज्ञान हे मोक्ष समजून बंड केले ते आमचे साहित्यिक माणसाला माणुस म्हणून जगता आलं पाहिजे असा दावा मांडून ज्यांनी दलितांच्या भाषेत महाराष्ट्रला सुंदर ज्ञानेश्वर दिले ते आमचे साहित्यिक. चुकलेले महाराष्ट्राचे पोर कडेवर घेणारे एकनाथ ते आमचे साहित्यीक. आम्ही आपल्या वर्गाचे इमान पटवुन त्यांच्या उपमर्द होणार नाही याची काळजी घेवुन साहित्य निर्माण करु. दलिताला आणि त्याच्या जीवनाला वरच्या पातळीवर नेण्याचा आपल्या कलेतुन प्रत्यत्न करुया'' अण्णाभाऊंच्या साहित्याने माणसाच्या गोळ्यांना आकार उकार दिला.

मुक्यांना शब्द, आंधळ्यांना दृष्टी आणि लंगड्यांना उभे राहण्याची ताकद दिली. प्रस्थापीतांच्या काल्पनिक साहित्याला क्षेद दिला. सुटाबुटातलया ठेरपेट्या शुद्ध सोलणारा विलासी नायक–नायीका बदलुन कष्टकारी कामगार, स्त्री, देवदासी, भटका विमुक्त यांच्या उद्धारासाठी कृतीशिल जीवनदायी साहित्याची निर्मिती केली. जातीपाती विरहीत समाजवादी आणि ध्येयवादी विचार त्यांनी मांडला. पण एवढं खरे की एकाच वृक्षाला विविध रंगी बेरंगी फुले लागावीत, अमृताची फळे यावीत, त्या विविधरंगी फुलांच्या विलोभनियतेवर रंगबेरंगी फुलपाखरांनी आसक्त व्हाव. भुग्यांनी गुजारा करावा. त्या फुलांच्या गंधानी आसमतांचा गाभारा भरावा...वाऱ्याच्या झुळकिने हळुवार गंध पसरावा... कस्तुरीचा सुगंध यात असाच आहे. अण्णाभाऊ नावाच्या वृक्षाला फुललेली डरवलेली सुगंधी फळ–फुल, कथा, कादंबरी, गित, शाहीरी, पोवाडे, नाटक, लोकनाट्य, प्रवास वर्णन असा आहे.

अण्णभाऊंच्या सप्तरंगी साहित्य जिवातूनच त्यांनी परिवर्तनाच्या चळवळीची बिजं पेरली ती

आता उगवत आहेत. ती बीज अक्षय रहावुन... समाज जीवनाला वाटाड्याच काम करीत आहे. १९५७ साली दलित साहित्य संमेलणाच्या अध्यक्ष पदावरुन अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यविचाराची मांडणी केली. आणि मराठी साहित्यविश्वाला हलवुन सोडले.

'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर उभी नसुन कष्ट करणाऱ्याच्या तळहातावर उभी आहे.' याचे त्यांनी पांढरपेशांना भान करुन दिले.

"जग बदल घालुनी घाव.
सांगुन गेले मला भीमराव."

अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आठवण दिली आणि दलित बांधवांना परिवर्तनाचे आव्हान केले.

"तुम्ही चळू नका
कुणी वळु नका
माग पळु नका
बिनी मारायची अजुन राहीली
माझ्या जिवाची होतीया काहीली
असा अखंड लढ्याचा संदेश दिला."

माणसाचा चेहरा विद्रुप दाखवणार नाही ही त्यांची प्रतिज्ञा होती. कलेला सत्याचा पाया हवा हा त्यांचा आग्रह होता. जीवनाशी जि कला जनतेची कदर करते त्याच कलेची जनात कदर करते हा त्याचा विश्वास होता. जीवनाशी कलेची नाळ जोडलेली पाहिजे हे अण्णाभाऊंनी निक्षुन सांगितले. त्यांचे साहित्य जीवनाच्या उमाळ्यात ज्वालामुखीसारखे उसळून आलेलं आहे.

दलित वर्गाचे अथांग जीवन दिसण्यासाठी लोककला एक दिव्य दृष्टी असावी लागते. तो त्या वर्गाशी एकनिष्ठ असावा लागतो. तो वस्तुनिष्ठ असावा लागतो. आणि त्याचा दलित वर्गाच्या सरळ न्यायी संघर्षावर नी त्याच्या अंतिम विजयावर विश्वास असला पाहिजे. म्हणजे तो लेखक ध्येयवादी असला पाहिजे. नी त्याची कल्पकताही तशीच हवी.

माणुस जगतो का ? नि जगण्यासाठी एवढा धडपडतो का ? याचा विचार करणे जरुरीचा आहे तो उंच गगनात गेलेल्या विद्युतमय मनोऱ्यावर उभे राहुन विजेच्या तारा जोडतो, खाणीत उभ्या कडलावर चडुन सुरुगांना पेट देतो किंवा पोलादाचा रस करणाऱ्य भट्टीवर तो निर्भय वावरतो. या सर्व ठिकाणी मृत्यु त्याची वाट पाहत असतो. कधी–कधी त्याची व मृत्युवची गाठ पडुन हा दलित मरण पत्करतो. ही जगण्याची आणि मरण्याची अगळी रीत आहे. ती समजावुन घ्यावी , सुरुगांना पेट देताना किंवा पोलादाच्या रसात लढून मरणे, नाही तर विजेच्या धक्क्याने मरणे आणि दिवाळे निघाले म्हणुन शेअर बाजारत मरणे या मरणातील अंतर मोजुन पाहवे, नि श्रेष्ठ मरण कोणते ते निश्चित ठरवावे.

दलितानांही सर्व भावभावना इतरांप्रमाणे सदैव जागृत असतात पण तो इतरापेक्षा जरा निराळा असतो. कारण तो हाडामासाचा केवळ गोळा नसतो. तो निर्मितीक्षम असतो, तो वास्तवक्षम असतो. जगात कष्टाचे सागर उपसुन दौलतीचे डोंगर रचतो. अशा या महान माणसावर महाकाव्य रचणारा त्याला

हवा असतो.

भारताचे पहिले लेखक ज्यांचे साहित्य हिंदी, गुजराती, उडीया, बंगाली, तमीळ, मल्याळी या भारतीय भाषांबरोबरच रशियन, झेक, पोलीश, इंग्रजी, फेंच अशा जगातील २७ भाषांमध्ये रुपांतर झाले आहे.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची साहित्य संपदा

अ) कथासंग्रह

१) बरबाद्या कंजारी २) चिरनगराची भूतं ३) निखारा ४) नवती ५) पिसाळलेला माणुस ६) आबी ७) फरारी ८) भानामती ९) लाडी १०) कृष्णाकाठच्या कथा ११) खुळंवाडी १२) गजाआड १३) गुन्हाळ

आ) नाटक

१) इनामदार

इ)शाहिरी

ई) तमाशा/लोकनाट्य

१) अकलेची गोष्ट २) खापऱ्या चोर ३) कलांगी ४) बिलंदर ५) बुडवे ५) बेकायदेशिर ६) शेटजींच इलेक्शन ७) पुढारी मिळाला ८) मूक मिरवणुक ९) माझी मुबई १०) देशभक्त घोटाळे ११) दुष्काळात तेरावा १२) निवडनुकीत घोटाळे १३) लोकमंत्र्याचां दौरा १४) पेंग्याच लगिन

उ) प्रवासवर्णन

१) माझा रशियाचा प्रवास

ऊ) कांदबऱ्या

१) आग २) आघात ३) अहंकार ४) अग्निदिव्य ५) कुरुप ६) चित्रा ७) फुलपाखरु ८) वारणेच्या खोऱ्यात ९) रत्न १०) रानबोका ११) रुपा १२) संघर्ष १३) आग १४) गुलाम १५) डोळे मोडीत तारा चाले १६) चंदन १७) मुर्ती २०) मंगला १८) मथुरा १९) मास्तर २०) अलगुज २१) चिखलातील कमळ २२) रानगंगा २३) माकडीचा माळ २४) कवढ्याचे कणीस २५) वैजंता २६) आवडी २७) धुंद रान फुलाचा २८) वारणेचा वाघ २९) फकिरा ३०) वैर ३१) पाझर ३२) सैरसोबत

ए) प्रसिद्ध पोवाडे

१) नांनकीत नगरापुठे २) स्टॉलिनग्राडचा पोवाडा ३) बर्लिनचा पोवाडा ४) बंगालची हका ५) पंचाब दिल्लीचा दंगा ६) तेलंगणाचा संग्राम ७) महाराष्ट्रची परंपरा ८) अमवनेरच अमर हुत्यात्मे ९) मुंबईचा कामगार १०) काळ्याबाजाराचा पोवाडा

एकुण ९० पुस्तके

अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीवर आधारीत चित्रपट

| | | |
|---|---|---|
| १) वैजयंता | – | वैजयंता |
| २) आवडी | – | टिळा लावते मी रक्ताचा |
| ३) माकडीचा माळ | – | डोंगराची मैना |

| | | |
|---|---|---|
| ४) चिखलातील कमख | – | मुरली मल्हारी रायाची |
| ५) वारणेचा वाघ | – | वारणेचा वाघ |
| ६) फकिरा | – | फकिरा |
| ७) अलगुज | – | अशी ही साताऱ्याची तऱ्हा |

१) 'वैजयंता' य चित्रपटास १९६१-६२ या वर्षाचे सर्टिफिकेट ऑफ मेरिट हे उत्कृष्ठ मराठी चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषक

२) 'वारणेचा वाघ' या चित्रपटास १९७०-७१ या वर्षाच महाराष्ट्र राज्य उत्कृष्ठ मराठी चित्रपट क्रमांक दोनचे पारितोषक

३) 'अशी ही साताऱ्याची तऱ्हा', या चित्रपटास १९७३-७४ या वर्षाचे महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट मराठी चित्रपट क्रमांक तीनचे परितोषक

ऑल टाईम ग्रेट साहित्यरत्न, लोकशाहिर, कादंबरीकार, साहित्यरत्न ही त्यांची ख्याती. माकर्सवादी चळवळीतील एक कार्यकर्ता व कलावंत या भुमिकेतून त्यांचा प्रारंभ म्हणजे १९४२ ते १९५० या कालखंडात लोकनाट्य, लावणी, पोवाडा हे कलाप्रकार काव्यप्रकार हाताळले.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या ४९ वर्षाचा झंझवती आयुष्यामध्ये खुप चढ-उतार पाहिले, अनुभवले, सोसले, पचवले त्यातुन त्यांच्यातील कार्यकर्ता व कलावंत ह्या दोन्हीची जडणघडण झाली. प्रामुख्याने त्यांचे प्रारंभचे आयुष्य वाटेगाव (ता. वळवा जि. सागंली) येथे तर नंतरचे आयुष्य मुंबईमध्ये गेले.

# राजा राममोहन रॉय

बाळासो म्हाळाप्पा मोटे
बी.ए. ३

**जीवन परिचय**

राजा राममोहन रॉय हे ''आधुनिक भारताचे जनक'' म्हणून ओळखले जातात. दि. २२ मे १७७२ रोजी बंगालमधील हुमळी जिल्ह्यातील राधानगर येथे एका संपन्न ब्राम्हण कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे पंजोबा 'कृष्णचंद्र बॅनर्जी' हे बंगालच्या नवाबाच्या सेवेत होते व त्यांना ''रॉय–रॉय'' या उपाधीने सन्मानीत करण्यात आले होते. तेव्हापासून त्यांच्या कुटुंबाने बॅनर्जी या परंपरागत आडनावा ऐवजी सन्मानीय करण्यात आलेले ''रॉय'' हे पदनाम वापरण्यास सुरुवात केली. त्यांचे वडील ''रामकांतो रॉय'' आणि माता तैरिणीदेवी यांनी राममोहन यांना प्राथमिक बंगाली शाळा या पारंपरिक पाठशाळेत शिक्षण घेण्यासाठी पाठविले.

१८०५ मध्ये रोजी राममोहन रॉय हे ईस्ट इंडिया कंपनीत महसुल अधिकारी जॉय दिग्वी यांचे सहाय्यक म्हणून रुजू झाले. नंतर त्यांना 'दिवाण' म्हणून बढती मिळाली. दहा वर्षांच्या सेवेनंतर ते सेवा निवृत्त झाले आणि बंगालच्या जनतेच्या सेवेमध्ये स्वतःला झोकुन दिले. मोगल सम्राट दुसरा अकबर यांनी राममोहन रॉय यांना राजा ही पदवी त्यांच्या महत्वपुर्ण सेबेबद्दल बहाल केली. त्यानंतर त्यांना राजा राममोहन रॉय असे संबोधले जाऊ लागले.

२७ सप्टेंबर १८३३ रोजी इंग्लंडमधील ब्रिस्टॉल येथे अल्पशा आजारपणामुळे त्यांचे निधन झोल.

**अ) धार्मिक कार्य –**

एका पंरपरावादी सनातनी उच्च जातीय हिंदु कुटुंबात राममोहन यांचा जन्म झाला. हिंदु धर्माच्या नावावर चालणारे निरर्थक विधी, कर्मकांड, प्रतिमा पुजा, मुर्तिपुजा व पुरोहित वर्गाचे इ. वर त्यांनी निर्भय पणे हल्ला चढविला. अनेक मतामुळे हिंदु धर्मात खळबख माजली व त्यांना कठोर विरोधांना सामोरे जावे लागले. त्यावरील विरुध्द समर्थन करण्यासाठी अनेक संस्था व समाज स्थापना केली.

१) आत्मीय सभा

राजा राममोहन रॉय यांना हिंदु धर्मासंबंधी अतिशय आदरभाव होता. हिंदुना आपला धर्म खऱ्या अर्थाने उमगलेला नाही, असे त्यांना वाटत होते. अशा विचारांना पाठिंबा असणाऱ्यांनी एकत्र येऊन १८१४ मध्ये कोलकत्ता येथे आत्मीय सभा या नावाची संघटना स्थापना केली. ''आत्मीय सभा'' म्हणजे मित्रांचा समाज होय.

२) ब्राम्हो समाज

१९ व्या शतकात बंगालच्या पुनरुज्जीवन ला कारणीभुत ठरलेल ब्रम्हो समाज ही सामाजीक व धार्मिक चळवळ सुरु केली. ब्राम्हो समाजाचा अर्थ 'एक खऱ्या ब्रम्हाची म्हणजे देवाची आराधना (उपासना) करणाऱ्यांचा समाज'. ''The Society of worshippers of one true God.'' म्हणजे

जो ब्रम्हाची म्हणजे विश्वातील सर्वश्रेष्ट शक्तीची आराधना करतो ते होय आणि समाज म्हणजे लोकांचा समुदाय होय.

कोलकाता येथे २० ऑगस्ट १८२८ रोजी सुरु झालेल्या व सार्वजनिकरित्य २३ जानेवारी १८३० झोलेल्या ह्या प्रार्थना स्थळाला ब्राम्हो सभा असे नाव दिले व नंतर त्याचेच ब्रम्हो समाज असे नामकरण करण्यात आले. अगोदरचा दिवस हा 'भाद्रोत्सव' या नावाने व नंतरचा दिवस 'माघोत्सव' या नावाने साजरा केला जातो. हे ब्रम्हो समाजाचे दोन महत्वाचे सण आहेत.

**ब्राम्हो समाजाची तत्वे-**

१) जगाची निर्मिती करणारा व त्याचे अस्तित्व कायम ठेवणारा ईश्वर एकच असुन, त्याची शक्ति, शहाणपणा, प्रेम व पावित्र्य अमर्याद आहे.

२) मानवी आत्मा हा अविनाशी असुन तो शास्वत प्रगती करण्याची क्षमता असणारा व आपल्या कमीसाठी ईश्वरास जबाबदार असणारा असा असतो.

३) ईश्वराशिवाय इतर कोणत्याही निर्मित वस्तूची पुजा करु नये. ईश्वर स्वतः होऊन प्रत्यक्षात मानवी आत्म्यात अवतरतो आणि म्हणूनच आत्मा आणि ईश्वर यांच्यामध्ये कोणत्याही देवदुत व धर्मग्रंथांची मध्यस्थी आवश्यक नाही.

४) सत्य हाच ब्राम्होचा एकमेव धर्म आहे. वेद वा अन्य कोणतेही धर्मग्रंथ हे अचुक वा खात्रीलायक नाहीत.

५) प्रेम व श्रध्देने ईश्वराची रोज पुजा करावी.

६) ईश्वराच्या दृष्टिने सर्व मानव समान आहेत आणि त्यामुळे जात, वर्ण, वंश यावर गट असु नयेत.

७) मुर्तिपुजा, यज्ञात प्राण्यांचा बळी देण, कर्मकांड यांना धर्मात स्थान नाही.

राजा राममोहन रॉय यांच्या घडविलेल्या धार्मिक सुभारणा–

१) एकेश्वरवादाचा प्रसार –

इस्लाम खिश्चत व उपनिषदीय धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर राजा राममोहन रॉय यांनी एकेश्वरवाद म्हणजेच एकाच देवाच्या अस्तित्वावरील विश्वास होय.

२) साध्या धर्मास चालना–

भारतीय लोकांना अतिशय साधा, स्पष्ट व निकोप असा धर्म देण्याची राजा राममोहन रॉय यांची इच्छा होती.

३) मूर्तिपुजेला विराध–

हिंदु धर्माचे एक प्रकांड पंडित या नात्याने रॉय यांना मूर्तिपुजा ही हिंदु धर्मात नंतर आलेली संकल्पना असुन, ती खऱ्या हिंदु धर्माचा भाग नसल्याची खात्री झाली होती. म्हणूनच त्यांनी मूर्तिपुजा प्रथा त्याज्य ठरविली.

४) धार्मिक सहिष्णुता

राजा राममोहन रॉय यांचा सर्व धर्मांवर विश्वास होता. याला त्यांनी कधीच विरोध केला नाही.

त्यामुळे लोकांमध्ये धार्मिक सहिष्णुता निर्माण होण्यास हातभार लागला.

५) सामाजिक धार्मिक संधटनाची स्थापना –

राजा राममोहन रॉय यांनी १८१४ मध्ये आत्मीय सभा व १८२८ मध्ये ब्राम्हो समाजाची स्थपना केली. याचे सर्व सदस्य धार्मिक चर्चेसाठी एकत्र येतात. यातच शंकाचे निरसन केले.

ब) सामाजिक कार्य –

भारतीय समाजात त्यावेळी अस्तित्वात आसलेल्या अनिष्ट प्रथांविषयी राजा राममोहन रॉय समाधानी नव्हते.

१) स्त्रियांच्या  हक्काचे कैवारी–

पितृसत्ताक कुटुंबात स्त्रियांना घराच्या चार भिंतींच्या आत कैद व्हावे लागत असे अनेक प्रकारांना तोंड द्यावे लागत असे. पुरुषांना मात्र सर्व अधिकार व विशेष हक्क उपभोगण्याची संधी होती.

२) सतीप्रथेचे उच्चाटन –

पतीच्या निधनानंतर अंत्यसंस्काराच्यावेळी चितेवर पतीबरोबर पत्नीला जिवंत जाळण्याच्या प्रथेला सतीप्रथा असे म्हणतात. १८१८ मध्ये त्यांची भावजय अलकमंजरी ही सती गेली या घटनेचे रॉय हे साक्षीदार होते. यांनी सतीप्रथा बंद करण्यास खूप कष्ट घेतले.

३) बहुविवाहास विरोध–

राजा राममोहन रॉय यांनी बहुविवाहाला आणि विवाहासाठी मुलींची विक्री करण्याला विरोध केला. हिंदु धर्मग्रंथात विशिष्ट परिस्थितीतच पुरुषाला दुसरे लग्न करण्याची परवानगी असल्याचे उल्लेख आहेत. हे राजा राममोहन रॉय यांनी निदर्शनास आणून दिले. व बहुविवाहास विराध केला.

४) अनिष्ठ सामाजिक प्रथांना विराध –

राजा राममोहन रॉय हे जातिभेद अस्पृश्यता पालन, बहुविवाह, बालविवाह व सतिप्रथा यांच्याविरुध्द होते. त्यांनी विधवा पुनर्विवाह आंतरजातिय विवाह, आंतरजातीय भोजन समारंभ यांना पाठिंबा दिला.

५) शेतकऱ्यांना पाठिंबा दिला–

राजा राममोहन रॉय हे स्वतः मोठे श्रीमंत जमिनदार होते. पण ते शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या जमीनदारांच्या विरुध्द होते. शेतकरी व जमीन मालक यांच्यात सौहार्द संबंध असावेत असे वाटत असे.

६) वृत्तपत्र स्वातंत्र्य

राजा राममोहन रॉय यांनी मिरतुल अखबर या नावाने पार्शियल भाषेतील वृत्तपत्र व संपाद कौमुदि या नावचे कौमुदि बंगाली भाषेतील साप्ताहिक प्रकाशित केले.

७) न्यायालयीन सुधारणा–

ब्रिटीश पार्लमेंट मध्ये संमत झालेले कायदे येथील जनतेवर लादण्याला त्यांचा विरोध होता. न्यायालय न्यायदान व्यवस्थेत सन्माननीय भारतीयांचा समावेश व्हावा असेही वाटत होते व तसे

प्रतिपादन केल.

क) शैक्षणिक कार्य–

राजा राममोहन रॉय हे विद्वान होते व अनेक भाषांचे त्यांना ज्ञाने होते.

१) अज्ञानाचे निर्मूलन–

सामान्य माणसाच्या अज्ञानाचा धर्मगुरु कडुन गैरफायदा घेतला जातो. त्यांची पिळवणुक होते. त्यामूळे त्यांनी पाश्चत्त्य वैज्ञानिक शिक्षणपध्दतीला पसंती दर्शविली.

२) पाश्चात्त्य शिक्षण पध्दतीला चालना–

राजा राममोहन रॉय यांनी स्वतःची ॲग्लो हिंदु स्कुल या नावाची शाळा १८२२ मध्ये सुरु केली. त्यांनी १८२५ माध्ये वेदांत कॉलेज सुरु केले. याद्वारे इंग्रजी शिक्षणाला प्राधान्य दिले.

३) वैज्ञानिक शिक्षणाला चालना –

राजाराममोहन रॉय यांना वाटत होते की, पाठशाला व चतुस्पाथी ह्या शाळा र्वतमान शैक्षणिक गरजांची पुर्तता करण्याच्या दृष्टिने अपुऱ्या आहेत. म्हणून १९१७ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या माध्यमाने व पाठिंब्याने कोलकत्ता येथे पहिले पब्लिक स्कुल सुरु झोल.

४) स्त्रियांच्या शिक्षणास पाठिंबा–

पारंपरिक भारतीय समाजात स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्त्रियांच्या शिक्षणाला बंदी होती. शिक्षणासाठी स्त्रियांना प्रोत्साहन दिले जात नव्हते. राजा राममोहन रॉय नी मात्र स्त्रियांच्या शिक्षणाला पाठिंबा दिला.

५) प्रसार माध्यमांच्याद्वारे शिक्षण–

लोकांना सुधारण्यासाठी वृत्तपत्रांची गरज आहे, असे वाटते. म्हणून आत्मीय सभेकडुन त्या वेळी बंगाल गॅझेट हे साप्ताहिक प्रकाशति होत होते. तर मिरतुल अखबर हे पार्शियन भाषेतील वृत्तपत्र व बंगाली भाषेतील संवाद कौमुदी हे साप्ताहिक प्रकाशित करत असत.

६) भाषा अध्ययनातील आदर्श–

रॉय चे मुळ शिक्षण बंगाली मध्ये झाले. त्यानंतर त्यांनी अरेबिक, पार्रियन व संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवले संस्कृत भाषेच्या ज्ञानामुळे त्यांना वेद आणि उपनिषदे यांचे अध्यन केले. तसेच येशुच्या जीवनावरील बायबलच्या चार भागापैकी एका भागाचे बंगालीमध्ये भाषांतर करणेही शक्य झाले. रॉय यांचे विविध भाषांवरील प्रभुत्व इतर लोकांना भाषा अध्ययनासाठी निश्चितच प्रेरणा दायी ठरले.

७) साहित्यिक कार्य –

इ. स. १८१५ व १८२० च्या दरम्यान राममोहन रॉय यांनी भाषेतील प्रमुख १४ साहित्य व इंग्रजी मधील १० साहित्यकृती पुर्ण केल्या त्यांनी वेदांतसार संक्षिप्त अनुवाद पुर्ण केले. १८२० मध्ये त्यांनी द प्रिसप्टस ऑफ जिसस, द गाईड टू पीस आँड हॅपीनेस प्रकाशित केला.

रामा मोहन रॉय यांच्या कार्याचा भारतीय समाजावरील प्रभाव –

ब्राम्हो समाजाच्या कार्यामुळे नंतरच्या अनेक समाजसुधारकांना प्रेरणा मिळत राहिली. रॉयच्या कार्यांचा प्रभाव पुढिल क्षेत्रावर पडलेला दिसुन येतो.

१) राष्ट्रवादाची भावना –

पुर्वी भारतीयांच्यामध्ये भारतीयत्वाची जाणीव नव्हती. नंतर विविध शाखा सुरु झाल्यावर शाखानी भारत वा भारतीय हे वापरण्यास सुरुवात केली. त्यामूळे हळुहळु राष्ट्रियत्वाची भावना निर्मान झाली.

२) समानता –

ब्राम्हो समाजाचा जातिव्यवस्थेवर विश्वास नव्हतो. ब्राम्हो समाज सदस्यांच्या मनात क्रांती घडुन आली व सुशिक्षीतांच्या मध्ये व्यापक स्थान मिळाले.

३) इतर सामाजिक चळवळींवरील प्रभाव–

केशवचंद्र सेन यांच्या प्रभावामुळे देशातील वेगवेगळ्या शहरांत वेगवेगळ्या नावाने ब्रम्हो समाज संघटना स्थापन झाल्या. यामुळे समाजाच्या सामाजिक–धार्मिक कार्यामूळे प्रभावित झाल्या.

४) हिंदु समाजावरील प्रभाव–

सामाजिक सुधारणांच्या बाबतीत रॉयच्या ब्राम्हो समाजाचा हिंदु समाजावर प्रभाव पडला.

५) सामाजिक सुधारणांना सुरुवारत–

ब्रम्हो समाजाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील सामाजिक व धार्मिक अनिष्ठ प्रथांच्या विरुध्द लोकांमध्ये जागृती निर्माण केली.

# महाराजा सयाजीराव गायकवाड आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

कु. प्रियांका प्रभाकर माने
बी.ए. ३

'प्रजेचे कल्याण हेच माझे कर्तव्य व तोच माझा मोक्ष'
श्री. महाराजासाहेब यांचे भाषण, रौप्य महोत्सव, ५ मार्च, १९०७

विद्या ही एकाच व्यक्तीला किंवा वर्गाला फार तर काय एकाच समाजालाही मिळून फायदा नाही. ती सार्वत्रिक असली पाहिजे. तरच आपले पाऊल पुढे पडणार आहे हे लक्षात ठेवा. सर्व राष्ट्राचा उत्कर्ष पाहिजे आहे. तो एका समाजाने साधणार नाही. लहानापासून थोरापर्यंत सर्वच विद्या शिकलेली होतील असे करण्यास तुम्ही झटले पाहिजे. खेड्यांपाड्यातूनसुद्धा हे विद्याप्रसाराचे काम आव्याहत व सुयंत्र चालले पाहिजे. आपल्या देशात महारापोरांपासून ते अगदी वरच्या पायरीपर्यंतच्या सर्व लोकांना काय करण भाव समजू लागले तर आपला ऊर्जितकाल जवळ आला आहे असे म्हणण्यास काही हरकत नाही. श्री. महाराजांचे न्यू इंग्लिड स्कुल, पूणे येथे झालेले भाषण ११ जुन १९०४.

श्री सयाजीराव महाराजांनी सत्तर वर्षे पूरी हाऊन ७१ वे वर्ष लागले आहे, याबद्दल सर्वांना अतिशय आनंद होत आहे. श्री. महाराज हे एक लोकत्तर राजपुरुष आहेत. त्यांच्या आयुष्यात वाढ होणे हा त्यांच्या प्रजाजनांचा आनंदोत्सवच आहे. महाराजांसारखे, पुरुष लोकांना जितक दिवस लाभतील तितके दिवस त्यांना हवे असतात. यासाठीच त्यांचे प्रजाजन असल्या वाढदिवसानिमित्त आनंदोत्सव साजरे करीत असतात. शिक्षण प्रसारराच्या बाबतीत महाराजांनी आपल्या राज्यात पुष्कळ प्रयत्न केले. विद्येची वाढ व साक्षरता या बाबतीत बडोदे राज्याचा नंबर वर आहे. हे संस्थांनापेक्षा व खालसांतील राज्यापेक्षा पुष्कळ वर लागेल. त्यांनी १८९२ साली संस्थानामध्ये सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरु केले. या सक्तीचे प्राथमिक शिक्षणामुळे बहुजनसमाजात विध्येची वाढ होऊन तो समाज पुढारलेला बरोबर कार्य करण्यास तयार होत आहे. महाराजांनी १९०४ मध्ये पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झालेल्या भाषणात म्हटल्याप्रामणे देशातील कोणत्याही एका समाजाचे शिक्षण होऊन देशाचा उत्कर्ष होणार नाही. समाजातील सर्व घटकांना सारखी संधी मिळाली तरच सर्व राष्ट्राचा उत्कर्ष होईल. महाराजांना ही गोष्ट पटल्यामुळे प्रथम हाती घेतला व सक्तीच्या शिक्षणासारखे कायदे पास करुन बहुजनसमाजाला शिक्षण घेणे भाग पडले. कोणत्याही राजाचे पहिले आणि महत्त्वाचे कोणते कर्तव्य असेल तर ते आपल्या प्रजाजनांचा विद्यादान देणे हे होय. प्राजाजनांपैकी ज्या लोकांना विद्येची अभिरुची लागलेली असते. ते विद्यादानासाठी उत्पन्न केलेल्या संधीचा फायदा घेतात. परंतु जे अज्ञानांधकारात पडलेले असतात त्यांना स्वतः ओढून काढल्याशिवाय जगात काय चालले आहे हे दिसत नाही. आपल्या हिंदुस्थानातल्या प्रमाणे बडोदे राज्यातही विद्येत मागासलेल्या लोकांची संख्या फार आहे. राज्य चालवायचे म्हणजे शिकलेल्या थोड्या लोकांना संतुष्ट ठेवून चालविता येत नाही. राज्य चिरस्थायी व सुकर होण्यास बहुजन समाजांचा पाठींबा पाहिजे. प्रजेपैकी फार मोठा भाग अज्ञानी राहिल्यास राज्यात होणाऱ्या सुधारणांचा लाकांना

फायदा घेता येणार नाही. तेव्हा अज्ञानांधकारात खितपत पडलेल्या लोकांना हातभार लावून वर आणणे हे फार माठे व कठीण काम आहे व ते श्री. महाराजांनी केले, त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत.

बहुजन समाज किंवा मागासलेला वर्ग व अतिशय हीन व गरीब स्थितीत असतो. त्याला शिक्षण घ्यावयास लावावयाचे म्हणजे त्याच्याकरिता नुसत्या शाळा उघडून चालणार नाही. त्याला मोफत शिक्षण दिले पाहिजे. एवढेच नव्हे तर पुस्तके, कपडेलत्ते व इतर मदत यांची सोय करावयास पाहिजे. प्राथमिक शाळांतील १ ते ६ इयत्तेतील मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थी-विद्यार्थीनीसाठी ५ हाजारा रुपयांची तरतुद सरकारी बजेटमध्ये करुन ठेवली आहे. त्याशिवाय अंत्यजांच्या मुलामुलींकरता १७२८ रुपये विद्यावेतनासाठी राखून ठेवलेले आहेत. हायस्कुलातील शिक्षणासाठी मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्याकरिता सरकारी बजेटामध्ये १६ विद्यावेतनासाठी१.२६८ राखुन ठेविले आहेत. कॉलेजमध्ये सुद्धा मागासलेल्या वर्गातील विद्यार्थाना सरकारी शिक्षणाची सोय केलेली आहे. स्कॉलरशिप व वसतिगृह यांची सोय मागासलेल्या वर्गाकरीता निराळी केली नसली तरी अशा वर्गातील मुलास जरुर पडल्यास प्रथम संधी देण्यात येते. तसेच अत्यंजांकरीता ९ अ, ठाकरडा जातीकरिता २५ अशा स्पेशल स्कॉलरशीप महाराजांनी नुकत्याच मंजुर केल्या आहेत. ट्रेनिंग कॅलेजात शिक्षण घेणाऱ्या सर्वच लोकांना विद्यावेतने मिळतात. परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेण्याकरीता मागासलेल्या वर्गासाठी जरी स्वंतत्र अशी सोय नसली तरी संस्थानामध्ये चालू असलेल्या फॉरिन स्टडी लोन अँड स्कॉलरशिप रुल्स चा त्यांना फायदा घेता येतो. अशा रितीने मागासलेल्या वर्गातील बऱ्याच विद्यार्थ्यांना परदेशी पाठवून शिकवून आणलेले सर्वांना माहीत आहे.

वरील सर्व विवेनाकरुन मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणाकरिता महाराजांनी कसे कसे प्रयत्न केले हे लक्षात घेण्यसारखे आहे. संस्थानात काय किंवा संस्थानाबाहेर काय मागासलेल्या वर्गाची लोकसंख्या फार आहे. त्याच्या शिक्षणाकरिता कोणतेही प्रयत्न अपुरेच पडणार आहेत. संस्थानामध्ये मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणाकरीता केलेल्या महाराजांचे प्रयत्न जरी पुष्कळ असले तरी ते महाराजांना व प्रजाजनांनाही अपुरेच आहेत. अजुनही कित्येक वर्षे या लोकाना महाराजांची वाढत्या प्रमाणात मदत लागेल व ती त्यांना मिळेल अशी आम्हाला खात्री वाटते.

### डॉ. भिमराव आंबेडकरांना शिष्यवृत्ती

या पार्श्वभूमीवर जोतिबा फुल्यांनी पुण्यात १८५१ साली मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली, हे सयाजीरावांना माहीत होते. त्यामूळे त्यांना फुल्याबंद्दल, त्यांच्या कार्याबद्दल आदर वाटायचा. १८८२ साली इंग्लंडमध्ये सरकारने सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला, हे फुल्यांनी वाचले असावे आणि हीच मागणी त्यांनी हिंदुस्थानातील हंटर कमिशनसमोर केली. सयाजीराव हे प्रज्ञदक्ष आणि शिक्षणासंबंधी सजक दृष्टी असलेले राजा होते. अस्पृश्यांना सरकारने कायदा करुन शिक्षण देण्याचा हा निर्णय हिंदुस्थानातील जनसामान्याच्या शिक्षणासंबंधीची धाडसी सुरुवात झाली.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृष्य मुलांच्या शिक्षणासाठी काम सुरु केले, त्यावेळी सयाजीराव महाराज त्यांच्या पाठीमागे उभे राहिले. विठ्ठल रामजी शिंदे तौलनिक धर्मशास्त्राच्या अभ्यासासाठी

विलायतेत गेले, तेव्हा प्रवासखर्चाची मदतही सयाजीरावांनी केली. सयाजीराव परदेश शिक्षणासाठी जाणाऱ्या सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊ लागले. त्यांची एक अट असे. शिकुन परत आल्यानंतर त्या विद्यार्थ्याने काही काळ बडोदा सरकारात नोकरी करावी. त्यामुळे शिकुन आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ बडोद्यातील प्रशासनास व्हावा. वि. रा. शिंदे शिकुन परत आल्यानंतर महाराजास म्हणाले, आपल्या प्रवास खर्चाच्या मदतीने माझे धर्मशिक्षण पूर्ण हाऊ शकले. हे कार्य आयुष्यभर करावे अशी इच्छा आहे.

## महाराज सयाजीराव आणि अस्पृश्योद्धाराचे कार्य

वर्तमान परिस्थितीचे भान विस वर्षाच्या सयाजीरावांना होते. ते नवसारी जिल्हयात सेनगड या आदिवासी भागात दौऱ्यावर होते. राज्यकारभार हाती येऊन एक वर्ष होत आलेले, या संवेदनशील राजाच्या लक्षाल आले होते की बहुतांश प्रजा शिक्षणापासून वंचित आहे. जो वर्ग शिकत आहे त्यांच्या पूर्वपार परंपारिक शिक्षणाची परंपरा होती पण बहुजन समाज मात्र निरक्षर होता. शिक्षणाबद्दल त्या वार्गाला अनास्थाच होती. या वर्गासोबत मागासलेले ज्यांना अस्पृश्य समजले जाई हा वर्ग आणि जंगलात राहणारी अदिवासी प्रजा शिक्षणापासून दूर होती.

हा मागासलेला समाज आणि जंगलात राहणारी प्रजा यांना शिक्षण देणे हेच आपले राज्यकर्तव्य आहे. हे ओळखुन सयाजीराव महाराजांनी १८८२ साली हुकूम काढला अस्पृश्य आणि आदिवासी मुलांसाठी सरकारी खर्चाने शाळा व मुलांना राहण्यसाठी वसतिगृह सुरु केले. या मुलांना पाटी, पुस्तके, कपडे, भोजन व्यवस्था सरकारी खर्चाने सुरु झाली. हा समाजक्रांतीचा निर्णय होता. कायद्याने मागासलेल्या मुलांसाठी आणि आदिवासी मुलांसाठी शिक्षण देण्याचा हुकूम काढणारे महाराज जनकल्याणाचा ध्यास घेणारे पहिले राजा ठरले. सगळ्या जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश सरकारच्या सामर्थ्याचे इंगित काय हे सयाजीराव यांना इ. स. १८८७ साली केलेल्या पहिल्या विलायत प्रवासात ध्यानात आले. लंडनच्या प्रवासात त्यांनी ओळखले. ब्रिटिशांचे सामर्थ्य हे शिक्षण आणि उद्योगधंद्यातील कौशल्यातच आहे. त्यामूळे आपल्या प्रजेचं कल्याण केवळ शिक्षणातूनच होऊ शकले आणि त्यांनी जाहिरपणे सांगूण टाकले. माझ्या प्रजेच्या कल्याणातच माझा मोक्ष-समाधान आहे. पहिल्या युरोप प्रवासापूर्वी पाच वर्ष अगोद महाराज सयाजीरावांनी अस्पृथ्य-आदिवासींनी शिकविणे सुरु केल्याने त्यांच्या जनकल्याणाची नांदीचे द्रष्टेपणाने सुरु केली होती. युरोपहुन परत येताच सर्व प्रजेला शिक्षण मिळले पाहिजे. त्याकरिता शिकण्यासाठी त्यांना सक्ती करावी लागली तरी हरकत नाही, हा त्यांनी मनाशी निग्रह केला. एवढेच नाहीतर त्यांची अंमलबजावणी सुरु कली. शोषित वर्गाच्या समाजिकदृष्ट्या अंध-पतीत स्थितीबद्दल महाराजांच्या मनात खोलवर सहानुभूती होती. त्यामुळे त्यांनी या वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी एक सर्वसमावेशक योजना मनावर घेतली आणि या लोकांना शिक्षण देण हा त्यांच्या उद्धाराचा पहिला उपाय आहे. असा विचार केला.

## सयाजीराव गायकवाड यांच्यातील खंडाचे काम वेगाने

डॉ. बाबासाहेब आंबेडरांनी परदेशी जाण्यासाठी आर्थिक मदत करुन स्वतःच्या दातृत्वाची साक्ष देणाऱ्या सयाजीराव गायकवाड महाराजांवर येत्या ३१ मार्चपर्यंत १२ खंड प्रकाशित हाणार आहेत. मात्र २००६ पासून घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यावरील एकही खंड शासनाने प्रकाशित केलेला नाही. दोन्ही सामित्यांचे अध्यक्ष राज्याचे उच्च व तंत्रक्षिण मंत्री असताना डॉ. आंबेडकर यांच्या चरित्र साधने समितीच्या कामाला वेग येत नाही, यांचे आश्चर्य वाटते. डॉ. आंबेडकरांचा पत्रव्यवहार आणि छायाचित्रांवरील दोन खंड २००६ नंतर प्रकाशित करण्यात आले. ते वादग्रस्त ठरले. हरी नरके, दत्ता भगवत आणि आता अविनाश डोळ्स अशा आजीमाजी सदस्य सचिवांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची धुरा सांभाळली. मात्र, वसंत मून यांच्या नंतर खंड प्रकाशनाच्या कामाला वेग आला नाही. आज त्यांनी प्रकाशित केलेल्या खंडाचेच पुनर्मुद्रण आणि भाषांतर होतात आणि तेच खंड विक्रिस उपलब्ध केले जातात. शासकीय मुद्रणालयाच्या कार्यालयात किंवा विजयादशमीला दीक्षाभूमीवरील मुद्रणालयाच्या स्टॉलवर प्रचंड गर्दी असते. मात्र तेच ते खंड उपलब्ध होतात. बाबासाहेबांच्या साहित्यावारील नवीन खंड मात्र वाचायला मिळत नाहीत, अशी खंत वाचकांतर्फे वेळोवेळी व्याक्त करण्यात येते. त्यामुळे डॉ. आंबेडकर यांच्या जयंती निमित्त येत्या १४ एप्रिलला तरी खंड प्रकाशित होईल काय अशी अपेक्षा वाचकांतर्फे व्याक्त करण्यात येत आहे.

**महात्त्वकांक्षी प्रकल्प**

सयासजीराव गायकवाड यांच्या वरील १० खंडांचे काम वेगाने सुरु आहे. येत्या ३१ मार्चपर्यंत १२ खंड प्रकाशित करण्याचा मासन आहे. काही खंडाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. २८ ऑक्टोबर २०१६ ला उच्च शिक्षण मंत्र्याबरोबर बैठक झाली आणि लगेच कामे सुरु केली. हा एक महत्त्वकांक्षी प्रकल्प असुन महाराजांवर खंड प्रकाशित करायला मिळणे हे मोठे काम आहे. बाबा भांड, सचिव, महाराज सयाजीराव गायकवाड चरित्र साधने समिती.

**सापत्न वागणुक का ?**

डॉ. बाबासाहेब आंबेडर यांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यासाठी तब्बल ४० वर्षां पूर्वी समिती स्थापन केली. मात्र, साहित्य प्रकाशित होत नसल्याने भारतीय दलित पँथर सोबत पाठपुरावा केला. त्यातुन सदस्य सचिव बदलले. मात्र समितीचे काम पुढे गेले नाही. एक पत्रव्यवहाराचा खंड आणि दुसरा बाबासाहेबांच्या छायाचित्रांवरील खंड एवढीच गेल्या दहा वर्षातील समितीची कामगिरी आहे. दरवर्षी एकतरी खंड प्रकाशित झाला पाहिजे अशी अट असताना २०१० नंतर एकही खंड नाही. सयाजीराव गायकवाड यांच्याविषयी आदर आहे. त्याच्यावरील खंडाने बौद्धीक मेजवानी मिळेलच. पण बाबसाहेबांना नेहमीच सापत्न वागणुक का ? प्रकाश बन्सोड, अध्यक्ष भारतीय दलित पँथर.

# आधुनिक भारताचे शिल्पकार महाराज सयाजीराव गायकवाड

पुजा पांडुरंग व्हनखंडे
बी. ए. ३

फर्जंद ए खास ए दौलत इंग्लिशिया, श्रीमंत महाराज सर, सेना खास खेल शमशेर बहादूर महाराज गायकवाड बडोदेकर अशी पदवी धारण करणारे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड जन्मनाव श्रीमंत गोपाळराव गायकवाड,(मार्च १० इ.स. १८६३ – फेब्रुवारी ६, इ. स. १९३९ ) हे इ. सा १९७५ ते इ. स. १९३९ सालांदरम्यान बडोदा संस्थानाचे अधिपती होते. बडोदा संस्थानातील प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याकरता ते विशेषत्वाने ओखले जातात.

सयाजीराव गायकवाड नाशिक जिल्ह्यातील मालेगांव तहसीलात कळवण या गावी मेहेरबान श्रीमंत माशिराव भिकाजीराव उर्फ दादासाहेब गायकवाड (१८२२–१८७७) आणि श्रीमंत अखंड सौभाग्यवती उमाजीबाई साहेब यांच्या पोटी मराठा कुंटुबात व्दितीय सुपूत्र म्हणून जन्माला आले व श्रीमंत गोपाळराव गायकवाड हे नाव दिले गेले.

दिवाण सर टी माधवराव यांनी सयाजीरावांना राज्याकारभाराचे शिक्षण दिले. २८ डिसेंबर१८८१ रोजी गादिवर आल्याबरोबर सयाजीरावांनी राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना केल्या. प्रशासकीय जबाबदारीची विभागणी हे तत्त्व राज्यकारभारात लागू करुन राज्ययंत्रणेत त्यांनी सुरळीतपणा निर्माण केला, सल्लागार नेमून कल्याणकारी योजना अंमलात आणल्या (१८८३), न्यायव्यवस्थेत सुधारणा कल्या, ग्रामपंचायतीचे पुनरुज्जीवन कले (१९०४) तसेच सक्तीच्य प्राथमिक शिक्षणाची योजना सुरु (१९९३) अल्पावधीतच ती सर्व राज्यभर लागू केली. संपूर्ण देशामध्ये मोफत आणि सक्तीचे शिक्षण लागू करणारे बडोदा संस्थान हे देशातील पहिले राज्य ठरले (१९०६). गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन उच्च शिक्षणाची सोय केली. औद्योगीक कलाशिक्षणाकरीता कलाभुवन ही संस्था स्थापन केली. त्यांनी प्राच्य विद्यामंदीर या संस्थेच्या वतीने प्राचीन संस्कृती ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन करण्यास उत्तेजन दिले. सयाजीरावांनी श्रीसयाजी बाल ज्ञानमाला या दोन मालांमधून उत्तम ग्रधाची भाषांतरे प्रसिद्ध केली. त्यांनी संस्थानात गावोगावी वाचनालये स्थापन केली, फिरत्या वाचनालयांचीही सोय केली. त्यानी या काळामध्ये इंग्लंड अमेरिकेसारख्या देशांना भेट दिली. तेथील पद्धवी आणि ग्रंथालये आपल्या देशातही निर्माण झाली पाहिजेत. या दृष्टीने त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी ग्रंथालय तज्ञ बॉर्डन यांना भारतामध्ये आमंत्रित केले. ते दहा वर्ष बडोदा संस्थनांमध्ये ग्रंथालय प्रमुख म्हणून कार्यरत होते. बॉर्डन यांच्या मार्गदर्शनाखाली बडोदा संस्थानात ग्रंथालयाचे जाळे निर्माण करण्यात आले. फिरती ग्रंथालये, ग्राम ग्रंथालये सुरु झाली.

महाराज सयाजीरावांचे कार्य चरित्ररुपात–

साहित्य संमेलनांना बडोद्याचे संस्थानिक महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी हातभार लावला होता. त्यांच्या मदतीने अनेक साहित्यिक प्रकाशक यांनी आपली कारकींद घडवली. केवळ

साहित्यिकच नाहीत, शैक्षणिक, शेती क्षेत्र, सामाजिक सुधारणा, न्याय अशा अनेक बाबतील कार्य केले. मात्र त्यांचे हे कार्य फारसे समाजापर्यंत पोहोचले नाही. त्यामुळे त्यांच्या कार्याचा सविस्तर वेध घेण्यासाठी महाराज सजयाजीराव गायकवाड चरित्र साधने समितीच्या माध्यमातून सुमारे २५ खंडाची योजना आखण्यात आली आहे. महाराज सयाजीरावांचे कार्याचे सर्व कारभार १२ खंडात समाविष्ट करण्यात आला असून पुढील खंडाचे कामही सुरु आहे.

सयाजीरावांचे कार्य कर्तत्त्व भारताच्या वैचारिक बांधणीत, सामाजिक शैक्षणिक बांधणी त्यांनी सर्वार्थाने काम केले. शेती, शिक्षण, प्रशासन, उद्योग, सामाजिक सुधारणा, न्याय यासंदर्भात त्यांचे योगदान मोठे आहे. आजही ते मार्गदर्शक आहेत, असे भाड यांनी सांगितले. त्यांची हजारो पत्रे आणि शेकडो भाषणे आहेत. त्यांनी साठ हजारांहुन अधिक कायदे केले. स्वातंत्र्यपुर्व काळात लोकशाही संविधानाचा पाया घातला. अनेक क्रांतीकारकांना मदत केली. अमेरिकेतील दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे सयाजीराव गायकवाड अध्यक्ष होते. १८७५ साली त्यांनी स्वतंत्र शिक्षण विभागाची स्थापना केली. अस्पृष्य, आदिवासींना सरकारी खर्चात मोफत प्राथमिक शिक्षण आणि वसतीगृह सोय देण्याचा जगात पहिल्यांदा हुकुम काढला. १८९२ साली प्राथमिक मोफत शिक्षणाचा कायदा केला. पहिल्यांदा शेती खाते सुरु कले, आशियातील पहिला साखर कारखाना काढला, अशी यादी भांड यांनी सादर केली.

सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरीही त्यांच्या सामाजिक सुधारणेची साक्ष देणारी आहे. पडदापद्धती बंदी, बालविवाह बंदी, कन्याविक्रयबंदी, मिश्रविवाहाचा पुरस्कार, स्त्रियांना वारसा हक्क मिळवून देणे, अस्पृश्यविनिवारण, विधवाविवाह इत्यादी सुधारणा प्रत्यक्ष अंमलात आणल्या. घटस्फोटासंबधीचा कायदा हा सर्व भारतात पहिल्यांदाच त्यांनी जारी केली. हरिजनांसाठी अठरा शाळा काढल्या (१८९२). डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. आणि त्यांची संस्थानात उच्च पदावर नेमणूकही केली. सुधारणांच्या प्रत्यक्ष पुरस्कारामुळे त्यांना राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला (१९०४). महाराज सयाजीराव गायकवाड हे सत्पात्री दान देण्यात ते नेहमीच अग्रेसर होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड आणि दुष्काळ निवारण

पानिपतच्या तिसऱ्या लढाईनंतर बडोद्याचे एक भाऊ प्रतापारव गायकवाड खानेदशातील कवळाणा येथे स्थायिक झाले. त्यांचे वंशज काशीराव गायकवाडांच्या तीन मुलांतील बारा वर्षाचा गोपाळ दत्तकपुत्र निवडला आणि शेतकऱ्यांचा पोरगा २७ मे १८७५ ला बडोद्याचा राजा बनला. त्याचे नाव ठेवले सयाजीराव तिसरे.

पहिल्या सहा वर्षात त्यांच्या गुरुजनांनी अक्षर ओळख आणि इतिहास व राज्य प्रशासनाची उत्तम धडे दिले. राज्याभिषेकानंतर सहा वर्षांनी २८ डिसेबर १८८१ ला सयाजीराव गायकवाड प्रत्यक्ष राज्यकारभार हाती आला. तरुण राजाने प्रथम प्रजेला भेटण्यासाठी आणि आपले राज्य पाहण्यासाठी दौरा केला. त्यांच्या लक्षात आले. बहुतांश प्रजाशेतकरी होती त्यांची सर्व प्रकारच्या सुधारणांची घोडदौड सुरु केली. १८७७-७८ साली दक्षिण हिंदूस्थानात भयंकर दुष्काळ पडला होता. त्याची झळ बडोद्याही

लागली होती. एकोणिसाव्या शतकाची शेवटचे वर्ष प्लेग आणि अवर्षण या दैवी–भौतिक आपत्तीची ठरली. सयाजीरावांनी सर्व शक्तीनिशी या प्लेगच्या संकटास तोंड दिले. दुष्काळाची चाहुल ओळखून सयाजीरावांनी चारही प्रांतात दुष्काळ निवारणार्थ उपाययोजना करण्यासाठी रामचंद्र धामणस्कर यांनी दुष्काळ निवारण अधिकारी नेमले.

दुष्काळाचे स्वरुप भिषण होते शेतीवर अबलंबून असल्याने शेतकऱ्यांची उपासमार सुरु झाली. त्यांनी तात्काळ दोन निर्णय घेतले. ज्योतिबा फुले यांना मदत तर केलीच, पण दानधर्माच्या नावाखाली एदी लोकांना वाटणारी खिचडी बंद करुन ती रक्कम दुष्काळी कामात अन्नछत्र उघडुन कामासाठी वळती केली. सयाजीरावानी पुन्हा दुष्काळी कामाचा दौरा सुरु केला.

अकराव्या शतकातील प्राचीन कलासंस्कृतीचे समृद्ध केंद्र असलेले दभाईला सयाजीराव पोहचले. जवळच्या धर्मशाळेत दुष्काळग्रस्त माणसांची राहण्याची, भोजनाची सोय केली होती. नुसते हाडाचे सापळे, निस्तेज डोळे खोल गेलेल्या महिला आणि मुले बसलेली डोळ्यांभोवती पांढरा पुजमा झालेली त्यावर माशा घोंघावत होत्या. हे विदारक दृश्य बघून सयाजीराव थिजून गेले. ईश्वर करो आणि माझ्या प्रजेचा असा देखावा पुन्हा पाहण्याची वेळ न येवो असा सयाजीरावांनी हुकुम केला. की, दुष्काळ पीडीतांना पोटभर खायला भाजी भाकरी आणि कपड्यांची सोय करा. कोठेवाडीतील एमरेळीचा दौरा करताना गिरासिया वतनदारांची वस्ती मोठी होती. या लोकांना मजुरीवर न लावता त्यांना अल्पदरात तगादा द्यावी. यामुळे वतनदार श्रीमंत मंडळींनाही दुष्काळाला तोंड देण्याचा मार्ग सापडला. या नंतर सोनगड या आदिवासी भागात दौरा केल्यानंतर आदिवासी आणि पददलित प्रजेची अवस्था बघून त्यांच्या शिक्षणाचा हुकूमही काढला होता. सयाजीराव महाराज दुष्काळी भागाचा दौरा करुन बडोद्यास परतले. सर्व प्रजावर ओढलेल्या भयानक संकटाची त्यांना कल्पना झाली. ते म्हणतात, या दुष्काळपासनू आपण एक शिकले पाहिजे, निसर्गाची घडी बिघडवून चालणार नाही. नाही तर, निसर्गाचा नियमच आहे. नियम मोडला की तो शिक्षा करणारच निसर्ग नियम पाळणे यातच सर्वांचे कल्याण आहे.

पन्नास खंडात सयाजीरावांची गौरवगाथा–

जनकल्याण व लोकसेवेचा ध्यास घेवनू प्रशासनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे जीवन कार्य लोकांपर्यंत पोहचिवण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. चरित्र साधन समितीने एकाच वेळी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत खंड निर्मिती सुरु केली आहे. नियोजना नुसार २५ खंडाची निर्मितीची प्रक्रिया सुरु आहे. सध्या १२ खंड शासकीय मुद्रणा लयात उपलब्ध आहेत. राज्य सरकारने, महाराजा सयाजीराव गायकवाड यांची चरित्रे साधने प्रकाशित करण्यास सुरुवात केली आहे. बडोदा संस्थानाचे अधिपती म्हणून त्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विकासासाठी कारभार केला. सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील कार्य दीपस्तंभासारखे आहे. न्यायव्यवस्थेत सुधारणा, ग्रामपंचायतीचे पुनरुज्जीवन सामाजिक क्षेत्रातील पडदापद्धती बंदी, कन्या विक्रय बंदी या माध्यमातून लोकाभिमुख राज्यकारभाराचा आदर्श घालून दिला. बडोदा संस्थानचे अधिपती म्हणून १८७५ ते १९३९ या कालावधीत त्यांनी सर्वच क्षेत्रात बदल घडवला. त्यांच्या

समाजाभिमुख कार्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी चरित्र साधन खंडाची निर्मिती सुरु आहे.

महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या जीवनकार्यावर आधारित खंड निर्मिती हिंदीमध्ये दहा खंडामध्ये झाली. त्यांच्या अनेकविध पैलूवर स्वतंत्रपणे लिखाण होणार आहे. बडोदा येथील मराठी साहित्य संमेलनात बाराखंडाचे प्रकाशसन होणार आहे. महाराजांच्या कार्यावर आधारीत पन्नास खंड येत्या दोन वर्षात प्रकाशित करण्याचे नियोजन आहे. महाराजांच्या लोककल्याणकारी प्रशासनाचा अभ्यास हा प्रेरणादयी असून याचा अभ्यास गरजेचा आहे.

महात्मा फुले यांचे कामच सयाजीराव करत होते. त्यांनी सत्यशोधक चळवळीला खूप मदत केली. त्यांचे अत्यंत उपकार आहेत. फुले–शाहू–आंबेडकरांना महाराष्ट्रातील सर्वांना जोडणारे सयाजीराव गायकवाड ही एक महत्त्वाची कडी होती. म्हणून डॉ. रंजन गर्गे म्हणतात हिदुस्थानातील एवढी टॉवरिंग पर्सनॅलिटी महाराष्ट्रातली हाती, हे वाचून थक्क झालो. एवढ्या उत्तूंग काम केलेल्या राजाबद्दल गप्प बसण्याचा येथील विद्वान विचार वंतांचा कटच दिसतोय.

सयाजीराव सर्व क्षेत्रातील क्रांतीकारक आहेत. आता पर्यंत आपण समाजक्रांती कारक, शिक्षण कांतीकारक अशा उपाध्या वेगवेगळ्या लोकांना देत आलोय पण सयाजीरावांनी या सर्व क्षेत्रात काम कलेय. ऐतिहासिक सत्याला कुठेही तडा जाणार नाही, याचे भान ठेवनू आपण युगद्रष्टा महाराज ही एक देखणी कलाकृती तयार केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून सयाजीरावांनी प्रजेसाठी सर्व क्षेत्रात जे कार्य केले त्याला तोड नाही. महापुरुषाच्या जडण–घडणीत सयाजीरावांनी मोलाचे योगदान दिले आहे. मात्र या युगपुरुषाला मराठी माणसांनीही आपल मानल नाही आणि गुजरातमध्ये तसच झाल आहे. ही एक खंत मनात सलत राहिली.

लेखक, विद्वान, क्रांतिकारक आणि समाज सुधारणाचे पोशिंदे होते. त्यांनी आयुष्यभर संकटांना तोंड दिल, पण विवेकाची कास सोडली नाही. स्वतंत्र्यापूर्व काळात आयुष्यभर क्रांतिकाराकांना हिमतीने मदत करणाऱ्या सयाजीरावांचे वेगळेपण हे युगद्रष्टा कादंबरीचे वेगळेपण आहे.

युगद्रष्टा महाराज हे एक प्रयोगशील शेतकरी राजाच्या चरित्रावर आधारलेले, ऐतिहासिक दस्तऐवजांचा धांडोळ घेऊन संशोधक वृत्तीने लिहीलेले महाकथन आहे. ब्रिटिशांनी भारतीय राजेशाहिला मांडलिकत्वाच्या जोखडात अडकवून ठेवले असताना बडोद्याच्या सहयाजीराव गायकवाड यांनी मात्र चातुर्याने क्रांतिकारी स्वातंत्र्यवीरांना आणि कर्त्यासमाज सुधारकांना पाठबळ पुरविले. तसेच राजेशाहीचे लोकशाहीत रुपांतर करण्याचा धाडसी प्रयोग करुन नवभारताच्या जडणघडणीचा पाया रचला. म्हणून त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार असे म्हणतात.

ग्रंथसेवा

त्यांना प्रवासची अत्यंत आवड होती. व त्यांनी जगभर प्रवास केला. जेथे जेजे चांगले असेल, तेते चोखंदळपणे स्वीकारुन आपल्या संस्थानाची सर्वांगीण भरभराट करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. लंडनला भरलेल्या पहिल्या दोन गोलमेज परीषदेत ते हजर होते. राष्ट्रीय आंदोलनाला त्यांचा

अप्रत्यक्ष पाठींबा होता. असे म्हटले जाते. ज्ञानवृद्धी, समाजसुधारणा व शिस्तबद्दध प्रशासन या सर्वच बाबतीत ते यशस्वी ठरले. हिंदूस्थानातील शेवटचा आदर्श राजा या शब्दात त्यांचे यशोचित वर्णन पंडित मदनमाहन यांनी केले आहे. मुंबई येथे त्यांचे निधन झाले.

# समाजमाध्यमे आणि आजचा युवक

कु. नुतन रमेश शिंदे
बी.कॉम. १

समाजमाध्यमे म्हणजेच सोशल मिडीया होय. तंत्रज्ञानाच्या युगामध्ये युवक वाचनापासून दुरजात आहेत. असा आरोप केला जातो, मात्र आजचा युवक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन आपले ज्ञान समृध्द करण्यासाठी मल्टीमिडीयाचा वापर करत आहे. त्यामुळे केवळ पुस्तक वाचनातुनच ज्ञान मिळते हा गैरसमज दुर होत आहे. आजचा युवक हा सोशल मिडीयाचा वापर करुन जागतिक खेड्यातील नागरिक बनुन एखाद्या प्रश्नांवर. विकासाच्या मुद्यावार आपली भुमिका मांडत आहे. म्हणजे सोशल मिडीयाच्या माध्यमातून युवक आपला सहभाग नोंदवत आहेत. त्याचा परिणाम शासनाच्या निर्णयावर होत असतो. सोशल नेटवर्किग वाईट नाही मात्र त्याचा वापर करणारे कसे आहेत यावरुन त्याचे उपयुक्ताता मुल्य ठरत असते. अलीकडे आण्णा हजारे यांच्या आंदोलनाला सोशल नेटवर्किगच्या माध्यमातून सकारात्म पाठिंब्याचा परिणाम दिसुन आला. मात्र ईशान्येकडील राज्यातील दंगलीच्या वेळी मात्र सोशल नेटवर्किगचा नकारात्मक वापर झालेला ही दिसतो. त्यामुळे सोशल नेटवर्किंग ही युवकांच्या हातातील दुधारी तलवार आहे. आजच्या युवकाकडे आधुनिक व्हर्जनचे मोबाईल उपलब्ध आहेत या मोबाईलवर इंटरनेट आल्यामूळे युवकांना अनेक प्रकारच्या बातम्या व्हिडिओ, ऑडिओ, घर बसल्या पाहता, वाचता, ऐकता येतात त्याच प्रमाणे, मोबाईलद्वारे चॉटिंग, एस. एम. एस च्या माध्यमातून सतत संवाद साधत असतात. संवादाच्या माध्यमातुन ज्ञान, माहिती, मनोरंजन अशा गोष्टी होतात. मात्र ज्ञान माहिती, मनोरंजनाची सिमा ओलांडुन सर्वत्र मनोरंजनासाठी वापर होत असल्याचे चित्र समारे येत आहे.

त्यामुळे युवकांकडे असलेल्या मल्टीमिडीयाचा उपयोग कशासाठी केला जात आहे याकडे पालकांचे दुर्लक्ष झालेले आपल्याला पहायला मिळते. युवकांनी मल्टीमिडीयाचा वापर सवंग मनोरंजनासाठी न करता ज्ञानाचे क्षितीज विस्तारण्याकरिता करणे अपेक्षित आहे. चित्रपटांची गाणी डाऊनलोड करुन ऐकत बसण्यापेक्षा अभ्यास करत असताना वाचलेली एखादा उतारा रेकॉर्डिंग करुन पुन्हा–पुन्हा ऐकला तर अभ्यास परिणामाकारक होऊ शकतो. तसेच पालकांनी देखील आपला पाल्य मल्टीमिडीयाचा वापर कशासाठी करतो याकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे मुले सायबर गुन्हे गारीला बळी पडणार नाहीत तसेच त्यांच्यामध्ये नैराश्य निर्माण होणार नाही.

आजचा युवाक मोबाईल, संगणकावर सतत फेसबुक, व्टिटर, ऑर्कट सारख्या सोशल नेटवर्किंगवर सकाळी झोपेतुन उठल्यापासून सायंकाळी झोपेपर्यंत सतत चॅटींग, सर्चिंग करत असतो. त्यामूळे आजच्या युवकाला संगणकाचे व्यसन जडलेले आहे. या व्यसनाचे दुष्परीणाम देखील आजच्या युवकांच्या आरोग्यावर होऊ लागले आहेत. फोटो आपल्यासाठी आठवणीशी निगडित आहेत. तरुण पिढीसाठी फोटो माहितीशी निगडित आहेत, इंस्टाग्राम ह्या एका अत्यंत महत्त्वाच्या आणि तरुण वर्गात खुप जोम धरलेल्या सोशल मिडीयाबद्दल आम्ही बोलत असताना माझ्या एका जाणकार मित्राने फोटो

बद्दलची या विषयाकडे बघायची माझी नजरच बदलुन टाकली.

वेगवेगळ्या सोशल मिडीयाचे तरुणवर्गातील स्थान तपासुन पाहणे हा आमचा विषय होता. सध्याच्या युगामध्ये सोशल मिडीयाला खुप महत्त्व आहे. इंस्टाग्रामसारख्या सुविधेने फोटोग्राफी हा प्रकार नव्वदीच्या आधीच्या दशकात जन्माला आलेल्या भारतीयांसाठी फारच खर्चिक म्हणजे आगदी पांढरा हत्ती हे विशेषण लावला जाणारा प्रकार होता. पण सुरुवातीला डिजीटल तंत्रज्ञानाने आणि नंतर ते तंत्रज्ञान मोबाईल फोनसारख्या तंत्रज्ञानाशी एकरुप झाल्याने फोटोग्राफी हा प्रकार इतकी वर्षे महागडा होता हे पटणे अश्यक्य व्हावे इतका सोपा व स्वस्त झालेला आहे. सगळ्यांकडे असणाऱ्या संगणक, टीव्ही किंवा मोबाईल अशा उपकरणांमुळे अजुनही खर्चिक भाग आहे. आधुनिक काळामाध्ये समाजमाध्यमाला खुप महत्त्व आहे. पूर्वी फोटो पाहायचा असेल तर छपाई हा एकमेव उपाय होता. त्यामुळेच फोटो कमी प्रिंट केले जायचे व जे प्रिंट केले जायचे ते आयुष्यातील लग्न, घरगुती समारंभ, भेटीगाठी अशा महत्त्वाच्या क्षणांशी निगडीत फोटोग्राफी केली जाते.

एखाद्या घटनेचे घटना घडत असताना फोटो काढुन ते शेअर करण्याची सवय असो व व्यक्त होण्यासाठी ह्या पिढीला मिळालेले हे नवे माध्यम आहे यात वादच नाही. या साऱ्यातुन शेअरिंग होतेच तसेच माहितीही मिळते. आजच्या तरुणाला त्याच्या अवडत्या व्यक्तीची मग ती राजकीय असो वा सिनेमा, क्रीडा क्षेत्रातील असो खुपच बारीक सारीक माहिती ह्या साऱ्यांमुळे मिळते. ही माहिती ह्या पिढीचे भान वाढविते. सोशल मिडीयाचा प्रभाव का वाढला आहे याची ही सारी कारणे लक्षात घेतलीतर ह्या माध्यमांकडे व ती सारी वापरण्याऱ्या तरुण पिढीकडे तुच्छतेने पाहायचा दृष्टिकोन कमी हाईल अशी आशा आहे

तंत्रज्ञानाचे प्रमाण वाढल्यामुळे अनेक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसत आहे. याचा समाजाला खुप फायदा होत आहे. हे माध्यम समाजोपयोगी माहितीच्या देवाण-घेवाणीसाठीही तितकेच परिणामकारक ठरते. हे आपण फार पूर्वीपासून दूरध्वनीचा वापर करुन वापरात आलेल्या अत्यावश्यक सेवा हेल्प डेस्क. आदी सुविधांतुन पाहतो आहोतच. इंटरनेटवरील अशी अनेक उत्पाद्ने अनेक प्रकारे वापरली गेल्यामुळे माहितीचा स्फोट झाला. बहुतेक सर्वच विषयांवरील सर्व प्रकारची माहिती सर्व प्रकारे (टेक्स्ट, फोटो, ऑडिओ आणि व्हिडीओ) उपलब्ध हाऊ लागली. नव्वदच्या व त्यानंतरच्या दशकात जन्मलेल्या जवळपास प्रत्यकाला ह्या सऱ्याचा खुप फायदा झालेला आहे. हे माध्यम हाताळणीस अत्यंत सोप्या व सतत जवळ बाळगु शकणाऱ्या तंत्रज्ञानासोबत इंटरनेट उपलब्ध असणे ही फारच क्रांतीकारक सोय ह्या पिढीच्या हातात आहे. प्रत्येक मोबाईलधारक याचा वापर अत्यंत चांगल्या किंवा वाईट प्रकारे करु शकतो.

तरुण वर्गाला सार्वत्रिक निवडुणकीसारख्या राजकीय प्रक्रियेबद्दल वाढत असलेली जाणीव ही चांगलीच गोष्ट आहे. आपल्या आजुबाजुला घडणाऱ्या गोष्टीबद्दल सजग असणे, त्याबद्दल भले, बुरे टोकाचे असे कोणी काहीतरी म्हणो. पण आपले स्वतःचे मत असणे गरजेचे आहे. हे वय घडण्याचे असते आणि अशी मते तयार करण्याची माणसिकता बळकट करते. वाचणाची अत्यंत कमी आवड टीव्हीचा वाढता प्रभाव, आदी कारणांमुळे दहा-बारा वर्षांपूर्वी तरुणाईबद्दल फारच काळजीचे वातावरण होते. पण हे

सगळे इंटरनेट आल्यावर स्वस्त होत गेले. आता तर इंटरनेटचा वापर आपण मोबाईलसारख्या वापरायला अत्यंत सोप्या माध्यमाद्वारे करु शकतो.

इंटरनेटच्या पाठीवरुन ओलेल्या सोशल मिडीया साईडस् व त्यांनी दिलेले व्यक्ती व्हायची संधी यातुन सोशल नेटवर्किगं वाढत गेले. जगाच्या कानाकोपऱ्यातील मंडळी एकमेकांशी संवाद साधु लागली वेगवेगळ्या आवडी, छंद आणि इतर औत्युकतेच्या विषयानुरुप हे नेटवर्किंग वाढत जात आहे. जिथे गर्दीत सतत वाढ आहे सर्वसामन्य समाज्यातील सर्व स्तरांतील लोकांचा सहभाग आहे अशा जत्रेपासून कुंभमेळ्यापर्यंत कोणत्याही गोष्टीबरोबर कॉमर्स (व्यापार/बाजार) लगेच चिटकते. या न्यायाने या सर्व सोशल नेटवर्किंगच्या माध्यमाचा लोकप्रियतेचा फायदा घेणारी उत्पादने तयार होत गेली व संवादातील सहजता वाढविणाऱ्या तंत्रज्ञानाला ते बाजारात आणणाऱ्या संशोधकांना महत्त्व आणि पैसा मिळत गेला.

आजच्या युवकांना संगणकाचे व्यसन जडले आहे. या व्यसनाचे दुष्परिणाम देखील आजच्या युवकाच्या आरोग्यावर होऊ लागले आहे. युवकांमध्ये कष्ट करण्याची जिद्द नष्ट होऊन असे आरामात जीवन जगण्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी आजच्या युवकामध्ये निर्माण झाली. त्यामुळे आजचा युवक राष्ट्रप्रेम, समाजिक जबाबदारी, कौटुंबीक जिव्हाळा यापासून दुर चाललेला दिसत आहे. म्हणजे एका बाजुला युवक मल्टीमिडीयाद्वारे जागतिक खेड्याचा नागरिक होऊ इच्छीत असला तरी स्थानिक पातळीचे संदर्भ विसरुन चंगळवादाकडे वाटचाल करु लागला आहे. त्यामुळे पुन्हा एखदा शासनाला सामाजिक संस्थांसाठी मल्टीमिडीया साक्षरता अभियान चालवावे लागणार आहे असे दिसते.

# समाजाला काय हवे श्रद्धा की विवेक

कु. प्राची मच्छिंद्र लोंढे
बी. ए. ३

''विवेक करीत नाही तो दुराग्रही आहे.
विवेक करु शकत नाही तो मुर्ख आहे.
विवेक करण्याचे धाडस करत नाही तो गुलाम आहे.'' एच डूमाँड

काळानुसार माणसाचे विचारही बदलत जातात. विचार हा शाश्वत नसतो. तो काळा नुसार बदलु शकतो. परंतू विवेक हे एकुणच सृष्टीच्या जीवनव्यवहारातील एक चिंतरन मुलच मानले जाते. आजच्या काळात श्रदेला दुर ठेवुन मानव समाजामध्ये सुख, विज्ञान तंत्रज्ञान हेच एकमेव प्राप्ती करुन देणारे माध्यम आहे. काळ बदलला असला तरी मनुष्य नावाचा प्राणी त्याच आकृती आणि प्रकृतीसह तसाच कायम आहे. मन, बुद्धी या सारखी अदृश्य इंद्रियेसुद्धा अनादिकालापासुन ते आजपर्यंत तशीच कायम दिसून येतात. आधुनिक काळातले आध्यात्मिक गुरु नवनविन शब्द घेऊन त्याचीही योगशिबीर भरवतात. हा सगळा प्रकार बघितल्यानंतर काळा बरोबर विचार बदलतात. भारतीय संस्कृतीने अतिशय विचारपूर्वक व्यक्ती आणि सामाजाचा विवेक जागृत ठेवण्यासाठी काही उपाय सांगितले आहेत. यातील पाहिला उपाय म्हणजे या संपर्ण ब्रम्हाडांचा निर्माता आहे. त्याच्याशी अनुसंधान ठेवणे आणि आपल्या गरजा मर्यादित ठेवणे या दोन गोष्टीचा विवेक जेथे शाबुत असतो तेथे समस्या निर्माण होत नाही. किंवा झाल्यातरी त्यातुन उपाय शोधता येतो.

ज्यावेळी एळाद्या झाडाची मुळे त्या माती पासुन तुटतात. तेव्हा वरच्या फांद्या देखील. शुष्क आणि कोरड्या होतात. अशी ही मुळ हेतुपासुन किंवा संस्कृतीपासुन तुटलेली पिढी केवळ विचारांच्या आहारी जाते. म्हणुन समाजातील अस्वस्थता, नैराश्यता किंवा भ्रष्टाचार, व्याभिचार, अत्याचार ते करतात. घर बांधल्यावर होम घालण्याची पद्धत आजही चालु आहे. होम घातल्याने घरामध्ये भरभराटी होते. व घर शुद्ध हाते. अशी लोकांची समजुत आहे. पण त्या होमला जेवढे पैसे घालवतात त्याऐवजी एळाद्या आश्रमाला भेट देऊन त्यांची असणारी गरज भागवली पाहिजे. पण गौतम बुद्धानी सांगितले आहे की दुसऱ्याच्या कल्याणासाठी आत्म परित्याग केला तर खरा यज्ञ असे म्हटले आहे. आत्म्याच्या शांतीसाठी कोणता देव प्रसन्न होत नाही. आणि खोटा यज्ञ प्राणीमात्राचा बळी घेणे आहे.

समाजामध्ये देव आहे असे म्हणतात. त्याची पुजा करतात. उपवास करतात. पण आपल्या महाराष्ट्रा मध्ये असणारी अनेक मंदिरे, मशीद यांच्या पुढे बसणारे भिकारी उपाशी पोटी आपला जिव मारुन जगतात. तरी त्यांना देव का प्रसन्न होत नसेल कारण तो देवच दगडाचा आहे. त्याच्या निर्मीती करणारा कोण आहे तर माणुसच आहे. या दगडाच्या देवावर पैसा खर्च करणारे अनेक समाजातील लोक आहेत. जर देव असताच तर स्त्रियावर होणारे अत्याचार रोखले असते. मुख्यतः या पृथ्वीतलावर हा देव नाही. प्रत्येक गावागावामध्ये यात्रा भरवली जाते. त्या देवाच्या नावावर पैसा कमावणारे भरपुर लोक

आहेत. त्या यात्रेमध्ये काही स्त्रीयांच्या अंगात येणे, केसामध्ये जट असणे असे प्रकार दिसुन येतात. दर्गायातून अंगारा आणून लावण्याचे अंधविश्वास माणसामध्ये उमटले आहेत. अंगावर येणारे फोड, कोड नायटा या आजारांना अंगारा लावल्याने तो बरा होतो असा समज आहे. आज आपल्या समाजामध्ये मंदिरासमोर बसणारी माणसे भिकारी वाटतात. पण मंदिराच्या आत बसून त्या देवाच्या नावावर आपली गरज भागवणारा हा भिकारीच समजला तर त्यात गैर काय ! समाजातील लोकांनी विवेकानुसार वागणे योग्य ठरेल या गोष्टीही ठळकपणे दिसून येतात.

आंधळेपणाने एखादी गोष्ट स्वीकारणे यास अंधश्रद्धा संबोधले जाते. या अंधश्रद्धेमध्ये विविध प्रकार आढळतात. त्यामध्ये जादुटोणा, मंत्र-तंत्र, नरबळी, भूत प्रेत पिशाच्या या संबंधित अंधविश्वास, अफवा पसरवणे, व कृती करणे या कृती प्राणी मात्रांच्या जिवावर विपरीत परीणाम होणे ही अंधश्रद्धा केली जात आहे. समाजातील अज्ञातांचा फायदा घेवून विघातक वृत्तीकडून होणारे शोषण थांबवण्यासाठी महाराष्ट्राने २०१३ साला कठोर कायदा केला आहे. याचे संक्षिप्त नाव महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी, प्रथा व जादुटोणा प्रतिबंध कायदा २०१३ असे आहे. भूत बाधा झाली तर मांत्रिकाकडे पाठवा अशी समाजमाध्यमातुन मागणी आहे.

सत्याला सत्य म्हणुन आणि असत्याला असत्य म्हणुन जगा

-भगवान गौतम बुद्ध

समाजामध्ये विविध धर्मांचे लोक राहतात. त्यामध्ये हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख या धर्मांची शिकवण सर्वश्रेष्ठ आहे. समाजामधील अनेक महापुरुषांनी अंधश्रद्धा व सत्याला अनुसरुन आपले विचार समाज माध्यमापुढे मांडले आहेत. तथागत गौतम बुध्द सांगतात पुजा-अर्चा करणे ही फक्त आपल्या पुर्वजांपासुन चालत आलेली परंपार आहे. तरी आपण त्या संबधी विचार करणे गरजेचे आहे. ह्या जगामध्ये देव खरंच आहे का? आणि तो कसा आहे ? देव कोणी पाहिला आहे का ? यावर आधारित त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. समाजामध्ये लोक देवामध्ये इतके गुरफटले आहेत की, त्यांना ऋषिमुणी सांगतील आजच्या पिढीने मागील केलेल्या पिढीचे विचार सोडून विज्ञानवादी व विवेकतेने वागले पाहिजे कारण त्याच्या पुढील येणाऱ्या पिढीला तीच शिकवण भेटते. त्यामुळे आपल्याला जन्म दिलेले आई-बाबा आपल्याला जीवन कसे घडवायचे हे सांगणारे शिक्षक यांची पुजा केली तर मनाला शांती लाभेल. तर प्राणीमात्रांवर होणारी अंधश्रद्धा बंद करणे आजच्या पिढीवर अवलंबून आहे.

जर देव हा शिव आहे. कल्याण करणारा आहे तर माणसे हत्यारे, चोर, खोटेपणा, करणारे का बनत आहेत? साधु पुरषांनी लोकांना ईश्वर भाग्य या आधारवर कठपुतली सारखं घरले आहे. देव कोणी पाहिला नाही लोक फक्त त्याची चर्चा करतात. जर कोणताही माणूस पंडित किंवा अपंडित असला तरी दुसऱ्यांना मुर्ख समजायला गुन्हा आहे. तर तो आंधळ्या माणसासारखा आहे. जो आंधळा होऊन दुसऱ्याच्या हातात मशाल दाखवत असतो.

आजपासुन एक शपथ घेतली पाहिजे. पृथ्वीवरच्या जीवंत महाराजाला देणगी देऊ नका त्याच्या दर्शनाला जाऊ नका. देणगी द्यायची तर आपल्या कर्जबाजारी शेतकऱ्याच्या कुटुंबाला द्या. कुठल्याही मंदिरात किलोभर सोन वाहु नका.

देव माणसात आहे माणुसकीत आहे.
पशुपक्षांना जगवा, निसर्ग वाचवा एवढेच
करा पहा किती मनाला समाधान मिळेल

# साहित्यिकांच्या भेटी

जयश्री घेरडे
बी. ए. ३

दिनांक – २४ जानेवारी, २०२० रोजी मराठी विभागातील प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख यांची सहलीच्या नियोजनाची बैठक पार पडली दिनांक – २४ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांनी सहलीसाठी परवानगी दिली आणि दिनाकं – २७ जानेवारी २०२० रोजी मराठी विभागाची शैक्षणिक सहल श्री. क्षेत्र नरसिंहवाडी येथे आयोजीत करण्यात आली. मराठी साहित्यीकांना भेटी देणे त्यांच्याशी साहित्यीक चर्चा करणे या उद्देशाने सहलीचे आयोजन करण्यात आले.

दिनांक – २७ जानेवारी, २०२० रोजी सकाळी ठिक ९ वाजता डॉ. अशोक बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली सहलीची गाडी निघाली. सदर सहलीमध्ये मराठी विभाग प्रमुख डॉ. मोहन लोंढे, प्रा. रविंद्र पाटील, मराठी विभागातील विद्यार्थी, बी. ए. भाग दोन मधील मराठी विषयाच्या विद्यार्थीनी यांचा समावेश होता.

सकाळी ठीक १० वाजता मिरज येथील जैन मंदिरात असलेल्या भिमराव धुळूबुळू यांच्या क्लासमध्ये पोहचलो तेथे कवी व महाराष्ट्र टाईमचे पत्रकार नामदेव भोसले, कवी भिमराव धुळूबुळू, प्रसिध्द व्यंगचित्रकार डॉ. अनिल दबडे या तिन्हीही मान्यवरांची भेट झाली. कवी नामदेव भोसले यांनी भिमराव धुळूबुळू यांची ओळख करुन देताना. त्यांना मिळालेले पुरस्कार, प्रसिध्द निवेदक, त्यांनी चित्रपटांसाठी लिहलेली गीते व त्यांच्या कविता संग्रहाचा परीचय करुन दिला. डॉ. अनिल दबडे यांची ओळख करुन देताना. त्यांनी लिहीलेल्या अठ्ठेचाळीस पुस्तके, दैनिकांमधुन प्रसिध्द होणारी व्यंगचित्रे व सदर मासीक सारांशचे संपादक, प्रसिध्द चित्रकार, त्यांना मिळालेले पुरस्कार, भारत देशाबाहेरील त्यांची भ्रमंती, उत्कृष्ठ कला शिक्षक असा त्यांचा परिचय करुन दिला. कवी भिमराव धुळूबुळू यांनी आपल्या मनोगतात त्यांच्या बालपणीच्या व शालेय जीवनाच्या आठवणींना उजाळा देत आपल्या दोन कविताही ऐकवील्या कवितेविषयी बोलताना ते म्हणाले. व्यक्तीच्या मनातले भाव टिपता आहे तर कविता सापडते, तसेच आपले अनुभव कवितेत पकडता आले पाहिजेत कवी नामदेव भोसले यांनी पुस्तका बरोबर माणसही वाचता आली पाहिजे असे सांगीतले. विद्यार्थीनी तेजस्वी पवार हीने मान्यवरांचे आभार मानले. धुळुबुळू सरांनी विद्यार्थ्यांना अल्पोपहार दिला आणि डॉ. अनिल दबडे यांनी आपल्या घरी येण्याचे निमंत्रण दिले व तेथुन आम्ही डॉ. अनिल दबडे यांच्या घरी असलेल्या मासिक सारांशच्या कार्यालयात आलो त्यांच्याशी मनमुराद गप्पा झाल्या. त्यांना अध्यात्माची आवड आसल्याने जीवनातील अध्यात्माचे महत्त्व व त्यांना आलेले अनुभव सांगितले. मासिक सारांश विषयी चर्चा झाली, त्यांनी काढलेल्या चित्रांचा संग्रह पाहिला, त्या बरोबरच विविध देशातुन आनलेल्या वस्तूंचा संग्रह ही पहायला मिळाला, चहापाणी झाल्यानंतर त्यांनी मासिक सारांशच्या जानेवारी २०२० चा अंकाच्या प्रति सर्वांना भेट म्हणून दिल्याव तेथून आम्ही निघालो.

मिरजेतील प्रसिध्द खरे मुक्त वाचलालयास भेट दिली. पुढे बालगंधर्व नाट्यग्रहास भेट दिली. फिरता रंगमंच, पडद्यांची साय, आसन क्षमता, प्रकाश योजना जाणून घेतली, नाट्यग्रहाच्या दुरुस्तीचे काम चालू असल्याने फारवेळ न थांबता मिरजेतील दर्ग्याचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र नृसिंहवाडीला जाण्यासाठी निझालो.

कृष्णा नदी काठी वसलेले श्री क्षेत्र नृसिंहवाडी या तिर्थक्षेत्राला भेट देऊन श्री. दत्ताचे दर्शन घेतले व तेथून शिरोळच्या श्री दत्त शेतकरी सह. साखर कारखाण्यावर पोहचलो तेथील हिरवागार निसर्गरम्य परिसर पाहिला. बगीच्यामध्ये भोजन केले व तेथून जयसिंगपूर मधील सिध्दीविनायक मंदिरास भेट दिली. तेथील फक्त विटांनी रचलेले आगळी – वेगळी वास्तू कला पाहिली व तेथून प्रसिध्द ग्रामिण साहित्यीक मोहन पाटील यांच्या मळ्यात गेलो.

तेथे त्यांच्याशी साहित्यीक गप्पा गोष्टी झाल्या. त्यांनी आपल्या मनोगतात आपल्या बालपणीच्या व शालेय जिवनातील अनुभवांना उजाळा देत आवांतर वाचनाचे महत्व सांगितले. ग्रामीण साहित्याविषयी चार्चा झाली. कथा निर्मिती प्रक्रिये बद्दल सांगताना ते म्हणाले आपल्या अवती–भोवती असलेले पात्र, घटना, प्रसंग यातूनच कथा जन्माला येते. फक्त ती शब्दांत मांडता आली पाहिजे. कविता लगेच लिहुन होईल. पण कथा कादंबरीसाठी बराच काळ द्यावा लागतो. प्रसिध्द कन्नड कांदबरीकार भैरप्पा यांच्या पर्व कादंबरीच्या निर्मिती प्रक्रिये विषयी सांगितले ती कादंबरी लिहीली. त्या बरोबरच मराठी विषयाच्या रोजगाराच्या संधी बद्दल सांगितले. त्यांच्याशी गप्पा मारताना विद्यार्थी रंगून गेले होते. चहापाणी झाल्यानंतर तेथून आम्ही कवठे महांकाळकडे येण्यासाठी निघालो. आणि ठिक ६.३० वाजता कवठे महांकाळ मध्ये पोहचलो.

अशा प्रकारे सदर शैक्षणिक सहल खऱ्या अर्थाने शैक्षणिक ठरली. सहली पाठीमागची उदिष्ट्ये व हेतू खऱ्या अर्थाने सफल झाले. अशा प्रकारची सहल प्रत्येक वर्षी आयोजीत व्हावी अशी विद्यार्थीकडून प्रतिक्रीया आली.

## ❊ लेक वाचवा ❊

कु. देवयानी कांबळे
बी. ए. भाग–१

आदिमाया शक्ती विश्वाची जननी
ते स्त्रीरुपच अवतरले नसते
तर हे जग तरी कुठून पैदा झाले असते ।।

वाघिणी समरुप जिजाऊ
ते स्त्रीरुपच अवतरले नसते
तर महाराष्ट्राचे दैवत शिवराय
तरी कुठून पैदा झाले असते ।।

माता भिमाई
ते स्त्रीरुपच अवतरले नसते
तर घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
तरी कुठून पैदा झाले असते ।।

परंतु ऐसी रत्ने प्रसवणारी माता
लेक म्हणून नको आहे आम्हांस आता
म्हणून गर्भातच करतो आम्ही तिचा खून
कोण आहे असा जगी या सांगा

अभागी आम्हाहून ।।
कौशल्याविना राम नाही
देवकी विना कृष्ण नाही
तर मुलीवाचुन मनुष्यजन्मच पुन्हा नाही
म्हणून मुलगी वाचवा ।।

## पुस्तक

कु. प्रियांका माने
बी.कॉम. भाग–३

अगं माझ्याकडे कधीतरी बघ
माझ्याकडे जरा नजर तरी टाक
तुझा खुप छान मित्र होईन बघ
कधी देणार नाय दगा तुला
जन्मभर साथ देईन तुला

सर्वांचे उत्तर असते माझ्याकडे
प्रश्नदेखील पडतात मला
उत्तरदेखील मिळते मला
तुझ्या एकही प्रश्नाचे उत्तर
माझ्याजवळ मिळणार नाही
असे चुकूनही कधी होणार नाही

माझ्याजवळ सर्व प्रकारचे आहे ज्ञान
मिळतो त्यामुळे तुम्हाला मान
तुमच्यामुळेच तर आहे माझी शान
कधी हटवू देऊ नको तुझे ध्यान

# महापूर २०१९ चा

कु. माधुरी संजय पाटील
बी. ए. भाग-१

आहो दादा देऊ नका मला
नुसती सहानुभूती
महापूरानं २०१९ च्या केलीय
माझ्या अवघ्या संसाराची हो माती...

तीळ-तीळ जपून उभा केलेला
हा संसार डोळ्यां देखत वाहुनी हा गेला
२०१९ च्या महापुरामध्ये असा हा तरंगु लागला

शेतातली पिकं
कुजुनि गेली
गोठ्यातली जितराबं २०१९ च्याच
महापुरांसारख्या कसायानं गिळली
तरीही सावकार मेला
करी व्याजाची हो मागणी
महापूरानं केलायं शेतीचा
हो ऱ्हास

भुमिपूत्रांच्या गळ्याला
लावलाय हा मोठा फास
उपाशि मरतोय जनाचा हो पोशिंदा
खायला नाही भाकर अन् कांदा

भरली जरी विहिर
पण आठले नाही रक्त
कर्ज माफी नको मला
पैसे, बंगला नको
मला फक्त रायला जीव
जगवायला आसरा
द्या फक्त नि आसरा
द्या फक्त...

# आठवण

## वडिलांस पत्र

कु. माधुरी संजय पाटील
बी. ए. भाग-१

प्रिय बाबा
आज  थोड एकटं एकटं वाटलं
बाकी काही नाही तुमची आठवण आली
म्हणून बोलावसं वाटलं....

चालायला लागल्यावर तूम्हीच पहिला हात
दिला होता. पण पुढे गेल्यावर नकळत
कधी दूर होतात? आज स्वत:च्या
पायावर उभी असले तरी धडपडल्या
सारखं वाटतं..
बाकी काही नाही तूमची आठवण आली
म्हणून बोलावसं वाटलं ...

जेवताना काऊ-चिऊ शिवाय कधी
घास पोटात गेला नाही आता तर
चिऊ बघायला सुध्दा मिळत नाही.
काऊ-चिऊसाठी पुन्हा एकदा रुसावं वाटलं
बाकी काही नाही तुमची आठवण आली
म्हणून बोलावसं वाटलं...

तुमची आठवण मनातून कधीच
जाऊ शकली नाही. आज
भरलेल्या आभाळांबरोबर
डोळ्यात पाणी दाटल्यासारखं वाटलं.
बाकी काही नाही तुमची आठवण आली म्हणून
बोलावसं वाटलं...

# आमचं कवठेमहांकाळ

कु. प्रतिक्षा माने
बी.कॉम. भाग–२

कवठेमहांकाळ आमचं झालं शहर,
आला त्याला हिरवाईचा मोहर,
कवठ्यात आमच्या हिरवळच हिरवळ...
महांकालीच्या दैवताने पडलं हे नाव,
म्हणूनच झालं मोठं शहर आमचं गांव,
माणसाला देतो माणूस भाव
काय सांगू याची महती राव...
नेता–पुढारी आमच्या शहराचे
निभावतात कार्य जबाबदारीचे
पालन करतात प्रत्येक नियमाचे
म्हणूनच ते आधार आमचे
आमच्या शहरात स्त्री म्हणजे महान
पुरुषांच्या बरोबरीने आहे अभिमान
सांगली जिल्ह्यात या शहराचीच चर्चा
प्रत्येक हक्कासाठी लोकांचा मोर्चा
प्रगती झाली शहराची
शहरातील घरांची अन् गावांची
गर्व नाही आम्हांला
पंख फुटले जीवनाला

# दवाखान्यातील आयुष्य

कु. दिपाली सुरेश चव्हाण
बी. कॉम. भाग–३

आनंदी जिवनात एकाकी दु:खच तुफान आलं
आणि जीवन माझं दवाखान्याशी जोडल
आयुष्यात उंच भरारी घेण्याचं स्वप्न
नियतिन क्षणार्धात तोडलं
डॉक्टर म्हणाले आता सारं आयुष्य
खॉटवरच काढायचय
तुटलेल्या स्वप्नाला इथेच जोडायचय

नियतिच्या या खेळीला मी पण
मान्य केलय
नकोस झालेल जीवन आता हवसं झालय
असं वाटतय आयुष्य खुप वाढलय
जिंदगी लंबी नही बडी होनी चाहिए
हा विचार मी मानलाय
माझ्यातील मी पणा एका वेगळ्या
वाटेवरती लागला

दवाखान्यातील या चार भिंतीची
जणू सवयच होऊन गेलीय
माझ्यातील मरणाची भीती कधीच मेली
माझ्यासाठी माझ्या मानसांची
घालमेल मी पण पाहिलीय
जगण्याची आशा पुन्हा जागी झालीय
शरीराने साथ सोडली तरी संकटाशी
लढल्याची शक्ती विचारांनी दिलीये...

# श्रावण

कु. संदेश दत्तात्रय चव्हाण
१२ वी (वाणिज्य)

ऋतु बदलतो श्रावण येतो,
संगे घेऊन पाऊस धारा,
हिरवाई लेऊन डोंगर सजली,
अंगणी जाई जुई अन् मोगरा....

ऊन पावसाचा खेळ मजेदार,
जग जणू स्वप्नचं भासे,
हसा, खेळा, नाचा सारे,
यात्रांचीही कमी नसे....

धनधान्याने रान बहरे,
शिवारातही श्रावण हसे,
बळीराजा मग हरखुन जाई,
तव आनंदाला ठाव नसे....

आनंदी मुले, आनंदी डोंगर,
पशु पक्षी अन् सारे शिवार,
नवीन झाली सारी सृष्टी,
वाहे चैतन्याची एक लहर....

असा हा श्रावण महिना,
दरवर्षी येतो...
भविष्याची सुंदर स्वप्ने,
माझ्या मनी पेरुन जातो...

# कुटूंब

कु. प्रांजली जाधव
१२ वी (कला)

कुणाच कुणाला कळत नव्हत
कुटूंब मात्र उध्वस्त होत ।।धृ।।
कोण म्हणत होतं अमावास्या चुकली
तर कोण म्हणत होतं पौर्णिमा चुकली
अरे चुकलं तर काहीच नव्हतं
फक्त नशीबच रुसल होतं
।। कुणाच कुणाला कळत नव्हतं
कुटूंब मात्र उध्वस्त होतं ।।

लेकरं उपाशी राहतील
आईला खुप काळजी होती
लेकरं मात्र गरिबीत, आनंद
हुडकावयाच्या नादात होती
का बरं असं वागावं
लेकरांना कळत नव्हतं
सार कळून सुध्दा आईला
काही केल्यानं वळत नव्हतं
।। कुणाच कुणााला कळत नव्हतं
कुटूंब मात्र उध्वस्त होत ।।

आता कुणीच हरायचं नव्हतं
साऱ्यानीच जिंकायचं होत
घराला घरपण आणायच होत
आईला विश्वासात घ्यायच होत
आता फक्त आणि आकाशाचीच
बोलायचं होतं
।। कुणाच कुणााला कळत नव्हतं
कुटूंब मात्र उध्वस्त होत ।।

# माझा बाप

माधुरी संजय पाटील
बी. ए. भाग १

बाप फोडायचा दगड
अंगी घामाच्या हो धारा
तवा बाप शोभूनी दिसायचा
जसा अवकाशातील तारा...

दिवसभराच्या मेहनतीनं
बाप दमायचा, थकायचा
उभ्या संसाराचा गाडा
तो मोठ्या हिंमतीने हाकायचा...

भाकरीच्या तुकड्यासाठी
रोज हातोडा घ्यायचा हाती
आम्हा लेकरांच्या शाळेसाठी
तुडवायचा भेगाळलेली माती...

घास मुटका भरवायचा
आमच्या इवल्या मुखात
त्यांच्या जलम कष्टात
आम्ही सदा हो सुखात...

कष्ट करुन त्यांचा
देह सारा शिणायचा
पण..काळजातलं दु:ख कधी
तो चेहऱ्यावर नाही आणायचा..

त्यांच्या सुखासाठी झटते
आज होऊन मी चंदन
त्याच्या असण्यानं फुलतं
आमच्या घराचंहो अंगण...

त्यांच्या सेवेसाठी
जीव माझा वेडा व्हावा
अशा गुणवान बापापोटी
जन्म पुन्हा-पुन्हा घ्यावा...

# शेतकरी

कल्याणी तडवळे
बी. ए. भाग ३

पावसाच्या वातावरणानं लागते आस
पेरायला करतो चालू
कळी ही लागते उमलू
लागतो शेतीचा ध्यास

गर्जना होताच लागतो धावू
पावसाची वाट लागतो पाहू
काळ्या आईला पाहत राहतो,
उद्याची स्वप्न रंगवितो.

कोंब वर लागतात दिसू
सण करतो साजरा
पावसाची पाहताणा  वाट,
दिवस जातात निघून

दिवसा मागून जातात दिवस निघून
पिके मोठी होतात
अवकाळीच्या पावसानं
पिक होतात उध्वस्त

स्वप्नांची होते राखरांगोळी
ध्यास लागते कर्जची
झोप लागेना राती
आता घेतो मी फाशी...

# स्त्री तुझे जीवन...

कल्याणी तडवळे
बी. ए. भाग ३

तुला कळले होते की, तुझ्यामुळे आम्ही आहोत,
तुझ्या मुळेच आमचे जीवन आहे,
नाही कळले कोण तुझे मन,
अन्, रांधा, वाडा, उष्टी काढा नाही तुझे जीवन.

गर्भपात केला मुलीला मारण्यासाठी,
मुलगा पाहिजे वंश वाढवण्यासाठी,
भेदभाव केला मुलगा अन् मुलीत,
स्त्रीचे हक्क असतात घर अन् चुलीत.

स्त्री होती म्हणून तुम्ही जगात आलात,
या जगाला मन भरुन पाहिलात,
गोठ्यातील गाय अन् घरातील माय,
सारखी कधीच नसते

आत्ताची स्त्री ही चुल अन मुल नव्हे,
तर आपले घर ही सांभाळते,
या जगापासून आपल्या,
कुटुंबाला वाचवते.

# अभ्यासाला वेळच नाही

सोनाली सुनिल कांबळे
बी. ए. भाग २

एका वर्षात असतात तीनशे पासष्ट दिवस
रविवार असतात बावन्न
आरामासाठी उरले तीनशे तेरा दिवस
उन्हाळ्याची सुट्टी पन्नास दिवस
उरले दोनशे त्रेसष्ट दिवस
रोजची झोप आठ तास वर्षात गेले एकशे बावीस दिवस
उरले एकशे चाळीस दिवस
रोज एक तास खेळ गेले वर्षातले पंधरा दिवस
उरले एकशे सव्वीस दिवस
रोज दोन तास दैंनदिन काम गेले तीस दिवस
उरले शहाण्णव दिवस
मित्र/ पहुण्याबरोबर गप्पा मारण्यात एक तास
रोज गेले पंधरा दिवस
उरले एक्याऐंशी दिवस
वर्षभरात निरनिराळे सण, उत्सव, समारंभ
सुट्टीत गेले पच्चाहत्तर दिवस
उरले सहा दिवस, वर्षभरात आपण किमान तीन
दिवस अजारी असतो
उरले तीन दिवस
सिनेमागृह लांब असेल तर सिनेमा नाटक
पाहण्यास गेले दोन दिवस
उरला एक दिवस
म्हणाल एक दिवस तर अभ्यास
अरे वाढदिवसाच्या दिवशी कोण अभ्यास करतं का?

# हिंदी विभाग

# सोच का निर्माण

अक्षय बाळसोा गेंड
बी. ए. ३

मै एक स्टेज पर खडा हूँ और मरे सामने पब्लिक बैठी है, उस दृष्टिकोन से मैं यह लिख रहा हूँ,

मै अपने मेन टॉपीक को शुरुवात करने से पहीले, मै आपको सोच के बारे में कुछ बताना चाहूँगा। इस दुनिया की सबसे ताकतवान चीज कोई है तो वह है सोच । मैं आप लोगों से एक सवाल पुछने वाला हूँ, मुझे यकीन है की आप लोग मुझे इसका सही जवाब देंगे । सवाल है– सबसे पहले ताजमहाल कहॉ पर बना है ? अगर आपका जवाब आग्रा है तो यह सवाल गलत होगा । सही जवाब है– सबसे पहले ताजमहाल शाहाजहाँन की सोच में बना है । उसके सोच मैं जैसी प्रतीकृती बनी वैसी ही प्रतिकृती उन्होंने पृथ्वी पर बनाई है । हमें जिंदगी मे कोई भी काम करना है तो, सबसे पहले हमें उसपर सोचना चाहिए ।

बिना संघर्ष कोई महान नही होता,
बिना कुछ किये जय जय कार नही होता,
जब तक नहीं पडती हथोडे की चोट,
तब तक काई पत्थर भी लोगों के लिए भगवान नही होता ।

(DREAM) मैं आप लोगों को अब DREAM यानी सपनों के बारे में बात करने वाला हूँ । अक्षर हम Life नें कामयाब होना है, तो हमारा सपना होना बहोत जरुरी है । चाहे वह कौनसा भी सपना हो। और हमें ऐसा नही करना है की आज का सपना कुछ और, और कल का सपना उससे अलग हो, ऐसा आप लोग करेंगे तो आप Life नें कभी कामयाबी की सीढी चठ नहीं सकेंगे । आपका जो भी सपना है जबतक वह सपना साकार नहीं होता, तब तक उस सपने के पीछे भागते रहना है । हमें सोते जागते स्रीफ उसी का खयाल आना चाहीए । हमारा जो टार्गेट और फोकस है उस रास्ते को हमे कभी छोडना नहीं है ।

खुदी को कर बुलन्द इतना,
कि हर तकदीर लिखने से पहले खुदा
बंदे से खुद पुछे बता तेरी रजा क्या है ।

हम लोग सपने दो तरह से देखते है । पहला सपना वह होता है जो हम खुली आँखो से देखते है, और दुसरा सपना वह होता है जो हम बंद आँखों से देखते है । जो भी लोग खुली आँखों से सपने देखते है, वह लोग आपना सपना साकार करने के लिए आपनी जान भी जोखीम में डाल देते है । उन लोगों को उनके सपनो के अलावा कुछ भी नहीं दीखाई देता । सपनों में बहोत ताकत होती है । वह कहते है ना– Dreams are the most powerfull energy in the world

अभी ना पुछ मेरी मंजील कहाँ है,
अभी तो चलने का इरादा किया है,
ना हारा हूँ, ना हारुँगा, जिंदगी मे कभी,
यह दुसरों से नहीं खुद से वादा किया है ।

(मकसद) जिन लोगों का सपना होता है, उन सपनों के पीछे उनका मकसद भी छीपा हुआ

होता है । और जीन लोगों का सपना है, मगर सपनों के पीछे उनका मकसद ही नहीं होता है, तो उस सपना केहलाना सही नही होगा । सपना है तो मकसद है । मकसद–मकसद यानी क्या होता है, हमारा मकसद होता है की हमें यह काम कयो करना है और वह सपना पुरा करने के लिए क्या करना पडेगा ? पर उससे पहले हमारा व्हुव क्लियर होना चाहिए । और जिसका व्हुव क्लियर होता है वह इस दुनिया में बहोत ही जल्दी कामयाब बन जाता है ।

सबसे पहले हमें अपनी Life में क्या करना है, उसका गोल सेट करना चाहिए । और जिसका गोल सेट होता है वह उसकी मंजील आसानी से पार कर सकता है । आपका मकसद यानी की आपका target फिक्स होना चाहए । आपका मकसद क्या होना चाहिए–

१) निशाना लगाने गोल करना या २) गोल बनाके निशाना लगाना ।

हौसले हो बुलंद तो हर मुश्लिल को आसो बना देंगे,
छोटी टहनियों की क्या बिसात, हम बरगद को ही हिला देंगे !
वो और हैं जो बैठ जाते हैं थक कर मंजिल से पहले,
हम बुलंद हौसलों के दम पर आसमां को ही सुका देंगे !

Love दुनिया की सबसे बडी ताकत प्यार है । प्यार के सहारे हम नामुंकीन को भी मुंनकीन कर सकते है । प्यार है तो emotion है, प्यार नहीं तो इमोशन भी नहीं । वह कहते है ना “World’s greatest strength is love” अगर आपका सपना है तो उन सपनों के प्रति आपको प्यार होना चाहिए । हमने जो भी सपना बनाया है, उस सपने की सारी जानकारी (A to Z) होनी चाहीए उसे ही प्यार कहते है ।

मैं आप सब लोंगो से एक सवाल पूछ रहा हुँ, आप लोगों में से ऐसे कितने लोग है जो प्यार करते है ? जवाब (कुछ लोग बताऐंगे की मैं अपनी माँ से, अपनी पिता से, अपनी Girlfriend से) हाँ, मैं वही प्यार की बात कर रहा हुँ, एक माँ अपने बेटे से करती है, मैं उसी प्यार की बात कर राहा हुँ, जहाँ एक बहण आपनी भाई से करती है, एक पत्नी अपनी पति से करती है, एक लडकी एक लडके से करती है और एक लडका एक लडकी से करता है । इसी तरह आपको आपने सपनों से प्यार करना चाहिए । ऐसे ही प्यार करते रहोगे तो आपका सपना हकीकत में बदल ने में देर नही लगेगी ।

प्यार तो किसी से भी होसकता है, चाहे वह निर्जीव हो या सजीव । मै जिस पेन से लिख रहा हुँ, मुझे उस पेन से भी प्यार हो सकता है । दुनिया में कौन–सी ऐसी अच्छी चीज नहीं है, जिससे हमे प्यार ना हो । बस उसके मायने अलग होते है, उसके रिश्ते अलग होते है, उसके भाव अलग होते, लेकिन उसका मकसद एकही होता है । सिर्फ और सिर्फ प्यार करना ।

किसी भी इंसान की कभी गुलामी मत करना,
करना ही है तो अपने सपनो की करो,
जो कभी–ना–कभी तुम्हें किसी मुकाम पर पहुँचा ही देगा ।

अगर आपका सपना, मकसद और उससे प्यार है तो आपको उसके बारे में सब जानकारी होनी चाहिए । मान लिजीए किसी का सपना गाडी खरेदना है तो 1)Model 2) Engine 3) Tank

capacity 4) weight 5) Price 6) colour 7) Ghears box 8) Date 9) ABS 10) Milege mileage

इन सब के बारे नें पता होना चाहिए।

जिन्दगी बहुत हसीन है,
कभी हंसाती है, तो कभी रुलाती है,
लेकिन जो जिन्दगी की घोंड मे खुश रहता है,
जिन्दगी उसी के आगे सर झुकाती है।

अब मैं आप लोगों को कुछ बताना चाहता हूँ आप अपनी जिवन मै कुछ बनना चाहते है या फीर आप लोग आपनी माँ, बाप के लिए कुछ करना चाहते है, तो आप लोगों ने जोभी रास्ता चुना है उस रास्ते पर आप लोग option मत रखो यार कही बार क्या होता है की लोग जो काम चुज करते है, अगर उसमें कामयाबा नही हुए तो, दुसरा काम चुज करते है। ऐसा आप लोग मत करो। आप लोगोंने जो भी करने की ठान ली है, तो उसी को अपना लक्ष्य बनाओ। सफलता नही मिली तो बार-बार प्रयास करो। प्रयास करने सही सफलता मिलती है। आपनी सफलता हो या लक्ष्य हो या फीर आपका सपना हो आप उसके पीछे इतना भागो की उनको भह लगना चाहिये की ये अब हमारा पीछा नहीं छोडने वाला है।

एक चौराहे पर आदमी खडा होता है। लेकिन उसे पता ही नही होता है की उसे किस तरफ जाना है। इसलिए सबसे पहले आपको आपना कयो क्लियर करना चाहिए।

मंजिले उन्हीं को मिलती है ,
जिनकी सपनो में जान होती है,
बही पंख होने से कुछ भी नही होता,
हौसलो से उडान होती है।

कई बार क्या होता है, की आपकी कला को सही दिशा देने का काम गुरु करते है। ऐसे गुरु आपकी Life मेंभी होंगे। आप लोगों ने तारे जमीन पर यह फिल्म देखी होगी। उसमें एक नऊ साल का बच्चा होता है। उसे पढने लीखने मे तकलीफ हाती थी। लेकिन उसे चित्रकला का बहोत शौक था। उसकी उम्र के बच्चे जो कर पाते थे वह नहीं कर पाता था। हर रोज वह दुनिया से लड रहा था। उसके दोस्त उस पर हसते थे, लेकिन उसे उसकी सफर मे एक गुरु मिलता है, जो उसकी कला को सही दिशा देते है। गुरु के माध्यम से उस बच्चे को एक उम्मीद की किरण दिखाई देती है। और वह बच्चा दुगनी ताकत के साथ मेहनत करता है। और सबके दिलों मे अपने लिए जगाह बनाता है।

## जिंदगी

ना जिना किसी के लिए,
जिना सिर्फ खुद के लिए ।।
ना हैं कोई आपना ,
ये हैं सब सपना ।।
जिने के लिए जिंदा रहना,
जिंदा हैं इसलिए नहीं जिना ।।

सोच लो एक बार,
ये जिंदगी ना आयेगी दोबार ।।
हो सके तो इतना जिना सिख लो,
हमारे जाने के बाद भी,
हमारा पिछे नाम निकले ।।

प्रियांका माने
बी. कॉम. ३

## मेरी माँ

जीवन में हर बात पर मेरा साथ
